# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण केंद्र

# समाजभाषाविज्ञान

**एम. ए. भाग २ : मराठी**

**सत्र ३ : अभ्यासपत्रिका क्र. ९**

**सत्र ४ : अभ्यासपत्रिका क्र. १३**

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**समाजभाषाविज्ञान**
एम.ए.भाग २ : मराठी
अभ्यासपत्रिका क्रमांक ९ व १३
२०१९ पासून होणाऱ्या परीक्षांसाठी

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१९
एम. ए. भाग-१ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-89327-90-8

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४. (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. एन. काशिद** (सदस्य सचिव)
I/c संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यासमंडळ : मराठी

अध्यक्ष : **डॉ. दत्तात्रय मल्लू पाटील**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

- **प्रा. (डॉ.) रणधीर शिंदे**
  मराठी विभागप्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
  सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
- **डॉ. शहाजी जगन्नाथ पाटील**
  पद्मभूषण वसंतरावदादा पाटील कॉलेज, तासगाव,
  जि. सांगली
- **डॉ. सुभाष गणपती जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **प्रा. डॉ. प्रभाकर पवार**
  मुधोजी कॉलेज, फलटण, जि. सातारा
- **प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण**
  श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर
- **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**
  नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **डॉ. उदय रामचंद्र जाधव**
  शहाजीराजे महाविद्यालय, खटाव, जि. सातारा
- **प्रा. (डॉ.) दासू वैद्य**
  मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
  विद्यापीठ, औरंगाबाद
- **डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्रा. (डॉ.) गोपाळ ओमाणा गावडे**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
- **श्री. के. एस. अटकरे**
  कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद

## प्रास्ताविक

समाजभाषाविज्ञान ही अभ्यासपत्रिका एम. ए. भाग २ साठी तयार करण्यात आलेली आहे. या अभ्यासपत्रिकेची क्रमांक ९ आणि १३ मध्ये विभागणी केली आहे. अभ्यासपत्रिका क्रमांक ९ ही सत्र तीन साठी असून त्यामध्ये १. समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप आणि व्याप्ती, २. भाषा, समाज आणि संस्कृती, ३. समाजभाषाविज्ञान : परिक्षेत्रे, ४. भाषा : समाजगट आणि विविधता आणि अभ्यासपत्रिका १३ मध्ये १. भाषाव्यवहार आणि भाषासंपर्क, २. भाषानियोजन आणि भाषाशिक्षण, ३. समाजभाषाविज्ञान आणि इतर अभ्यासशाखा, ४. समाजभाषाविज्ञान आणि मराठीच्या प्रमुख बोली असे घटक समाविष्ठ करण्यात आलेली आहेत.

समाजभाषाविज्ञान ही सामाजिक-सांस्कृतिक दृष्टिकोनातून भाषेकडे पाहणारी भाषाभ्यासाची सर्वात आधुनिक पद्धती मानली जाते. ही अभ्यासपद्धतीचे स्वरूप व व्याप्ती आपण प्रस्तुत अभ्यासपत्रिकेतून आपण अभ्यासणार आहोत. समाजभाषाविज्ञान या अभ्यासक्षेत्राचा उदय साधारणत: १९६० नंतर झालेला आहे. भाषा आणि समाज मांच्यामध्मे असलेल्या संबंधाचा अभ्यास समाजभाषाविज्ञानामध्ये केला जातो. भाषा हे समाजव्यवहाराचे माध्यम आहे. मा व्यवहारामधूनच भाषेची व्यवस्था आकाराला येते. तरीही भाषाभ्यासामध्ये व्यवहारापेक्षा भाषेच्या व्यवस्थेवरतीच भाषाभ्यासकांचे लक्ष केंद्रीत झालेले दिसते. समाजभाषाविज्ञानाच्या उदयापूर्वी भाषाव्यवहाराकडे पूर्णत: दुर्लक्ष झालेले दिसते. समाजामध्ये सर्वत्र एकच भाषा अथवा एखाद्या भाषेचे सर्वत्र एकसारखे रूप आढळत नाही. म्हणूनच जगभरात शेकडो भाषा प्रचलित असलेल्या दिसतात. भाषेच्या विविध रूपांमागे समाजाची सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी; तसेच भौगोलिक, राजकीय परिस्थिती कारणीभूत असते. त्यामुळे भाषा आणि भाषाव्यवहाराचा अभ्यास या संदर्भाधारेच करावा लागतो. भाषांकडे पाहण्याचा हा नवा दृष्टिकोण समाजभाषाविज्ञानाने दिला. भाषाभ्यासाचे सर्वात विकसित रूप म्हणून या अभ्यासपद्धतीकडे आज पाहिले जाते. या अर्थाने समाजभाषाविज्ञान हे आजचे भाषाविज्ञान आहे.

भाषा ही महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. समाजाची निर्मिती, अस्तित्व आणि विकास या गोष्टी भाषेमुळेच शक्य झालेल्या आहेत. भाषेतील शब्दांना प्राप्त होणारा अर्थ पूर्णत: समाजसापेक्ष असतो. त्यामुळे कोणत्याही भाषेचा विचार ती भाषा बोलणाऱ्या समाजाच्या संदर्भातच करावा लागतो. त्यादृष्टीने समाजभाषाविज्ञानात अनेक संकल्पना विकसित होत आहेत. यादृष्टीने या अभ्यासपत्रिकेत समाजभाषाविज्ञानाची परिपूर्ण ओळख विद्यार्थ्यांना व्हावी असे नियोजन केले आहे. प्रस्तुत पुस्तकात अभ्यासकांनी आपल्यापरीने या घटकांची ओळख करून दिली आहे. विद्यार्थ्यांनी या लेखनाव्यतिरिक्त संदर्भग्रंथांचे वाचन करावे आणि ही अभ्यासपत्रिका अधिक सखोलपणे समजून घ्यावी.

**■ संपादक ■**

**डॉ. नंदकुमार मोरे**
मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**समाजभाषाविज्ञान**
**एम. ए. भाग–२**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र–३ : अभ्यासपत्रिका ९** | |
| **डॉ. नंदकुमार मोरे**<br>मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **डॉ. प्रवीण लोंढे**<br>सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ |
| **प्रा. विनायक राऊत**<br>बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. पाटण, जि. सातारा | ३ |
| **डॉ. बाळासाहेब चव्हाण**<br>डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगांव, जि. सातारा | ४ |
| **सत्र–४ : अभ्यासपत्रिका १३** | |
| **प्रा. विनायक राऊत**<br>बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. पाटण, जि. सातारा | १ |
| **प्रा. सविता केंजळे**<br>कला, वाणिज्य महाविद्यालय, वडूज, ता. खटाव, जि. सातारा | २ |
| **प्रा. सुभाष वाघमारे**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | ३ |
| **डॉ. सुखदेव एकल**<br>कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. नंदकुमार मोरे**
मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका

## सत्र तिसरे : अभ्यासपत्रिका क्रमांक ९
## समाजभाषाविज्ञान

घटक १ समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप आणि व्याप्ती १

घटक २ भाषा, समाज आणि संस्कृती २८

घटक ३ समाजभाषाविज्ञान : परिक्षेत्रे ४४

घटक ४ भाषा : समाज गट आणि विविधता ६०

## सत्र चौथे : अभ्यासपत्रिका क्रमांक १३
## समाजभाषाविज्ञान

घटक १ भाषाव्यवहार आणि भाषासंपर्क ७६

घटक २ भाषा नियोजन आणि भाषा शिक्षण ९५

घटक ३ समाजभाषाविज्ञान व इतर अभ्यासशाखा ११४

घटक ४ समाजभाषाविज्ञान आणि मराठीच्या प्रमुख बोली १४७

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

**घटक–१**

# समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप आणि व्याप्ती

**अनुक्रमणिका**


१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रस्तावना

१.३ विषय विवेचन

१.३.१ समाजभाषाविज्ञान

१.३.२ भाष, बोली आणि समाज

१.३.४.४ ऐतिहासिक संदर्भ

१.३.५ समाजभाषाविज्ञानातील पायाभूत संकल्पना

१.३.५.१ भाषिक भांडार

१.३.५.२ लघुक्षेत्र

१.३.५.३ भाषिक प्रभावक्षेत्र

१.३.५.४ भाषाव्यवहार

१.३.५.५ द्वैभाषिकता आणि बहुभाषिकता

१.३.५.६ भाषाद्वित्व

१.३.५.७ भाषामिश्रण आणि भाषापरिवर्तन

१.३.५.८ भाषाबदल

१.३.५.९ भाषानिषिद्धता

१.३.५.१० भाषाशुद्धी

१.३.५.११ भाषाप्रदूषण

१.३.६ समाजभाषाविज्ञान या अभ्यास शाखेचा उदय

१.३.६.१ लिंगभेदाची भाषा

१.३.६.२ भाषिक संपर्क

१.३.६.३ भाषानिर्मिती

१.३.६.४ जीवनपद्धती अथवा समाजव्यवस्था

१.३.६.५ उद्योगव्यवसाय

१.३.६.६ धार्मिकता

१.४ समारोप

१.५ शब्दार्थ व टीपा

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ संदर्भ सूची

१.८ अधिक वाचन

१.९ क्षेत्रिय अभ्यास

१.१० उपक्रम

## १.१ १. उद्दिष्ट्ये

विद्यार्थी मित्रहो, प्रस्तुत घटकामध्ये आपण या समाजविज्ञानाचे स्वरूप आणि व्याप्ती समजून घेणार आहोत. हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला

- समाजिक भाषाविज्ञानाचे स्वरूप समजेल.
- भाषा, बोली आणि समाजाचा परस्परसंबंध समजून घेता येईल.
- सामाजिक भाषाविज्ञानातील विविध नावीन्यपूर्ण संकल्पनांचा परिचय होईल.
- समाजभाषाविज्ञान हे भाषाभ्यासाचे एक व्यापक क्षेत्र असल्याचे समजेल.

## १.२. प्रास्ताविक

संप्रेषण व्यवहारासाठी मानव जी ध्वनियुक्त व्यवस्था अवलंबितो ती व्यवस्था म्हणजे भाषा होय. व्यक्तीला भाषा येणे ही बाब सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्वपूर्ण आहे. भाषा न येणाऱ्या मानवी समाजाची कल्पना देखील करता येणार नाही. भाषेचा जन्म हा संप्रेषण व्यवहारासाठी झालेला असून संप्रेषण पूर्ण करणे हे तिचे मुख्य कार्य आहे. पारंपारिक भाषाभ्यास आणि आधुनिक भाषाविज्ञानातील वर्णनात्मक भाषाभ्यासापर्यंत भाषाभ्यासाची वाटचाल पाहता; भाषेच्या 'संप्रेषण व्यवहाराला' विशेष महत्त्व देण्यात आलेले नव्हते. या अभ्यासामध्ये 'भाषाव्यवहार' पूर्णतः दुर्लक्षित राहिलेला होता.

फेर्दिना द सोस्यूर या भाषाभ्यासकाने भाषाभ्यासात भाषिक वर्तन आणि भाषिक व्यवस्था असे भेद केलेले असले तरी, स्वतः त्यांनी केवळ भाषिक व्यवस्थेलाच प्रमुख अभ्यासविषय केले. सोस्यूर आणि त्याच्या प्रभावाने भाषेकडे पाहणाऱ्या संरचनावादी भाषाभ्यासकांनी ज्या भाषिक वर्तनामधून भाषेची व्यवस्था मिळते; त्या वर्तन प्रर्कियेकडेच दुर्लक्ष केले. विशिष्ट कालखंडामध्ये भाषा स्थिर मानून तिचे वर्णन करता येते; हा विचार सोस्यूर यांनी रुजविला. सोस्यूर आणि त्यांच्या नंतरच्या भाषाभ्यासकांच्या नव्या दृष्टीने जन्माला आलेली विचारधारा पुढे भाषिक परिवर्तन हे भौतिक विश्वातील कोणत्याही प्रकारच्या  विकास प्रक्रियेमुळे होत नाही; या परिवर्तनाच्या मागे सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थिती कारणीभूत असते; या विचारापर्यंत विकसित झाली. तत्पूर्वीच्या भाषाभ्यासात सामाजिक व्यवस्थेशी भाषाव्यवहाराचा संबंध असतो हे उपजूनही हा संबंध टाळून अभ्यास होत होता.

भाषिक व्यवहाराच्या सामाजिक अंगाचा अभ्यास करण्याची भाषाभ्यासाची नवी दिशा समाजभाषाविज्ञानाने दिली. भाषेच्या वर्तन प्रक्रियेचा म्हणजेच उपयोजित अंगाचा अभ्यास करणारे 'समाजभाषाविज्ञान' ही आज भाषाविज्ञानाची केवळ शाखा राहिली नसून स्वतंत्र अभ्यासशाखा म्हणून स्वतःच्या सिद्धान्त-संकल्पनावर उभी राहात आहे. त्यामुळे तिला भाषाविज्ञानाची शाखा न मानता भाषाभ्यासाची स्वतंत्र अभ्यासशाखा मानायला हवी.

## १.३ विषय विवेचन

### १.३.१ : समाजभाषाविज्ञान

समाजीकरण(Sociolization) प्रक्रियेमध्ये प्रत्येक व्यक्तीवर होणारा भाषा हा एक संस्कार आहे. मानवाजवळ भाषा आहे म्हणून तो इतर प्राण्यांपेक्षा वेगळा ठरतो. भाषा मानवी जीवनामध्ये अनुभव अभिव्यक्तीचे महत्त्वपूर्ण कार्य करते. मनुष्य हा समाजशील प्राणी असल्याने तो समाजात राहातो. त्याला जीवन संक्रमणासाठी भासणाऱ्या गरजांची पूर्तता समाजाशिवाय होऊ शकत नाही. त्यामुळे मानवाचे 'सामाजिक जीवन' अपरिहार्य असेच आहे. दैनंदिन जीवनामध्ये मानवाला अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. विविध व्यवहारांमध्ये सहभागी व्हावे लागते. व्यक्तीनुसार, समाजानुसार, वर्ग, पेशा, वय इत्यादी गोष्टींनी प्रत्येक व्यक्तीचे दैनंदिन जीवन व्यापलेले दिसते. या व्यवहारामध्ये व्यक्तीचा अनेकांशी संपर्क येतो. त्याला अनेक गोष्टींची गरज भासते. अशा वेळी भाषा त्याच्या मदतीला धावून येते. समाजातील प्रत्येक व्यक्तीला कोणत्या ना कोणत्या कारणांसाठी सतत व्यक्त व्हावे लागते. यातून निर्माण होणाऱ्या आंतरक्रियेमुळे समाज अस्तित्वात येतो. केवळ व्यक्ती एकत्र येण्याने समाज अस्तित्वात येत नाही; कारण समाज या संकल्पनेमध्ये आंतरक्रिया महत्त्वपूर्ण मानली गेलेली आहे.

आज मानवी जीवनातील संपर्कप्रक्रिया वेगाने विस्तारते आहे. विविध भाषांवर प्रभुत्व मिळवून, वेगवेगळ्या लोकसमूहांच्या भाषा आत्मसात करून व्यक्ती दिवसेंदिवस आपली संपर्कप्रक्रिया वाढवताना दिसते. 'आज जग एक खेडे बनते आहे' अशी विधाने याच अर्थाने वापरली जातात. येथे वाढता संपर्क हाच विचार अधोरेखित करावयाचा असतो. मानवाने कतीही वैज्ञानिक प्रगती साधली तरी; त्याचे परावलंबित्व न संपणारे आहे. त्याला विविध गरजांसाठी इतरांवर अवलंबून राहावेच लागते. यासाठी भाषा हेच साधन विचार अभिव्यक्तीसाठी सर्वात महत्त्वपूर्ण आणि प्रभावी ठरते आहे.

समाजिक भाषविज्ञान किंवा समाजभाषाविज्ञान या अभ्यासक्षेत्राचा उदय साधारणतः १९६० नंतर झालेला आहे. भाषा आणि समाज यांच्यामध्ये असलेल्या संबंधाचा अभ्यास समाजभाषाविज्ञानामध्ये केला जातो. भाषा हे समाजव्यवहाराचे माध्यम आहे. या व्यवहारामधूनच भाषेची व्यवस्था आकाराला येते. तरीही भाषाभ्यासामध्ये व्यवहारापेक्षा भाषेच्या व्यवस्थेवरतीच भाषाभ्यासकांचे लक्ष केंद्रीत झालेले दिसते. समाजभाषाविज्ञानाच्या उदयापूर्वी भाषाव्यवहाराकडे पूर्णतः दुर्लक्ष झालेले दिसते. समाजामध्ये सर्वत्र एकच भाषा अथवा एखाद्या भाषेचे एकसारखे रूप आढळत नाही. म्हणूनच जगभरात शेकडो भाषा प्रचलित असलेल्या दिसतात. भाषेच्या विविध रूपांमागे समाजाची सामाजिक-सांस्कृतिक पाश्वभूमी; तसेच भौगोलिक, राजकीय परिस्थिती कारणाभूत असते. त्यामुळे भाषा आणि भाषाव्यवहाराचा अभ्यास या संदर्भाधारेच करावा लागतो. भाषांकडे पाहाण्याचा हा नवा दृष्टिकोण समाजभाषाविज्ञानाने दिला. भाषाभ्यासाचे सर्वात विकसित रूप म्हणून या अभ्यासपद्धतीकडे आज पाहिले जाते. या अर्थाने समाजभाषाविज्ञान हेच आजचे भाषाविज्ञान आहे.

भाषा ही महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. समाजाची निर्मिती, अस्तित्व आणि विकास या गोष्टी भाषेमुळेच शक्य झालेल्या आहेत. भाषेतील शब्दांना प्राप्त होणारा अर्थ पूर्णतः समाजसापेक्ष असतो. त्यामुळे कोणत्याही भाषेचा विचार ती भाषा बोलणाऱ्या समाजाच्या संदर्भातच करावा लागतो.

भाषा हे सर्वात सुलभ, प्रभावी आणि अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असे संपर्क माध्यम आहे. नागरीकरण, जागतिकीकरण आणि प्रसारमाध्यमांचा वाढता प्रभाव यामुळे व्यक्तीची संपर्कप्रक्रिया विलक्षण विस्तारलेली आहे. बदललेल्या जीवनपद्धतीचा भाग म्हणून; विविध भाषांवर प्रभुत्व मिळविणे, अनेक भाषिकांच्या संपर्कात येणे, भिन्न भाषिकांशी समायोजन साधने अपरिहार्य बनले आहे. या प्रक्रियेमुळे संपर्कव्यवस्था विस्तारण्याबरोबरच गतिमानही होत आहे. 'जग एक खेडे बनले आहे' अशी विधाने प्रचलित होणे; हे बदलत्या जीवनपद्धतीचे द्योतक आहे. अशा विधानांमधून वाढता संपर्क सूचित करायचा असतो. मानवाने जीवनाच्या सर्वच क्षेत्रामध्ये वैज्ञानिक प्रगती साधली आहे. भौतिक साधनांनी बाजारपेठा खचाखच भरलेल्या आहेत. तथापि मानवाचे परावलंबित्व संपुष्टात आलेले आहे; असे मात्र नाही. अनेक गरजांच्या पूर्ततेसाठी त्याला इतरांवर अवलंबून राहावेच लागते. यासाठी भाषा हे साधन सर्वात महत्त्वपूर्ण आणि प्रभावी ठरले आहे. संपर्क आणि विचारांच्या प्रकटीकरणासाठी भाषेइतका अन्य दुसरा प्रभावी पर्याय उपलब्ध नाही.

भाषेचा उद्देश संदेशव्यवहार पूर्ण करणे हा आहे. जगातील प्रत्येक भाषा-बोलीकडून त्या भाषिक समाजातील प्रत्येकाचा संदेशव्यवहार पूर्ण केला जातो. कोणताही नवा संदेश देण्याची आणि ग्रहण करण्याची क्षमता भाषेजवळ असते. समाजभाषावैज्ञानिक अभ्यासपद्धतीमध्ये या संदेशव्यवहारावर लक्ष केंद्रीत केले जाते. त्यामुळे भाषा समाजनिर्मित असली तरी; भाषेचा वापर वैयक्तिक पातळीवर होत असतो. त्यामुळे भाषाभेदांची विभागणी व्यक्तिबोलीपर्यंत केली जाते. कोणत्याही भाषेच्या अंतर्गत रचनेमध्ये अनेक प्रकारचे भौगोलिक, राजकीय परिस्थिती इत्यादी कारणांमुळे पडलेले दिसतात. तर व्यक्तिबोलींमध्ये दिसून येणारी व्यक्तिविशिष्टता ही या कारणाबरोबरच व्यक्तीच्या स्वतंत्र अनुभवविश्वामुळे अस्तित्वात येते. व्यवहारामध्ये आपण एकच भाषा वापरणाऱ्या समाजाला 'मराठी समाज', 'कानडी समाज' अशी नावे देतो. तथापि एका विशिष्ट समाजाची भाषा कधीही

एकजिनसी नसते. त्यामुळे अशा कधीही एकजिनसी नसणाऱ्या भाषेचे आदर्श रूप कल्पून या रूपाचे विविध पातळ्यांवर विश्लेषण देणाऱ्या आधुनिक भाषाविज्ञानातील विचारप्रवाहांना समाजभाषाविज्ञान छेद देते.

### १.३.२. भाषा, बोली आणि समाज

एकाच समाजामध्ये अस्तित्वात असणाऱ्या विविध भाषिक रूपांमागे भौगोलिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती कारणीभूत असते. त्यामुळे भाषेचा आणि भाषाव्यवहाराचा अभ्यास या संदर्भातच करावा लागतो. भाषाव्यवहारामध्ये शब्दांना प्राप्त होणारे अर्थ हे समाजाकडून निश्चित झालेले असतात. विविध स्तर, वर्ग, धर्म, जाती, प्रदेश, नोकरी-व्यवसाय, वय, लिंग इत्यादींमुळे समाजात दिसणारे भेद भाषेमध्येही पाहावयास मिळतात. या भाषिक भेदांचा आणि आधुनिक भाषाविज्ञानामध्ये भाषाभ्यासासाठी गृहीत धरलेल्या ध्वनी, शब्द, वाक्य या भाषेच्या स्तरांचा विचारही या अभ्यासपद्धतीमध्ये केला जातो. त्याचबरोबर धातू, धातूला लागणारे प्रत्यय, सर्वनाम, नाम, विशेषणे, क्रियापदे, अन्वये यांचाही विचार सामाजिक संदर्भाच्या आधारानेच केला जातो.

मानवाचा भाषाव्यवहार व्यापक आणि संदर्भबहुल असतो. एखाद्या समाजाच्या भाषाव्यवहाराचे निरीक्षण केल्यानंतर अभ्यासकांच्या समोर येणारे निष्कर्ष; दुसऱ्या समाजाच्या भाषाव्यवहाराशी तुलना करू पाहाता संदिग्ध आणि अपुरे वाटतात. कारण प्रत्येक समाजानुसार भाषावाराचे संकेत बदलतात. एकंदरीत मानवी भाषाव्यवहाराचे जेवढे व्यापक स्वरूप अनुभवास येईल; तेवढे या अभ्यासपद्धतीचे स्वरूप व्यापक होत जाणार आहे. मानवाच्या व्यापक आणि संदर्भबहुल भाषाव्यवहाराचे निरीक्षण केल्यानंतर भाषेची असंख्य रूपे आणि नानाविध प्रकारचे भेद अस्तित्वात असल्याचे आढळतात. अशा भाषाव्यवहाराचे स्वरूप तपासणे आव्हानात्मक आहे. असे असले तरी; या अभ्यासपद्धतीचे सूत्र एकच आहे आणि ते म्हणजे भाषेला असलेला सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ होय.

### १.३.३. प्रमाणभाषा आणि बोली

भाषा आणि बोली हे खरे तर एकाच अर्थाचे दोन शब्द आहेत. व्यवहारात भाषा म्हणजे भाषा आणि बोली म्हणजे समाजातील विशिष्ट गटाकडून दैनंदिन व्यवहारात वापरले जाणारे एक भाषिक रूप असे आपण गृहित धरतो. प्रमाण भाषा आणि बोली संदर्भातील हा विचार येथे आपण मराठी भाषा आणि तिच्या बोली यासंदर्भात विवेचनाला घेऊ. कोणताही समाज कायम स्थिर नसतो. मराठी समाजही याला अपवाद नाही. समाजजीवनामध्ये झालेले अमूलाग्र परिवर्तन सर्वज्ञात आहे. या अगोदर क्षत्रप, युएची, श्वेत, हूण, शक, सबक्तगीन, गझनीचा महंमुद, इस्लामी, तुर्क, घोरी, खिलजी, तुघलक, मुघल इत्यादी घराण्यांनी या देशावर आक्रमणे केलेली आहेत. या सर्व स्वाऱ्यांबरोबर व्यापार, वेळोवेळी पडलेले दुष्काळ, देशांतर्गत राजवटींची अंतर्गत भांडणं, सत्तास्पर्धा अशा अनेकविध कारणांनी समाज बदलत राहिला. काळानुसार समाज परिवर्तनाची कारणे बदलत राहिली.

आपण आज जी मराठी म्हणून ओळखतो तिला आजचे रूप प्राप्त होण्यासाठी अनेक परिवर्तनातून संक्रमण करावे लागले आहे. अनेक भाषा आणि संस्कृती यांचे ऋण घेऊनच तिला आजचे सामर्थ्य प्राप्त झालेले आहे. मराठी ही भाषा संस्कृतोद्भव आर्य-भारतीय भाषा आहे. महाराष्ट्रासारख्या भौगोलिक दृष्टीने विस्तृत भूमीवर आणि महाराष्ट्राबाहेरही ती मोठ्या प्रमाणावर नित्य व्यवहारासाठी वापरली जाते. भारतीय स्वातंत्र्यानंतर इतर

राज्यभाषांच्याबरोबरीने मराठी भाषेलाही राजभाषा म्हणून मान्यता देण्यात आली. महानुभावांपासून ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, रामदास ते विष्णूशास्त्री चिपळूणकरांपर्यंत अनेक मान्यवरांनी मराठीला राजभाषा म्हणून मान्यता मिळण्यापूर्वीच तिची वाङ्मयीन महत्ता सिद्ध केलेली आहे.

मराठी भाषेचे प्रमाणभाषा म्हणून जे रूप ओळखले जाते; ती पूर्वाश्रमीची पुणेरी बोली होय. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय वर्चस्वामुळे ही बोली 'प्रमाणभाषा' या मान्यतेपर्यंत पोहोचली हे आपण मागे नोंदविले आहेच. महाराष्ट्र हे बहुसंख्येने मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे राज्य आहे. भौगोलिक दृष्टीने या राज्याचे कोकण, देश, खानदेश, मराठवाडा, नागपूर आणि उर्वरित विदर्भ असे देखील मानले जातात. मराठी भाषा असे म्हणताच आपल्यासमोर जे रूप येते, ते मराठीचे 'प्रमाण' म्हणून मान्यता मिळालेले रूप होय. तथापि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये व्यवहारात सर्वत्र हे रूप वापरले जात नाही. महाराष्ट्राच्या विस्तृत भूमीवर मराठीची अनेक बोलीरूपे अस्तित्वात आहेत. त्याचबरोबर एका विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीमध्येही त्या प्रदेशातील सामाजिक-भौगोलिक वैशिष्ट्यांनुसार विविध भेद आढळतात. यापुढे जावून बोलीचा सूक्ष्म विचार केल्यास बोलीरूप व्यक्तिगणिक भिन्न असल्याचे दिसून येते.

भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय परिस्थिती, शासन, भाषिकप्रदेशाला असलेली ऐतिहासिक पार्श्वभूमी इत्यादी कारणांनी एकाच भाषेची भिन्न-भिन्न रूपे निर्माण होतात. भौगोलिक दृष्टीने सारख्या प्रदेशामध्ये जाती, धर्म, व्यवसाय इत्यादी कारणांनी भाषा बदलताना दिसते. त्याचबरोबर भिन्न भाषा संपर्क, भौतिक विकास, नागरीकरण, परकीय आक्रमणे, राज्यक्रांती, भूकंप, दुष्काळ, महापुरासारख्या नैसर्गिक आपत्ती, नव्या गोष्टीचा ध्यास, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा झपाट्याने होणारा विकास, शिक्षण, अशा कितीतरी कारणांनी भाषा नेहमी बदलत राहाते. भाषा ही स्वयंसिद्ध सामाजिक संस्था असल्यामुळे बदलत्या समाजजीवनाबरोबर ती बदलत राहाते. त्यामुळे 'बदलणे' हा प्रत्येक विकसनशील भाषेचा नैसर्गिक गुणधर्म बनला आहे. मराठी ही देखील अशा परिवर्तनाच्या प्रक्रियेतून उत्क्रांत झालेली भाषा आहे. तथापि परिवर्तन हा भाषेचा नैसर्गिक गुणधर्म असला तरी, हे परिवर्तन विशिष्ट भाषा बोलली जाणाऱ्या प्रदेशामध्ये सर्वत्र एकसारख्या पद्धतीने होत नाही. म्हणूनच एका भाषेमध्ये अनेक स्थानिक भेद पाहायला मिळतात. हे भेद बऱ्याच वेळा एवढे वैशिष्ट्यपूर्ण आणि त्या प्रदेशाची स्वतंत्र वैशिष्ट्ये घेऊन तयार झालेले असतात की, तिला त्यामुळे स्वतंत्र बोलीचे रूप प्राप्त होते.

मराठीच्या उत्पत्तीसंदर्भात अभ्यासकांमध्ये एकवाक्यता दिसत नाही. यासंदर्भात भाषाभ्यासकांनी भिन्न-भिन्न मते नोंदविलेली आहेत. तथापि ही संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश या भाषांसह काही द्रविडी भाषांच्या संस्कारातून विकसित झालेली भाषा आहे; हे मत अनेक अभ्यासकांनी मान्य केल्याचे दिसते. तिच्या आजच्या रूपामध्ये तर अनेक परकीय, विदेशी भाषांमधील शब्दांचे ऋण दिसतात. भाषेच्या बाबतीत कोणतीही भाषा विशिष्ट याच एका भाषेपासून उत्क्रांत झाली; अथवा एका विशिष्ट कालखंडामध्ये तिच्यामध्ये विशिष्ट असे परिवर्तन घडून आले अशी विधाने येत नाहीत. भाषिकपरिवर्तन सूक्ष्म, तरल आणि मंदगतीने अविरत सुरू असते. शिवाय हे परिवर्तन विशिष्ट भाषा बोलल्या जाणाऱ्या सर्व प्रदेशामध्ये सर्वत्र एकसारख्या पद्धतीने होत नाही.

मराठी भाषेची प्रमाणभाषा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रूपाची लिपी आणि सत्तर टक्के शब्द संस्कृत

भाषेपासून उत्क्रांत झालेल्या भाषांच्या परंपरेतील आहेत. इंग्रजीसारख्या परकीय भाषेसह कन्नड, तामिळ, तेलगू या द्रविडी तर वेळोवेळी झालेल्या स्वाऱ्यांमुळे फार्सी, उर्दू आणि हिंदी, गुजराती या शेजारी राज्यातील भाषांतून शब्दांच्या बाबतीत मराठी भाषेने मुक्त हस्ते ऋण घेतलेले आहे. मराठीच्या प्रांत, जाती, धर्म, बोलीचा स्वतंत्र विचार होऊ शकतो. मराठीच्या विविध बोलींना अभ्यासकांनी अभ्यासाच्या किंवा संशोधनाच्या सुलभीकरणासाठी जाती, धर्म, व्यवसाय, स्थळानुसार नावे दिलेली दिसतात.

प्रमाणभाषा ही कधी काळी बोलीच असते. मराठी भाषेची 'कोकणी' ही बोली आज साहित्य अकादमीने स्वतंत्र भाषा म्हणून मान्य केली आहे. कोकणी, अहिराणी, वऱ्हाडी सारख्या मराठीच्या प्रमुख बोलींच्याही अनेक उपबोली आहेत. एखाद्या भाषेच्या बोलींचा अभ्यास अभ्यासकांसमोरील आव्हान असते. बोली निर्माण होण्याची कारणे अनेक असतात. एखाद्या प्रमाणभाषेच्या कितीही बोली असल्या तरी तिच्या सर्व बोली त्या प्रमाणभाषेला नवनव्या शब्दांचे भांडार पुरवीत असतात. बोली ही प्रमाणभाषेपेक्षा आधिक परिवर्तनशील असते. समाजातील बदल ती नैसर्गिकपणे स्वीकारते. बोली निर्मितीच्या बाबतीत 'भाषाविज्ञान आणि मराठी भाषा' या ग्रंथामध्ये डॉ.अनिल गवळी यांनी चंदगडी बोलीचे उदाहरण दिले आहे. ते लिहितात, ''महाराष्ट्र-कर्नाटकच्या सीमावर्ती भागात वेगवेगळ्या बोली निर्माण झाल्याचे दिसते. दोन शेजारच्या भाषा नव्या बोलीला जन्म देतात. चंदगड (महाराष्ट्र) तालुक्याच्या शेजारी बेळगाव(कर्नाटक) शहर एकीकडे आणि दुसरीकडे आंबोली, सावंतवाडी(महाराष्ट्र), गोवा असा प्रदेश असल्याने एक नवीनच 'चंदगडी बोली' निर्माण झाली आहे.'' चंदगडी बोलीच्या निर्मितीचे हे कारण यथार्थ वाटते. महाराष्ट्रभर मराठीच्या अशा अनेक बोली आहेत. यापैकी अनेक बोलींचा अभ्यास झालेला आहे. तर काही बोलींचा अभ्यास झालेला नाही. या संदर्भातील आढावा पहिल्या प्रकरणामध्ये घेतलेला आहेच.

### १.३.४. भाषा आणि सांस्कृतिक व्यवस्था

भाषेला असलेल्या सामाजिक संदर्भाचा शोध घेणे हे समाजभाषाविज्ञानाचे उद्दिष्ट आहे. हा सामाजिक संदर्भ पाडताळून पाहाण्यासाठी आजुबाजूला पुष्कळ उदाहरणे सापडतात. भारतीय समाजात लिंग, धर्म, जाती आणि उपजाती, विविध जातींचे परंपरागत व्यवसाय, उद्योग, समाजातील समजुती, नागरीकरणानंतर उदयाला आलेले आर्थिक स्तर, या आर्थिक स्तरानुसार अस्तित्वात आलेले नवे वर्ग, श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या पारंपरिक आणि आधुनिक कल्पना असे बहुस्तरीय भेद पाहावयास मिळतात. भाषावापरातही या भेदांचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रतिबिंब पडलेले दिसते. व्यक्तीला समाजीकरणाच्या (Sociolization) प्रक्रियेतून भाषा प्राप्त होताना त्या समाजाच्या सर्व संदर्भासहित प्राप्त होते. त्यामुळे प्रत्येकाच्या भाषावापरावर समाजाअंतर्गत भेदांचे परिणाम जाणवतात.

### १.३.४.१ परंपरा, श्रद्धा-समजुती

प्रत्येक समाजाची भाषा त्या समाजाशी संबंधित परंपरा, रूढी, समजुती, संस्कृती, व्यवसाय इत्यादी गोष्टींमुळे समृद्ध बनलेली असते. भाषाभ्यासकाला भाषेचे हे सर्व संदर्भ सारून भाषेचा विचार करता येत नाही. प्रत्येक समाजामध्ये आढळून येणारे हे संदर्भ त्या त्या समाजाच्या भाषेमध्ये खोलवर रुजलेले व भाषेशी एकजीव झालेले असतात. मराठी भाषेत रूढ झालेले लगीनघाई, गावगोंधळ, गावभवानी यासारखे शब्द पाहाता हे संदर्भ लक्षात येतात. श्रद्धा समजुतीतून प्रत्येक समाजाचे भाषावापराचे काही संकेत ठरलेले असतात. उदाहरणार्थ, कुंकू

पुसले, बांगड्या फुटल्या या वाक्यप्रयोगांचा अशुभसूचक अर्थ असल्यामुळे ही वाक्ये कुंकू वाढले, बांगड्या वाढल्या अशी उच्चारली जातात. तसेच घरातून जाताना 'जातो' न म्हणता; 'येतो' म्हणणे किंवा दुकान बंद करताना 'दुकान वाढवतो' असे म्हणणे ही त्याची आणखी काही उदाहरणे. समाजजीवन, राहणीमान, समाजाच्या बदलत्या मूल्यकल्पना यामुळे भाषा बदलत राहते. परंतु परंपरा, रूढी, श्रद्धा या प्रत्येक समाजामध्ये खोलवर रुजलेल्या असतात. पर्यायाने बदलत्या भाषेवरही त्याची छाप दिसतेच. त्यामुळे समाजभाषाविज्ञान ही अभ्यासपद्धती अधिकाधिक सर्वसमावेशक, संदर्भबहुल आणि बहुव्याप्त झालेली दिसते.

### १.३.४.२ पर्यावरण आणि भाषिक प्रभाव

सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरण, भौगोलिक परिस्थिती आणि भाषा यांचा परस्परसंबंध घनिष्ठ आहे. कारण पर्यावरण बदलले की भाषिक प्रभावक्षेत्र बदलतात. पर्यायाने भाषा बदलते. धर्म, जाती, राजकारण, नोकरी-उद्योगधंद्यांची ठिकाणे, वसतिस्थान, भौगोलिक परिस्थिती अशी अनेक कारणे भाषिक प्रभावामागे आहेत. या भाषिक प्रभावाचा विचार अद्याप विस्ताराने झालेला आहे. हा विचार केल्याखेरीज भाषेचे विश्लेषण करता येणार नाही. तसेच व्यक्तीच्या भाषिक कोशावर विशिष्ट क्षेत्राचा प्रभाव असतो. उद्यमनगरीमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या भाषेवर 'उद्योगजगताचा' प्रभाव जाणवतो. खेळाडूंच्या भाषेवर 'खेळाचा', मंदिरात पूजा-अर्चा करणाऱ्या पुजाऱ्याच्या भाषेवर 'धार्मिकतेचा', डॉक्टरच्या भाषेवर 'वैद्यकीय क्षेत्राचा' प्रभाव दिसतो. इंग्रज भारतात आल्यापासून येथील भाषांवर पडलेल्या इंग्रजीचा प्रभाव हा बदलत्या सांस्कृतिक पर्यावरणाचाच भाग आहे.

### १.३.४.३ पौराणिकतेचा संदर्भ

समाजाला, प्रदेशाला विशिष्ट अशी सांस्कृतिक परंपरा असते. त्यातून त्या समाजाच्या भाषेलाही सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि पौराणिकतेचे संदर्भ लाभतात. भारतीय भाषांच्या संदर्भात हे विशेषत्वाने जानवते. भारतीय संस्कृती प्राचीन आहे. भारतीय हिंदू समाजांमध्ये रामायण, महाभारत या आर्षमहाकाव्यांबरोबरच वेद, उपनिषदे, भगवद्गीता अशा ग्रंथांना विशेष महत्त्व आहे. त्यामुळे सर्वच भारतीय भाषांमध्ये या महाकाव्यांशी संबंधित संदर्भ प्रतिबिंबित झालेले आहेत. उदाहरणासाठी मराठी भाषेतील काही भाषाप्रयोग पाहाता येतील. कळीचा नारद, कुबेर, कंसमामा, शकुनीमामा, कुंभकर्ण, कर्ण, कृष्णकृत्य, कैकयी, चित्रगुप्त, जमदग्नी, हिंडिंबा, नारदमुनी, पूतनामावशीचे प्रेम, भीष्मप्रतिज्ञा, विश्वामित्री पवित्रा, वाल्याचा वाल्मिकी, एकलव्या इत्यादी व्यक्तिरेखा या महाकाव्यांमधील आहेत. दैनंदिन व्यवहारामध्ये व्यक्तीच्या वर्तनाची, गुण-दोषांची तुलना नकळत या व्यक्तिरेखांशी होते आणि तशी तुलनात्मक प्रतिमा साकारणारी भाषा व्यवहारासाठी वापरली जाते. भाऊ असावा लक्ष्मणासारखा, रामलक्ष्मणाची जोडी, कर्णासारखा दानशूर, कृष्णकारस्थानी, सतिसावित्री असे असंख्य भाषाप्रयोग या संदर्भाने भाषेमध्ये प्रचलित झालेले आहेत. भारतीय राजकारणांमध्ये नेते, पुढारी आणि राजकीय विश्लेषक-पत्रकार यांच्याकडून 'कुरुक्षेत्र' हा शब्द नेहमी वापरला जातो. याचे कारण ही महाभारतीय युद्धाची प्रसिद्धी 'रणभूमी' आहे. अलिकडे या कुरुक्षेत्राच्या ठिकाणी खोदण्यात आलेल्या कुपनलिकेमध्ये 'प्रिन्स' नावाचा लहान मुलगा खेळता-खेळता पडला. शर्थीच्या प्रयत्नानंतर प्रिन्सला बाहेर काढण्यामध्ये यश आले. त्यामुळे अनेक वर्तमानपत्राांमधून 'प्रिन्सने कुरुक्षेत्र जिंकले' असे वृत्त प्रसिद्ध झाले. त्याला बाहेर काढताना प्रशासनाची 'युद्धपातळीवरील धावपळ, तसेच 'प्रिन्स' आणि 'कुरुक्षेत्र'

या दोन शब्दांशी 'जिंकणे' या शब्दाचा जोडला गेलेला संदर्भ यातून वरील वाक्य वर्तमानपत्रामध्ये छापले गेले. भाषा कशी आकाराला येते याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

### १.३.४.५ ऐतिहासिक संदर्भ

पौराणिक संदर्भाबरोबरच समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी देखील भाषेच्या अभ्यासासाठी विचारात घ्यावी लागते. प्रत्येक समाजाला इतिहास आहे. हा इतिहास समाजाच्या वर्तमानावर परिणाम घडवून आणत असतो. मराठी समाजाच्या संदर्भात शिवरायांचे स्वराज्य, शिवकाळ, पेशवेकाळ खूपच महत्त्वाचा आहे. शिवाय येथील इंग्रजांचे राज्य हा देखील ऐतिहासिक संदर्भ भाषाविचारात महत्त्वाचा आहे. गड राखला, झेंडा आटकेपार रोवला, एकट्यानं खिंड लढविली, गनिमीकावा, तोफ डागली, 'ध' चा 'मा' केला, पाठीमागून वार केला, तलवार म्यान केली, अस्मानी-सुलतानी संकट, ग्यानबाची मेख, बाजीरावाचा नातू, यादवी, पानिपत झाले, विश्वास गेला पानिपतात, हुजरेगिरी, पगडी उतरवणे अशी अनेक प्रचलित भाषिक रूपे ही भाषेचा ऐतिहासिक संदर्भ तपासून ध्यानात घ्यावी लागतात. मराठी भाषेत स्थिर झालेले इंग्रजी, हिंदी, फार्सी शब्द समजून घेण्यासाठी ही ऐतिहासिक पार्श्वभूमी महत्त्वाची ठरते.

## १.३.५ समाजभाषाविज्ञानातील पायाभूत संकल्पना

### १.३.५ भाषिक भांडार

समाजभाषाविज्ञानातील 'भाषिक भांडार' ही संकल्पना जॉन गम्पर्झ यांनी मांडली आहे. प्रत्येक भाषिक समाजाचे एक भाषिक भांडार असते. या भाषिक भांडारामध्ये संदर्भानुसार विविध कप्पे तयार झालेले असतात. कोणत्याही समाजातील व्यक्ती एकाच प्रकारची भाषा वापरताना दिसत नाही. कोणाशी, कधी, काय, किती, कसे बोलावे याचे काही संकेत ठरलेले असतात. प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीशी बोलत असताना समोरच्या व्यक्तीचे वय, लिंग, समाजातील स्थान, प्रसंग याचा विचार करून बोलत असते. अशाप्रकारे व्यक्ती, स्थळ, काळ, वेळ याचा विचार करून बोलण्याच्या क्षमतेचा 'संदेशनक्षमता' असे म्हणतात. ही संदेशनक्षमता त्या व्यक्तीच्या भाषिक भांडारावर अवलंबून असते.

नोम चॉम्स्की याने आपला क्षमतेचा सिद्धांत मांडताना भाषिक प्रयोगामधून पूर्णतः एकजिनसी आणि स्थिर अशी नियमव्यवस्था वेगळी काढता येईल असे सांगितले आहे. ही एकजिनसी स्थिर अशी भाषा वापरताना असा एकसंध समाज तो गृहीत धरतो. तथापि समाजभाषावैज्ञानिकांना चॉम्स्कीचे हे मत स्वीकारार्ह वाटत नाही. समाजामध्ये भाषिक प्रयोगातील आढळणारी विविधता पाहिली तर समाजभाषावैज्ञानिकांचे मत योग्य ठरते. कारण समाजामध्ये भाषा अनेकविध कार्य करीत असते. भाषा वापरासंबंधी समाजामध्ये अनेक अलिखित सामाजिक संकेत पाळावे लागतात. त्यामुळेच भाषा वापरण्याची क्षमता सर्वच भाषिकांच्याजवळ आढळते. या क्षमतेला समाजभाषाविज्ञानामध्ये 'संदेशवहनात्मक क्षमता'(Communicative competance) या नावाने ओळखले जाते.

चॉम्स्की आणि त्याच्या अगोदरच्या भाषाभ्यासकांनी गृहीत धरलेली भाषेची एकसंध आणि स्थिर नियमव्यवस्था

समाजामध्ये वापरली जाऊ लागली तर भाषिक गोंधळ निर्माण होईल. कारण समाजामध्ये समायोजन करताना समोरील व्यक्ती, प्रसंग, संदर्भ काळ, विषय, परिस्थिती इत्यादी गोष्टी ध्यानात घेऊन आपली भाषा बदलावी लागते. पूर्णपणे एकजिनसी, स्थिर, एकसूत्री भाषिक नियमव्यवस्था कोणत्याही समाजाच्या भाषेमध्ये आढळत नाही. कोणत्याही समाजाच्या भाषेचे सूक्ष्म निरीक्षण केले तर वेगवेगळे पैलू अनेक पातळ्या असणारे 'भाषिक भांडार' त्या समाजाच्या भाषेमध्ये नांदत असल्याचे आढळून येईल.

विशिष्ट समाजातील लोक परस्पर विनिमयासाठी ज्या भाषा-बोलींचा प्रयोग करतात त्या सर्वांचा मिळून एक 'भाषिक कोश' तयार होतो. उदाहरणार्थ पुण्या मुंबईसारख्या महानगरामध्ये एकच एक भाषा बोलणारे समाज आढळत नाहीत. तेथील समाज दैनंदिन गरजा भागविण्यासाठी किंवा इतर विविध कारणांसाठी मराठी, हिंदी, इंग्रजी किंवा यापेक्षा वेगळ्या सीमावर्ती भाषांचा वापर करीत असतो. त्यामुळे अशा ठिकाणचा भाषिक कोश हा या सर्व भाषांचा मिळून बनतो. या कोशावर या समाजातील व्यवसाय, शिक्षण, श्रद्धा, समाजविशेष, आर्थिक-सामाजिक स्तर या सर्व गोष्टींचा प्रभाव असतो.

### १.३.५.२ लघुक्षेत्र

वरील भाषिक भांडाराच्या संकल्पनेमध्ये प्रत्येक समाजाचे एक भाषिक भांडार असते; आणि हे भाषिक भांडार प्रत्येक समाजानुसार भिन्न असते ही गोष्ट आपण नोंदविली. एखाद्या व्यवसायातील किंवा क्षेत्रातील लोक परस्पर विचार विनिमयासाठी ज्या भाषाबोलींचा किंवा भाषिक भांडाराचा प्रयोग करतात; त्या सर्वांचा मिळून एक भाषिक कोश तयार होतो. उदाहरणार्थ एखाद्या आरोग्य विभागामध्ये किंवा आरोग्याशी संबंधित क्षेत्रामध्ये शरीर, रोगस, जंतू, आरोग्य, डॉक्टर, औषधे, गोळ्या, ऑनिक, सलाईन, इत्यादी कितीतरी स्वतंत्र शब्दांचा प्रयोग होत असलेला पहावयास मिळतो. विशिष्ट समाजाच्या भाषिक भांडारात संदर्भागणिक वरील उदाहरणाप्रमाणे वेगवेगळे कप्पे तयार होतात. भाषा वापराच्या या क्षेत्रांना 'लघुक्षेत्रे'(domain) असे म्हणतात.

लघुक्षेत्राची संकल्पना सर्वप्रथम जर्मन अभ्यासक शिमट आणि रोर यांनी मांडली. समाजातील व्यक्ती आपल्या गरजांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या कारणांसाठी एकत्र येत असतात. प्रत्येक व्यक्तीचे परस्परांच्या सहकार्यामुळे निमार्ण झालेले सामाजिक नात्यांचे स्वरूपही निरनिराळे असते. या सर्व घटकांचा त्यांच्या भाषिक व्यवहारावर परिणाम होत असतो. एखाद्या महाविद्यालयामध्ये शिकणारा विद्यार्थी, क्रीडांगणावर, महाविद्यालयातील मित्राांमध्ये, घरी आई-वडिलांच्याबरोबर, परिसरातील मित्राांच्यामध्ये प्राचार्य किंवा शिक्षकांच्या सोबत एकच प्रकारच्या भाषा वापरताना आढळत नाही. तो विद्यार्थी प्रसंग, संदर्भानुसार आपली भाषा बदलतो. संकल्पना क्षेत्र बदलले की व्यक्तीची भाषा बदलते; कारण प्रत्येक बदललेला संदर्भ म्हणजे एक स्वतंत्र 'लघुक्षेत्र' असते.

लघुक्षेत्राचे स्वरूप बोलणाऱ्याचा हेतू, विषय, बोलणारे एकमेकांशी कोणत्या नात्याने बांधले गेले आहेत, परस्परांचे बोलण्याचे ठिकाण कोणते आहे यावरून ठरत असते. उदाहरणार्थ

**१. शिक्षण क्षेत्र**

अभ्यास, प्रवेश, वर्ग, पदवी, शिक्षण, अभ्यासक्रम, संशोधन, समीक्षा, टीका, सिद्धांत, प्रतिपादन, मत,

विचार, वक्तव्य, चर्चासत्र, परिसंवाद, चर्चा, परिषद, निबंध, शोधनिबंध, निष्कर्ष, उदाहरण, पुस्तके, संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, नियतकालिके, प्रयोग, प्रयोगशाळा, विद्यार्थी शिक्षक, सर, टिचर, मॅडम, प्राचार्य, अध्ययन, अध्यापन इत्यादी कितीतरी शब्दांचा प्रयोग या क्षेत्रामध्ये पाहावयास मिळेल.

**२. न्यायालन**

जज्ज, वकील, अपराधी, साक्ष, साक्षीदार, पुरावा, पोलीस, शोध, गुन्हा, आरोप, आरोपी, न्याय, कायदा, साक्षी, कलम, शिक्षा, अपराध, वादी, प्रतिवादी, पुरावा, तहकूब, कोर्ट, न्यायनिवाडा इत्यादी शब्द या क्षेत्रात आढळतात.

**३. क्रिकेट**

क्रिकेट हा खेळ भारतामध्ये सुमारे २०० वर्षापूर्वीपासून खेळला जात असल्याने हा खेळ मूळ ज्या देशातून आला त्या इंग्लंड देशातील इंग्रजी भाषेसह मराठी भाषेमध्येही या खेळाचा स्वतंत्र शब्दसंग्रह तयार झालेला आहे. बॉल (चेंडू), बॅट, स्टम्प (यष्टी), रन (धाव), सिक्सर (षटकार), फोर (चौकार), रनआऊट (धावचित), टिम (संघ), आऊट (बाद), प्लेअर (फलंदाजी), धावफलक, विकेट, रनरेट, कॅच (झेल), बोल्ड (त्रिफळा), दांडी, स्कार (धावा), पिच (खेळपट्टी), फिल्डिंग (क्षेत्ररक्षण), ग्राऊंड (मैदान), अम्पायर (पंच), कप्तान (कर्णधार) इत्यादी शब्द.

**४. व्यापार**

खरेदी, विक्री, दर, चढ-उतार, तेजी, मंदी, कमिशन, किंमत, नफा, तोटा, नुकसान, फायदा, माल, पत, पैसा, व्याज, कर्ज सुटे पैसे, दलाली, हमाली, व्यवहार, उधारी, रोख, रोखड, पॅकींग, वाहतूक, पोस्टेज, पार्सल, माल, नग, डॅमेज इत्यादी शब्द.

वरील लघुक्षेत्रामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील शब्दांचे मिश्रण दिसते. तथापि लघुक्षेत्रामध्ये अशा विविध भाषांचा समावेश जागतिकीरणासारख्या कारणांमुळे वाढतोच आहे. काही वेळा एकच वस्तू वेगवेगळ्या लघुक्षेत्रामंध्ये वेगवेगळ्या नावाने ओळखली जाते किंवा वेगळ्या अर्थाने वापरली जाते. उदाहरणार्थ; स्वयंपाक घरातील हळद, तांदूळ, जेवण, नारळ, या वस्तू देवघरामध्ये अनुक्रमे भंडारा, अक्षता, नैवेद्य, श्रीफळ या नावाने ओळखल्या जातात.

### १.३.५.३ भाषिक प्रभावक्षेत्र

समाजामध्ये वेगवेगळ्या कारणांसाठी अथवा संदर्भाने लोक एकत्र येताना दिसतात. संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाची भाषा एकसारखी नसते. एक व्यक्ती वेगवेगळ्या स्तरातील लोकांना भेटताना एकच एक भाषिक रूप वापरताना आढळत नाही. संदर्भानुसार प्रत्येक व्यक्ती आपली भाषा बदलताना दिसते. परंतु प्रत्येक व्यक्तीच्या भाषिक कोशावर एखाद्या क्षेत्राचा प्रभाव जाणवतो. उद्यमनगरीमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या भाषिक कोषावर 'उद्योगजगता'चा प्रभाव जाणवतो. मंदिरात पूजा-अर्चा करणाऱ्या पुजाऱ्याच्या भाषिक कोशावर धार्मिकतेचा प्रभाव दिसतो. ही यादी खूप लांबविता येईल. एकंदरीत भाषेवर सांस्कृतिक पर्यावरण, संस्कृती, परंपरा, श्रद्धा, धर्म,

जातीयता, साहित्य, इतर विविध कला, शेजारी प्रदेश, भाषा, वातावरण, भौगोलिक परिस्थिती अशा अनेक क्षेत्र, घटकांचा प्रभाव असतो. मराठीच्या संदर्भात या भाषिक प्रभावाचा विचार अद्याप कोणी विस्ताराने मांडलेला नाही. हे तर या प्रभावाचा विचार केल्याखेरीज समाजभाषाविज्ञानामध्ये भाषेचे विश्लेषण पूर्ण होणार नाही.

समाज, संस्कृती आणि भाषा यांचा सहसंबंध स्पष्ट करताना आपण भाषेला असलेले विविध संदर्भ तपासले आहेत. हे सर्व संदर्भ म्हणजे भाषेवर असलेले क्षेत्रविशिष्ट प्रभाव होय. भाषिक भांडाराची चर्चा करतानाही व्यक्तीच्या भाषिक कोशावर असलेले संदर्भविशिष्ट प्रभाव आपण नोंदविले आहेत. या संदर्भात ग. प्र. प्रधान यांनी भाषा आणि जीवन १९८५, वर्ष ३, अंक २ (उन्हाळा) या नियतकालिकांमध्ये लिहिलेल्या 'राजकारणातील भाषा' या लेखातील एक उदाहरण पहाता येईल. 'विधिमंडळामध्ये अर्थव्यवस्था कुंठीत झालेली आहे' या विषयावर दोन आमदार मत प्रतिपादन करताना जी भाषा वापरतात ती पाहा.

पहिला आमदार : आपल्या अर्थव्यवस्थेचे विमान रनवेवरच फिरतंय, या सरकारच्या हयातीत टेक ऑफ स्टेज येण्याची शक्यता दिसत नाही.

दुसरा आमदार : आपल्या अर्थव्यवस्थेचा गाडा चिखलात रूतून पडला आहे आणि दिवसेंदिवस तो अधिकच खोलात चालला आहे.

दोन्ही आमदारांच्या बोलण्याचा आशय एकच आहे. परंतु या दोन्ही आमदारांची सामाजिक पार्श्वभूमी वेगळी आहे. पहिला आमदार शहर-मध्यमवर्गीय आहे. त्याच्या भाषेवर त्याच्या वर्गाच्या जीवनपद्धतीचा प्रभाव आहे. तर दुसरा आमदार ग्रामीण भागातील आहे. त्याच्या भाषेवर त्याच्या जीवनपद्धतीचा, पर्यावरणाचा प्रभाव आहे. 'दशक्रिया' या बाबा भांड यांच्या कादंबरीतील भाषेवर अध्यात्म, धर्मशास्त्र, धार्मिक विधी यांचा प्रभाव दिसतो. याचे कारण या कादंबरीत पैठणच्या दशक्रिया घाटावर दशक्रियेचा विधी करणारे ब्राह्मण आणि या विधिवर स्वतःचा चरितार्थ चालविणाऱ्या लोकांचे भावविश्व येते. त्यामुळे त्यांच्या भाषेवर तो प्रभाव नैसर्गिकपणे पडतो.

भाषेवर क्षेत्रविशिष्ट प्रभावांबरोबर सांस्कृतिक पर्यावरण, संस्कृती (उदाहरणार्थ पाश्चात्त्य संस्कृती) राहणीमान, शिक्षण इत्यादींचाही प्रभाव दिसून येतो. उच्चशिक्षित भारतीय लोकांच्या भाषेवर इंग्रजीचा प्रभाव, विविध पाश्चात्त्य जीवनपद्धतींचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. शिक्षण, उद्योग, राजकारण इत्यादी व्यापक क्षेत्रे आज समाजजीवनातील भाषेमध्ये अपरिहार्य झालेली आहेत. त्यातून प्रभावक्षेत्राांची सरमिसळ देखील व्यक्तीच्या भाषाव्यवहारातून स्पष्ट होते. परकीय भाषांचा प्रभाव ही बाब तर सतत चर्चेत असते. त्याचबरोबर साहित्य, जातीयता, वर्ग, धर्म, श्रद्धा अशा गोष्टींचा भाषेवरील प्रभावही विचारात घेण्याइतका व्यापक आहे.

### १.३.५.४ भाषाव्यवहार

भाषा वाक्व्यवहारासाठी अस्तित्वात आलेली व्यवस्था आहे. विचार अभिव्यक्तीसाठी सर्व मानवजातीकडून ती वापरली जाते. भाषा, बोली कोणतीही असो; ती कितीही कमीत कमी ध्वनींनी (वर्णांनी) सिद्ध झालेली असो; विश्वातील यच्चयावत् गोष्टी मांडण्यासाठी ती आपली सर्व कौशल्ये पणाला लावते. कोणत्याही प्रकारची लिपी नसलेल्या बोली देखील विचार अभिव्यक्तीच्या सर्व गरजा पूर्ण करतात. ज्याप्रमाणे मनुष्य म्हणजे हात, पाय,

नाक, डोळे इत्यादीचा समुच्चय नव्हे; तो काहीतरी वेगळा आहे, इतर प्राण्यांपेक्षा त्याकडे काही कौशल्ये वेगळी आहेत. अगदी त्याप्रमाणे ध्वनी, शब्द, उपवाक्य, वाक्य यांचा समूह म्हणजे भाषा नव्हे. भाषा अत्यंत सूक्ष्म, तरल, व्यामिश्र, गुंतागुंतीची व्यवस्था आहे; जी समाजमनामध्ये स्थित असते.

समाजमनामध्ये स्थित असणाऱ्या भाषेचा प्रत्येक व्यक्ती आपल्या पद्धतीप्रमाणे वापर करीत असते. या व्यक्तिगणिक भाषावापरालाच भाषिक व्यवहार म्हणतात. उदाहरणार्थ; एखादी व्यक्ती बाजारामध्ये केळी खरेदी करताना अनेक प्रकारचे भाषिक प्रयोग करू शकते. जसे;

काय हो, केळी कशी देताय?

अहो, केळी कशी डझन आहेत?

ओ, काय दराने देताय केळी?

अहो, केळ्यांचा भाव काय?

ओ, काय भावाने देणार केळी?

व्याकरणीय नियम पाहता प्रत्येक वाक्यांमध्ये खूपच फरक आहे. एवढेच नव्हे तर काही वाक्ये वर्तमानकाळात, काही भूतकाळात तर काही भविष्यकाळात उच्चारली गेली आहेत. तरीही सर्व वाक्यांतून एकच अर्थ ध्वनित होतो. ज्या व्यक्तीच्या मनामध्ये मराठी भाषा स्थित आहे; त्यांनी वरील कोणतेही वाक्य उच्चारले तरी अभिप्रेत अर्थ कळतो. व्यवहारात कोणताही अडथळा निर्माण होत नाही. शाळेतील घटना घरी सांगताना मुलं ती आपल्या भाषेत सांगतील पण प्रत्येक मुलाचे म्हणणे किंवा घटनाबीज सारखेच असेल. संस्कारीत रूपामध्ये प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये स्थित असणारी भाषा म्हणजे सोस्यूरच्या संकल्पनेतील भाषाव्यवस्था (langue) होय. तर या भाषेची विविध वैयक्तिक आणि व्यावहारिक रूपे म्हणजेच भाषिक व्यवहार (Parole) होय.

### १.३.५.५ द्वैभाषिक आणि बहुभाषिकता (Bilingual & Multilingualism)

एखाद्या प्रदेशातील भाषिक समाज दैनंदिन व्यवहारामध्ये दोन भाषांचा आधार घेऊन व्यवहार करतो; त्या समाजाला 'द्वैभाषिक समाज'(Bilingual) असे म्हणतात. उदाहरणार्थ; कॅनडा हे राष्ट्र द्वैभाषिक राष्ट्र म्हणून ओळखले जाते. या देशामध्ये फ्रेंच आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये व्यवहार चालतो. शाळा-महाविद्यालये द्वैभाषिक असून या दोन्ही भाषांवर प्रभुत्व असावे यासाठी येथे दोन्ही भाषा शिकविल्या जातात. गोवा राज्य असे द्वैभाषिक राज्य आहे. कोकणी ही अलिकडे मान्यता मिळालेली भाषा आणि मराठी अशा दोन्ही भाषांना सरकारी मान्यता आहे. एखाद्या द्वैभाषिक समाजाचा अभ्यास समाजभाषाविज्ञानामध्ये अनेक अंगाने केला जातो. सामाजिक स्तरानुसार द्वैभाषांचा भिन्न वापर आढळतो. उच्चवर्गीय अभिजन लोक सर्रास दोन भाषांचा अवलंब करतात. प्रसंगी ते घरात देखील दत्तक भाषेचा अवलंब करताना आढळतात. परंतु या वर्गातील लोकांना दुसरी भाषा कामचलाऊ येते. दुसऱ्या भाषेवर या लोकांचे प्रभुत्व नसते. हे लोक गरजेपुरते दुसऱ्या भाषेचा प्रसंगानुसार वापर करताना दिसतात.

बहुभाषिक समाजाची निर्मिती द्वैभाषिकतेनंतर सुरू होते. भारत हा एक बहुभाषिक देश म्हणून जगामध्ये प्रसिद्ध आहे. भारतातील हिंदी मातृभाषा असलेल्या बहुतांश प्रदेशावर जास्तीत जास्त लोक कमीत कमी तीन भाषा बोलताना दिसतात. इंग्रजी, हिंदी आणि त्या प्रदेशाची स्थानिक भाषा हे लोक बोलतात. बहुतांश राज्यांमधून प्राथमिक शिक्षणापासून या तिन्ही भाषा शिकविल्या जातात. महाराष्ट्रामध्ये मराठी प्रथम भाषा, हिंदी द्वितीय भाषा आणि इंग्रजी तृतीय भाषा म्हणून अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट केलेली आहे.

मुंबईसारख्या महानगरामध्ये तेथील गरज म्हणून बहुभाषिक झालेले लोक आढळतात. ही संख्या अशा शहरांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात असते. अशा शहरांमध्ये परप्रांतातून स्थलांतरीत झालेला एखादा अभियंता घरी तो केरळी असेल तर तामीळ बोलेल, स्थानिक भाषा म्हणून मराठीचा अवलंब करील, राष्ट्रभाषा म्हणून हिंदी जाणेल आणि कार्यालयामध्ये इंग्रजीचा वापर करील. या भाषांच्या उच्चारावर त्याच्या मातृभाषेचा वैशिष्ट्यपूर्ण प्रभाव असला तरी; या सर्व भाषांवर त्याने प्रभुत्व मिळवलेले असते. या भाषांचा वापर या व्यक्तीकडून प्रसंगी, संदर्भ पाहून होत असतो.

### १.३.५.६ भाषाद्वित्व (Dialossia)

समाजभाषाविज्ञानामध्ये 'भाषाद्वित्व' ही संकल्पना सर्वप्रथम चार्लस् फर्गसन याने मांडली. प्रत्येक किंवा प्रत्येकाच्या भाषेची साधारणतः दोन रूपे दिसतात. या रूपांना औपचारिक व अनौपचारिक रूप असे म्हणता येईल. शिक्षण, पत्रव्यवहार, शासनव्यवहार, प्रसारमाध्यमे यांच्याशी संबंधित क्षेत्रामध्ये औपचारिक भाषेचे रूप उपयोजिले जाते. तर कुटुंब, मित्र परिवार आणि दैनंदिन व्यवहारामध्ये अनौपचारिक भाषेचे रूप उपयोजिले जाते. अशाप्रकारे ही दोन्ही रूपे जेव्हा एकाच समाजात अस्तित्वात येतात तेव्हा भाषेच्या या स्थितीला 'भाषाद्वित्व' (Dialossia) असे म्हणतात.

### १.३.५.७ भाषामिश्रण आणि भाषापरिवर्तन

कोणत्याही समाजाची भाषा संपर्कात येणाऱ्या भाषा-बोलींपासून ऋण घेऊन समृद्ध बनत असते. विविध भाषांमधील शब्दांचे आदान-प्रदान ही आजच्या काळात सहजप्रवृत्ती बनलेली आहे. मराठी भाषेचा अभ्यास करताना आपल्या लक्षात येते की; या भाषेत इंग्रजी, हिंदी, कन्नड, तेलगू, तामीळ, गुजराती इत्यादी भाषेतील शब्द मिसळले आहेत. ही प्रक्रिया व्यापार, नोकरी-व्यवसाय, विविध वैज्ञानिक शोध, नवी उपकरणे यामुळे अविरत सुरूच आहे. १३ ऑक्टोबर २००६ च्या दैनिक सकाळ (कोल्हापूर) मधील एक उदाहरण या संदर्भात पाहता येईल. न्यूझीलंडच्या क्रिकेटपटूंनी मुलाखत देताना असे म्हटले की, ''आम्हाला जणू फ्रिजरमधून ओव्हनमध्ये आल्यासारखे वाटत आहे.'' हे वाक्य अनुवादित असले तरी या आधुनिक इलेक्ट्रिकल उपकरणांचा उल्लेख भाषा कशी परावर्तित झाली यासाठी उपयुक्त आहे. 'साहेब एक्सलंट बोलले', 'मुलांनी प्रयत्न करावयास हवा. कोशिश करनेवाले की हार नही होती.' यासारखी वाक्ये भाषामिश्रण व भाषापरिवर्तन दर्शवितात. मात्र संरचनावादी भाषाभ्यासकांचा भाषांकडे पाहण्याचा दृष्टिकोण व्यापक नव्हता. चॉम्स्कीच्या क्षमतेच्या सिद्धान्तावर डेल हाइम्स यांनी आक्षेप घेतला आणि स्वतः 'संदेशवहन क्षमतेची संकल्पना, (Communication comptence) मांडली. विल्यम लॅबाव्ह या भाषाभ्यासकाने तर सामाजिक संदर्भापासून भाषेला वेगळे काढून भाषाविज्ञान असे काही अभ्यासक्षेत्र

असूच शकत नाही असा विचार मांडला. हा भाषाभ्यासक भाषाविज्ञान आणि समाजभाषाविज्ञान यांच्यामध्ये खूप मोठा फरक असल्याचे मत नोंदवितो. लॅबाव्ह यांनी भाषेचे संशोधन करताना 'टेपरेकॉर्डर'चा वापर केला. त्यामुळे त्यांच्या अभ्यासामध्ये नैसर्गिक संभाषणाची सामग्री आधाराला मिळाली. समाजामध्ये लोकांकडून वेगवेगळ्या परिस्थितीत उच्चारलेल्या शब्दांचे त्यांनी रेकॉर्ड केले. प्रत्यक्ष पुराव्याने सिद्ध केलेला हा अभ्यास म्हणूनच इतर संशोधकांच्या अभ्यासापेक्षा वेगळा ठरला. या अभ्यासातून लॅबाव्ह यांनी विशिष्ट समाजातील लोकांच्या बोलीभाषेमध्ये पडत जाणारा फरक दाखवून दिला. लॅबाव्ह आपल्या अभ्यासाला Sociolinguistics असे म्हणण्याऐवजी Plain linguist म्हणण्याला पसंती देतात. लॅबाव्ह यांच्या बरोबरीने याच वेळी फिशमन या भाषाभ्यासकाने परस्परप्रक्रियांचा अभ्यास करणारे नवे अभ्यासक्षेत्र कल्पिले. या सर्व भाषाभ्यासकांनी सोस्यूर आणि नंतरच्या भाषाभ्यासावर आक्षेप घेत आपल्या सिद्धांतांचे प्रतिपादन केले. संरचनावादी भाषाभ्यासकांचा भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोण व्यापक नाही; या मूलभूत जाणिवेमधून 'सामाजिक भाषाविज्ञान' या नव्या अभ्यासक्षेत्राचा उदय झाला.

### १.३.५.८ भाषाबदल

'भाषाबदल' ही प्रक्रिया भाषिक परिवर्तनाला गती देणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतून इतरांच्या भाषेतील शब्दांची आयात मूळ भाषेमध्ये सुरू असते. व्यक्तिबोली संपर्क प्रक्रियेसंदर्भात भाषाबदलाचा विचार केल्यास हा बदल उच्चारवैशिष्ट्य, शब्दांची निवड, वाक्यांची रचना, बोलण्याची लकब या पातळीवर सुरू झाल्याचे दिसते. समोरील व्यक्तीची भाषा पाहून; आपल्या भाषेतील संभाषण थांबविणे आणि समोरील व्यक्ती ज्या भाषेतून प्रतिसाद देते ते पाहून स्वतःची भाषा बदलणे या प्रक्रियेला 'भाषाबदल' असे म्हणतात. समाजभाषाविज्ञानामध्ये भाषिक प्रदूषणाच्या संदर्भात विचार करताना; भाषामिश्रण, भाषाबदल या प्रक्रियांतून होणाऱ्या भाषांच्या परिवर्तन प्रक्रियेच्या स्वरूपाचा अभ्यास केला जातो. या परिवर्तनामागील कारणांचा आणि प्रवृत्तींचा शोध सामाजिक संदर्भाधारे घेतला जातो.

जागतिकरणाच्या प्रक्रियेमध्ये भाषासंपर्काचे स्वरूप बदलताना दिसते. महानगरांपासून खेड्या-पाड्यांपर्यंत विविध वस्तूंचे विक्रेते, जाहिरातदार यांची रेलचेल वाढली आहे. एकेकाळी खेड्यातून 'फिरस्ते' फिरत असत. ते खेड्यातील लोकांच्या भाषेतच स्वतःच्या मालाची विक्री करीत होते. परंतु आज खेड्यातून विविध भाषा बोलणारे उच्चशिक्षित, परराज्यातील विविध कंपन्यांचे प्रचारक, जाहिरातदार फिरताना दिसतात. हे 'नवफिरस्ते' ग्रामीण भागात हिंदीसारख्या भाषेचा अवलंब करतात. त्यांच्याशी बोलताना खेड्यातील लोकही 'तोडकी-मोडकी' हिंदी वापरण्याचा प्रयत्न करतात. ही प्रक्रिया भाषाबदलाचे उदाहरण आहे. मुंबईसारख्या महानगरामध्ये पाऊल ठेवताच आपण हिंदी भाषेचा वापर करायला सुरुवात करतो याचे कारणही हेच आहे. भाषाबदलाच्या या प्रक्रियेसंदर्भात विवेचन करताना डॉ. रमेश वरखेडे लिहितात, ''समाजभाषाविज्ञानात भाषामिश्रण व भाषापरिवर्तन यांच्या स्वरूपाचा अभ्यास करून त्याची सामाजिक कारणे व प्रवृत्ती यांचा शोध घेतला जातो. लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' या आत्मकथनात निवेदक निवेदन करता करता अचानक कैकाडी भाषेतली संभाषणे देतो. ह्याचे कारण तेथे ते संभाषण कैकाडीतच स्वाभाविक वाटेल व मराठीत कृत्रिम वाटण्याची शक्यता आहे. लेखकाला अभिव्यक्तीत वास्तवचित्रणाच्या निवडीतून असे भाषापरिवर्तन करावे लागते. जसे दैनंदिन व्यवहारात बोहऱ्याच्या दुकानात

गेल्यावर हिंदीत बोलणे आणि गुजरीत गेल्यावर भाजीवालीशी स्थानिक बोलीत (अहिराणीत) बोलणे अधिक योग्य वाटल्याने मराठी भाषिक आपले मराठी बोलणे थांबवून हिंदीत वा अहिराणीत बोलू लागतो. म्हणून संज्ञापन व्यवहाराची निवड हे भाषा बदलाचे (Code switching) कारण असते.''

### १.३.५.९ भाषानिषिद्धता

समाजामध्ये भाषावापराबाबतीत काही सामाजिक संकेत पाडले जातात. या सामाजिक संकेतांचा विचार समाजभाषावैज्ञानिक अभ्यासपद्धतीमध्ये केला जातो. सामाजिक वर्ग, वर्चस्व, सल्ला, शुभ-अशुभाची कल्पना इत्यादी अनेक कारणांनी हे संकेत समाजात तयार होतात. वरिष्ठांविषयी एकेरी भाषेत बोलणे भाषानिषिद्धतेचे उदाहरण आहे. कोणत्याही समाजाचा भाषाव्यवहार तपासल्यानंतर समाजातील जाती, धर्म, शिक्षण, सत्ता, व्यवसाय, वसतिस्थान, राहणीमान, अभिरुची, संपत्ती अशा काही निर्धारक घटकांनुसार भाषाव्यवहारामध्ये भिन्नता दिसून येते. या निर्धारक घटकांच्या मुळाशी भाषावापराचे काही दंडक पाळले जात असल्याचे दिसून येतात. समोरील व्यक्तीचा दर्जा, परिस्थिती, काळ, संदर्भ पाहून भाषावापराचे नियम स्वाभाविकपणे पाळले जातात. कोठे काय बोलू नये, कोणाला काय म्हणू नये हे संस्कार सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत अप्रत्यक्षपणे व्यक्तीवर होत असतात. त्यातूनच भाषानिषिद्धतेचे संकेत तयार होतात आणि ते समाजातील प्रत्येक व्यक्तीकडून पाळले जातात.

भारतील समाजामध्ये लैंगिक संबंध, स्त्री-पुरुषांची गुप्तांगे, प्रातःर्विधी यासंदर्भात बोलताना खूप काळजी घेतली जाते. एव्हाना या संदर्भातील शब्द उच्चारणे निषिद्ध मानले जाते. साप दिसला तर ग्रामीण भागात 'लांबडं दिसलं' असे म्हटले जाते. कुंकू वाढले, बांगड्या वाढल्या हे वाक्यप्रयोग नेमके उलट अर्थाने वापरले जातात. विशिष्ट रोगांची-औषधांची नावे घेत नाहीत. ही भाषा निषिद्धतेची काही उदाहरणे आहेत.

### १.३.५.१० भाषाशुद्धी

भाषासंपर्क ही बाब आजच्या व्यवहारात अपरिहार्य बनलेली आहे. भाषेच्या वाटचालीत भाषासंपर्काची प्रक्रिया महत्त्वाची समजली जाते. कोणत्याही भाषेच्या विकाचा अभ्यास करताना त्या भाषेवर इतर भाषेच्या संपर्काने झालेले परिणाम दिसून येतात. सामाजिक स्थित्यंतर, प्रवास, युद्ध, सत्तास्थानाचे हस्तांतरण आता अटळ झालेले आहे. परभाषा स्वभाषेला धोका पोहोचवू शकते म्हणून जाणीवपूर्वक भाषाशुद्धीची प्रक्रिया राबविली गेल्याची उदाहरणे आहेत. आपल्या भाषेत आपली संस्कृती असते, त्यामुळे भाषा अस्मितेचा प्रश्न बनते. आपल्या भाषेचे स्वत्व टिकून राहावे, पर्यायाने आपली संस्कृती अबाधित राहावी म्हणून परभाषिक शब्द निषिद्ध मानले जातात. स्वातंत्र्यवीर सावरकर, माधवराव पटवर्धन यांनी यासाठीच भाषाशुद्धीची चळवळ राबवली. त्यांच्या चळवळीला श्री. के. क्षीरसागर यांनी विरोध केला; तर न. चिं. केळकर सारख्या अभ्यासकांनी समन्वयवादी भूमिका घेतली. त्यांनी शक्य असेल तेथे परकीय शब्द टाळून त्याजागी स्वभाषेतील शब्द जरूर वापरावेत, परंतु परकीय शब्दांना योग्य प्रतिशब्द मराठीत नसल्यास तेथे परकीय शब्द वापरण्यास हरकत नसावी असा विचार मांडला. शिवाय पर्यायी शब्द तयार करताना संस्कृतचे साहाय्य घेऊन शब्द घडविताना दुर्बोधता निर्माण होऊन हे शब्द हास्यास्पद होतात असे त्यांचे मत होते. क्षीरसागर, केळकर यांची मते भाषाभिमानी लोकांना नकारात्मक वाटली असतील. परंतु भाषेच्या परिवर्तनशील प्रक्रियेला अशा पद्धतीने थांबविता येत नाही. व्यवहारामध्ये जे शब्द

सतत वापरले जातात ते भाषेत नैसर्गिकपणेच एकजीव होत राहतात. त्यामुळे या प्रक्रियेकडे भाषेच्या विकासाची प्रक्रिया म्हणून पाहिले पाहिजे आणि या प्रक्रियेच्या सामाजिक, सांस्कृतिक अंगाचा विचार समाजभाषाविज्ञानामध्ये केला पाहिजे.

### १.३.५.११ भाषा प्रदूषण

भाषिक प्रदूषण ही बाब भाषाशुद्धी या मुद्याची चर्चा करताना आपण विचारात घेतली. भाषेत घुसलेल्या अनेक परकीय शब्दांमुळे भाषा प्रदूषित झाली असे म्हटले जाते. परंतु आधुनिक भाषाविज्ञानामध्ये या प्रक्रियेकडे भाषेच्या विकासाची प्रक्रिया म्हणूनच पाहिले जाते. भाषिक प्रदूषण ही संकल्पना आता नव्याने समजून घेतली पाहिजे. एखादी भाषा दुसऱ्या भाषेच्या संपर्कात आल्यानंतर जो भाषिक बदल होतो त्या बदलाला भाषिक प्रदूषण म्हणता येणार नाही. बदलत्या जीवनपद्धतीमध्ये परकीय भाषासंपर्क अपरिहार्य आणि व्यवहार्य ठरतो आहे. परंतु या संपर्कातून भाषेच्या मूळ घटकांचे संतुलन बिघडून भाषिक प्रदूषण होण्याचीही शक्यता असते. शब्द, वाक्य या पातळ्यांवर हे प्रदूषण घडून येते. स्वतःच्या भाषेत योग्य शब्द उपलब्ध असताना; त्या शब्दांऐवजी पर्यायी शब्द परकीय भाषेतून घेतला जातो. तर काही वेळा वाक्यांच्या रचनेमध्ये परकीय भाषांसंपर्काने बदल केला जातो.

अनास्था, निष्काळजीपणा यामुळे लिहिताना, बोलताना तयार होणाऱ्या चुका हा भाषिक प्रदूषणाचाच भाग आहे. नवीन शोध, नवीन वस्तू, नव्या कल्पना-संकल्पना बऱ्याचदा परकीय भाषेतून येतात तेव्हा ते भाषाप्रदूषण मानता येणार नाही. या प्रक्रियेशी संबंधित विवेचन करताना डॉ. रमेश धोंगडे 'वाचासरमिसळ' आणि 'वाचाबदल' असे शब्दप्रयोग करतात. भाषासंपर्कातून शब्दस्तरावरील बदलांना 'वाचासरमिसळ' आणि वाक्यस्तरावरील बदलांबाबत ते 'वाक्यपालट' असा शब्दप्रयोग करतात. ते भाषाप्रदूषण असा शब्दप्रयोग करीत नाहीत. भाषिक प्रदूषणासंबंधी डॉ. अशोक केळकर यांनी व्यापक दृष्टीने विचार केलेला आहे. त्यांनी आपल्या 'मराठी भाषेचा आर्थिक संसार' या पुस्तकामध्ये या संदर्भात विवेचन करताना म्हटले आहे की, भाषाव्यवहार जेव्हा यथार्थ, विहित आणि यथोचित राहात नाही तेव्हा तो दूषित मानायला हवा.

भाषाव्यवहार कधी यथार्थ, विहित किंवा यथोचित राहात नाही याची कारणे कोणती, तो कोणकोणत्या परिस्थितीत तसा राहात नाही याची कारणे शोधून निर्माण होणाऱ्या भाषिक प्रदूषणाची चर्चा समाजभाषाविज्ञानामध्ये केली जाते.

## १.३.६ : समाजभाषाविज्ञान या अभ्यासशाखेचा उदय

### १.३.६.१ लिंगभेदाची भाषा

स्त्री-पुरुष हा लिंगभेद नैसर्गिक आहे. समाजजीवनामध्ये मानवाच्या बाबतीत विविध भेद पाहण्यास मिळतात. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक परिस्थिती, जाती-जमाती, धर्म, विविध व्यवसाय इत्यादी नुसार कितीतरी मानवनिर्मित भेदांमध्ये पृथ्वीवरील मानव विभागला आहे. या भेदाचा व्यापक परिणाम भाषेवर झालेला आढळतो. मानवामधील स्त्री-पुरुष हा भेद नैसर्गिक आहे. या भेदाचा समाजावर, मानवी जीवनावर खोलवर परिणाम झालेला आहे. स्त्री-पुरुषांच्या समाजातील स्थानासंबंधी जाती, जमाती धर्मानुसार विविधता

आढळते. तरीही भारतीय समाजजीवनामध्ये बहुतांश समाजात पुरुषसत्ताक समाजव्यवस्था प्राचीन काळापासून प्रभावी असल्याचे दिसते. या वर्चस्ववादी व्यवस्थेचा स्त्री-पुरुषांच्या भाषेवर सूक्ष्म आणि खोलवर परिणाम झाल्याचे दिसते. श्रीमती आशा मुंडले यांनी १९८४ च्या 'साधना' साप्ताहिकाच्या स्वातंत्र्यदिन विशेषांकातील 'भाषेतून दिसणारी स्त्री' या लेखामध्ये भाषेतून दिसून येणारी पुरुषाची सत्ता आणि स्त्रीचे समाजातील दुय्यमत्व अनेक उदाहरणांच्या आधारे नोंदविले आहे. त्या नोंदवितात 'रांड' म्हणजे नवरा मेलेली स्त्री, 'वांझ' म्हणजे मूल नसलेली स्त्री; परंतु बायको मेलेल्या पुरुषाला किंवा 'मूल नसलेला पुरुष' याला भाषेमध्ये असे स्वतंत्र हेटाळणी करणारे शब्द आढळत नाहीत. त्याच बरोबर त्या लिहितात की, ''तिच्या शरीराचं वर्णन खायच्या वस्तूसारखं केलेलं. 'छातीवरची फळं' वगैरे. त्यानं तिच्यावर झडप घातली, चोळामोळा केला, कुस्करली वगैरे. या सगळ्यांतून शिकारी-सावज हे नातं दिसतं. नाहीतर खादाड-अन्न हे नातं दिसतं इतर शब्दातून तिला पाहून लाळ टपकायला लागली वगैरे असली बुभुक्षित वर्णनं पुरुषदेहाची होत नाहीत.''

स्त्रियांचे समाजातील दुय्यमत्व सांगणारी आणखी काही उदाहरणे देता येतील. स्त्रीच्या बाबतीत सर्वसामान्य समाज सहजपणे बोलताना 'पायातली वहान पायात बरी' किंवा 'आपलं जनावर आपल्या ताब्यात हवं' अशी भाषा वापरतो. स्त्रीसंबंधी भाषा वारताना स्त्री ही वापरावयाची वस्तू, उपभोग घ्यावयाची वस्तू किंवा तिचा आस्वाद घेतल्याप्रमाणे भाषा वापरलेली दिसते. तिच्यावर झडप घातली (शिकार), तिचा चोळामोळा केला (पाचोळा), तिला पाहून लाळ टपकायला लागली (आवडता पदार्थ) ही भाषा सर्रास पुरुषांच्या तोंडामध्ये दिसते.

स्त्रियांबाबत पुरुषांच्या तोंडी येणारे शब्द अनेकदा विकृत, अश्लिल, घाणेरडे असतात. वैज्ञानिक दृष्टिकोणाचा प्रसार झालेला असला तरी; अजूनही समाजात स्त्रीला दुय्यम स्थान आहे. भाषेतही आपणास हे जाणवते. अलिकडे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये एक जाहिरात आढळते ती अशी;

''घाबरून जाऊ नका. लैगिक संबंधात निरोध फाटल्यास,

अत्याचाराची शिकार झाल्यास नजीकच्या आरोग्य केंद्रास भेट द्या''

ही जाहिरात स्त्रियांना उद्देशून आहे. या जाहिरातीत स्त्रीला उद्देशून घाबरून जाऊ नका; असे विधान केलेले दिसते. या जाहिरातीमध्ये जर वरील गोष्टी झाल्यास स्त्रिया घाबरतात आणि शिकार स्त्री होते. शिकारी पुरुष असतो हे पक्के केले आहे.

पुरुष व्यभिचारी असला, सुंदर असला, आकर्षक असला तरी पुरुषाच्या बाबतीत अशी वेगळी भाषा वापरलेली दिसत नाही. समाजातील स्त्री-पुरुषांच्या स्थानाचे प्रतिबिंब त्या-त्या समाजाच्या भाषेमध्ये पहावयास मिळते. मराठी भाषिक समाजामध्ये पुरुषसत्ताक समाजरचनेचा स्पष्ट प्रभाव जाणवतो. समाजातील विविध सामाजिक संस्थांतून जबाबदारीच्या पदे, पदासंबंधीची भाषा, पदनाम यामध्ये पुलिंगी शब्दांचे आधिक्य सहज नजरेत भरते. प्राध्यापक, अध्यक्ष, चेअरमन, खजिनदार, सचिव, सेक्रेटरी, मॅनेजर, प्रमुख, संपादक, वार्ताहर, पत्रकार, सूत्रसंचालक, ग्रंथपाल, संचालक, संयोजक, सभासद, सदस्य, ड्रायव्हर, इंजिनिअर, डॉक्टर, अभियंता, वैद्य अशी ही यादी खूप लांबविता येते. 'चूल आणि मूल' या व्यवस्थेत अडकलेली स्त्री घराबाहेर पडायला खूप

उशीरा सुरुवात झाली. त्या अगोदरपासून अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या, पदे, पुरुषांकडेच होती. त्यामुळे यासंबंधी तयार झालेल्या भाषेवर पुलिंगी शब्दांचे वर्चस्व आहे.

भाषा वापराबाबत स्त्री फार सौम्य शब्दांचा वापर करीत असते. तिच्या भाषेमध्ये अश्लिल, शिवराळ शब्दांचा वापर जवळ-जवळ नसतो. भाषा वापरावरून व्यक्तीचा दर्जा, चारित्र्य ठरविण्यात येते. उच्चभ्रू समाजातील स्त्रिया स्वतःच्या भाषेमध्ये अश्लिल, शिवराळ शब्द कधीही वापरताना दिसत नाहीत. योनिशुचिता, श्रेष्ठ-कनिष्ठता, चारित्र्य याबाबतीत अवाजवी महत्त्व नसलेल्या काही खालच्या जातीच्या, निम्नस्तरीय भटक्या जमातीमधून किंवा समाजामध्ये स्त्रियांच्या तोंडी अश्लिल, शिवराळ, भाषा पाहावयास मिळते. त्यांच्या बोलण्यातच पुरुषी ढंग दिसतो.

स्त्री ही नाजूक, हळवी, भावूक, सहनशील, घाबरट अशी समजूत समाजामध्ये दृढ आहे. ही बाब स्त्री-पुरुषांच्या मनावर चांगलीच बिंबवलेली आहे. अय्या, इश्श्य, गडे असा लाडिक सूर स्त्रियांच्या भाषेत दिसतो. स्त्रियांची भाषा इतकी वेगळी, स्वतंत्र असते की; एखाद्या पुरुषाच्या बोलण्यात असा स्त्रिचा सूर आढळला तर त्याला समाज बायकी, बाईलबुद्ध्या ठरवतो. स्त्रिया स्वतःच्या पतीच्या नावाचा उल्लेख टाळतात. यासाठी त्या 'अहो', 'इकडून अजून होकार नाही', 'ते आलेले नाहीत' असे शब्दप्रयोग करतात. पुरुष मात्र अगं, तूगं आणि नावाने आपल्या बायकोला बोलावतो. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या बाबतीत बऱ्याचदा नादमय, सूत्रमय भाषेतून संवाद चालतो. ही स्त्री आपले दुःख बऱ्याचदा काव्यमय भाषेतून सांगते. या बाबतीत डॉ. रमेश वरखेडे लिहितात की, ''नादमय शब्दयोजना ही तिच्या जगण्याच्या वृत्तीचीच द्योतक असते.''

समाजभाषावैज्ञानिकांनी स्त्री-पुरुषांच्या भाषेचे निरीक्षण करून वस्तुनिष्ठ विवेचन केलेले आहे. समाजातील स्तरानुसार स्त्री-पुरुषांच्या भाषेमध्ये फरक पडतो. समाजातील प्रत्येक स्तरानुसार बदलत जाणारी भाषा असते. तथापि स्त्री ही सामाजिकदृष्ट्या प्रतिष्ठित भाषा वापरण्याच्या बाबतीत पुरुषापेक्षा दक्ष असते. स्त्रीला समाजामध्ये विविध जबाबदाऱ्या पुरुषांपेक्षा दक्षपणे पार पाडाव्या लागतात. परंपरेचा इतका प्रचंड पगडा तिच्या मनावर असतो की; भाषेच्या बाबतीतही ती अधिक दक्ष राहते. आज बदलत्या समाजजीवनाबरोबर स्त्री पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसते आहे. शिक्षण-नोकरीच्या बाबतीत ती पुरुषांच्याही पुढे आहे. अशा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी स्त्रिया आज जी भाषा वापरतात ती जवळ जवळ पुरुषी थाटाची असते. अशा स्त्रीच्या भाषेमध्ये परंपरागत स्त्रीसुलभ भाव लुप्त होताना दिसतो आहे.

### १.३.६.२ भाषिक संपर्क

स्वतःच्या सर्व गरजा स्वतःच पूर्ण करता येऊ शकल्यामुळे मानव समाजशील बनला; स्थिर झाला. त्यानंतर मानवाची संपर्क साधण्याची क्षमता विकसित होत गेली. ही क्षमता भाषाभ्यासामध्ये 'संदेशन क्षमता' या नावाने परिचित आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला अनेक कारणांसाठी परस्परांच्या संपर्कात रहावे लागते. मग ती व्यक्ती कोणीही असो; एखादा सर्जनशील लेखक, कवी, कलावंत, अभिनेता, नवनवे शोध आणि नवे संशोधन करणारा शास्त्रज्ञ सर्वच भाषेतून व्यक्त होत असतात. अशाप्रकारे भाषेच्या माध्यमातून व्यक्त होण्यासाठी चालणाऱ्या संप्रेषण माध्यमांचा विकास दिवसेंदिवस वाढत चालला आहे. जागतिकीकरणामुळे आज मानवाला

बहुभाषिक होणे भाग पडत आहे. वाढती लोकसंख्या आणि पर्यायाने वाढती बेकारी यामुळे उपजीविकेसाठी स्थलांतर, देशाटन करणे आज अपरिहार्य बनलेले आहे. आपली उत्पादने जगाच्या बाजारपेठेमध्ये खपविण्यासाठी मोठमोठ्या कंपन्यांची स्पर्धा विकोपाला पोहोचली आहे. या घडामोडीमध्ये संप्रेषण व्यवस्थेमध्ये एक भाषकाचा विविध भाषांशी दिवसेंदिवस संपर्क वाढत चालला आहे. त्यामुळे आज एका व्यक्तीकडून अनेक भाषा वापरल्या जात आहेत. हा भाषासंपर्क वाढल्यामुळे या भाषासंपर्काचा अभ्यास करणे हे समाजभाषाविज्ञानासमोरील एक मोठे आव्हान बनले आहे.

मुंबई, पुणे सारख्या महानगरांमध्ये वास्तव्य करणारी व्यक्ती आपल्या दैनंदिन जीवनामध्ये एकापेक्षा अधिक भाषांचा प्रयोग करीत असते. हे लोक घरी आपली मातृभाषा वापरतात. परंतु घराबाहेर पडल्यानंतर त्यांना अनेक भाषांशी समायोजन करावे लागते. नोकरीच्या ठिकाणी हिंदी, इंग्रजीचा सर्रास वापर केल जातो. अशा मोठ्या शहरांमध्ये कामानिमित्त किंवा नोकरी, व्यवसायानिमित्त अनेक प्रांतातून लोक येत राहतात. त्यांच्याशीही येथील स्थानिक लोकांचा संपर्क येत राहतो. गोव्यासारख्या पर्यटन क्षेत्राामध्ये बहुभाषासंपर्क आज अपरिहार्य बनला आहे. अशा मोठ्या शहरांमध्ये जीवनसंक्रमणासाठी निरनिराळ्या भाषांचा आधार घ्यावा लागतो. आपल्या संपर्कात येणाऱ्या भिन्न भाषिकांच्या भाषा आपल्याला शिकाव्या लागतात. भाषासंपर्कामुळे ही प्रक्रिया घडत जाते. परप्रांतातून आलेल्या किंवा परप्रांतामध्ये स्थायिक झालेल्या लोकांना हा भाषासंपर्क अटळ आहे. भाषासंपर्काची प्रक्रिया व्यापक आहे. त्यामुळे अभ्यासकांनी भाषासंपर्काचे काही प्रकार कल्पिले आहेत ते खालीलप्रमाणे;

**१. व्यक्तिबोली संपर्क**

आधुनिक भाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून भाक्षेचा विचार करताना प्रत्येक व्यक्तीची भाषा ही इतरांपेक्षा वेगळी मानली जाते. ही व्यक्तिबोली (Indiolect)  त्या व्यक्तीच्या वैयक्तिक सवयी, लकबी यामुळे वेगळी ठरते. यामुळेच वाङ्मयीन क्षेत्रामध्य  प्रत्येक लेखक, साहित्यिकाची भाषा आपल्याला वेगळी वाटते. मराठी कादंबरीच्या संदर्भात ग्रामीण पाश्वभूमी असणारे कादंबरी लेखक आणि शहरी मध्यमवर्गीय जीवनातून आलेल्या लेखकांचे लेखन याचा तौलनिक विचार केल्यास व्यक्तिबोलीमुळे लेखकांच्या लेखनशैलीमध्ये पडणारा फरक ध्यानात येईल. कवितेच्या संदर्भात बहिणाबाईची भाषा, नारायण सुर्वे यांची भाषा, नामदेव सुर्वे यांची भाषा, नामदेव ढसाळांची भाषा, ना. धो. मनोहर कुसुमाग्रज, ग्रेस यांची भाषा व्यक्तिबोलीची उत्तम उदाहरणेच आहेत.

भिन्न-भिन्न व्यक्तिबोलींचा संपर्क जीवनामध्ये अपरिहार्य असतो. शिक्षण-विद्यार्थी, नेता-कार्यकर्ता, पेशंट-डॉक्टर यांचा संबंध नित्याचा असतो. यामुळे त्यांच्या बोलींचा संपर्क आपोआपच येतो. शिक्षकांच्या भाषेचे विद्यार्थी अनुकरण करतात. आपल्या नेत्याच्या भाषेचे कार्यकर्ते अनुकरण करू पाहतात. महाराष्ट्रामध्ये प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे अनुकरण अनेकजण करताना दिसतात. हे अनुकरण विशेषतः शब्दांची निवड, उच्चारांचे चढउतार या बाबतीत असते.

**२. बोली संपर्क**

भाषासंपर्काच्या या प्रकारामध्ये एकाच भाषेच्या दोन भिन्न बोली बोलणाऱ्यांमध्ये होणाऱ्या भाषिक संपर्काचा अंतर्भाव होतो. एखाद्या शहराच्या ठिकाणी उद्योगधंद्यासाठी प्रमाणभाषा एकच असणाऱ्या परंतु बोलीभाषा अलग

असणाऱ्या दोन व्यक्तींचा संपर्क येतो. उदाहरणार्थ मुंबई-पुण्यासारख्या शहरामध्ये अहिराणी, वऱ्हाडी अशा मराठीच्या भिन्न बोलणाऱ्या व्यक्तींचा संबंध आल्यास प्रथम हे दोघेही आपापल्या बोलीतून बोलतील. या दोन्ही मराठीच्या बोली असल्यामुळे या बोली एकमेकीपासून दुर्बोध नसतात. त्यामुळे संभाषणामध्ये अडथळा निर्माण होत नाही. कालांतराने हे दोघे परस्परांशी व्यवहार करताना या दोन्ही भाषांच्या सीमावर्ती भाषेचा उपयोग करतील किंवा प्रमाण मराठीमध्ये बोलण्याचा प्रयत्न करतील. या संपर्कामुळे काही वेळेला तिसऱ्याच मिश्रभाषेचाही उगम होऊ शकतो.

**३. स्वकीय भाषा संपर्क**

भिन्न भाषा संपर्कातून किंवा दुसरी भाषा स्विकारण्याच्या प्रक्रियेतून द्वैभाषिक समाज अस्तित्वात आलेला पाहावयास मिळतो. मुंबईमध्ये गुजराती समाज मोठा आहे. हा समाज घरी गुजराती तर; व्यापार-धंद्याच्या ठिकाणी मराठी, हिंदी सारखी स्थानिक भाषा वापरतो. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान या राज्यातूनही मोठ्या प्रमाणावर मुंबईत येऊन स्थिर होणाऱ्यांच्या बाबतीतही हाच अनुभव येतो. दिल्लीमध्ये हिंदी-पंजाबी, नागपूरमध्ये हिंदी-मराठी, हैद्राबाद मध्ये हिंदी-तेलगू, अहमदाबाद मध्ये हिंदी-गुजराती अशा द्वैभाषिक समाजाची संख्या फार मोठी आहे. आज निरीक्षण केले तर अशा द्वैभाषी समाजाची निर्मिती होण्याची प्रक्रिया वाढतानाच दिसते आहे.

**४. परकीय भाषा संपर्क**

भारतात पोर्तुगीज, इंग्रज, मोगल या परकीयांनी अनेकवेळा आक्रमणे केलेली आहेत. हा देश जिंकून त्यांनी आपली राज्यव्यवस्था या भूमीवर स्थापली आहे. जेते म्हणून बराच मोठा काळ या भूमीवर या लोकांचे वास्तव होते. त्यामुळे त्यांची भाषा आणि येथील मूळच्या स्थानिक लोकांची भाषा यांचा परस्परसंबंध येणे अपरिहार्य होते. या संपर्कामुळे निर्माण झालेले भाषामिश्रण तपासायला आपल्याला फार यातायात करावी लागत नाही. मराठीचा शब्दसंग्रह सहज पाहिला तरी परकीय शब्दांचे या संग्रहामध्ये असणारे प्राबल्य नजरेत भरेल. आज या परकीय भाषांमधून आलेले शब्द मराठी शब्दसंग्रहामध्ये स्थिर झालेले आहेत, हे आपल्या लक्षात येईल. जागतिकीकरण, शिक्षणाचा सर्वदूर झालेला प्रसार, नोकरी व्यवसायानिमित्त परदेशात स्थयिक होणाऱ्यांच्या संख्येमध्ये होत चाललेली वाढ अशा कारणांमुळे इंग्रजी-मराठी, इंग्रजी-हिंदी असा द्वैभाषिकसमाज या भाषासंपर्कातून अस्तित्वात आलेला आहे. या द्वैभाषिक समाजाच्या निर्मितीमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसते आहे.

अशाप्रमाणे भाषासंपर्क प्रक्रियेमुळे भाषिक आदान-प्रदान अटळ बनते आहे. निम्निलिखित वर्गाला उच्चवर्गीय समाजाचे आकर्षण असते. त्यातून होणारे अनुकरण, विविध कारणांनी भिन्न भाषांशी वाढत चाललेला संपर्क, नोकरी निमित्त परदेशी वास्तव्य, शिक्षणाचा प्रसार या सर्वच कारणांमुळे भाषासंपर्काची प्रक्रिया वाढते आहे. या अव्याहत चाललेल्या प्रक्रियेचे अध्ययन समाजभाषाविज्ञानाचे कार्य आहे.

### १.३.६.३ भाषानिर्मिती (पिजिन व क्रिऑल भाषा)

भाषा ही महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. समाजाच्या परिवर्तनाबरोबर भाषेमध्ये परिवर्तनाची प्रक्रिया अखंड सुरू असते. हे परिवर्तन म्हणजे भाषेचा मंदगतीने सुरू असलेला विकास होय. या परिवर्तनाच्या प्रक्रियेतून

भाषेमध्ये घडून येणारे बदल लक्षात येण्यासाठी काही कालावधी जावा लागतो. व्यापार उदिमाच्या निमित्ताने मानवी वसाहतींचे स्थलांतर, भ्रमण हे अतिप्राचीन काळापासून सुरू आहे. प्राचीन भारतीय इतिहासामध्ये याचे असंख्य पुरावे सापडतात. याशिवाय भारत ही भूमी अनेक कारणांनी आणि वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींनी प्रसिद्ध आहे. या देशामध्ये प्राचीन काळीदेखील विद्यादानाचे कार्य चालत असे. विद्याग्रहणासाठी परदेशातून आलेल्या व्यक्तींचे उल्लेख इतिहासामध्ये सापडतात. इंग्रज भारतामध्ये व्यापारी हेतूनेच आले. अशा प्रकारे व्यापाराच्या हेतूने इंग्रजांच्याबरोबर अनेक वसाहतींचे आगमन झाले. त्यांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या. यासंदर्भातील विवेचन मागे केले आहेच. या वसाहतकारांनी लोकांशी संपर्क आला. या संपर्कप्रक्रियेतून झालेल्या भाषिक देवघेवीमुळे नवीन संकरित स्वरूपाच्या व्यवहारउपयोगी, कामचलाऊ भाषा जन्माला आल्या. अशा संकरित भाषेला समाजभाषाविज्ञानामध्ये 'पिजिन भाषा' या नावाने ओळखले जाते. या पिजिन भाषा तात्पुरत्या आणि कामचलावू स्वरूपाच्या असतात. या भाषांची निर्मिती तात्पुरत्या गरजांपोटी झालेली असल्याने या भाषांचे स्वरूप प्राथमिक पातळीवरचेच असते. त्यामुळे व्याकरणिक अंगाने त्या परिपूर्ण नसतात. शिवाय अनेक भाषांमधील शब्दांचे मिश्रण या भाषांमण्ये असते. अशा पिजिन भाषेच्या स्वरूपासंबंधी काही मते येथे नोंदविता येतील.

पिजिन भाषा कोणाचीही मातृभाषा नसते. त्यामुळे या भाषांशी कोणाचेही भावनिक नाते नसते.

ही भाषा दोन आर्थिक, सामाजिक गटातील लोकांच्या भाषिक संपर्कामुळे निर्माण होते.

ही भाषा तात्पुरत्या कालावधीसाठी जनमलेली असल्यामुळे केवळ बोलण्यासाठी वापरली जाते. या भाषांमधून लेखनप्रक्रिया चालत नाही.

जास्तीत जास्त एखाद्या पिढीच्या आयुष्याएवढेच या भाषेचे आयुष्य असते.

पिजिन भाषांची शब्दसंपदा मर्यादित असते. चार-पाचशे शब्दांच्या पलीकडे या भाषांचा शब्दसंग्रह नसतो.

पिजिन भाषांचे स्वरूप व्याकरणिक नियमांनी बद्ध नसते. सुलभीकरणाची प्रक्रिया याही भाषेमध्ये कायम असतेच.

पिजिन भाषा कामचलावू असल्याने स्थिर नसतात. किंवा त्या फार काळ टिकून राहात नाहीत. या भाषांची गरज संपली की या भाषांचे अस्तित्व संपते. परंतु काही वेळा असे होत नाही. अपवादात्मक परिस्थितीमध्ये पिजिन भाषेचे अस्तित्व न संपता ही भाषा अधिकाधिक क्षेत्रामध्ये वापरली जावू लागते. या भाषेशी बोलणाऱ्यांचे भावनिक नाते दृढ होते. ही भाषा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होण्याची प्रक्रिया सुरू होते. शब्दसंग्रहामध्ये वाढ आणि व्याकरणिक संरचना सूक्ष्म बनू लागते. आणि ही भाषा एखाद्या समाजाची मातृभाषा बनण्यापर्यंत विस्तारते. अशावेळी या पिजिन भाषेच्या रूपाला 'क्रिऑल भाषा' असे म्हणतात. पिजिन भाषा कुणाचीही मातृभाषा नसते परंतु क्रिऑल भाषा किमान एका पिढीची मातृभाषा असते.

### १.३.६.४ जीवनपद्धती अथवा समाजव्यवस्था

समाजव्यवस्था ही जीवनसुकरतेसाठी अस्तित्वात आलेली असते. ही व्यवस्था म्हणजेच विशिष्ट समाजाची जीवनपद्धती म्हणता येईल. विवाह व कुटूंब पद्धती, विधी, सण-उत्सव, कुटूंबातील सदस्यांचे स्थान, समाजातील

व्यक्तीची प्रतिष्ठा, त्याचबरोबर समाजात अस्तित्वात असलेले अलिखित नियम व संकेत, मूल्यकल्पना या सर्व बाबी या व्यवस्थेमध्ये अंतर्भूत असतात. त्यांचा परिणाम भाषेवर अपरिहार्यपणे होतोच. 'चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे' यासारख्या म्हणींचे उदाहरण यासंदर्भात पाहाता येईल. या म्हणीतून अभिप्रेत असलेला अर्थ व्यक्त करण्यासाठी इंग्रजी भाषेमध्ये 'Every dog has it's day  and every man has his hours' अशी म्हण प्रचलित आहे. एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये सुन एक दिवस सासू होतेच. त्यातून तिची भूमिका बदलते. अधिकार प्राप्त होतात. मराठी भाषेमध्ये रूढ झालेली वरील म्हण किंवा वाक्यप्रयोग मराठी समाजामध्ये प्रचलित असलेल्या कुटूंबपद्धतीमधून भाषेमध्ये आलेला आहे. परंतु इंग्रजीमध्ये या म्हणीचा आशय व्यक्त करण्यासाठी रूढ असलेली म्हण ही पाश्चात्त्य जीवनपद्धतीतून आकाराला आलेली आहे. पाश्यात्त समाजाची कुटुंबपद्धती वेगळी आहे. तेथील संदर्भ वेगळे आहेत. थोडक्यात भाषा आकाराला येत असताना, तेथील स्थानिक संदर्भ घेऊनच येते.

मराठी समाजामध्ये कुटुंबाला आणि कुटूंब व्यवस्थेमध्ये नाते-संबंधाना महत्त्व आहे. स्त्री-पुरुष, ज्येष्ठ-कनिष्ठ हे भेद आणि समाजव्यवस्थेसाठी निर्माण केलेली विविध पदे, दर्जा, मान, अधिकार या बाबी देखील भाषेवर प्रभाव टाकतात. आहो-जाहो सारखे आदरार्थी शब्द केवळ वयानुसार नाही तर; पद, प्रतिष्ठा पाहून वापरले जातात. पूर्वी राजघराण्यातील लहान मुले देखील 'महाराज' या संबोधनाने ओळखली जात. ही जागा आता राजकीय पुढाऱ्यांनी घेतलेली आहे. आमदार-खासदारांच्या मुलांना कार्यकर्ते वयाचा विचार न करता; साहेब किंवा इतर आदरार्थी शब्दप्रयोगाने उल्लेखितात. असे सर्वच संदर्भ भाषाभ्यासासाठी महत्त्वाचे असून या संदर्भाचा विचार समाजभाषाविज्ञान या अभ्यासपद्धतीमध्ये होतो.

### १.३.६.५ उद्योग-व्यवसाय

मराठी समाजाचा पारंपरिक 'गावगाडा' पाहाता त्यात अलुतेदारी-बलुतेदारी पद्धतीला किती महत्त्वाचे स्थान होते हे ध्यानात येते. वैज्ञानिक प्रगतीनंतर पारंपरिक उद्योग-व्यवसाय मागे पडले. पर्यायाने अलुतेदारी-बलुतेदारी पद्धती संपुष्टात आली. 'गावगाडा' संपुष्टात आला. खेडी नागरीकरणाकडे वाटचाल करू लागली. गावातील भाषा बदलू लागली. तथापि या भाषेवर शेकडो वर्ष प्रचलित असणाऱ्या गावगाड्याचा प्रभाव आजही भाषेवर दिसतो. गावगाड्यातील पारंपरिक व्यवसायांवर अनेक शब्द, शब्दप्रयोग रूढ झालेले आहेत. उदाहरणार्थ, एखादे काम व्यवस्थित पूर्ण केले नाही तर, 'तो माझी हाजामत करेल' असे म्हटले जाते. एखाद्याला दिल्या जाणाऱ्या 'ए हाजामा' सारख्या शिवीतून न्हाव्याला समाजाने दिलेले स्थान दिसून येते. मांगा, चांभारा, भंग्या हे शब्द देखील एखाद्याचा वाईट अर्थाने उद्धार करताना वापरले जातात. या जातीतील लोकांना परंपरेने दिलेल्या कारणामुळे ही नावे शिव्यांच्या स्थानी आलेली आहेत. शिंप्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळल्यास 'तार तुटली' असा शब्दप्रयोग होत असे. हा शब्दप्रयोग आता विस्तारित अर्थाने वापरला जातो. तो केवळ त्या समाजापुरता राहिलेला नाही. 'टाका घालणे' हा चर्मकार व्यवसायातून, 'पाचर मारणे' सुताराकडून, 'पाणी पाजणे हा लोहाराकडून, 'डाग देणे', 'कान टोचणे हे शब्दप्रयोग सोनाराकडून तर 'सुतात घेणे', 'वळंबा घालणे' हे शब्द बांधकाम व्यवसायातून भाषेमध्ये प्रविष्ट झालेले आहेत. हे शब्द त्या-त्या जातींपुरते मर्यादित न राहाता, त्यांचा वापर अधिक व्यापक अर्थाने सर्व समाजाकडून होताना दिसतो.

### १.३.६.७ धार्मिकता

भारतीय समाजामध्ये धर्म आणि धार्मिकतेला विशेष स्थान आहे. धर्म, देव, परमेश्वर, स्वर्ग, नरक, पाप, पुण्य यासारख्या कल्पना समाजामध्ये खोलवर रुजलेल्या आहेत. त्याचबरोबर या कल्पना भाषेमध्येही एकजीव झालेल्या दिसून येतात. तीर्थक्षेत्रांना, काही नद्यांना उदाहरणार्थ; काशी, गंगा यांना धार्मिक जीवनात विशेष स्थान आहे. त्यातूनच 'दारात गंगा आली', 'ज्ञानगंगा', 'गंगाजळी', 'गंगेत घोडे न्हाले' असे भाषाप्रयोग रूढ झाले आहेत. धार्मिक स्थळांप्रमाणेच धार्मिक ग्रंथांनाही असेच महत्त्व असल्याचे दिसते. 'गीतेची शपथ', 'एक अध्याय संपला' अशा शब्दप्रयोगांना असलेला संदर्भ पाहिल्यास ही बाब लक्षात येते. धार्मिक ग्रंथांची रचना अध्यायांनुसार असते. त्यावरून एखादे काम पूर्ण झाले, अडचणीतून सोडवणूक झाली तर; एक अध्याय संपला असे बोलले जाते. 'पंढरीची वारी' ही मराठी जनसामान्यांमध्ये विशेष श्रद्धेची बाब आहे. त्यातूनच दहावी-बारावीचे विद्यार्थी नापास झाल्यानंतर 'सुरू झाली काय आषाढी-कार्तिकी' अशी भाषा ऐकू येते.

गतिमान समाज आणि अलिकडील काही वर्षांपासून सुरू झालेल्या जागतिकीकरणासारख्या प्रक्रियेमुळे संपर्क वाढतो आहे. शिक्षणाचा सर्वदूर झालेला प्रसार, प्रसारमाध्यमे, इंटरनेट प्रणालीमुळे हा संपर्क वाढत राहाणार आहे. या सर्व गोष्टींचा परिणाम भाषेवर होत आहे. जगातील सर्वच भाषा या प्रक्रियेतून संक्रमण करीत आहेत. काही भाषा नष्ट होत आहेत. विशेषतः छोट्या समूहांच्या मागास, आदिवासी समाजाच्या भाषा या प्रक्रियामुळे नाहीशा होत आहेत. भाषांची ही परिवर्तन प्रक्रिया समजून घेणे आणि भाषेच्या बदलत्या स्वरूपाचे विश्लेषण देणे हे समाजभाषाविज्ञानाचे उद्दिष्ट आहे.

भारत हा बहुभाषिक देश आहे. येथील सांस्कृतिक-भौगोलिक विविधता, ऐतिहासिक पार्श्वभूमी, नैसर्गिक संपन्नता, प्राचीन परंपरा, विविध धर्म, जाती, विविध वर्ग यामुळे भाषाभेद निर्माण झाले आहेत. पर्यायाने अनेक बोलींची निर्मिती झालेली आहे. त्यामुळे समाजभाषावैज्ञानिक अभ्यासासाठी ही विविधता अधिक पोषक ठरू शकते.

या सर्व गोष्टींबरोबरच भाषाभ्यासासाठी समाजभाषाविज्ञानामध्ये अनेक संकल्पना-सिद्धांतांची मांडणी करण्यात आलेली आहे. या संकल्पना-सिद्धांतांच्या आधारे भाषाव्यवहाराची चिकित्सा केल्यास; भाषा आणि समाजव्यवस्थेसंदर्भात महत्त्वाचे निष्कर्ष हाती येतात. समाजभाषाभ्यासपद्धतीमध्ये भाषिक सापेक्षतावाद, संदेशवहनात्मक क्षमता, भाषिक भांडार, लघुक्षेत्र, भाषिक समाज, भाषासंपर्क, भाषाव्यवहार, भाषाद्वित्व, बहुभाषिकता, भाषामिश्रण, भाषापरिवर्तन, भाषानिर्मिती, भाषिक लिंगभेद, भाषाजतनत्व, भाषा प्रदूषण, भाषाबदल, भाषादंडक, भाषालघुत्व अशा काही संकल्पनांची मांडणी करण्यात आलेली आहे. यापैकी काही संकल्पनांची आपण ओळख करून घेऊ या.

### १.४. समारोप

भाषाविज्ञानाच्या वाटचालीमध्ये फेर्दिनां द सोस्यूर यांच्या दृष्टिकोणातून विकसित झालेली विचारधारा अखेरीस भाषिक परिवर्तन हे भौतिक विश्वातील कोणत्याही प्रकारच्या विकास प्रक्रियेमुळे होत नाही; तर या

परिवर्तनाच्या मागे सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थिती कारणीभूत असते या विचारापर्यंत विकसित झाली. हा विचाराचा टप्पा म्हणजेच समाजभाषाविज्ञानाचा उदय होय. समाजभाषाविज्ञान हे भाषेचा उपयोजित अंगाने अभ्यास करणारे महत्त्वाचे क्षेत्र म्हणून ओळखले जाते. या अध्ययनक्षेत्रातील अनेक सिद्धांत-संकल्पना अद्याप स्थिर झालेल्या नाहीत. तथापि नजीकच्या काळात या क्षेत्रातील अभ्यासकांच्या व्यापक सहभागानंतर ही भाषाभ्यासाची पद्धती अधिक बळकट होईल.

समाजजीवनामध्ये असंख्य भाषिक रूपे अस्तित्वात आहेत. त्याचबरोबर नाना भेद समाजाअंतर्गत अस्तित्वात आहेत. त्यातून भाषेची विविधांगी रूपे समोर येतात. अशा विविधांगी भाषेचे स्वरूप तपासणे हे आव्हानात्मक काम आहे. त्याचबरोबर भारतासारख्या बहुभाषिक देशातील अनेक प्रश्न भाषांशी निगडीत आहेत. या सर्वच प्रश्नांची चर्चा समाजभाषाविज्ञानातील संकल्पनांच्या आधाराने करणे शक्य आहे.

भाषेला असलेले सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ, भाषेचा आणि समाजाचा सहसंबंध, भाषेला लाभलेले विविध संदर्भ आणि एकूण भाषिक व्यवहाराचे समाजभाषाविज्ञानातील संकल्पनांच्या आधारे विश्लेषण केल्यानंतर भाषेचे नेमके विश्लेषण करता येते. समाजगटानुसार अस्तित्वात असलेले विविधांगी सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ उलगडता येतात आणि भाषेच्या समकालीन स्वरूपासह तिच्या वाटचालीचा नेमकेपणाने वेध घेत परिवर्तनामागील कारणांचा शोध घेता येतो.

## १.५ : शब्दार्थ व टिपा

भाषिक समाज : भाषा वापरणारा समाज

समाजभाषाविज्ञान : भाषेचा समाजातील प्रत्यक्ष वापराचा अभ्यास करणारे विज्ञान

भाषिक वर्तन : भाषाव्यवहार-भाषा वापर

संप्रेषण : भाषेचा (चिन्ह) व्यवहार, बोलणे

बहुभाषिकता : एकापेक्षा जास्त भाषा बोलल्या जाणे

परभाषा : परकीयांची भाषा

द्विभाषक : दोन भाषा येणारा समाज

अचल : न बदलणारी

दंडक : नियम-संकेत

लिंगभेद : नर-मादी हा फरक

भाषाक्षमता : जन्माला आलेल्या मुलाला भाषाग्रहण करण्याची उपजत असलेली क्षमता

भाषिक परिवर्तन : भाषिक बदल.

## १.६ सरावासाठी प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप व व्याप्ती सविस्तर लिहा.

२. समाज, संस्कृती आणि भाषा यांचा सहसंबंध स्पष्ट करा.

३. समाजभाषाविज्ञानातील विविध संकल्पनांची चर्चा करा.

४. विविध क्षेत्रे आणि भाषा यांचा सहसंबंध सविस्तर लिहा.

**ब) लघुत्तरी प्रश्न**

१. लिंगभेदाची भाषा म्हणजे काय?

२. भाषिक संपर्काचे स्वरूप स्पष्ट करा.

३. भाषिक भांडार या संकल्पनांची थोडक्यात चर्चा करा.

४. पिजिन व क्रिऑल प्रक्रिया लिहा.

**क) टीपा लिहा**

१. भाषिक प्रदूषण

२. भाषाव्यवहार

३. भाषिक प्रभाव

४. भाषिक भांडार

## १.७ संदर्भ सूची

१. गवळी अनिल (२००२). भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, कोल्हापूर, हिरण्यकेशी प्रकाशन, पृष्ठक्रमांक १२

२. कल्याण काळे, मृणालिनी शहा, निवडक भाषा आणि जीवन, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पृष्ठक्रमांक ९

३. डॉ. रमेश वरखेडे, समाजभाषाविज्ञान : प्रमुख संकल्पना, श्रीरामपूर, शब्दालय प्रकाशन, पृष्ठक्रमांक ६२

४. आशा मुंडले, भाषेतून दिसणारी स्त्री, साधना साप्ताहक १५ ऑगस्ट १९८४, पृष्ठक्रमांक २३-२४

५. डॉ. रमेश वरखेडे, उ.नि. पृष्ठक्रमांक ४१

### १.८ अधिक वाचन

१. कालेलकर ना. गो., भाषा : इतिहास आणि भूगोल, मौज प्रकाशन, मुंबई.

२. कालेलकर ना. गो, भाषा आणि संस्कृती, मौज प्रकाशन, मुंबई.

३. रमेश वरखेडे, समाजभाषाविज्ञान : प्रमुख संकल्पना, शब्दालय, श्रीरामपूर.

४. धोंगडे रमेश, सामाजिक भाषाविज्ञान, दिलीपराज प्रकाशन, पुणे.

५. केळकर अशोक, मराठी भाषेचा आर्थिक संसार, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद.

६. नंदकुमार मोरे, समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

७. जयश्री पाटणकर, सामाजिक भाषाविज्ञान : कक्षा आणि अभ्यास, ससंदर्भ प्रकाशन, नाशिक रोड.

### १.९ क्षेत्रिय अभ्यास

तुमच्या परिसरातील बोलीचे निरीक्षण करा. बोलीतील शब्दसंग्रह शोधा आणि त्या शब्दांचे सामाजिक संदर्भ शोधा.

### १.१० उपक्रम

तुमच्या बोलीभाषेत लिहिलेल्या कथा, कादंबरीतील भाषिक भांडार आणि लघुक्षेत्रे शोधा.

●●●

**घटक–२**

# भाषा, समाज आणि संस्कृती

## अनुक्रमणिका


२.१ उद्दिष्ट्ये

२.२ प्रस्तावना

२.३ विषय विवेचन

२.३.१ भाषा : व्याख्या व स्वरूप

२.३.१.१ व्याख्या

२.३.१.२ भाषेचे स्वरूप

२.३.१.२.१ भाषा एक सामाजिक संस्था

२.३.१.२.२ भाषा : सांकेतिक व्यवस्था

२.३.१.२.३ भाषा : अभिव्यक्तीचे साधन

२.३.१.२.४ भाषा : सामाजिक व्यवहाराचे व संप्रेषणाचे माध्यम

२.३.१.२.५ मौखिक व लिखित भाषा

२.३.२ भाषेची लक्षणे

२.३.२.१ बहुविधता

२.३.२.२ उत्पादनक्षमता

२.३.२.३ यादृच्छिकता

२.३.२.४ स्थलकालातीतता

२.३.२.५ संस्कृती जतन व संक्रमण

२.३.३ समाज म्हणजे काय?

२.३.४ भाषा आणि समाज : परस्परसंबंध

२.३.५ संस्कृती म्हणजे काय ?

२.३.५.१ भौतिक संस्कृती

२.३.५.२ अभौतिक संस्कृती

२.३.६ भाषा आणि संस्कृती : परस्परसंबंध

२.४ समारोप

२.५ सरावासाठी प्रश्न

२.६ उपक्रम

## २.१ उद्दिष्ट्ये

विद्यार्थी मित्रहो, प्रस्तुत घटकाच्या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

- भाषेचे स्वरूप समजून घेणे.
- भाषा आणि समाज यांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास करणे
- भाषा आणि संस्कृती यांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास करणे.

## २.२ प्रस्तावना

समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप आंतरविद्याशाखीय असल्याचे आपण मागील प्रकरणामध्ये अभ्यासले आहे. समाजभाषाविज्ञानामध्ये केंद्रवर्ती असणारी भाषा ही समाजामध्ये वापरली जात असताना तिचा संबंध व्यक्ती, समाज व संस्कृती अशा घटकांशी येतो. मानवेतर सजीव आणि मानव यांच्यामध्ये भाषा हा मुख्य फरक आहे आणि त्यामुळेच मानवाचे वेगळेपण सिद्ध होते. मानवी जीवनातील जवळपास सर्व व्यवहार भाषा या माध्यमावर अवलंबून आहेत. त्यामुळे प्रस्तुत घटकामध्ये आपण भाषा म्हणजे काय व भाषेचे स्वरूप समजून घेणार आहोत. तसेच भाषेचा समाज व संस्कृती या घटकांशी असणारा अनुबंध अभ्यासणार आहोत.

## २.३ विषय विवेचन

इ.स. १९१६ साली फर्दिनांद द सोस्यूर या भाषावैज्ञानिकाच्या 'कोर्स इन जनरल लिग्विंस्टीक' या पुस्तकातून 'भाषाविज्ञान' हा स्वतंत्र आणि महत्वाचा अभ्यास विषय असल्याचे सोस्यूर यांनी प्रकर्षाने अधोरेखित केले आहे. सोस्यूर यांनी भाषेला एक चिन्हव्यवस्था असे संबोधले. ध्वनीरूप चिन्हक आणि अर्थरूप चिन्हित यातील संबंध म्हणजे भाषिक चिन्ह हे स्पष्ट केले. त्या भाषिक चिन्हांची विशिष्ट अशी एक व्यवस्था त्या-त्या भाषेमध्ये स्थिरावलेली असते. निजभाषिकाने ही व्यवस्था ग्रहण केलेली असते. त्यामुळे निजभाषिक भाषेचा वापर व त्यामध्ये नवीन प्रयोग सातत्याने करीत असतो. अशा प्रकारे सोस्यूर यांनी भाषा व्यवस्थेला स्पष्ट करण्याचे काम केले होते. तद्नंतरच्या काळात इ.स.१९३३ साली प्रकाशित केलेल्या 'लॅग्वेज' या ग्रंथातून

वर्तनवादी मानसशास्त्राच्या दृष्टीकोनातून लेनर्ड ब्लूमफिल्ड यांनी भाषेचा अभ्यास केला. नोम चॉम्स्की यांनी 'सिंटॅक्टिक स्टॅक्चर्स' यासारख्या ग्रंथांद्वारे रचनानंतरणवादाचा सिद्धांत मांडण्याचे काम केले. विविध अभ्यासकांनी निरनिराळया अभ्यासपद्धतींचा अवलंब करून भाषाविज्ञानातील मुलभूत सिद्धांतांची मांडणी करण्याचे काम केले. कालपरत्वे समाजभाषाविज्ञान ही भाषाविज्ञानाची एक प्रमुख शाखा असल्याचे सिद्ध झाले. आज भाषाविज्ञानामध्ये समाजभाषाविज्ञान शाखेस अभ्यासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्व प्राप्त झालेले आहे. अशा समाजभाषाविज्ञानाचे अभ्यासकांनी प्रामुख्याने दोन अभ्यास प्रकार पाडलेले दिसून येतात. १. सूक्ष्मलक्ष्यी समाजभाषाविज्ञान २. स्थूललक्ष्यी समाजभाषाविज्ञान. भाषेचा अभ्यास करताना तिचा संबंध केवळ व्यक्ती व तिच्या भाषेइतका मर्यादित स्वरूपाचा असेल तर तो अभ्यास सूक्ष्मलक्ष्यी प्रकारामध्ये मोडतो. सूक्ष्मलक्ष्यी समाजभाषाविज्ञानामध्ये विशेषनामांचे प्रयोग, सर्वनामांचे प्रयोग, विविध नातेसंबंध, काळाची विभागणी इत्यादी बाबींचा समावेश करण्यात येतो. तर स्थूललक्ष्यी समाजभाषाविज्ञानामध्ये संपूर्ण समाज आणि त्यातील भाषाभेद यांचा प्रामुख्याने अभ्यास करण्यात येतो. त्यामध्ये बहुभाषिकता, द्वैभाषिकता, भाषानियोजन, भाषासंपर्क इत्यादी घटकांचा समावेश होतो. विशेषत्वाने या अभ्यास प्रकारामध्ये भाषा, समाज आणि संस्कृती यांच्यातील परस्परसंबंधांच्या अनुषंगाने अभ्यास करण्यास महत्व आहे. एकूणच या सर्व अभ्यासाच्या मूळ स्थानी असणारी 'भाषा' कशाप्रकारची आहे व तिचे स्वरूप काय आहे हे पाहूया. तसेच भाषेचे सामाजिक व सांस्कृतिक बंध काय आहेत याचा अभ्यास प्रस्तुत स्थळी आपण करणार आहोत.

### २.३.१ भाषा : व्याख्या व स्वरूप

#### २.३.१.१ भाषेच्या व्याख्या

'भाषा' हा शब्द 'भाष्' या धातूपासून निर्माण झालेला आहे. भाष् या धातूचा मूळ अर्थ 'ध्वनी अथवा आवाज निर्माण होणे' असा आहे. यालाच इंग्रजीमध्ये Language (लँग्वेज) असे म्हणतात. भाषेला एक पारिभाषिक संकल्पना म्हणून मान्यता आहे. बोलण्याच्या मानवी शक्तीद्वारे भाषेचा वापर मानव करीत असतो. भाषा हा शब्द व्यापक अर्थाने वापरला जातो. जसा तो भाषेसाठी संवाद माध्यम म्हणून वापरतात तसाच तो शरीरभाषा, शहरी भाषा, ग्रामीण भाषा, बोली भाषा, साहित्याची भाषा अशा विविध अर्थानेही वापरतात. मात्र भाषा ही संज्ञा बोलणे, भाषण (Parole) या अर्थानेच समाजभाषाविज्ञानामध्ये वापरली जाते. भाषेच्या विविध अभ्यासकांनी अनेक व्याख्या केल्या आहेत. त्यातील काही प्रमुख व्याख्यांचा परामर्श आपण येथे घेऊ या.

भाषा म्हणजे व्यवहारास प्रवृत्त करणाऱ्या सार्थ व अन्वित ध्वनींचा समूह. - कृ.पा. कुलकर्णी (मराठी भाषा व उद्‌गम व विकास, मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, कोल्हापूर, १९६९, पृ.१)

व्यवहार सौकर्याचे व व्यवहारपूर्तीचे मुख्य साधन म्हणजे भाषा होय. - कृ.पा. कुलकर्णी (मराठी भाषा व उद्‌गम व विकास, मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, कोल्हापूर, १९६९, पृ.२)

मूळ आशयाशी कार्यकारण संबंध नसलेल्या ध्वनिसंकेतांनी बनलेली समाजव्यवहाराला साह्यभूत अशी भाषा एक पद्धत आहे. - ना.गो. कालेलकर

ज्या ध्वनीसंकेताचा पद्धतशीर उपयोग करून प्रत्येक व्यक्ती व्यवहारात भाग घेते ते व्यवहारक्षम संकेत म्हणजे भाषा. – ना. गो. कालेलकर

ध्वनी व अर्थ यात सांगड घालणाऱ्या चिन्हांची व्यवस्था म्हणजे भाषा होय. – फर्दिनां द सोस्यूर (मालशे, मिलिंद, आधुनिक भाषाविज्ञान सिद्धान्त आणि उपयोजन, लोकवाङ्मयगृह व राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, प्र.आ. १९९५, पृ.७)

भाषा म्हणजे वाचिक वर्तन होय. – लेनर्ड ब्लूमफिल्ड (मालशे, मिलिंद, आधुनिक भाषाविज्ञान सिद्धान्त आणि उपयोजन, लोकवाङ्मयगृह व राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, प्र.आ. १९९५, पृ.८५)

भाषा म्हणजे वाचिक वर्तन नसून भाषिक ज्ञान व क्षमता होय. – नोम चॉम्स्की (मालशे, मिलिंद, आधुनिक भाषाविज्ञान; सिद्धान्त आणि उपयोजन, लोकवाङ्मय गृह व राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, प्र.आ. १९९५, पृ.८३)

अशा प्रकारच्या विविध अभ्यासकांच्या भाषेच्या मानवी जीवनातील स्थानावरून तसेच तिच्या स्वरूपावरून आकारास आलेल्या विविध व्याख्यांचा परामर्श घेतला असता भाषा म्हणजे ध्वनी संकेतांनी बनलेली व संप्रेषणाची प्रभावी माध्यम असणारी अशी चिन्हव्यवस्था होय अथवा व्यवहारपूर्तीचे ध्वनी माध्यम म्हणजे भाषा होय असे थोडक्यात म्हणता येते.

### २.३.१.२ भाषेचे स्वरूप

माणूस बुद्धीमान व समाजशील प्राणी आहे. त्यामुळे तो शिस्तबद्ध व सामाजिक नियमांना अनुसरून जीवन जगत असतो. या व्यवस्थेमध्ये जगताना भाषा मनुष्याला वेगळेपण प्रदान करण्यात मोलाची भूमिका बजावते. मानवाचे जीवसृष्टीतील पृथकत्व हे भाषेमुळे सिद्ध होते कारण भाषा ही मानवाला इतर सचेतन सृष्टीपासून वेगळे सिद्ध करते. माणूस हा भाषा बोलणारा प्राणी आहे ही बाब इतर जीवसृष्टीपेक्षा मानवामध्ये महत्वाची फरक स्पष्ट करणारी बाब आहे. सर्वच मानवी व्यवहारांना भाषेचे मुलभूत अधिष्ठान लाभलेले आहे हे मानवी जीवनाचे वैशिष्ट्य आहे. मानवी मूल हळूहळू भाषा शिकते. त्याच्या मेंदूमध्ये भाषेची एक विशिष्ट व्यवस्था आकार घेते व त्याद्वारे मानव भाषेमध्ये विविध प्रयोग करण्यास सुरूवात करतो. शब्द, वाक्य यांच्या रचनांची निर्मिती करतो. अशाप्रकारेच भाषा हे मानवाच्या संप्रेषणाचे प्रधान व प्रभावी माध्यम ठरते. नोम चॉम्स्की यांच्या मते, ''मुलाला जन्मतः भाषिक क्षमता प्राप्त असते या प्राप्त झालेल्या क्षमतांच्या आधारेच त्याने भाषा आत्मसात केलेली असते. भाषेचे आत्मसातीकरण म्हणजे भाषेची नियमव्यवस्था आत्मसात करणे या क्षमतांच्या आधारेच मानव भाषाप्रयोग करतो.'' (तुपेरे, सारीपुत्र, समाजभाषाविज्ञान संकल्पना–सिद्धांत आणि दलित वाङ्मय, नवीन इंदलवार प्रकाशन, नवीन उद्योग, पुणे, प्र.आ., २०११, पृ.४८) चॉम्स्की यांच्या मतानुसार मानवाच्या ठायी असणारी भाषिक क्षमताच भाषा व्यवहार पार पाडण्यास मदत करते. या भाषिक क्षमतेच्या जोरावर मानव भाषेची संकेतबद्ध स्वनिमसंरचनेच्या संप्रेषण प्रणाली आत्मसात करतो व जीवनव्यवहार सुरळीत पार पाडतो. मानव भाषेचा वापर समाजजीवनात अधिक करतो. अर्थातच भाषेमध्ये सामाजिक व सांस्कृतिक संकेत सामावलेले असतात. असे

भाषेचे स्वरूप संकेतबद्ध संप्रेषणप्रणाली व समाजव्यवहार पार पाडणारे प्रभावी व्यवहार माध्यम आहे. हे स्वरूप आपण खालील मुद्यांच्या आधारे समजून घेऊ या.

**२.३.१.२.१ भाषा एक सामाजिक संस्था**

ॲरिस्टॉटलने "Man is social animal." (मानव हा समाजशील प्राणी आहे.) असे म्हटले आहे. तर मानव समाजशील असण्याबाबत विश्लेषण करून मत नोंदविताना मिलिंद मालशे म्हणतात की, ''मानव हा एक समाजशील प्राणी आहे असे म्हटले जाते. याचा अर्थ असा की, आपल्या आजूबाजूच्या मानवांशी अनेक प्रकारे सहकार्य करून त्यांच्यांशी संबंध-नाती जोडून एकत्र राहण्याची मानवाची प्रवृत्ती असते. नुसते एकत्र राहण्याची प्रवृत्ती पशु-पक्षी-किटकांमध्येही बऱ्याच प्रमाणात असते, परंतु, त्यांच्यात व मानवात फरक असा की, मानव एकत्र राहतो तो नुसता 'गट', 'समूह' किंवा 'कळप' करून नव्हे. एकत्र येताना मानव प्राणी परस्परांशी संबंध व नाती जोडतात. मानव प्राण्यांच्या सहकार्याच्या प्रक्रियेत काही असे आकृतिबंध तयार होतात, सामाजिक अस्तित्वाच्या व संबंधांच्या पातळ्या निर्माण होतात.'' (मालशे, मिलिंद, आधुनिक भाषाविज्ञान सिद्धान्त आणि उपयोजन, लोकवाङ्मय गृह व राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, पहिली आ., १९९५, पृ.१०८) या संबंधाच्या पातळ्या म्हणजे समाजामध्ये अस्तित्वात असणाऱ्या विविध सामाजिक संस्था होत. उदा. अर्थ, शिक्षण, धर्म, राज्य, कुटुंब, विवाह इत्यादी त्या सामाजिक संस्था होय. या संस्था म्हणजे 'समाज' या संकल्पनेची विविध अंगे आहेत. अशाप्रकारच्या विविध अंगांच्या एकत्रिकरणातून समाज ही संकल्पना आकारास येते. समाजाच्या या विविध अंगांना स्पर्श करणारी व मानवाचा त्यांच्याशी संवाद घडवून आणणारी भाषा ही एक महत्त्वपूर्ण माध्यम म्हणून अस्तित्वात आहे. भाषा हे सामाजिक संस्थांच्यामधील परस्पर साहचर्याचे व संज्ञापनाचे प्रमुख साधन आहे. तसेच मानव व समाज यांच्यातील संज्ञापनाचे देखील प्रमुख साधन आहे.

मानवेतर सचेतन सृष्टीपेक्षा माणसाचे वेगळेपण त्याच्या भाषेमुळे सिद्ध होते. समाज हा मानवी समूहाने बनलेला असतो. मानवाला स्वतःची प्रगती समाजामध्ये राहूनच साध्य करता येते. मानवास आपले जीवन अधिक प्रगत व समृद्ध करताना समाजाबरोबर आपले संबंध प्रस्थापित करून ते जपावे लागतात. या संबंधामधून समूहाशी अथवा इतर व्यक्तींशी संवाद साधण्याची व विचार-भावना यांच्या आदान-प्रदानाची प्रक्रिया पार पाडावी लागते. भावना, विचार व व्यवहार यांच्या आदान-प्रदान प्रक्रियेमधून मानवाची समाजाप्रती असणारी बांधिलकी दृढ होण्यास तसेच मानवी जीवन सुखकर होण्यास मदत होते. इच्छा, विचार, भाव-भावना अभिव्यक्त करणे व इतरांच्या इच्छा, विचार, भावना यांना समजून घेणे ही देवाणघेवाण मानव भाषेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर पार पाडतो. त्यामुळे भाषा हे मानव व समाज यामधील महत्त्वाचे संवाद माध्यम ठरते. अर्थातच समाजामध्ये जीवन जगताना काही सामाजिक नियमांची बंधने मनुष्यावर आपोआप निर्माण झालेली असतात. या सामाजिक नियमांना अनुसरून काही सामाजिक संस्था अस्तित्वात असतात. ज्याद्वारे समाज व्यवहार सुरळीत पार पडत असतात. अशा प्रमुख संस्थांपैकी भाषा ही एक महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. कारण भाषा ही सामाजिक नियमांचे पालन करणारी व समाज व्यवहारामध्ये सौकर्य आणणारी अशी

प्रणाली आहे म्हणूनच मानवाच्या विकासाच्या वाटचालीमध्ये समाजात ज्या अनेक संस्थांचा जन्म झाला. त्यापैकी भाषा ही सर्वच संस्थांना स्पर्श करणारी व सर्व संस्थांच्यामध्ये संधान साधून आणणारी अशी संस्था आहे. इतर संस्थांच्या संज्ञापनाचे देखील ते सर्वश्रेष्ठ साधन आहे. ज्ञानसंवर्धन, ज्ञान प्रसारण, माहिती संकलन अथवा प्रसारण, भाव-भावनांचे प्रकटीकरण, विचारांचे प्रकटीकरण इत्यादी बाबींची माणसा-माणसामध्ये तसेच समूहामध्ये व संस्थांमध्ये देवाणघेवाण करण्यामध्ये भाषेची भूमिका महत्त्वपूर्ण आणि केंद्रवर्ती आहे. सामाजिक संवाद अथवा संज्ञापन हे भाषेचे महत्वाचे कार्य आहे. तसेच विशिष्ट व्यक्ती किंवा मानवसमूह यांच्या वर्तनाची प्रक्रिया ही भाषेच्या जोरावर आकारास आलेली आहे अशा केंद्रवर्ती भूमिकेमुळेच भाषा इतर सर्व सामाजिक संस्थांमध्ये सर्वश्रेष्ठ सामाजिक संस्था असल्याचे दिसून येते.

### २.३.१.२.२ भाषा : सांकेतिक व्यवस्था

मानवी भाषा ही एक यादृच्छिक ध्वनीसंकेतांची व्यवस्था आहे. या चिन्हांना मानवी धारणेनुसार विशिष्ट अर्थ प्रदान करण्यात आले आहेत. मानवास भाषा अवगत असणे व त्याद्वारे त्याने समाजव्यवहार सुरळीत पार पाडणे हे सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग आहे. ''मानवी भाषा ही ध्वनीरूप घटकांनी साकार होणारी एक चिन्हव्यवस्था असून तिच्यातील चिन्हे ही पूर्णतः यादृच्छिक स्वरूपाची आहेत. ही चिन्हे विश्वातील वास्तव अथवा कल्पित पदार्थ त्यांचे गुणधर्म, त्यांच्या क्रिया यांचा निर्देश करण्यासाठी एकास एक पद्धतीने तयार झाली नसून त्या मानव समूहाच्या तद्विषयक धारणेचे प्रतिनिधित्त्व करतात. तोच त्यांचा अर्थ होय.'' (काळे कल्याण व सोमण अंजली, आधुनिक भाषाविज्ञान (संरचनावादी आणि सामान्य) प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९९, पृ. प्रस्तावना ५) तर फर्दिनांद द सोस्यूर या भाषावैज्ञानिकाने ''ध्वनी व अर्थ यात सांगड घालणाऱ्या चिन्हांची व्यवस्था म्हणजे भाषा होय.'' (मालशे, मिलिंद, आधुनिक भाषाविज्ञान सिद्धान्त आणि उपयोजन, लोकवाङ्मयगृह व राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, प्र.आ. १९९५, पृ.७) अशी व्याख्या करून ध्वनी व अर्थ म्हणजेच चिन्हक व चिन्हित यांचे संबंध स्पष्ट केले आहेत. भाषेचा अंतःस्तर म्हणजे भाषेची व्यवस्था व भाषेचा बाह्यःस्तर म्हणजे भाषेचा व्यवहार अर्थात संरचना (Langue and Parole) अशी विभागणी सोस्यूर नमूद करतो. चित्रे, चिन्हे, हावभाव इत्यादींच्या आधारे काही संकेत सिद्ध होतात व सांकेतिक व्यवस्था आकारास येते. मात्र या चित्रलिपी अथवा चित्रभाषा या संकेतव्यवस्थेच्या काही मर्यादा आहेत. चित्रे, चिन्हे, हावभाव यांच्यामधून अभिप्रेत असणारा अर्थ समोरच्या व्यक्तीस म्हणजेच तो ग्रहण करणाऱ्या ग्राहकास यथायोग्य ग्रहण होईल याची खात्री देता येत नाही. तो व्यक्त करण्यामध्ये अथवा ग्रहण करण्यामध्ये उणीव राहणे बहुतांशीवेळा शक्य आहे. मात्र ध्वनी या माध्यमाचा वापर करून भाषेद्वारे संवाद साधणे अधिक सोयीचे व व्यवहार सुलभ आहे. कारण भाषा ही अर्थवहनासाठी अधिक प्रभावी अशी सांकेतिक व्यवस्था आहे हे सिद्ध झाले आहे. भाषेमध्ये विशिष्ट वस्तूस अथवा घटकास प्रदान करण्यात आलेला भाषिक संकेत मानवी बुद्धिमध्ये त्या वस्तूचे प्रतिबिंब साकारण्याचे व ग्राहकास त्या भाषिक संकेताचा अर्थ प्रतीत करण्याचे काम यथायोग्य करतो. संकेतबद्ध भाषा ही व्यवस्था सर्व मानवी समाजामध्ये आढळून येते. भाषा न वापरणारा समाज अस्तित्वात असणे आजच्या विज्ञानयुगात अशक्य आहे. कारण मानवाने विज्ञानयुगापर्यंत

साधलेली प्रगती ही भाषेच्या जोरावरच साधलेली आहे व आपले तसेच समाजाचे जगणे समृद्ध केलेले आहे.

### २.३.१.२.३ भाषा : अभिव्यक्तीचे साधन

आदीम काळामध्ये मानवाने अभिव्यक्तीसाठी चिन्हे आणि चित्रे इत्यादी माध्यमांचा वापर विचार व भावना व्यक्त करण्यासाठी केला. विविध प्रकारचे आवाज काढणे अथवा खुणावणे या बाबींचा देखील वापर केला. आरती कुलकर्णी नमूद करतात की, ''विचारांच्या प्रकटीकरणासाठी अर्थपूर्ण चित्रे, दगड, लाकूड यावर कोरून मानवाने हिंस्त्र पशुंचा वावर किंवा त्यांच्यापासून असणारा धोका, नदी झऱ्यांचे वाहणे इत्यादी बाबी इतरांना सांगितल्या असाव्यात. तसेच सभोवतीचा निसर्ग आणि प्राणी पक्ष्यांविषयी स्वतःला वाटणाऱ्या भावनादेखील चित्रांतून व्यक्त करणे त्याला शक्य झाले असेल. मानवाच्या संदेशनाच्या या माध्यमातूनच चित्रलिपी/ चित्रभाषा जन्मली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण अर्थाचे सूचन करणारी ही चित्रे ही पूर्वीची अनुभव व्यक्त करण्याची साधनेच होती.'' (कुलकर्णी आरती, भाषाविज्ञान संकल्पना व स्वरूप, विजय प्रकाशन, नागपूर, पृ.०६) अशा प्रकारे मानव पूर्वीच्या काळी चित्रांचा व चिन्हांचा आपल्या विचारप्रकटीकरणासाठी माध्यम म्हणून वापर करीत होता. त्याद्वारे तो व्यक्त होत होता. कालपरत्वे मानवाच्या विकासाबरोबर भाषेचे मानवी जीवनातील स्थान केंद्रवर्ती बनले व भाषा मानवाची विचारप्रकटीकरणाचे महत्त्वाचे माध्यम बनली. आज मानवासाठी भाषा ही विचारप्रकटीकरणाचे सक्षम साधन आहे. मनुष्य आपल्या भाव-भावनांची व विचारांची अभिव्यक्ती भाषेच्या माध्यमातून करतो. विविध चित्रांच्या व चिन्हांच्या माध्यमातून व्यक्त होण्याच्या पद्धतीपेक्षा भाषेच्या माध्यमातून व्यक्त होणे मानवासाठी अधिक सोयीचे आहे. तसेच ते अधिक प्रमाणात एकानुबंधी व अनेकानुबंधी देखील आहे. मनातील विचारांची मौखिक अथवा लिखित स्वरूपात भाषेच्याद्वारे अभिव्यक्ती करून मानव आपल्या विचारांची देवाणघेवाण करतो. त्याद्वारे आपले जगणे तो सुखकर व समृद्ध करण्याचे काम करतो.

### २.३.१.२.४ भाषा : व्यवहाराचे व संप्रेषणाचे माध्यम

मानव हा समाजशील प्राणी आहे. तो समाजामध्ये राहताना भाषेद्वारे व्यवहार करतो तसेच तो स्वतः भाषेच्या माध्यमातून विचार करीत असतो. स्वतःशी संवाद साधण्यासाठी देखील तो भाषेचाच वापर करतो. मानवी बुद्धितील नानाविध स्वरूपाच्या संकल्पना, विचार, मनातील भावना इत्यादी बाबींना व्यक्त करण्यासाठी मनुष्य ध्वनी माध्यम असणाऱ्या भाषेचा वापर करतो. त्याद्वारे तो आपले विचार इच्छित व्यक्ती अथवा समूहापर्यंत पोहोचवण्याचे काम करतो. मानवास आपल्या गरजांची पूर्ती करण्यासाठी व समाजातील व्यवहार पूर्तीसाठी भाषिक व्यवहार हा अधिक प्रमाणात करावा लागतो. ''भाषेद्वारा माणसे एकमेकांशी संपर्क साधतात, म्हणजेच माहिती, ज्ञान, विचार, अनुभव, भावना यांची देवाण-घेवाण करतात. एकमेकांना समजून घेतात एकमेकांशी संबंध, नाती प्रस्थापित करतात. या देवाण-घेवाणीच्या प्रक्रियेला 'विज्ञापन' किंवा 'संदेशन' (Communication) म्हणता येईल. तेव्हा भाषेचे मुलभूत कार्य म्हणजे सामाजिक संदेशन होय.'' (काळे कल्याण व सोमण, अंजली, संपा, आधुनिक भाषाविज्ञान, द्वि.आ., प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००३, पृ.१५) तर प्र. न. जोशी म्हणतात की, ''समाजाच्या सान्निध्यातच भाषा संभवते. एकट्या माणसास भाषेचा फारसा उपयोग नाही. त्याला बोलायला दुसरा कोणीतरी हवा आणि ज्याच्याविषयी बोलायचे ते आणखी तिसरे हवे. याप्रमाणे

भाषा ही एक सामाजिक वस्तू मानली गेली आहे. समाजाच्या गती-स्थितीचे व आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब त्याच्या भाषेत पडलेले आढळून येते.'' सामाजिक व्यवहार भाषेमुळे मोठ्या प्रमाणावर संभव व सुलभ होतात. त्यामुळे सामाजिक आदान-प्रदान प्रक्रियेच्या अनुषंगाने भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. या भाषेच्या माध्यमातून व्यक्त होणाऱ्या भावना व विचार यांच्या आदान-प्रदान प्रक्रियेस भाषिक संप्रेषण असे देखील संबोधले जाते. ही संप्रेषणप्रणाली मानवाकडून सर्वाधिक प्रमाणात वापरली जाते. या संप्रेषण प्रणालीची प्रक्रिया तीन महत्त्वपूर्ण घटकांद्वारे पार पडते. १. संप्रेषक २. संप्रेष्य ३. ग्राहक

१. संप्रेषक - आपल्या मनातील विचार, भावना, कल्पना संकेताच्या माध्यमातून व्यक्त करून दुसऱ्यापर्यंत पोहोचवतो तो संप्रेषक होय.

२. संप्रेष्य - जो आशय, भावना अथवा विचार संप्रेषकाकडून व्यक्त झाला आहे त्या भावना अथवा विचारास संप्रेष्य म्हणतात.

३. ग्राहक - संप्रेषकाकडून व्यक्त झालेला आशय अथवा विचार जो ऐकून घेतो अथवा स्वीकारतो त्यास ग्राहक म्हणतात. आशय ग्रहण करणारा ग्राहक होय.

संप्रेषक विशिष्ट संदेशास विशिष्ट संकेताच्या माध्यमातून इच्छित ग्राहकापर्यंत पोहोचवतो. त्यासाठी ज्या चिन्ह अथवा माध्यमाचा तो वापर करतो ते माध्यम संप्रेषण प्रणालीतील संकेत असते. मानव ध्वनी संकेतांनी बनलेल्या भाषा या माध्यमाचा वापर करून संप्रेषण करतो. भाषा ही मानवी व्यवहारास व विचारास अधिक चांगल्या प्रकारे व्यक्त करण्याचे काम करते त्यामुळे भाषा ही सक्षम संप्रेषण प्रणाली आहे, हे स्पष्ट होते.

### २.३.१.२.५ मौखिक व लिखित भाषा

चित्रांची, चिन्हांची आणि हावभावाची भाषा वापरून मनातील विचार भावना व्यक्त करण्याचे कार्य पार पाडले जाते. त्याप्रमाणे ध्वनींच्या सार्थ समूहांनी बनलेली भाषा वापरून भाषिक संप्रेषण पार पाडले जाते. मुखावाटे निघणाऱ्या ध्वनींच्या भाषेला मानवी मौखिक भाषा म्हणून अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. मौखिक भाषा ही प्रत्येक व्यक्तीच्या व्यवहारसौकर्याची आहे. कारण जो मनुष्य बोलू शकतो तो भाषेचा वापर करून संवाद साधतो. तसेच मनुष्य विचारप्रकटीकरणासाठी व संदेशनासाठी लेखन करतो तेव्हा देखील तो भाषेचाच वापर करीत असतो. भाषेशिवाय लेखन अशक्यप्राय बाब आहे. भाषेस प्राप्त झालेल्या लिपीच्या माध्यमातून मनुष्य लेखनाची प्रक्रिया पार पाडतो स्वतःला व्यक्त करण्याचे काम करतो. मात्र भाषेच्या बाबतीत बोलणे हे महत्त्वाचे तर लेखन ही दुय्यम प्रक्रिया आहे. कारण जो व्यक्ती अशिक्षित आहे अशा व्यक्तीशी संवाद साधणे मौखिक भाषेच्या माध्यमातून शक्य आहे मात्र लिखित भाषेच्या माध्यमातून ते शक्य नाही.

### २.३.२ भाषेची लक्षणे

भाषा या प्रभावी संप्रेषण माध्यमाची महत्त्वाची अशी काही वैशिष्ट्ये नोंदविता येतील. भाषेच्या जोरावर

मानवाने साधलेला विकास तसेच भाषा, मानव आणि समाज यांच्यामधील सहसंबंध लक्षात घेता या तीनही घटकांमधील साहचर्य ध्यानात येते आणि मानवी व्यवहारांवरील भाषेचे प्राबल्य अधोरेखित होते. मानवी जीवनातील व समाजातील भाषेचे महत्त्व नमूद करण्याच्या अनुषंगाने आपणांस भाषेची पुढील प्रमुख लक्षणे नोंदविता येतील.

### २.३.२.१ बहुविधता

जगामध्ये आज अनेक भाषांचा वापर करण्यात येतो. आज आपल्या भारत देशाचे उदाहरण अभ्यासल्यास दिसून येते की, भारतामध्ये भाषावार प्रांत रचना करण्यात आलेली आहे. प्रत्येक राज्यामध्ये विविध भाषा वापरल्या जातात. त्याचबरोबर प्रदेशागणिक भाषांमध्ये वेगळेपण आढळते. तसेच बोलींचे प्रकार आढळून येतात. प्रादेशिकतेनुसार व भौगोलिकतेनुसार बहुविध स्वरूपाच्या भाषांचा वापर हे भाषेचे वैशिष्ट्य आहे. आज आपल्याला भारतामध्ये आढळणाऱ्या सर्व भाषा या परस्पर भिन्न अशा स्वरूपाच्या असलेल्या दिसतात. प्रत्येक भाषेचे वेगळेपण आपण त्या-त्या भाषेचा अभ्यास केल्यास आपल्याला दिसून येते कारण प्रत्येक भाषेची ध्वनीव्यवस्था भिन्न स्वरूपाची आहे. एकूणच बहुविधता हे भाषेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

### २.३.२.२ उत्पादनक्षमता

भाषेच्या ठायी नवीन शब्दांची निर्मिती करण्याची क्षमता असणे यास 'उत्पादनक्षमता' किंवा 'निर्मितीशीलता' असे म्हणतात. भाषेतील वेगवेगळ्या ध्वनींच्या सार्थ जुळणीतून अनेक नवीन शब्द साकारण्यात येतात. तसेच वेगवेगळ्या शब्दांची जुळवाजुळव करून सोयीचे नवीन शब्द तयार केले जातात. मानवी बुद्धीमध्ये असणाऱ्या भाषिक व्यवस्थेमधून या शब्दांचे नवीन रूप आकारास येते. ज्याचा वापर मनुष्य आपल्या व्यवहारामध्ये करतो. उदा. घोडागाडी, साखरपुडा इ. यामध्ये घोडा व गाडी या दोन वेगळ्या शब्दांना जोडून सोयीस्कर शब्द तयार झाला आहे. डॉ. आरती कुलकर्णी यांच्या मते, ''भाषा बोलणाऱ्याच्या डोक्यात भाषेची विशिष्ट अशी नियम व्यवस्था तयार होत असते म्हणूनच कोणतेही नवे सादरीकरण किंवा उच्चारण त्याच्या सहज लक्षात येते. भाषेची ही नियम व्यवस्था नवनिर्मितीक्षम असल्यामुळेच अनेक प्रकारची वाक्यरचना करणे शक्य होते. भाषेत उत्पादन क्षमता असल्यामुळेच नवनवे शब्द निर्माण होत असतात.''(कुलकर्णी, आरती, भाषाविज्ञानः संकल्पना व स्वरूप, विजय प्रकाशन, नागपूर, पृ.११) याप्रकारे नवनिर्मिती क्षमतेमुळे भाषेमध्ये अनेक नावीन्यपूर्ण व सोयीच्या शब्दांची तसेच वाक्यांची भर पडण्याचे कार्य चालू असते. उत्पादनक्षमतेची ही प्रक्रिया भाषेमध्ये सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे.

### २.३.२.३ यादृच्छिकता

भाषेची व्यवस्था ही संकेतावर आधारलेली आहे. एखाद्या वस्तूस विशिष्ट संकेत प्राप्त झाल्यानंतर ती वस्तू त्याच ध्वनी संकेतांनी ओळखली जाते. उदा. पाणी, झाड, गवत इत्यादी झाडाला झाड असेच संबोधले जाते. तसेच झाड म्हटल्यानंतर माणसाच्या मनामध्ये येणारी प्रतिमा ही झाडाचीच असते ती अन्य कोणत्याही वस्तूची नसते. याचा अर्थ एखाद्या वस्तूस प्राप्त झालेला भाषेतील विशिष्ट ध्वनीसंकेत व व्यक्त होणारा अर्थ यांच्यामध्ये

कोणताही कार्यकारण संबंध असत नाही. तो भाषेच्या निर्मितीप्रक्रियेमध्ये त्या विशिष्ट वस्तूस प्राप्त झालेला संकेत असतो व तो समाजमान्य असतो. भाषेच्या या वैशिष्ट्यास यादृच्छिकता असे म्हणतात.

### २.३.२.४ संस्कृतीचे जतन व संक्रमणाचे माध्यम

भाषा संस्कृतीचा महत्वपूर्ण घटक आहे. भाषेच्या माध्यमातून संस्कृतीचे जतन, संवर्धन व संक्रमण करण्याचे कार्य पार पाडले जाते. ज्ञान, माहिती, संस्कार, कला, साहित्य इत्यादी संस्कृतीच्या घटकांना एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वाहून नेण्याचे काम भाषा करते. हे वहन बहुतांशी मौखिक संदेशनाच्या माध्यमातून तसेच लिखित संदेशनाच्या माध्यमातून पार पडते. हे एक प्रकारचे संस्कृतीचे जतन करणे आहे. त्यामुळे आरती कुलकर्णी म्हणतात की, ''मानवाच्या भाषेने संरक्षण अणि संरक्षणाच्या सीमा पार करून सांस्कृतिक वारसा जतन करण्याचे मोलाचे कार्य केले. '' (कुलकर्णी आरती, भाषाविज्ञानःसंकल्पना व स्वरूप, विजय प्रकाशन, नागपूर, पृ१४-१५) अशाप्रकारे भाषा संस्कृती संवर्धनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. लोकसाहित्य हे याचे उदाहरण म्हणून आपण पाहू शकतो. लोकगीतांचे मौखिक जतन व वहन हे भाषेच्या माध्यमातून होते. त्याद्वारे लोकसंस्कृती घटकांना एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे नेण्याचे काम होते. या प्रक्रियेत भाषा हीच महत्त्वाची भूमिका बजावते. अभिजात साहित्य हे देखील लिखित स्वरूपातील भाषेच्या माध्यमातून संस्कृती जतन करण्याचे काम करते. त्याचबरोबर विविध भाषांच्या आदान-प्रदान प्रक्रियेमध्ये देखील भाषेच्या माध्यमातून विविध प्रदेशातील संस्कृतीचे संक्रमण होताना देखील दिसून येते.

### २.३.२.५ स्थलकालातीतता

भाषेच्या ठायी स्थलकालातीतपणाचे वैशिष्ट्य आहे. भाषेच्या माध्यमातून आपण कोणत्याही स्थळावरून विश्वातल्या कोणत्याही स्थळाविषयी तसेच वर्तमानकालातून कोणत्याही काळाविषयी म्हणजेच भूतकाळाविषयी व भविष्यकाळाविषयी देखील भाष्य करू शकतो. या गुणधर्मास भाषेच्या ठायी असणारे स्थलकालातीतपणाचे वैशिष्ट्य असे आपण म्हणतो. आपण इतिहासातील कोणत्याही प्रसंगाचे अथवा काळाचे वर्णन भाषेत करतो. तसेच भविष्यातील अंदाज देखील बांधतो. आपल्या नजीकच्या बाबींवरती ज्याप्रमाणे भाष्य करतो त्याचप्रमाणे हजारो मैलांवरील परदेशातील बाबींवरदेखील भाष्य करतो. या सर्व बाबींना व्यक्त करण्याचे कार्य भाषेच्या द्वारे घडून येते. भाषेला कोणत्याही प्रकारची बंधने नसलेली यातून आपल्याला दिसून येतात तर भाषा स्थलकालातीत असल्याचे स्पष्ट होते.

### २.३.४ समाज म्हणजे काय?

'समूहात राहणाऱ्या व्यक्तींमध्ये असणारी संबंधांची व्यवस्था म्हणजे समाज' अशी सर्वसाधारण समाजाची व्याख्या केली जाते. तसेच समाजशास्त्रात केली जाणारी समाजाची व्याख्या ही ''समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे'' अथवा ''समाज म्हणजे अशा व्यक्तींचा समूह की, ज्या व्यक्ती विशिष्ट संबंध वर्तनाचे प्रकार यांनी बद्ध झालेल्या असतात. यामुळेच अशा तऱ्हेचे संबंध न ठेवणाऱ्या अथवा दुसरे वर्तन प्रकार असणाऱ्या व्यक्तींपासून त्या समाजातील व्यक्ती वेगळ्या दिसतात.'' (नाडगोंडे, गुरूनाथ, समाजशास्त्राची मूलतत्त्वे,

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पहिली आ. १९८०, पृ.५७) अशी मांडली जाते. तर समाजभाषाविज्ञानाच्या अनुषंगाने समाज म्हणजे काय हे विशद करताना, ''एकच भाषा वापरून एकत्र व्यवहार करणारे लोक म्हणजे समाज.'' अशी व्याख्या केली जाते. साधारणतः धर्म, जात, वंश, वर्ग, लिंग इत्यादी भेदांच्या अनुषंगाने स्त्री पुरूषांचा जनसमुदाय या अर्थी 'समाज' या शब्दाची उपयोजना केली जाते. मात्र 'समाज' हा शब्द सैलपणे व प्रसंगानुरूप वापरला जातो. आपण आपल्या दैनंदिन व्यवहारामध्ये भारतीय समाज, हिंदू समाज, सत्यशोधक समाज इत्यादी शब्द वापरतो. तो आपण देशवाचक, धर्मवाचक, समूहवाचक या अर्थाने वापरतो. मात्र समाज ही मूलतः व्यक्ती आणि समूहाची मिळून बनलेली व परस्परावलंबी अशी व्यवस्था आहे. या व्यवस्थेचे मुख्य घटक व्यक्ती व समूह असून त्यांच्यामध्ये आंतरक्रिया सातत्याने चालू असतात व त्याद्वारे त्यांचे सामाजिक बंध निर्माण झालेले असतात. त्यामुळे समाज म्हणजे एकाअर्थी सामाजिक संबंधांचे जाळे आहे. केवळ एक व्यक्ती अथवा केवळ समूह म्हणजे समाज होत नाही तर व्यक्ती-व्यक्तीत, व्यक्ती -समूहात व समूह-समूहात स्थिर सामाजिक संबंध निर्माण होऊन एक व्यवस्था निर्माण झाल्यास तिला समाज म्हणतात. हे सामाजिक संबंध पृथक स्वरूपाचे कदापि नसतात तर ते एकमेकांमध्ये खोलवर गुंतलेले असे असतात. या समाजाच्या विविध गरजा भागवण्याच्या उद्देशानेच निर्माण झालेल्या अशा विविध संस्था अस्तित्वात असल्याचे दिसून येते. उदा. कुटुंबसंस्था, अर्थसंस्था, धर्मसंस्था, शिक्षण, राज्य इत्यादी. यापैकीच समाजाच्या संप्रेषणाची गरज भागविणारी भाषा ही एक महत्वाची सामाजिक संस्था आहे. भाषा आणि समाज यांचा परस्परसंबंध अतिशय घनिष्ठ असा आहे.

### २.३.४ भाषा आणि समाज : परस्परसंबंध

भाषा समाजातील विविध घटकांच्या संवादाचे आणि व्यवहाराचे माध्यम आहे. समाज हा मानवी समूहाने बनलेला असतो आणि समूहामध्ये विविध परंपरा, प्रथा, व्यवहार आणि आदान-प्रदान इत्यादी प्रक्रिया पार पडत असतात. या प्रक्रियांच्या पार पडण्यासाठी लोकांना एकत्रित येणे आणि संवाद साधणे तसेच विचार, भावना इत्यादींना व्यक्त करणे या सर्व बाबींसाठी भाषेची नितांत आवश्यकता असते. भाषेसारखे माध्यम व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समाज, समाज-समाज यांच्यामध्ये नसेल तर सामाजिक व्यवहार परिपूर्ण होणे शक्य नाही. सर्व सामाजिक व्यवहारांची पूर्ती करणे, मानवाचे स्वतःस व्यक्त करणे या बाबींमधून व्यक्ती व समाज उन्नती साधण्याचे कार्य करतो. मानवाच्या उन्नतीचे भाषा हे माध्यम त्यामुळेच महत्त्वाचे ठरते. कुटुंब, शिक्षण, न्यायदान, कार्यालयीन कामकाज, व्यवसायाची विविध क्षेत्रे, बाजार इत्यादी प्रत्येक सामाजिक संस्थांमधील व घटकांमधील संप्रेषणाची परिपूर्ती ही भाषेच्याद्वारेच घडून येते. एकूणच भाषा ही सामाजिक व्यवहारांची आणि मानवाची महत्त्वाची निकड आहे. भाषा ही समाजाच्या आणि मानवाच्या प्रगतीचे महत्वाचे माध्यम आहे. त्यामुळे भाषा आणि समाज यांच्यामध्ये अतिशय घनिष्ठ संबंध आहे.

भाषा व्यवस्था व भाषेचे व्यवहारातील स्थान या दोन्ही बाबी समाजाबरोबर संधान साधणाऱ्या आहेत. ज्याप्रमाणे विल्यम लॅबॉव म्हणतात की, संपूर्ण भाषाविज्ञान म्हणजेच समाज भाषाविज्ञान होय. त्याप्रमाणे भाषा ही समाजापासून वेगळी करून अभ्यासता येत नाही. भाषा आणि समाज या भिन्न करता येत नाहीत. आर.

ए. हडसन यांनी १९८० साली 'सोशियोलिंग्विस्टिक' या ग्रंथामधून भाषा आणि समाज यांचे बाबत आपले मत मांडताना नमूद केले आहे की, ''समाजभाषाविज्ञान म्हणजे भाषा आणि समाज यातील आंतरसंबंधाचा अभ्यास होय.'' (तुपेरे, सारीपुत्र, समाजभाषाविज्ञान संकल्पना-सिद्धांत आणि दलित वाड्मय, नविन इंदलवार प्रकाशन, नविन उद्योग, पुणे, प्र.आ., २०११, पृ.३०) हडसन याप्रकारची समाजभाषाविज्ञानाची व्याख्या करून भाषा आणि समाज यांच्या आंतरसंबधाचे महत्त्व विशद करतात. मॅलिनोवस्की यांनी मानवी वर्तन आणि परिस्थिती संदर्भ या संकल्पनांची मांडणी करून मानवाचा समाजातील भाषाव्यवहार महत्त्वाचा असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. त्यांनी भाषेच्या आदर्शभूत अभ्यासापेक्षा तिच्या व्यवहारसापेक्ष अभ्यासास अधिक महत्त्वाचा असल्याचे दाखवून दिले आहे. तसेच भाषा ही कृतीसाठी कशी पूरक आहे हे मांडताना त्यांनी त्याचे तीन घटक नोंदविले आहे. १. स्थितीदर्शक - कोणत्या स्थितीत बोलतो आहे. २. स्थानदर्शक - कोणत्या ठिकाणी बोलतो आहे. ३. संपर्क दर्शक - काय चालले आहे. किंवा कसे चालले आहे. मॅलिनोवस्कींच्या मांडणीवरून भाषाव्यवहार हा भाषाव्यवस्थेपेक्षा अधिक महत्त्वाचा असल्याचे स्पष्ट होते. असा हा भाषाव्यवहार प्रामुख्याने समाजामध्ये पूर्ण होतो. त्यामुळे भाषा व समाज यांचा व्यवहाराच्या अनुषंगाने असणारा संबंध अतिशय महत्त्वाचा आहे.

भाषेच्या श्रेष्ठ कनिष्ठत्वाचे भेद भाषाभ्यासाने आता संपुष्टात आले आहेत. कोणतीही भाषा श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नसते. बोली हे भाषेचे सहज व्यवहार स्वरूप आहे. हे भाषेचे प्रथम तर प्रमाणभाषा हे भाषेचे उत्तर स्वरूप आहे. त्यामुळे भाषेमध्ये उच्चनीच, सुधारित अथवा मागास असे भाषेचे स्वरूप कधीच नसते तर भाषेचे देशकालपरिस्थितीनुरूप असणारे असे व्यवहाररूपच असते.

### २.३.५ संस्कृती म्हणजे काय ?

'संस्कृती' या शब्दासाठी इंग्रजीतील Culture (कल्चर) आणि Civilization (सिव्हीलायझेशन) पर्यायी शब्दांचा वापर केला जातो. संस्कृतीची संकल्पना स्पष्ट करताना 'भारतीय संस्कृतीकोशा'मध्ये पंडीत महादेवशास्त्री जोशी यांनी नमूद केले आहे की, ''कृ-करणे या धातूपासून बनलेल्या कृती या शब्दाला 'प्र', 'वि' आणि 'सम' असा उपसर्ग लागून 'प्रकृती', 'विकृती' आणि 'संस्कृती' असे शब्द अनुक्रमे बनतात. प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे त्यात होणारा विकार किंवा बिघाड आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार किंवा बिघाड होऊ नये या उद्देशाने तिच्यावर करायचे विविध सम्यक संस्कार होत.'' (जोशी, पं. महादेवशास्त्री, भारतीय संस्कृतीकोश, प्रथम खंड, प्रस्तावना पृ.२) तर सदा कऱ्हाडे 'संस्कृती म्हणजे एकाअर्थी व्यक्तीचे व समाजाचे समग्र आचार, विचार आणि व्यवहार' अशा व्यापक अर्थाची व्याख्या नमूद करतात. टायलरने संस्कृतीची संकल्पना मांडताना म्हटले आहे की, "Culture or civilization taken in its ethnographic sense, is that complex topic which includes knowledge, belief, art, morals law, custom and any other capabilities and habits acquired by man as a member of society." तर इरावती कर्वे संस्कृतीची व्याख्या करताना नमूद करतात की, ''मनुष्यसमाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती.''

(कर्वे, इरावती, मराठी लोकांची संस्कृती, देशमुख आणि कंपनी, पुणे, दुसरी आ. १९६२, पृ.११) अशा या संस्कृतीला मानवी इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. संस्कृतीची प्रामुख्याने दोन रूपे सांगितली जातात. एक मानवी दृष्टीला दिसणारे त्यास 'भौतिक संस्कृती' असे संबोधले जाते तर दुसरे ज्ञानेंद्रियांना जाणवणारे त्यास 'अभौतिक संस्कृती' असे संबोधले जाते. इरावती कर्वे नमूद करतात की, ''व्यक्ती या घरे, कपडे इत्यादी स्थूल वस्तूंचा उपभोग घेत असतात. हे संस्कृतीचे बाह्यरूप. संस्कृतीचे दुसरे रूप म्हणजे माणसाने सामाजिक जीवन जगण्यासाठी ठरवून घेतलेली रीत होय. योग्य-अयोग्य, पाप-पुण्य इत्यादी संकल्पना तसेच कौटुंबिक नाती, वागणूक इत्यादी गोष्टी या परंपरागत असतात. या गोष्टी माणूस एकटा निर्माण करीत नाही. तो समूहाने त्या करत असतो.'' (भारतीय संस्कृती कोश, खंड नववा) अशा प्रकारे भौतिक संस्कृती आणि अभौतिक संस्कृती अशी संस्कृतीची दोन रूपे आढळतात.

### २.३.५.१ भौतिक संस्कृती

मानवाने स्वतःची उन्नती साधत असताना आपल्या प्रगतीसाठी विविध वस्तूंची निर्मिती केली. त्यामध्ये दळणवळणाची साधने, शेतीविषयक अथवा कारागिरीविषयक हत्यारे, दैनंदिन वापराच्या वस्तू उदा. भांडी, कपडे इत्यादी. या बाबींना भौतिक संस्कृतीत समाविष्ट केले जाते. यावरून मानवाच्या सांस्कृतिक जीवनाची वाटचाल समजून घेण्यास मदत होते.

### २.३.५.२ अभौतिक संस्कृती

मानवी जीवनास समृद्ध बनविण्यासाठी मानवाने जोपासलेल्या कला, ज्ञान, कौशल्ये, जीवनमूल्ये, धर्म इत्यादी अमूर्त बाबींचा समावेश अभौतिक संस्कृतीमध्ये होतो. या बाबी ज्ञानेंद्रियांना जाणवणाऱ्या व त्याद्वारे जोपासल्या जाणाऱ्या अशा असतात. एका पिढीतील संस्कार अभौतिक संस्कृतीच्या माध्यमातून पुढील पिढ्यांकडे वाहून नेण्याचे कार्य पार पाडले जाते.

संस्कृती या संकल्पनेमध्ये विविध अर्थच्छटा आहेत. तसेच संस्कृती हा शब्द विविध अर्थ प्रतीत करताना व्यापक बाबींना आपल्या कवेत घेतो. उदा. १. कला व शास्त्रे यातील उच्च अभिरूची अर्थात - अभिजात संस्कृती, २. एखाद्या संस्थेच्या अथवा संघटनेच्या अथवा एखाद्या समूहाच्या प्रवृत्ती, मूल्ये, ध्येये, प्रथा, प्रघात इत्यादी सामायिक बाबी, ३.मानवी ज्ञान, समजुती, वर्तणुकी इत्यादी बाबी. तसेच ढोबळमानाने वर्गीकरण करताना भूमी, भारतीय जन, भाषा व साहित्य ही भारतीय संस्कृतीची तीन प्रमुख अंगे आहेत. प्रस्तुतस्थळी आपण भाषा या संस्कृतीच्या महत्त्वपूर्ण अंगाचा परामर्श घेतला आहे. आत्ता आपण भाषा आणि संस्कृती यांचा सहसंबंध पाहूया.

### २.३.६ भाषा आणि संस्कृती : परस्परसंबंध

संस्कृती ही एक मानवी समाजाला दुसऱ्या मानवी समाजापासून वेगळेपण बहाल करते. संस्कृतीमध्ये त्या समाजाच्या धर्म, नीती-कल्पना, रुढी, परंपरा, आचार-विचार, जाती, व्यवसाय, कला, साहित्य, व भाषा इत्यादींचा समावेश होतो. एकूणच त्या समाजाच्या जीवनपद्धतीचे प्रतिबिंब म्हणजे संस्कृती होय. भाषा, समाज

व संस्कृती या परस्परपूरक अशा संस्था आहेत. मानव प्राणी भाषेद्वारे समाज व संस्कृतीशी जोडला गेला आहे. यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सांस्कृतिक संक्रमण भाषेच्या माध्यमातूनच घडून येते. ज्याप्रमाणे माणूस हा समाजशील प्राणी आहे व त्याच्या बहुतांशी गरजा या समाजातच पूर्ण होतात. तसेच मानवाचा विकास समाजामध्ये राहूनच घडताना दिसून येतो. त्याचप्रमाणे संस्कृती हा देखील मानवाच्या जीवनास व्यापून टाकणारा घटक आहे. कारण रूढी, प्रथा-परंपरा, कला, साहित्य, धर्म इत्यादी घटकांना समाविष्ट करूनच संस्कृती आकारास येते. परिणामी मानव, समाज व संस्कृती हे परस्परपूरक घटक आहेत व भाषा ही मानवाच्या व्यवहाराचे व संप्रेषणाचे प्रमुख माध्यम असल्याकारणाने भाषा, समाज व संस्कृती या परस्परपूरक बाबी आहेत व त्यांच्यामध्ये अतिशय घनिष्ठ संबंध आहे, हे दिसून येते. सामाजिक व्यवहार प्रक्रिया व सांस्कृतिक घटक यांचे व्यक्त होण्याचे माध्यम भाषाच आहे.

सांस्कृतिक घटक असणाऱ्या रूढी, प्रथा, परंपरा, कला, धर्म इत्यादी बाबी भाषेवर निश्चितार्थाने परिणाम करतात. तसेच भाषेची जडण-घडण ही मोठ्या प्रमाणावर विशिष्ट समाजाच्या संस्कृतीमुळेच घडून येण्यास मदत होते. अंजली सोमण म्हणतात की, ''भाषा आणि संस्कृती यांचा अतिशय निकटचा संबंध असतो. आपण एखादी भाषा शिकतो म्हणजे पर्यायाने त्या समाजाची संस्कृतीच शिकत असतो.'' (सोमण, अंजली, भाषेतला लिंगभेद पण जरा निराळा, भाषा आणि जीवन, वर्ष २, अंक २, उन्हाळा १९८४, पृ.१) त्यामुळे भाषा आणि संस्कृती यांचे संबंध गुंतागुंतीचे व अभिन्न अशा स्वरूपाचे आहेत. भाषेचे संस्कृतीबरोबर असणारे अभिन्नत्व त्यांच्या परस्परावलंबित्वास स्पष्ट करतात. भाषा आणि संस्कृती यांचे घनिष्टपणे असणारे एकजिनसी स्वरूप आपल्यासमोर येते.

भाषेचा समाज व संस्कृतीशी असणारा संबंध दुर्लक्षित करून भाषा केवळ ध्वनी व अर्थ अशी चिन्हव्यवस्था असल्याचे सोस्यूर, ब्लूमफिल्ड, नोम चॉम्स्की हे भाषावैज्ञानिक मते मांडतात. मात्र एडवर्ड सपीर हा भाषा वैज्ञानिक मात्र भाषेचा समाज व संस्कृतीच्या संबंधाने अभ्यास करून भाषा या संज्ञेला शब्दबद्ध करण्याचे काम करतो. तो नमूद करतो की, ""Language is a purely human and non-instinctive method of communicating ideas, emotions and desires by means of a system of voluntarily produced symbols" येथे सपीर भाषेचे समाज व संस्कृती सोबतच्या परस्परसंबंधावर प्रकाश टाकण्याचे काम करतो. डेल हाईम्स आपल्या 'फाऊंडेशन इन सोशियोलिंग्विस्टिसन' या ग्रंथात नमूद करतो की, ''प्रत्यक्ष भाषिक व्यवहारातील ध्वनी शब्द रुपांच्या मागे सांस्कृतिक पार्श्वभूमी उभी असते.'' (तुपेरे, सारीपुत्र, समाजभाषाविज्ञान संकल्पना-सिद्धांत आणि दलित वाङ्मय, नविन इंदलवार प्रकाशन, नविन उद्योग, पुणे, प्र.आ., २०११, पृ.२९) हाईम्स यांनी भाषेच्या ध्वनीरूपापासून संस्कृतीसोबत असणारे भाषेचे संबंध नोंदविलेले आहेत. या दोहोंच्या मतांमधून भाषेचा संस्कृतीसंबंध ध्वनीरूपामधून कसा प्रतीत होतो याचा प्रत्यय येतो. एकूणच संस्कृतीमुळे समाजाला अर्थ प्राप्त होतो तर संस्कृती व भाषा यांचे अस्तित्व समाजामध्ये सिद्ध होते. परिणामी भाषा, समाज व संस्कृती या परस्पराश्रयी बाबी असल्याचे स्पष्ट होते. भाषेविना सामाजिक व्यवहार करणारा समाज आपणास आढळत नाही. प्रत्येक समाजास स्वतःची भाषा आहे. तसेच प्रत्येक समाजास संस्कृती

देखील आहे. त्यामुळे भाषा, समाज व संस्कृती हे घटक एकाच परिघातील परस्परपूरक घटक असल्याचे आढळते.

## २.४ समारोप

एकूणच भाषा ही मानवी जीवनाला व्यापून टाकणारे असे महत्त्वपूर्ण अंग आहे. भाषा ही मानवाला त्याच्या समाजाशी आणि संस्कृतीशी जोडून ठेवण्याचे काम करते. भाषा ही समाजव्यवहारासाठी असणारी यादृच्छिक संकेतप्रणाली असून तिचा समाजामध्ये जीवनव्यवहार सुरळीत करण्यासाठी मोलाचा वाटा आहे. चिन्हांची भाषा, चित्रलिपी, हावभावाची भाषा अशा विविध मानवास व्यक्त होण्याच्या माध्यमांपेक्षा भाषा ही सर्वात प्रभावी अशी संप्रेषण प्रणाली आहे.

## २.५ सरावासाठी प्रश्न

**अ) रिकाम्या जागा लिहा.**

१. भाषा हा शब्द ............ या धातूपासून बनलेला आहे. - भाष्

२. भाषा ही .............. असते. - प्रतिकात्मक

३. भाषा ही ................ संस्था आहे. - सामाजिक

४. .............. हे भाषेचे माध्यम आहे. - ध्वनी

५. भाषा ही एक ...............प्रणाली आहे.- संकेत

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. भाषा ही कोणत्या संकेतावर आधारलेली प्रणाली आहे.

२. संप्रेषामध्ये भाषा कशाची भूमिका पार पाडते.

३. ज्या ध्वनीसंकेताचा पद्धतशीर उपयोग करून प्रत्येक व्यक्ती व्यवहारात भाग घेते ते व्यवहारक्षम संकेत म्हणजे भाषा. अशी भाषेची व्याख्या कोणी केली आहे?

४. भाषेच्या बाबतीत बोलणे हे महत्वाचे तर लेखन ही कशाप्रकारची प्रक्रिया आहे ?

१०. संकेत हे नेहमीच कसे असतात ?

**क) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. भाषा म्हणजे काय व भाषेचे स्वरूप काय हे स्पष्ट करा.

२. भाषेची लक्षणे लिहा.

३. भाषा आणि समाज यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

४. भाषा आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**२.६ उपक्रम**

१. विशिष्ट भाषिक समाजातील बोली स्वरूपात असणाऱ्या भाषेची माहिती संकलित करा.

२. विशिष्ट व्यवसायातील भाषेचे नमुने संकलित करून त्याचा अभ्यास करा.

●●●

**घटक –३**

# समाजभाषाविज्ञान परिक्षेत्रे


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ भाषिक भांडार

३.२.२ लघुक्षेत्र

३.२.३ भाषिक प्रभावक्षेत्र

३.२.४ द्विभाषिकता

३.२.५ बहुभाषिकता

३.२.६ भाषा मिश्रण

३.२.७ भाषाबदल

३.२.८ भाषा निषिद्धता

३.२.९ भाषा प्रदूषण

३.२.१० भाषाशुद्धी

३.२.११ लिंगभेदाची भाषा

३.४ समारोप

३.५ संदर्भ

३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नोत्तरे

३.६ अधिक वाचन

३.७ पूरक वाचन


## ३.० उद्दिष्ट्ये

या घटकाचे अध्ययन केल्यामुळे आपणास –

१. समाजभाषाविज्ञानाची विविध परिक्षेत्रे समजावून घेता येतील.

२. भाषिक भांडार व लघुक्षेत्र या संकल्पना समजावून घेता येतील.

३. भाषाप्रदूषण व भाषाशुद्धी या संकल्पनांची निर्मिती का व कशी होते, ते समजावून घेता येतील.

४. समाजामध्ये असणाऱ्या पुरुषप्रधानतेचा प्रभाव भाषेवर कसा होतो याची कल्पना येईल.

५. व्यक्तीच्या भाषेवर समाजातील घटकांचा कसा प्रभाव होतो हे समजेल.

६. भाषा मिश्रण व भाषाबदल या संकल्पना समजावून घेता येतील.

## ४.१ प्रस्तावना

भारत हा प्राचीन परंपरा असणारा देश असल्याने भारतामध्ये भाषेचा अभ्यासही वैदिक काळापासून होत आहे. निघंटु, प्रतिशाख्ये, शिक्षाग्रंथ, निरुक्त यांसारख्या ग्रंथांतून ही अभ्यासाची परंपरा प्रवाहित होताना दिसते. परंतु ही अभ्यास परंपरा संस्कृत भाषेपुरती मर्यादित राहिली. स्वतंत्र, सामान्य आणि सर्वच भाषांना सामावून घेणारा भाषाविज्ञानाचा दृष्टिकोन या अभ्यास परंपरेतून निर्माण झाला नाही. पुढे विसाव्या शतकाच्या सुरुवातीला संपूर्ण मानव समाजाच्या भाषेचा विचार करणारी एक स्वतंत्र अभ्यास शाखा निर्माण झाली ही अभ्यासशाखा म्हणजे आधुनिक भाषाविज्ञान होय. या अभ्यासशाखेने गेल्या शतकात आमूलाग्र प्रगती केली आहे. भाषेच्या औपपत्तीक, वर्णनात्मक, उपयोजित, ऐतिहासिक अशा विविध अंगांचा अभ्यास या शाखेच्या माध्यमातून होताना दिसतो.

अठराव्या शतकाच्या शेवटी युरोपमध्ये भाषेच्या शास्त्रीय अभ्यासाला सुरुवात झाली परंतु हा अभ्यास भाषेच्या ऐतिहासिक अंगामध्ये अडकून पडला सोस्यूर यांनी भाषेचा ऐतिहासिक आणि एककालिक वर्णनात्मक अभ्यास यातील फरक पहिल्यांदा स्पष्ट केला. भाषाव्यवस्था आणि भाषाव्यवहार या द्वंद्वाची कल्पना त्यांनी मांडली. तर भाषेचा अभ्यास ध्वनी, शब्द, वाक्य या विविध स्तरांवर भाषेचे मूलभूत घटक निर्धारित करून, त्यांचे अंतःसंबंध निश्चित करून त्यांच्यापासून बनणाऱ्या विविध रचनांचा अभ्यास करून संपूर्ण भाषेची संरचना स्पष्ट करणे हे ब्लूमफिल्ड या अमेरिकन भाषावैज्ञानिकाच्या अभ्यासाचे स्वरूप होते त्यांच्या या अभ्यास पद्धतीला अमेरिकन संरचनावाद या नावाने ओळखले जाते. अमेरिकन संरचनावाद्यांनी सोस्यूर प्रणीत आदर्शभूत अशा भाषा व्यवस्थेचाच प्रामुख्याने अभ्यास केला तर नोम चॉम्स्की यांनी सोस्यूर प्रमाणे भाषिक क्षमता आणि भाषिक व्यवहार या द्वंद्वाची कल्पना मांडली त्यांनी विकसित केलेल्या अभ्यास पद्धतीला जनक सूत्री रचनांतरणवादी संप्रदाय संबोधले जाते. सोस्यूर भाषा व्यवस्थेला सर्व समाजाच्या मालकीची मानतात तर चॉम्स्की भाषिक क्षमता ही वैयक्तिक असल्याचे मानतात. परंतु यातील भाषेच्या सामाजिक अंगांकडे स्वतः सोस्यूर आणि चॉम्स्की सह उत्तरकालीन अनेक अभ्यासकांनी दुर्लक्ष केले. सुमारे १९६० सालापर्यंत भाषेचा संपूर्ण अभ्यास हा भाषेच्या आदर्श व्यवस्थेच्या नियमांवरच केंद्रित झालेला होता.

दरम्यानच्या काळात मॅलीनोवस्की यांनी भाषा व्यवस्थेपेक्षा भाषा व्यवहारांचा अभ्यास भाषा वैज्ञानिकांनी केला पाहिजे असा आग्रह धरला. तर त्यांचे सहकारी फर्थ यांनी भाषेचा सामाजिक स्वरूपाचा अभ्यास करण्यावर

भर दिला होता, कारण भाषेचा अभ्यास करताना तिचा सामाजिक संदर्भ लक्षात घ्यायला पाहिजे असे त्यांचे मत होते. भाषेच्या या सामाजिक अंगांचा विचार करत असताना अमेरिकन भाषाभ्यासक सपीर व्होर्फ यांनी एक उपपत्ती मांडली. प्रत्येक भाषक समाजाचे भाषाबाह्य सृष्टीचे ज्ञान त्या समाजाच्या भाषेने नियंत्रित केलेले असते, त्यामुळे आपल्या भाषेने जे आणि जेवढे शब्द आपल्याला दिलेले असतात तेवढ्याच शब्दांनी सभोवतालच्या वास्तवाचे आपण वर्णन करू शकतो. त्यासाठी आपल्या जवळ शब्द नसतात ते भाषेद्वारे मांडण्यात आपल्याला कष्ट पडतात असे या उपपत्तीचे थोडक्यात स्वरूप आहे. हिलाच भाषांच्या सापेक्षतावादाची उपपत्ती म्हणतात ती प्रामुख्याने व्होर्फ यांच्या नावाने ओळखली जाते. परंतु भाषेमुळे आपले बाह्यसृष्टीचे ज्ञान नियंत्रित होते. ही वस्तुस्थिती नसून आपल्या बाह्यसृष्टीच्या आकलनामुळे आपली भाषा नियंत्रित होते. असा उलटा प्रकार दिसून येतो.

## ४.२ विषय विवेचन

अशा प्रकारे रचनांतरणवादी आणि संरचनावादी संप्रदायातील अभ्यासापेक्षा वेगळा विचार काही अभ्यासक मांडत होते. त्यातून १९६० सालाच्या सुमारास समाजभाषाविज्ञान ही समाजामध्ये भाषा कशा पद्धतीने वापरली जाते याचा स्वतंत्र अभ्यास करणारी अभ्यासशाखा निर्माण झाली. या अभ्यास शाखेमध्ये भाषेचा अभ्यास करत असताना भाषिक भांडार, लघुक्षेत्रे, भाषिक प्रभाव क्षेत्र, द्विभाषिकता व बहुभाषिकता, भाषा मिश्रण, भाषाबदल, भाषानिषिद्धता, भाषाप्रदूषण व भाषाशुद्धी, लिंगभेदाची भाषा अशी विविध परिक्षेत्रे निश्चित करून भाषेचा अभ्यास केला जातो. या परिक्षेत्राचा अभ्यास सदर प्रकरणामध्ये करावयाचा आहे.

### ४.२.१ भाषिक भांडार

प्रत्येक भाषिक समाजामध्ये समाजव्यवहार पार पाडण्यासाठी विशिष्ट शब्दनिधी तयार होत असतो. या शब्दनिधीच्या माध्यमातून समाजाचे सर्वच भाषा व्यवहार पार पाडले जातात. हा शब्दनिधी म्हणजे त्या भाषिक समाजाचे भाषिक भांडार असते. भाषिक भांडार ही संकल्पना सर्वप्रथम जॉन गंपर्झ यांनी मांडली. प्रत्येक भाषिक समाजाचे एक भाषिक भांडार असते. या भाषिक भांडारांमध्ये संदर्भानुसार विविध भाग तयार झालेले असतात. कोणत्याही समाजातील व्यक्ती एकाच प्रकारची भाषा वापरताना दिसत नाही. कोणाशी, कधी, काय, किती, कसे बोलावे याचे काही संकेत ठरलेले असतात. विशिष्ट क्षेत्रातील लोक परस्पर विनिमयासाठी काही विशिष्ट भाषा किंवा बोलींचा वापर करत असतात. त्या सर्वांचा मिळून एक भाषिक कोश निर्माण होतो. या भाषिक कोषावर त्या विशिष्ट क्षेत्रातील समाज, विशिष्ट व्यवसाय वैशिष्टे, आर्थिक आणि सामाजिक स्तर या सर्व गोष्टींचा प्रभाव पडत असतो. एका भाषिक कोशामध्ये अनेक बोलीभाषांतील शब्दांचा समावेश असू शकतो. उदाहरणार्थ मुंबई, पुणे, बेंगलोर इत्यादी शहरांमधील भाषिक कोशावर जागतिकीकरण, औद्योगिकीकरण, नवनवीन तंत्रज्ञानातील अनेकविध गोष्टींचा प्रभाव पडतो. तर पूर्णतः ग्रामीण पार्श्वभूमीवरील एखाद्या खेड्यातील भाषिक भांडारावर अथवा भाषिक कोशावर कृषीक्षेत्र, पशुपालन, जातीव्यवस्थेचा प्रभाव असू शकतो.

ज्याप्रमाणे एक भाषिक समाजाचे भाषिक भांडार असते त्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीचेही भाषिक भांडार असते;

कारण समाजातील अनेक व्यक्तींकडून संप्रेषण होत असते. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीशी संपर्क साधत असताना पुढील व्यक्तीचे वय, लिंग, पद, प्रतिष्ठा इत्यादी गोष्टींचा विचार करून सामाजिक संदर्भानुसार आपल्या भाषिक भांडारातील विशिष्ट शब्दांची निवड करून संप्रेषण साधत असते. समाजामध्ये प्रसंग, संदर्भ ,कारण, विषय, परिस्थितीपरत्वे भाषा परिवर्तन अपेक्षित असते. हे परिवर्तन वेगवेगळे भाषिक पैलू आणि अनेक पातळ्यांवरून घडत असते. या सर्व गोष्टींचा अंतर्भाव त्या समाजाच्या भाषिक भांडारांमध्ये होत असतो.

व्यक्ती स्थळ, काळ, वेळ यांचा विचार करून बोलत असते. या बोलण्याच्या क्षमतेला संदेशन क्षमता असे म्हणतात. ही संदेशन क्षमता त्या व्यक्तीच्या भाषिक भांडारावर अवलंबून असते. मॅलीनोवस्की याने आपला भाषाक्षमता सिद्धांत मांडताना भाषिक प्रयोगातून पूर्णता एकजिनसी आणि स्थिर अशी नियम व्यवस्था वेगळी काढता येईल असे सांगितले आहे. ही एकजिनसी आणि स्थिर अशी भाषा वापरणारा असा एकसंघ समाज तो गृहीत धरतो. तथापी समाजभाषावैज्ञानिकांना मॅलीनोवस्कीचे मत स्वीकारार्ह वाटत नाही. कारण समाजामध्ये भाषिक प्रयोगात प्रचंड विविधता आढळते म्हणून समाजभाषा वैज्ञानिकांचे मत योग्य वाटते; कारण समाजामध्ये भाषेकडून अनेकविध कार्ये पार पाडली जात असतात. भाषा वापरासंबंधी समाजामध्ये अनेक अलिखित सामाजिक संकेत पाळावे लागतात. त्यामुळेच भाषा वापरण्याची क्षमता सर्व भाषिकांच्या जवळ आढळते या क्षमतेला समाजभाषाविज्ञानामध्ये संदेश वहनात्मक क्षमता या नावाने ओळखले जाते.

या संदेश वहनात्मक क्षमतेचा वापर करून समाजातील प्रत्येक व्यक्ती समोरील व्यक्तीबरोबर प्रसंग, संदर्भ, कारण, विषय इत्यादी वेगवेगळ्या परिस्थितीनुसार आपली भाषा बदलते. पूर्णपणे एकजिनसी स्थिर एकसूत्री भाषिक नियम व्यवस्था कोणत्याही समाजामध्ये किंवा समाजाच्या भाषेमध्ये आढळत नाही. कोणत्याही समाजाच्या भाषेचे सूक्ष्म निरीक्षण केले तर वेगवेगळे पैलू अनेक पातळ्या असणारे भाषिक भांडार त्या समाजाच्या भाषेमध्ये नांदत असल्याचे आढळून येते.

समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील लोक परस्पर विनिमयासाठी ज्या भाषा बोलींचा वापर करतात या सर्वांचा मिळून एक 'भाषिक कोश' तयार होतो. उदाहरणार्थ पुण्या-मुंबईसारख्या मोठ्या शहरामध्ये एकच एक भाषा बोलणारा समाज आढळत नाही. तेथील समाज आपल्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी किंवा इतर विविध कारणांसाठी मराठी, हिंदी, इंग्रजी,गुजराथी, तामिळी, कन्नड अशा भाषांचा वापर करताना आढळतो. सीमावर्ती भागातील लोक किमान दोन भाषांतून आपला भाषाव्यवहार पार पाडत असतात. त्यामुळे अशा ठिकाणचा भाषिक कोश हा या सर्व भाषांचा मिळून बनतो. या कोशावर या समाजातील व्यवसाय, शिक्षण, श्रद्धा, समाजजीवन, आर्थिक, सामाजिक स्तर या सर्व गोष्टींचा प्रभाव आढळतो.

### ४.२.२ **लघुक्षेत्र**

प्रत्येक भाषिक समाजामध्ये वेगवेगळ्या सामाजिक संदर्भानुसार वापर करण्यासाठी वेगवेगळे भाषिक संच अथवा शब्दनिधी तयार झालेले असतात या भाषिक संचांची संदर्भ क्षेत्रानुसार वेगवेगळे कप्पे तयार होतात हे कप्पे त्याच्या क्षेत्राशी संबंधित असतात भाषा वापराच्या या क्षेत्रांना लघु क्षेत्रे असे संबोधले जाते. ही लघुक्षेत्र (Lingustic domain) प्रत्येक भाषिक समाजाचा आंतर्रचनेवर अवलंबून असतात.

'लघुक्षेत्र ही कल्पना प्रथम जर्मन अभ्यासक श्मिट आणि रोर यांनी मांडली. दुसऱ्या महायुद्धापूर्वी जर्मन सैनिकांचा अन्य भाषिकांशी संपर्क आल्याने त्यांच्या भाषेत जे बदल झाले त्यांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी प्रथम ही संकल्पना मांडली त्यांनी एकूण नऊ लघुक्षेत्रे मानली होती. १) कुटुंब २) क्रीडांगण ३) रस्ता ४)विद्यालय ५) धार्मिक स्थान ६) साहित्य ७) वृत्तपत्र ८) सैन्य ९) न्यायालय आणि शासकीय कचेऱ्या यानंतरच्या अभ्यासकांनी लघुक्षेत्राच्या या यादीत भर टाकली तर कोणी त्यातील काही वगळलीही सर्व भाषांना लागू पडेल असा लघुक्षेत्रांचा एकच एक संच नसतो. प्रत्येक समाजगटांच्या लघु क्षेत्रांची संख्या व स्वरूप हे समाजात आढळणाऱ्या भेदांचा अन्वयार्थ लावण्याच्या गरजेतून ठरते. भाषिक भांडारातील अनेकविध शब्दांपैकी कोणता शब्द कोणत्या लघु क्षेत्रानुसार अथवा संदर्भ क्षेत्रानुसार वापरावयाचा याचे संकेत प्रत्येक भाषिक समाजाने निश्चित केलेले असतात. त्यानुसार प्रत्येक लघु क्षेत्रात भाषा वापराच्या संचाची निवड आधीच झालेली असते लघुक्षेत्र बदलले की त्या शब्दाचा अर्थ बदलतो. उदाहरणार्थ 'अर्थ' या शब्दाचा अर्थ साहित्यक्षेत्रात वेगळा तर पैशाच्या व्यवहारात वेगळा घेतला जातो, एकांतात अरे-तुरे करणारे दोन मित्र व्यासपीठावर एकमेकांचा आदराने उल्लेख करतात, स्वयंपाक घरातील जेवण देवघरात नैवेद्य, महाप्रसाद, प्रसाद इत्यादी नावाने संबोधले जाते. म्हणजेच भाषेचे स्वरुप लघुक्षेत्रानुसार बदलताना दिसते. वक्ता व श्रोता यांच्यातील नाते संप्रेषणाचे ठिकाण, विषय, भाषा तसेच संभाषणाचा संदर्भ या सर्वच गोष्टींचा प्रभाव लघु क्षेत्रानुसार भाषा व्यवहारांवर पडत असतो.

एखाद्या विशिष्ट व्यवसायातील किंवा क्षेत्रातील लोक परस्पर विचारविनिमयासाठी ज्या भाषा बोलींचा किंवा भाषिक भांडाराचा प्रयोग करतात त्या सर्वांचा मिळून एक भाषिक कोश तयार होतो. उदाहरणार्थ - एखाद्या आरोग्य विभागामध्ये किंवा आरोग्याशी संबंधित क्षेत्रामध्ये शरीर, रोग, जंतू, आरोग्य, डॉक्टर, औषधे, गोळ्या, टॉनिक, सलाइन, उपचार, ईलाज, निदान, नर्स, डोस, इंजेक्शन, वॉर्ड, काळजी, ड्रेसिंग, मलम, पेस्ट, ऑपरेशन, इत्यादी कितीतरी स्वतंत्र शब्दांचा प्रयोग होत असलेला पाहावयास मिळतो. विशिष्ट समाजाच्या भाषिक भांडारात संदर्भागणिक वरील उदाहरणाप्रमाणे वेगवेगळे कप्पे तयार होतात भाषा वापराच्या या क्षेत्रांना लघुक्षेत्र असे म्हणतात.

समाजातील व्यक्ती आपल्या गरजांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या कारणांसाठी एकत्र येत असतात. प्रत्येक व्यक्तीचे परस्परांच्या सहकार्यामुळे निर्माण झालेले सामाजिक नात्यांचे स्वरूपही वेगवेगळे असते. या सर्व घटकांचा त्यांच्या भाषिक व्यवहारावर परिणाम होतो. एखाद्या महाविद्यालयांमध्ये शिकणारा विद्यार्थी क्रीडांगणावर, महाविद्यालयातील मित्रांमध्ये, घरी आई वडिलांच्या बरोबर, परिसरातील मित्रांसोबत, प्राचार्य किंवा शिक्षकांच्या सोबत एकाच प्रकारच्या भाषा वापरताना आढळत नाही. तो विद्यार्थी प्रसंग, संदर्भानुसार आपली भाषा बदलतो. संकल्पनाक्षेत्र बदलले की व्यक्तीची भाषा बदलते; कारण प्रत्येक बदललेले संदर्भक्षेत्र म्हणजे एक स्वतंत्र लघुक्षेत्र असते. काही वेळा एकच वस्तू वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये वेगवेगळ्या नावाने ओळखली जाते किंवा वेगळ्या अर्थाने वापरली जाते. उदाहरणार्थ स्वयंपाक घरातील हळद, तांदूळ, जेवण, नारळ या वस्तू देवघरांमध्ये अनुक्रमे भंडारा, अक्षता, नैवेद्य, श्रीफळ या नावाने ओळखल्या जातात.

लघु क्षेत्राचे स्वरूप बोलणाऱ्यांच्या हेतू विषयी बोलणारे एकमेकांशी कोणत्या नात्याने बांधले गेलेले आहेत

परस्परांचे बोलण्याची ठिकाण कोणती आहे यावरून ठरत असते उदाहरणार्थ

**१. शिक्षण क्षेत्र –** अभ्यास, प्रवेश, वर्ग, पदवी, शिक्षण, अभ्यासक्रम, संशोधन, समीक्षा, टीका, सिद्धांत, प्रतिपादन, मत, विचार, वक्तव्य, चर्चासत्र, परिसंवाद, चर्चा, परिषद, निबंध, शोधनिबंध, निष्कर्ष, उदाहरण, पुस्तके, संदर्भग्रंथ, क्रमिक पुस्तके, नियतकालिके, प्रयोग, प्रयोगशाळा, विद्यार्थी, शिक्षक, सर, टीचर, मॅडम, प्राचार्य, अध्ययन, अध्यापन, इत्यादी कितीतरी शब्दांचा प्रयोग या क्षेत्रामध्ये पाहावयास मिळेल.

**२. न्यायालय –** जज, वकील, अपराधी, साक्ष, साक्षीदार, पुरावा, पोलीस, शोध, गुन्हा, आरोपी, कलम, आरोप, न्याय, कायदा, अपराधी, वादी, प्रतिवादी, पुरावा, तहकूब, कोर्ट, न्यायनिवाडा, इत्यादी विविध शब्द या क्षेत्रात आढळतात.

**३. क्रिकेट –** क्रिकेट हा खेळ भारतामध्ये सुमारे दोनशे वर्षांपूर्वीपासून खेळला जात असल्याने हा खेळ मूळ ज्या देशातून आला त्या इंग्लंड देशाशी इंग्रजी भाषेसह मराठी भाषेमध्ये या खेळाचा स्वतंत्र शब्दसंग्रह तयार झालेला आहे. बॉल- चेंडू, बॅट, स्टम्प्स - यष्टी रन- धावा, सिक्सर- षटकार, फोर- चौकार, रनआऊट- धावचित, टीम- संघ, आऊट- बाद, प्लेअर- खेळाडू, बॅटमॅन- फलंदाज, बॉलर -गोलंदाज, बॉलिंग- गोलंदाजी, बॅटिंग- फलंदाजी, धावफलक, विकेट, रन रेट, कॅच - झेल, बोल्ड- त्रिफळा दांडी, स्कोअर - धावा, पीच- खेळपट्टी, फिल्डिंग- क्षेत्ररक्षण, ग्राऊंड- मैदान, अंपायर - पंच, कप्तान - कर्णधार इत्यादी शब्द.

**४ व्यापार –** खरेदी, विक्री, दर, चढ, उतार, तेजी, मंदी, कमिशन, किंमत, नफा, तोटा, नुकसान, फायदा, माल, पत, पैसा, व्याज, कर्ज, सुट्टे पैसे, दलाली, हमाली, व्यवहार, उधारी, रोख, रोकड, पॅकिंग, वाहतूक, भाडे, पोस्टेज, पार्सल, नग, डॅमेज इत्यादी शब्द.

वरील लघु क्षेत्रांमध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील शब्दांचे मिश्रण दिसते. तथापी लघुक्षेत्रामध्ये अशा विविध भाषांचा समावेश जागतिकीकरणांसारख्या कारणांमुळे वाढतो आहे.

**४.२.३ भाषिक प्रभावक्षेत्र**

समाजामध्ये अनेक कामांसाठी किंवा कारणांनी लोक एकत्र येतात. हे परस्परांच्या संपर्कात येणारे लोक पुर्णपणे भिन्न असतात. प्रत्येकाची भाषा भिन्न असते, प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या सामाजिक स्तरातील असते. व्यक्ती ज्या सामाजिक, शैक्षणिक , राजकीय, औद्योगिक पार्श्वभूमीतून आलेली असते ती सामाजिक, राजकीय, औद्योगिक पार्श्वभूमी त्या त्या क्षेत्रातील लोकांना प्रभावीत करत असते. प्रत्येक संदर्भक्षेत्रानुसार व्यक्ती आपली भाषा बदलताना दिसते. प्रत्येक व्यक्तीच्या भाषिककोशावर एखाद्या विशिष्ट क्षेत्राचा प्रभाव जाणवतो. विशेषत: व्यक्ती ज्या उद्योग व्यवसायात असते त्या उद्योग व्यवसायाचा त्या व्यक्तीच्या भाषिक कोशावर प्रभाव जाणवतो. उदाहरणार्थ शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या लोकांच्या भाषिक कोशावर शिक्षण क्षेत्राचा प्रभाव जाणवतो, एम. आय. डी. सी. मध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या भाषिक कोशावर उद्योग जगताचा प्रभाव जाणवतो, धार्मिक काम करणाऱ्या पुजाऱ्यांच्या भाषिक कोशावर धार्मिकतेचा प्रभाव दिसतो. एकूण भाषेवर सांस्कृतिक पर्यावरण, संस्कृती, परंपरा, श्रद्धा, धर्म, जातीयता, साहित्य, विविध कला, शेजारी प्रदेश, भाषा, वातावरण,

भौगोलिक परिस्थिती अशा अनेक क्षेत्र-घटकांचा प्रभाव असतो. या प्रभावाचा विचार केल्याखेरीज समाजभाषाविज्ञानामध्ये भाषेचे विश्लेषण पूर्ण होणार नाही.

समाज, संस्कृती आणि भाषा यांचा परस्परांवर प्रभाव पडत असतो या सर्वांचे संदर्भ म्हणजे भाषेवर असलेले क्षेत्रविशिष्ट प्रभावच असतात. यासंदर्भात ना. वा. टिळक आणि त्र्यंबक बापुजी ठोंबरे उर्फ बालकवी यांच्याकडे पाहता येईल. दोघांनाही रानात एक फूल दिसले. पण ना. वा. टिळक या चिंतनशील कवीला ते वनवासी फूल वाटले तर त्र्यंबक बापुजी ठोंबरे उर्फ बालकवींना ती फुलराणी वाटली. व आपापल्या परीने त्यांनी त्या फुलाचे वर्णन केले.

या दोन्ही कवींचा फुलाकडे पाहाण्याचा दृष्टीकोण त्यांच्या मनावर झालेल्या समाजाच्या व संस्कृतीच्या क्षेत्रविशिष्ट प्रभावाकडे निर्देश करतो. ना. वा. टिळक हे चिंतनशील कवी तर बालकवी हे निसर्गकवी असल्याने त्यांच्या भाषेवर त्यांच्या जीवनपद्धतीचा पर्यावरणाचा प्रभाव आहे. चंद्रासाठी मराठी साहित्यात अनेक सुंदर उपमा दिसतील पण नारायण सुर्वे 'भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली' असे जेव्हा म्हणतात तेव्हा त्यांच्या त्या भाषेवर त्यांच्या संपूर्ण जीवनाची विदारकता परिणाम करताना दिसते. गिरणीकामगारांच्या व्यथा वेदना त्यांच्या कवितेत प्रतिबिंबीत होतात. बाबा भांड यांच्या दशक्रिया कादंबरीच्या भाषेवर अध्यात्म, धर्मशास्त्र, धार्मिक विधी, यांचा प्रभाव दिसतो. कारण या कादंबरीतील ब्राह्मण स्वतःचा चरितार्थ पैठणच्या दशक्रिया घाटावर दशक्रिया विधी करून चालवतात त्यामुळे त्यांच्या भाषेवर तो प्रभाव नैसर्गिकपणे पडतो.

भाषेवर क्षेत्रविशिष्ट प्रभावाबरोबर सांस्कृतिक पर्यावरण, संस्कृती उदाहरणार्थ पाश्चात्य संस्कृती, राहणीमान, शिक्षण इत्यादींचाही प्रभाव दिसून येतो. उच्च शिक्षित भारतीय लोकांच्या भाषेवर हिंदी आणि इंग्रजीचा प्रभाव, पाश्चात्य जीवनपद्धतीचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. शिक्षण, उद्योग, राजकारण इत्यादी व्यापक क्षेत्रे आज समाजजीवनातील भाषेमध्ये अपरिहार्य झालेली आहेत. त्यातून प्रभावक्षेत्रांची सरमिसळ देखील व्यक्तीच्या व्यवहारात होत असते. साहित्य, जातीयता, वर्ग, धर्म, श्रद्धा अशा गोष्टींही भाषेला प्रभावित करत असतात.

### ४.२.४ **द्विभाषिकता**

एक भाषिक समाज दुसऱ्या भाषिक समाजाचा संपर्कात येतो तेव्हा ते दोन्ही भाषिक समाज परस्परांच्या भाषा आत्मसात करतात. या दोन समाजगटांचा भाषाव्यवहार दोन भाषांमधून संपन्न होतो तेव्हा या प्रकारच्या संप्रेषण व्यवहाराला द्वैभाषिकता असे म्हणतात. या समाजाची दोन्ही भाषांना मान्यता असते. कॅनडासारख्या राष्ट्रामध्ये फ्रेंच आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमधून दैनंदिन व्यवहार संपन्न होत असतो म्हणून हे द्विभाषिक राष्ट्र समजले जाते. अशा समाजामध्ये कुटुंबामध्ये बोलण्यासाठी मातृभाषा तर समाजातील व्यवहारासाठी दुसरी व्यवहार भाषा वापरली जाते. अगदी शिक्षणव्यवस्था सुद्धा दोन भाषांमध्ये उपलब्ध असते. भारतातील गोवा हे राज्य देखील द्वैभाषिक राज्य आहे. तेथे मराठी आणि नव्याने मान्यता पावलेल्या कोकणी या दोन्ही भाषांना मान्यता आहे. तेथील लोक घरी कोकणी आणि समाजात व्यवहारासाठी मराठी भाषा वापरताना आढळतात.

समाजातील द्वैभाषिकतेचा अभ्यास अनेक अंगांनी केला जातो. समाजामध्ये सामाजिक स्तरभेदानुसार दोन

भाषांचा वापर आढळतो. उच्च वर्गातील लोक सामाजिक प्रतिष्ठेच्या भावनेतून घरांमध्येही दत्तक भाषेचा वापर करताना आढळतात. पण नोकरांशी किंवा निम्न स्तरातील लोकांशी संवाद साधताना ते मातृभाषेमधून संभाषण करतात. तर कनिष्ठ वर्गातील लोकांना ही दत्तक भाषा केवळ व्यवहारापूरती अगदी प्राथमिक स्वरूपात येत असते. त्यांचे दत्तक भाषेवर प्रभुत्व नसते. ते प्रसंगपरत्वे कामचलावू स्वरूपात या दत्तक भाषेचा वापर करतात. परंतु काही समाजात सतत द्वैभाषिक संज्ञापन व्यवहार चालत असतो. विशेषत: महानगरांमध्ये सर्रास हा द्वैभाषिक व्यवहार चालतो. अशा समाजाचे दोन्ही भाषांवर समान प्रभुत्व असल्याचे आढळते. अशा समाज गटाला 'स्थायी द्वैभाषिक समाज गट' असे संबोधले जाते. भारतातील अनेक राज्यांमध्ये वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. त्यामुळे दोन राज्यांच्या सीमा प्रदेशामध्ये वास्तव्य करणाऱ्या समाजाला या दोन्ही राज्यांच्या भाषा संपर्कामुळे अवगत होतात. उदाहरणार्थ, महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांच्या सीमाभागातील लोकांना कन्नड व मराठी दोन्ही भाषा अवगत आहेत. त्यांचे व्यवहारही या दोन्ही भाषांमधून चालतात त्यामुळे हा समाज द्विभाषिक आहे.

### ४.२.५ **बहुभाषिकता**

बहुभाषिकता ही द्विभाषिकतेच्या पुढची पायरी आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा बहुभाषिक देश आहे. कारण भारतातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळी भाषा राजभाषा म्हणून मान्यता पावलेली आहे. भारतातील अनेक राज्यातील सीमावर्ती भागातील लोकांना दोन्ही राजभाषा शिवाय हिंदी आणि इंग्रजीचेही ज्ञान असते. भारतातील हिंदी मातृभाषा असलेला प्रदेश वगळता इतर प्रदेशावर जास्तीत जास्त लोक कमीत कमी तीन भाषा बोलताना दिसतात हिंदी इंग्रजी आणि त्या प्रदेशाची स्थानिक भाषा हे लोक बोलतात. बहुतांश राज्यांमधून प्राथमिक शिक्षणापासून या तीनही भाषा शिकवल्या जातात. महाराष्ट्रामध्ये मराठी प्रथम भाषा, हिंदी द्वितीय भाषा, इंग्रजी तृतीय भाषा तसेच संस्कृत भाषा सुद्धा अभ्यासक्रमांमध्ये समाविष्ट केली गेलेली आहे. 'एखाद्या व्यक्तीच्या किंवा समाजाच्या किंवा देशाच्या संज्ञापन व्यवहारात तीन किंवा त्याहून अधिक भाषांचा उपयोग केला जातो तेव्हा अशा संज्ञापन व्यवहाराला बहुभाषिकता म्हणतात' बहुभाषिक समाजातील लोकांचे कोणत्या तरी एका भाषेवर प्रभुत्व असते. लघुक्षेत्र भाषा प्रयोगाचे संकेत ठरलेले असतात. क्षेत्रानुसार भाषा वापराचे नियमही ठरलेले असतात. उदाहरणार्थ धार्मिक कार्याची भाषा त्यामुळे एकापेक्षा अधिक भाषांचे उपयोजन संदर्भानुसार व प्रसंगानुसार होते. या बहुभाषिकतेचे प्रामुख्याने दोन प्रकारात वर्गीकरण करता येते. लोक – बहुभाषिकता व अभिजन बहुभाषिकता.

लोकांच्या संपर्कातून आपोआप भाषा आत्मसात करून आलेली बहुभाषिकता लोक – बहुभाषिकता असते. तर शाळा महाविद्यालयातून जाणीवपूर्वक शिक्षण घेऊन आत्मसात केलेली भाषा ही अभिजन बहुभाषिकता या प्रकारात येते. इंग्रजी भाषा भारतामध्ये अभिजन बहु भाषिकाचे उदाहरण आहे .तर हिंदी ही लोक आणि अभिजन अशा दोन्ही बहुभाषिकतेचे उदाहरण आहे.

मुंबईसारख्या महानगरामध्ये अनेक बहुभाषिक लोक आढळतात. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्या कारणाने संपूर्ण देशातूनच नव्हे तर जगातून मुंबईमध्ये अनेक लोक ये–जा करत असतात. त्यामुळे मुंबई

हे एक बहुभाषिक शहर झाल्याचे आपणास निदर्शनास येते. अशा शहरांमध्ये परप्रांतातून स्थलांतरीत झालेला एखादा नोकर घरी आपली मातृभाषा बोलेल, स्थानिक भाषा म्हणून बाहेर व्यवहारांमध्ये मराठीचा अवलंब करण्याचा प्रयत्न करेल आणि राष्ट्रभाषा म्हणून हिंदी तसेच कार्यालयांमध्ये काळाची गरज म्हणून इंग्रजीचा वापर करताना आढळेल. या भाषांच्या उच्चारावर त्याच्या मातृभाषेचा प्रभाव असल्याचे जाणवते. तो या सर्वच भाषांवर प्रभुत्व मिळविण्याचा प्रयत्न करेल व कालांतराने त्याला प्रभुत्व मिळेलही. या भाषांचा वापर त्या व्यक्तीकडून प्रसंग, संदर्भ पाहून परिस्थितीनुसार व ठिकाणानुसार होताना आढळतो.

स्थलांतराचा बहुभाषिकतेवर मोठ्या प्रमाणात प्रभाव जाणवतो.'राष्ट्र या स्तरावर छोटे छोटे भाषिकांचे गट भोवतालच्या इतर भाषकगटांत स्वेच्छेने सामील होण्यासाठी, आर्थिक उन्नतीसाठी स्वभाषा बाजूला ठेवून भोवतालची दुसरी प्रबळ भाषा अनेकदा स्वीकारतात याला 'भाषात्याग' असे म्हणता येईल मात्र भोवतालच्या भाषकांचा प्रभाव फारसा नसेल, त्यांच्यात सामील होण्यात आर्थिक फायदा नसेल किंवा त्यांची संस्कृती आणि धर्म याबाबत प्रतिकूल दृष्टी असेल, तर असे स्थलांतरित अल्पसंख्यांक गट स्वतःची भाषा टिकवून ठेवतात याला 'भाषाजतन' असे म्हणता येईल

इसवी सन १९९० सालच्या एका पाहणीनुसार जगात सुमारे ५०० ते ८०० भिन्न सांस्कृतीक समूह व १६० राष्ट्रे होती. या राष्ट्रांमध्ये ५००० पेक्षा जास्त भाषा बोलल्या जात होत्या याचाच अर्थ असा की राष्ट्रभाषा वेगळी आणि आपली मातृभाषा वेगळी अशा परिस्थितीत असणारे लोक खूप मोठ्या प्रमाणावर आहेत. आपल्या भारतात आपली राष्ट्रभाषा हिंदी आहे परंतु महाराष्ट्रीयन माणसांची मातृभाषा मराठी आहे. या पार्श्वभूमीवर केवळ एक भाषिक राहून चालणार नाही. अशी असंख्य लोकांची अवस्था आहे. बहुभाषिकता ही अशा रीतीने सार्वत्रिक आढळणारी बाब आहे. आज जगात एकच भाषा बोलणारे लोक फार कमी प्रमाणात सापडतील.

### ४.२.६ **भाषा मिश्रण**

भिन्न भाषा संपर्काच्या माध्यमातून अनेकदा मिश्रभाषा किंवा मिश्रबोली निर्माण होत असते. अशा पद्धतीचा बहुभाषिक आपल्या बोलण्यामध्ये ज्ञात असलेल्या भाषांचे मिश्रण करून बोलत असतो. हे मिश्रण पूर्णता नैसर्गिक स्वरूपात व नकळत संपन्न होते यालाच वाचासरमिसळ असेही संबोधले जाते. वाचा मिसळीत एकाच वाक्यांमध्ये दोन भाषांतील शब्दांचे मिश्रण असते. काही वेळा एका भाषेची वाक्यरचना आणि शब्द दुसऱ्या भाषेतील अशाही पद्धतीने वाक्यरचनेच्या पातळीवरही हे मिश्रण घडत असते. परंतु संभाषणामध्ये कधी कधी एक व्यक्ती एका भाषेतून बोलण्यास सुरुवात करते आणि तिच्या तोंडून पुन्हा दुसऱ्या भाषेतील पूर्ण वाक्य बाहेर पडू लागतात तेव्हा त्या प्रकाराला वाचा पालट किंवा भाषा पालट असे म्हणतात. हे भाषा संक्रमण निसर्गतः केव्हाही होऊ शकते. त्याला नियमात किंवा अनुमानात बांधणे शक्य नाही. हे भाषा संक्रमण प्रतिष्ठेसाठीही होताना आढळते. व्यवहारांमध्ये आपल्या मातृभाषेच्या चौकटीमध्ये इतर भाषेतील शब्दांना चपखलपणे बसवून संभाषण व्यवहार संपन्न होत असतो. उदाहरणार्थ - मी आताच नाष्टा केल्यामुळे थोडीशी एनर्जी आली.

आज इंग्रजी भाषेतील अनेक शब्द मराठी भाषेमध्ये इतके रुळलेले आणि रुजलेले आहेत की अनेकदा त्यांना पर्यायी मराठी शब्द मराठी भाषिकाला लवकर उपलब्ध होत नाहीत. अगदी इंग्रजीचे ज्ञान नसणारा

अशिक्षित भाषिकही सहजपणे हे शब्द वापरतो उदाहरणार्थ टेबल, कॉट, नाष्टा, रेल्वे स्टेशन समाजभाषाविज्ञानात अशा अनेकविध शब्दांच्या आयातीला उसनवारी असे म्हणतात. ही मराठीमध्ये इंग्रजी शब्दांची उसनवारी ठरते.

दोन भाषा एकमेकींच्या संपर्कात आल्यानंतर एका भाषेकडून दुसऱ्या भाषेतील शब्दांची उसनवारी केली जाते आणि या उसनवारीतून एक नवीन तिसरी भाषा अथवा वाचा तयार होते. आजची यंग जनरेशन ज्या लॅंग्वेज मधून कम्युनिकेट करते त्या लैंग्वेज मधली ही कविता आहे. असे संदीप खरे आपल्या लव्ह लेटर या कवितेविषयी सांगतात तेव्हा हे वाक्य उसनवारीतून निर्माण झालेली तिसरी भाषा दर्शवते.

'जॉन गिबन्सने एकच भाषा येणाऱ्या माणसांच्या बोलण्यात उसनवारी आढळते तर सरमिसळ होण्यासाठी बोलणारा द्विभाषिक असावा लागतो असे म्हटले आहे. तसेच उसनवारी ही कालांतराने भाषेमध्ये सामावली जाते तसे सरमिसळीचे नाही असेही म्हटले आहे.' (रमेश धोंगडे ५७)

कोणत्याही समाजाची भाषा संपर्कात येणाऱ्या भाषा बोलीपासून अनेक शब्द घेवून स्वतः समृद्ध बनत असते. विविध भाषांमधील शब्दांच्या आदानप्रदान ही आजच्या काळात सहज प्रवृत्ती बनलेली आहे. मराठी भाषेचा अभ्यास करताना आपल्याला लक्षात येते की या भाषेत इंग्रजी, हिंदी, कन्नड, तेलगू, तमिळ, गुजराती इत्यादी भाषेतील शब्द मिसळले आहेत. ही प्रक्रिया व्यापार नोकरी व्यवसाय विविध वैज्ञानिक शोध नवी उपकरणे यामुळे अविरत सुरूच आहे.

### ४.२.७ **भाषाबदल**

भाषा बदल ही भाषिक परिवर्तनाला गती देणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतून इतरांच्या भाषेतील मूळ शब्दांची आयात निर्यात सुरू असते. व्यक्तीबोली संपर्क प्रक्रियेसंदर्भात भाषा बदलाचा विचार केल्यास हा बदल उच्चार, वैशिष्ट्य, शब्दांची निवड, वाक्याची रचना, बोलण्याची लकब या पातळीवर सुरू झाल्याचे दिसते. समोरील व्यक्तीची भाषा बघून आपल्या भाषेतील संभाषण थांबवणे किंवा त्या व्यक्तीच्या भाषेतून योग्य तो प्रतिसाद देणे. ते पाहून स्वतःची भाषा बदलणे या प्रक्रियेला भाषाबदल असे म्हणतात. समाजभाषाविज्ञानामध्ये भाषिक प्रदूषणाच्या संदर्भात विचार करताना भाषामिश्रण, भाषाबदल या प्रक्रियेतून होणाऱ्या भाषांच्या परिवर्तन प्रक्रियेचा अभ्यास केला जातो. या परिवर्तनामागील कारणांचा आणि प्रवृत्तींचा शोध घेताना सामाजिक संदर्भाचा आधार घेतला जातो.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात भाषा संपर्काचे स्वरूप बदलताना दिसते. महानगरापासून खेड्यापाड्यापर्यंत ऑनलाइन खरेदी-विक्रीचे व्यवहार होताना दिसतात. मोबाइल इंटरनेटच्या माध्यमातून ग्रामीणभागही जगाशी जोडला गेला आहे. विविध वस्तूंचे विक्रेते, जाहिरातदार त्यांची रेलचेल ग्रामीण भागात वाढली आहे. हे परराज्यातील लोक ग्रामीण भागात फिरत असताना हिंदी भाषेचा अवलंब करतात. आज महाराष्ट्रातील प्रत्येक गावामध्ये स्वीटमार्ट गुजराथी, मारवाडी किंवा राजस्थानी लोकांनी काढलेली आहेत. टायर पंक्चरचे दुकान केरळी माणसाने काढलेले आहे. त्यांच्याशी बोलताना महाराष्ट्राच्या खेडय़ातील लोकही तोडकी

मोडकी हिंदी बोलण्याचा प्रयत्न करतात. ही प्रक्रिया भाषा बदलाचे उदाहरण आहे. मुंबई, पुण्यासारख्या शहरामध्ये हिंदी भाषेचाच वापर सर्रास केला जातो. याचे कारणही हेच आहे.

भाषा बदलाच्या या प्रक्रियेसंदर्भात विवेचन करताना डॉ. रमेश वरखेडे लिहितात, समाजभाषा विज्ञानात भाषा मिश्रण वा भाषा परिवर्तन यांच्या स्वरूपाचा अभ्यास करून त्यांची सामाजिक कारणे व प्रवृत्ती यांचा शोध घेतला जातो. लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' या आत्मकथनात निवेदक निवेदन करता करता अचानक कैकाडी भाषेतील संभाषण देतो याचे कारण तेथे ते संभाषण कैकाडीतच स्वाभाविक वाटेल व मराठीत कृत्रिम वाटण्याची शक्यता आहे. लेखकाला अभिव्यक्तीत वास्तवचित्रणाच्या निकडीतून असे भाषा परिवर्तन करावे लागते. जसे दैनंदिन व्यवहारात बोहऱ्याच्या दुकानात गेल्यावर हिंदीत बोलणे आणि गुजरीत गेल्यावर भाजीवालीशी स्थानिक बोलीत (अहिराणीत) भाषेत बोलणे अधिक योग्य वाटल्याने मराठी भाषिक आपले मराठी बोलणे थांबवून हिंदीत व अहिराणीत बोलू लागतो. म्हणून संज्ञापन व्यवहाराची निकड हे भाषा बदलाचे (Code switching) कारण असते. (डॉ. रमेश वरखेडे, ६२)

### ४.२.८ भाषा निषिद्धता

समाज हा रूढी, प्रथा-परंपरा, संस्कृती आणि जीवनमूल्यांच्या आधारावर उभा असतो. या सर्वच गोष्टी त्या समाजाच्या भाषेवर प्रभाव टाकत असतात. भाषा वापराबाबत समाजामध्ये काही संकेत ठरलेले असतात या सामाजिक संकेतांचा विचार समाजभाषावैज्ञानिक अभ्यासपद्धतीमध्ये केला जातो. त्यानुसार अनेक भाषाप्रयोग भाषिक जाणीवपूर्वक टाळत असतो. किंबहुना तो भाषा प्रयोग करणे हे सभ्य समाजात अमान्य असते किंवा निषिद्ध असते. या भाषिक निषिद्धतेला सामाजिक मूल्यांचे अधिष्ठान असते. भारतीय समाजामध्ये सौभाग्य खुणांच्या बाबतीत ही निषिद्धता विशेष पाळली जाते. उदारणार्थ कुंकू सांडले असता कुंकू वाढेल, मंगळसूत्र तुटले असता मंगळसूत्र वाढले असे शब्दप्रयोग आढळतात. मुक्त लैंगिकतेचा स्वीकार न केलेल्या समाजामध्ये लैंगिक इंद्रिय वाचक अथवा गुह्यवाचक शब्दांचा उच्चार केला जात नाही. सामूहिक नेणिवेतील भयगंडातून माणसांच्या मरणाशी संबंधित स्वर्गवासी, वैकुंठवासी, पैगंबरवासी, ख्रिस्तवासी असे शब्दप्रयोग केले जातात. भारतीय समाजामध्ये लैंगिकसंबंध स्त्री पुरुषांची गुप्तांगे, प्रातर्विधी या संदर्भात बोलताना काळजी घेतली जाते. या संदर्भातील शब्द उच्चारणे निषिद्ध मानले जाते. डॉक्टरही रुग्णांच्या विविध चाचण्यांमधील मलमूत्र तपासणी संबंधी स्टूल व युरीन अशा इंग्रजी शब्दांचा वापर करून भाषिक निषिद्धता पाळताना दिसतात. साप दिसला तर ग्रामीण भागात लांबडं दिसलं असे म्हटले जाते. समाजात वावरताना सामान्य माणूसही आज टॉयलेट, बाथरूम असे शब्दप्रयोग या निषिद्धतेच्या अनुषंगाने करत असतो.

समाजामध्ये बोलत असताना समोरील व्यक्तीचा दर्जा, परिस्थिती, काल, संदर्भ पाहून भाषा वापराचे नियम पाळले जातात. सामाजिक वर्ग वर्चस्व, सल्ला, शुभ-अशुभाची कल्पना इत्यादी अनेक कारणांनी हे संकेत समाजात तयार होतात. वरिष्ठांविषयी एकेरी भाषेत बोलणे भाषा निषिद्धतेचे मानले जाते. कोणत्याही समाजामध्ये भाषा व्यवहारात समाजातील जाती, धर्म, शिक्षण, सत्ता, व्यवसाय, वसतिस्थान, राहणीमान, अभिरुची, संपत्ती अशा काही निर्धारक घटकानुसार भिन्नता दिसून येते. कोणाशी कसे बोलावे. कोठे काय बोलू नये, कोणाला काय

म्हणू नये, हे संस्कार सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून अप्रत्यक्षपणे व्यक्तीवर होत असतात. त्यातूनच भाषा निषिद्धतेचे संकेत तयार होतात आणि ते समाजातील प्रत्येक व्यक्तीकडून पाळले जातात.

### ४.२.९ **भाषा प्रदूषण**

भिन्न भाषा संपर्काच्या माध्यमातून संपर्कात आलेल्या दोन्ही भाषांमध्ये आदान प्रदान होत असते. एकमेकींवर प्रभाव पडत असतो. परंतु दोन्हीतील एका भाषेत दुसऱ्या भाषेतील शब्दांचे वर्चस्व वाढू लागते तेव्हा त्या आदान करणाऱ्या भाषेची आणि त्या भाषिक समाजाची सांस्कृतिक घडी विस्कळीत व्हायला सुरुवात होते. तो समाज आपल्या प्रथा, परंपरा, संस्कृतीपासून दूर जाण्याची प्रक्रिया सुरू होते. संपूर्ण समाज व्यवहारच प्रदूषित होऊ लागतो. तेव्हा त्याला भाषिक प्रदूषण असे म्हणतात. जगातील कोणत्याही समाजाच्या संस्कृतीचे संक्रमण भाषेच्या आधारानेच होत असते पण त्या समाजाची भाषा जर परकीय भाषेच्या आहारी गेलेली असेल तर त्याचा परिणाम संस्कृतीवरही होत असतो. मराठीमध्ये डॉ. अशोक केळकर यांनी पहिल्यांदा भाषिक प्रदूषण या शब्दाचा वापर केला आणि भाषा प्रदूषणाकडे लक्ष वेधले. माणूस विचार आपल्या भाषेच्या माध्यमातूनच करत असल्याने आपली भाषा जर परकीय भाषेच्या आहारी गेलेली असेल तर आपल्या विचारांवरही परकीय भाषेचा प्रभाव जाणवू लागतो. हेही सांस्कृतिक ऱ्हासाचे कारण ठरते.

आपली संस्कृती, रूढी, परंपरा जतन करण्यासाठी मारक ठरणारी बाब म्हणजे भाषा प्रदूषण असे मानले जाते. परंतु आधुनिक भाषा विज्ञानामध्ये या प्रक्रियेकडे भाषेच्या विकासाची प्रक्रिया म्हणूनच पाहिले जाते. एखादी भाषा दुसऱ्या भाषेच्या संपर्कात आल्यानंतर जो भाषिक बदल होतो त्या बदलाला भाषिक प्रदूषण म्हणता येणार नाही. कारण बदलत्या जीवनपद्धतीमध्ये परकीय भाषासंपर्क अपरिहार्य आहे. परंतु या संपर्कातून भाषेच्या मूळ घटकांचे संतुलन बिघडून भाषिक प्रदूषण होण्याची शक्यता असते. शब्द, वाक्य, अर्थ या पातळीवर हे प्रदूषण घडून येते. स्वतःच्या भाषेत योग्य शब्द उपलब्ध असताना त्या शब्दाऐवजी पर्यायी शब्द परकीय भाषेतून घेतले जातात तर काही वेळा वाक्यांच्या रचनेमध्ये परकीय भाषा संपर्काने बदल घडवून आणला जातो तेव्हा भाषा प्रदूषण ही प्रक्रिया घडून येते.

या प्रक्रियेशी संबंधित विवेचन करताना डॉ. रमेश धोंगडे वाचासरमिसळ आणि वाचापालट असे शब्द प्रयोग करतात भाषा संपर्कातून शब्द स्तरावरील बदलांना वाचासरमिसळ आणि वाक्य स्तरावरील बदलांबाबत ते वाक्य पालट असा शब्दप्रयोग करतात ते भाषा प्रदूषण असा शब्द प्रयोग करीत नाहीत भाषा प्रदूषणासंबंधी डॉ. अशोक केळकर यांनी व्यापक दृष्टीने विचार केलेला आहे. त्यांनी आपल्या 'मराठी भाषेचा आर्थिक संसार' या पुस्तकांमध्ये या संदर्भात विवेचन करताना म्हटले आहे की, भाषा व्यवहार जेव्हा यथार्थ विहित आणि यथोचित राहत नाही तेव्हा तो दूषित मानायला हवा. या भाषिक प्रदूषणाचा अभ्यास समाजभाषाविज्ञानामध्ये केला जातो.

### ४.२.१० **भाषाशुद्धी**

भाषाशुद्धी ही भाषिक प्रदूषणाला थांबवण्यासाठी जाणीवपूर्वक निर्माण केली गेलेली प्रक्रिया आहे. भाषा संपर्क ही बाब आजच्या व्यवहारात अपरिहार्य बनलेली आहे. कोणत्याही भाषेवर इतर भाषेच्या संपर्काने परिणाम

झालेले दिसून येतात. सामाजिक स्थित्यंतर, प्रवास, युद्ध, सत्तास्थानाचे हस्तांतरण अथवा परिवर्तन, व्यापार, उद्योग, व्यवसाय इत्यादी असंख्य गोष्टींचे भाषेवर परिणाम घडून येतात. परभाषा स्वभाषेला धोका पोहोचवू शकते म्हणून जाणीवपूर्वक भाषाशुद्धीची प्रक्रिया राबवली गेल्याची उदाहरणे आहेत. एकनाथांनी ज्ञानेश्वरीची केलेली शुद्ध प्रत आणि महानुभावीयांनी लेखनासाठी वापरलेल्या सकळ आणि सुंदर या सांकेतिक लिपी या भाषाशुद्धी साठीचा चांगला प्रयत्न म्हणावा लागेल. आपल्या संस्कृतीचे वहन आपली भाषा करीत असते त्यामुळे भाषा हा आपल्या अस्मितेचा प्रश्न बनते. आपल्या भाषेचे स्वत्व टिकून राहावे पर्यायाने आपली संस्कृती अबाधित राहावी म्हणून परभाषेतील शब्द निषिद्ध मानले जातात. स्वातंत्र्यवीर सावरकर, माधवराव पटवर्धन यांनी याचसाठी भाषाशुद्धीची चळवळ राबविली. त्यांच्या चळवळीला श्री. के. क्षीरसागर यांनी विरोध केला तर न. चि. केळकर सारख्या अभ्यासकांनी समन्वयवादी भूमिका घेतली. त्यांनी शक्य असेल तेथे परकीय शब्द टाळून त्याजागी स्वभाषेतील शब्द जरूर वापरावेत परंतु परकीय शब्दांना योग्य प्रतिशब्द मराठीत नसल्यास ते परकीय शब्द वापरण्यास हरकत नसावी असा विचार मांडला. शिवाय पर्यायी शब्द तयार करताना संस्कृतचे सहाय्य घेऊन शब्द घडविताना दुर्बोधता निर्माण होऊन हे शब्द हास्यास्पद होतात असे त्यांचे मत होते. क्षीरसागर, केळकर यांची मते भाषाभिमानी लोकांना नकारात्मक वाटली असतील परंतु भाषेच्या परिवर्तनशील प्रक्रियेला अशा पद्धतीने थांबवता येत नाही व्यवहारांमध्ये जे शब्द सतत वापरले जातात ते भाषेत नैसर्गिकपणेच एकजीव होत राहतात त्यामुळे या प्रक्रियेकडे भाषेच्या विकासाची प्रक्रिया म्हणून पाहिले पाहिजे. या प्रक्रियेच्या सामाजिक सांस्कृतिक अंगांचा विचार समाजभाषाविज्ञानामध्ये केला पाहिजे.

### ४.२.११ **लिंगभेदाची भाषा**

लिंगभेदाची भाषा हा समजभाषाविज्ञानातील महत्वाचा अभ्यास विषय आहे. लिंगभेद हा एकमेव भेद निसर्गाने सृष्टीतील सर्व प्राणिमात्रात निर्माण केलेला आहे. या विषयी विवेचन करताना प्रा. डॉ. नंदकुमार मोरे म्हणतात, 'निसर्गाने प्राण्यांमध्ये नर आणि मादी असा लिंगभेद केलेला आहे. यापैकी नर श्रेष्ठ की मादी श्रेष्ठ हा प्रश्न मानवाने निर्माण केलेला आहे. स्त्रीवादी विचारधारेमध्ये हा प्रश्न खूपच चर्चिला गेला आहे. श्रेष्ठ कनिष्ठ–कनिष्ठत्वाची ही गृहीतके संस्कृतीवर्चस्वातून मानवी समाजजीवनामध्ये दृढ झाल्याचे दिसते. विशिष्ट समाजाची संस्कृती आणि भाषा यांचा संबंध घनिष्ठ आहे. जगभरातील समाजांचे निरीक्षण केल्यानंतर बहुतांश समाज पुरुषकेंद्री अथवा पुरुषप्रधान असल्याचे आढळतात. काही विशिष्ट समाजामध्ये अपवादानेच स्त्रीकेंद्री संस्कृती आढळते. कोणत्याही समाजाची भाषा ही संस्कृतीवर्चस्वातून आकार घेत असते, ती घडत असते. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पुरुषी वर्चस्व भाषेतून आविष्कृत होताना दिसते. त्याच बरोबर त्या समाजातील स्त्रीला दिलेले दुय्यमत्वही त्यांच्या भाषेमध्ये पाहता येते.'

जगातील जवळजवळ सर्वच भाषांमध्ये लिंगभेद आढळतो. मराठी भाषेत तर हा लिंगभेद खोलवर रूजलेला दिसतो. मराठी भाषेत जवळजवळ सर्वच सजीव तसेच निर्जीव वस्तू, पदार्थांनाही ही लिंगभेदावर आधारित प्रणाली चिकटलेली दिसते. त्यामुळे सजिवांसह निर्जीव वस्तू, पदार्थ या सर्वांचाच मराठी भाषेसंदर्भात विचार करताना लिंगभेदाचा विचार महत्त्वाचा ठरतो.

या संदर्भात श्री प्र. ना. परांजपे यांनी मराठी भाषेतील लिंगभेदा संदर्भात केलेला विचार महत्वपूर्ण आहे. ते लिहितात ‘मराठी भाषेतील लिंग व्यवस्था व्याकरणिक आहे, प्राकृतिक नाही. म्हणजे निर्जीव वस्तू निर्लिंगी असूनही मराठी भाषा तीन लिंगातील कुठले तरी लिंग तिला बहाल करते. पण त्यातही सेक्सिस्ट दृष्टी आहे असे काहींना वाटते. पर्वत, डोंगर पुल्लिंगी पण टेकडी स्त्रीलिंगी समुद्र, सागर पुल्लिंगी पण नदी, पुळण स्त्रीलिंगी ! माणूस हा शब्द पुल्लिंगी व नपुसकलिंगी आहे, पण त्याचा बहुशः वापर होतो पुल्लिंगी म्हणूनच. माणसांमधील सौहार्दसंबंध आपण बंधुभाव या शब्दाने व्यक्त करतो भगिनीभाव ने नाही.’ स्त्रियांची भाषा-पुरुषांची भाषा असा स्पष्ट भेद करता येईल इतका भाषिक लिंगभेद मराठी भाषेमध्ये स्पष्ट दिसतो. त्याचबरोबर निर्जीव वस्तूंच्या बाबतीत आढळणारी सेक्सिस्ट दृष्टी ही लिंगभेदाच्या दृष्टीने विचारात घेण्यासारखी आहे. मराठीतील अनेक कवी निसर्गातील निर्जीव वस्तूंना आपल्या कवितेमध्ये स्थान देताना; भाषिक लिंगभेद करतात. आपल्या फुलराणी कवितेत बालकवी एका फुलाला स्त्रीलिंग बहाल करतात. आणि सूर्यकिरणाला पुल्लिंग बहाल करतात. इतकेच नव्हे तर त्या दोघांचा विवाहही लावून देतात.

समाजातील सर्वच क्षेत्रातील जबाबदारीच्या पदनामांचा विचार केला तर त्यातून पुरुषप्रधानता प्रकर्षाने जाणवते. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पुल्लिंग महत्वाचे तर स्त्रीलिंग दुय्यम मानले गेले आहे. राष्ट्रपती, राज्यपाल, पंतप्रधान, आमदार, खासदार, प्राध्यापक, अध्यक्ष, खजिनदार, सचिव, सेक्रेटरी, व्यवस्थापक, मॅनेजर, ग्रंथपाल, संयोजक, संचालक, चेअरमन, सहाय्यक, सभासद, ड्रायव्हर, डॉक्टर, इंजिनिअर, अभियंता, इत्यादी अनेक पदनामांतून पुरुषी वर्चस्व अर्थात पुल्लिंग अधोरेखित होते.

### ४.४ समारोप

समाजामध्ये वावरत असताना परस्परांशी संप्रेषण साधले जाते ते भाषेच्या माध्यमातून. समाजामध्ये भाषा कशा पद्धतीने वापरली जाते याचा स्वतंत्रपणे अभ्यास समाजभाषाविज्ञान या अभ्यासशाखेमध्ये केला जातो. समाजामध्ये हे संप्रेषण साधत असताना समाजाचे एक भाषिक भांडार अस्तित्वात येते.त्या भाषिक भांडारामध्ये संदर्भक्षेत्रानुसार वेगवेगळे कप्पे तयार होतात. हे कप्पे त्या त्या क्षेत्रांशी संबंधित असतात. भाषा वापराच्या या क्षेत्रांना लघुक्षेत्रे असे संबोधले जाते. प्रत्येक व्यक्तीच्या भाषिककोशावर एखाद्या विशिष्ट क्षेत्राचा प्रभाव असतो. विशेषत: व्यक्ती ज्या पर्यावरणात, उद्योग, व्यवसायात असते त्या उद्योग, व्यवसायाचा व एकूण पर्यावरणाचा त्या व्यक्तीच्या भाषिक कोशावर प्रभाव जाणवतो. कोणत्याही समाजाच्या संस्कृतीचे संवर्धन व संक्रमण भाषेच्या आधारानेच होत असते. पण त्या समाजाची भाषा जर परकीय भाषेच्या आहारी गेलेली असेल तर त्याचा परिणाम संस्कृतीवरही होत असतो. भाषा हा आपल्या अस्मितेचे प्रतिक असते. भाषा आणि संस्कृतीचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी भाषाशुद्धीची चळवळ उभी राहते. अनेक भाषिक प्रश्न निर्माण होतात. या सर्वांचा अभ्यास समाजभाषाविज्ञानाच्या कक्षेत येतो.

### ४.५ संदर्भ :


१. डॉ.कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण (संपादक): आधुनिक भाषाविज्ञान संरचनावादी, सामान्य आणि सामाजिक, प्रतिमा प्रकाशन.

२. डॉ. रमेश वरखेडे : समाजभाषाविज्ञान प्रमुख संकल्पना, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

३. डॉ. रमेश धोंगडे : सामाजिक भाषाविज्ञान , दिलीपराज प्रकाशन प्रायोगिक लिमिटेड, पुणे

४. डॉ. नंदकुमार मोरे : समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

## ३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नोत्तरे

### अ) योग्य पर्याय निवडा

१) भाषिक भांडार ही संकल्पना सर्वप्रथम कोणी मांडली ?

अ) श्मिट आणि रोर ब) जॉन गिबन्स क) जॉन गंपर्झ ड) मॅलीनोवस्की

२) समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील लोक परस्पर विनिमयासाठी ज्या भाषा बोलींचा वापर करतात या सर्वांचा मिळून काय तयार होतो ?

अ) समाज ब) 'भाषिक कोश' क) समूह ड) लघुक्षेत्र

३) जर्मन अभ्यासक श्मिट आणि रोर यांनी कोणती संकल्पना मांडली ?

अ) लघुक्षेत्र ब) 'भाषिक कोश' क) भाषिक भांडार ड) भाषिक गट

४) समाजगटांचा भाषाव्यवहार दोन भाषांमधून संपन्न होतो तेव्हा या प्रकारच्या संप्रेषण व्यवहाराला काय म्हणतात?

अ) बहुभाषिकता ब) भाषाबदल क) भाषापरिवर्तन ड) द्वैभाषिकता

५) संज्ञापन व्यवहारात तीन किंवा त्याहून अधिक भाषांचा उपयोग केला जातो तेव्हा अशा संज्ञापन व्यवहाराला काय म्हणतात'?

अ) बहुभाषिकता ब) भाषिक कोश क) भाषिक गट ड) द्वैभाषिकता

६) इंग्रजी भाषा भारतामध्ये कोणत्या बहुभाषिकाचे उदाहरण आहे?

अ) लोक ब) लोक आणि अभिजन क) भाषाद्वित्त ड) अभिजन

७) एकच भाषा येणाऱ्या माणसांच्या बोलण्यात उसनवारी आढळते तर सरमिसळ होण्यासाठी बोलणारा द्विभाषिक असावा लागतो हे विधान कोणाचे आहे ?

अ) श्मिट आणि रोर ब) जॉन गंपर्झ क) जॉन गिबन्सने ड) मॅलीनोवस्की

८) समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी हा ग्रंथ कोणी लिहिला ?

अ) रमेश धोंगडे ब) रमेश वरखेडे क) अश्विनी धोंगडे ड) नंदकुमार मोरे

९) 'मराठी भाषेतील लिंग व्यवस्था व्याकरणिक आहे, प्राकृतिक नाही. हे मत कोणाचे ?

अ) रमेश धोंगडे ब) रमेश वरखेडे क) प्र. ना. परांजपे ड) नंदकुमार मोरे

१०) मराठीमध्ये पहिल्यांदा भाषिक प्रदूषण या शब्दाचा वापर कोणी केला ?

अ) रमेश धोंगडे ब) रमेश वरखेडे क) प्र. ना. परांजपे ड) डॉ. अशोक केळकर

उत्तरे – १) क) जॉन गंपर्झ २) ब) 'भाषिक कोश' ३) अ) 'लघुक्षेत्र'
४) ड) द्वैभाषिकता ५) अ) बहुभाषिकता ६) ड) अभिजन
७) क) 'जॉन गिबन्सने' ८) ड) नंदकुमार मोरे ९) क) प्र. ना. परांजपे
१०) ड) डॉ. अशोक केळकर

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. भाषिक भांडार व लघुक्षेत्र या संकल्पना स्पष्ट करा.

२. कोणती परिक्षेत्रे निश्चित करून समाजभाषाविज्ञानात भाषेचा अभ्यास केला जातो ?

**ब) लघुत्तरी प्रश्न**

१. लिंगभाषा ही संकल्पना स्पष्ट करा.

२. समाजातील भाषिक प्रभावक्षेत्रे स्पष्ट करा.

## ४.६ अधिक वाचन

१. समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी : डॉ. नंदकुमार मोरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

२. सामाजिक भाषाविज्ञान : डॉ. रमेश धोंगडे, दिलीपराज प्रकाशन प्रायोगिक लिमिटेड, पुणे

३. समाजभाषाविज्ञान प्रमुख संकल्पना : रमेश वरखेडे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

## ४.७ पूरक वाचन

१. सामाजिक भाषाविज्ञान कक्षा आणि अभ्यास : जयश्री पाटणकर, ससंदर्भ प्रकाशन, नाशिक

२. आधुनिक भाषाविज्ञान सिद्धांत आणि उपयोजन : मिलिंद मालशे, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई

३. मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान : डॉ. महेंद्र कदम, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

❖ ❖ ❖

## घटक–४

# भाषा : समाज गट आणि विविधता

### ४.१ उद्दिष्ट्ये

१. समाज गट आणि भाषिक विविधता अभ्यासणे.

२. समाज, संस्कृती व भाषिक विविधता समजून घेणे.

३. विविध भेद आणि समाज व्यवस्था समजून घेता येईल.

४. आर्थिक वर्ग व वर्ण व्यवस्था समजून घेणे.

५. लहान मूलांच्यातील भाषिक विविधता भ्यासणे.

६. स्त्री–पुरुष यांच्यातील भाषिक विविधता समजून घेणे.

७. कामगार आणि विदयार्थी तसेच युवक यांच्यातील भाषिक विविधता समजून घेता येईल.

### ४.२ प्रास्ताविक

मानव हा समाजशील प्राणी आहे, समाजाचे अस्तित्व भाषेमुळेच असल्याने भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. मानवी विकासात भाषेचे स्थान महत्वपूर्ण आहे. स्वत:चे भाषिक अंग विकसित केल्यामुळे मानव इतर प्राण्यापेक्षा वेगळा वेगळा असून मानवाव्यतिरिक्त इतर प्राणी हजारो वर्षे मूळ स्वरुपातच आहेत; त्यांनी मानवासारखा भौतिक विकास साधला नाही; याचे कारण भाषा हेच आहे. मानवाने भाषेचा शोध लावला. भाषा अधिकाधिक विकसित केली आणि या भाषेच्या सहाय्याने स्वत:ची प्रगती केली आहे. वैज्ञानिक प्रगती, मानवी जीवनातील विविधांगी समृद्धता, सर्व क्षेत्रामधील ज्ञानभांडाराचे संचित भाषेमुळेच मानव प्राप्त करु शकला. हे ज्ञानभांडाराचे संचित भाषेमुळे जतन करण्यात येते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केले जाते, म्हणून मानवी जीवनामध्ये चाकाच्या शोधापेक्षाही भाषेचा शोध महत्वाचा मानला जातो.भाषा ही मानवाच्या संप्रेषण व्यवहारासाठी अस्तित्वात आलेली व्यवस्था असून संदेशन हेच भाषेचे मुख्य कार्य आहे. भाषेव्यतिरिक्त काही माध्यमांचा, क्लृप्त्यांचा उपयोग संदेशासाठी मानव करतो; परंतु भाषेशिवाय प्रभावी संदेशन अशक्य आहे. याचे कारण भाषेमध्ये समाविष्ट असलेली अनेक वैशिष्ट्ये होय. संप्रेषण व्यवहारासाठी मानव भाषेचा वापर वेगवेगळया अंगानी आणि कौशल्याने करताना दिसतो. भाषा ही मानवी ध्वनींनी बनलेली संरचना आहे. ध्वनींमध्ये अंतर्भूत असलेल्या गुणांमुळे भाषा सामर्थ्यशाली बनली आहे. मानवी ध्वनींचे निर्मितीस्थान मानवाचे शरीर आहे. त्यामुळे हे ध्वनी सतत मानवासोबत असतात. या ध्वनींची निर्मिती आणि वहनासाठी मानवाला विशेष कष्ट करावे लागत नाहीत. अलीकडे तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे ध्वनी टिकवून ठेवता येतात, शेकडो मैल दूर पाठविता येतात, पुन्हा

– पुन्हा ऐकता येतात. ध्वनी अंधार भेदतात. अशा प्रकारच्या गुणवैशिष्ट्यांमुळे भाषा सामर्थ्यशाली बनली. भाषा मानवाला समाजीकरणाच्या प्रक्रियेतून नैसर्गिकपणे प्राप्त होते. ती मानवाच्या जीवनाशी–जगण्याशी एवढी एकरुप झालेली आहे की, भाषेचा स्वतंत्र विचार केल्याखेरीज तिचे अस्तित्व आपल्या लक्षात येत नाही.

मानव हा समाजशील प्राणी आहे. भाषा ही प्रत्येक समाजाची, संस्कृतीची एक गरज असते. समाजाचे अस्तित्त्व आणि विकासासाठी अविरत कार्यशील असलेली भाषा म्हणूनच मानवी जीवनामध्ये भाषेला महत्वाचे स्थान आहे. भाषेचे स्वरूप जाणीवपूर्वक समजावून घेतल्याशिवाय तिचे सामर्थ्य आपल्या लक्षात येत नाही. सर्वच मानवी समूहांचा स्वता:च्या भाषेशी घनिष्ठ आणि अतूट संबंध असतो. स्वत:च्या भाषेविषयी प्रत्येक समाजाला नितांत आदर असतो. त्यामुळेच भाषेच्या प्रश्नांवर समाज संवेदनशील असल्याचे दिसतो. भाषाही प्रत्येक समाजाच्या संस्कृतीचा एक भाग असते. समाजाची संस्कृती, परंपरा, श्रद्धा, ज्ञान इत्यादींचे जतन आणि पुढच्या पिढीकडे वहन करण्याचे कार्य भाषेमार्फत चालू असते. परंपरेतून चालत आलेल्या आणि संस्कृतीमध्ये अंतर्भूत असलेल्या अनेक गोष्टी भाषेमुळेच मनुष्य शिकतो. त्यामुळे भाषेला समाजाचे संचित म्हटले जाते. म्हणूनच भाषेशिवाय मानवी जीवनाचा विचार करता येत नाही. भाषा ही मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. भाषा हे समाज व्यवहाराचे महत्वाचे साधन ठरले आहे. भाषेमध्ये शब्दांना, वाक्यांना अर्थ हे समाजाकडून प्राप्त झालेले असतात. त्यामुळे भाषा व्यक्ती वापरत असली, तरी ती समाजाची असते. भाषेची सामाजिकता तपासण्यासाठी आजूबाजूला पुष्कळ उदाहरणे सांगता येतील. समाज ही संकल्पना व्यापक आहे. समाज अस्तित्वात येण्यासाठी एका विशिष्ट उद्देशाने लोक एकत्र यावे लागतात. त्यांच्यामध्ये सतत अंतरक्रिया सुरू राहावी लागते. सुसंवादित्वाची घनता समाजासाठी महत्वपूर्ण मानली जाते. हे सुसंवादित्व भाषेमुळे शक्य होते. त्यामुळे भाषा आणि समाजाचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. कोणताही समाज एकसंघ नसतो. एका भाषिक समाजामध्येही अनेक भेद असल्याचे दिसून येतात. धर्म, जाती, वर्ग, व्यवसाय, इत्यादी कारणांनी समाजामध्ये भेद अस्तित्वात येतात. या विविध भेदांनुसार भाषेचे रुप बदलताना दिसते; भाषा ही मानवी ध्वनींनी बनलेली असल्याने मानवाच्या समाजीकरणाचा तो एक अतूट धागा बनला आहे.

### ४.३ समाज, संस्कृती व भाषा

समाजात भाषा ही संस्कृतीला संक्रमित करत असते. संस्कृतीच्या चौकटीत राहून समाज जीवन नियंत्रित होत असते. मानव हा समाजशील प्राणी असल्यामुळे एकमेकांशी तो सहकार्य करुन, मदत करुन समाजात तो अनेक नाते–संबंध जोडतो. केवळ तो संबंध जोडून थांबत नाही तर समाजात तो गट व समूह करुन राहतो. पशुपक्षी जसे कळप करुन राहतात तशीच प्रवृत्ती मानवात असते, काही संकट आले तर सगळेजण त्याचा मुकाबला करतात. थोडक्यात तो एकीचे बळ, मिळते फळ या उक्तीनुसार राहत असतो. एकंदर समाजात राहत असतांना काही आचारविचार, नियम, संकेत तयार होत असतात. यातूनच कुटूंब, विवाह या सारख्या सामाजिक संस्था तयार होतात. सामाजिक व्यवहारांमध्ये एक मूल्यव्यवस्था तयार होते. श्रद्धा, कला, नीति व रुढी, परंपरा यातूनच जीवनाचे नियंत्रण करणारी मूल्यव्यवस्था निर्माण होत असते. ज्या विशिष्ट नियमव्यवस्थेतून वा चौकटीतून मानवाचे जीवन व्यथित हाते, त्यालाच संस्कृती म्हटले जाते. सामाजिक व सांस्कृतिक जीवनामध्ये

आवश्यक असणाऱ्या सहकार्यासाठी व संपर्क क्रियेसाठी मानव अनेक प्रकारच्या संदेशवहन पद्धती म्हणजे भाषा होय. मानवी समाज व संस्कृती यांची भाषा ही एक अविभाज्य घटक ठरलेली आहे.

**४.४ विविध भेद आणि समाज व्यवस्था**

भाषेला असलेल्या सामाजिक संदर्भाचा शोध घेणे हे समाजभाषाविज्ञानाचे उद्दिष्ट आहे. हा सामाजिक संदर्भ पडताळून पाहाण्यासाठी अवतीभोवती अनेक उदाहरणे आपणाला सापडतात. भारतीय समाजात लिंग, धर्म, जाती आणि उपजाती, विविध जातींचे परंपरागत व्यवसाय, उद्योग, समाजातील समजुती, नागरीकरणानंतर उदयाला आलेले आर्थिक स्तर या आर्थिक स्तरानुसार अस्तित्वात आलेले नवे वर्ग, श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या पारंपरिक आणि आधुनिक कल्पना असे बहुस्तरीय भेद पाहावयास मिळतात. भाषावापरातही या भेदांचे प्रत्यक्षात प्रत्यक्ष प्रतिबिंब पडलेले दिसते. व्यक्तीला समाजीकरणाच्या (sociolization) प्रक्रियेतून भाषा प्राप्त होते. त्यामुळे प्रत्येकाच्या भाषावापरावर समाजाअंतर्गत भेदांचे परिणाम जाणवतात.

प्रत्येक समाजाची भाषा त्या समाजाशी संबंधीत परंपरा, रुढी, संस्कृती, व्यवसाय इत्यादी गोष्टींमुळे समृध्द बनलेली असते. भाषाभ्यासकाला भाषेचे हे सर्व संदर्भ बाजूला सारुन भाषेचा विचार करता येत नाही. प्रत्येक समाजामध्ये आढळून येणारे हे संदर्भ त्या त्या सामाजाच्या भाषेमध्ये खोलवर रुजलेले व भाषेशी एकजीव झालेले असतात. मराठी भाषेत रुढ झालेले लगीनघाई, गावगोंधळ, गावभवानी यासारखे शब्द पाहता हे संदर्भ लक्षात येतात. श्रध्दा समजुतीतून प्रत्येक समाजाचे भाषावापराचे काही संकेत ठरलेले असतात. उदाहरणार्थ कुंकू पुसले, बांगड्या फुटल्या या वाक्यप्रयोगांचा अशुभसूचक अर्थ असल्यामुळे ही वाक्ये कुंकू वाढले, बांगडया वाढल्या अशी उच्चारली जातात. तसेच घरातून जाताना 'जातो' न म्हणता; 'येतो' म्हणणे किंवा दुकान बंद करताना 'दुकान वाढवतो' असे म्हणणे ही त्याची आणखी काही उदाहरणे. समाजजीवन, राहणीमान, समाजाच्या बदलत्या मूल्यकल्पना यामुळे भाषा बदलत राहते. परंतु परंपरा, रुढी, श्रध्दा या प्रत्येक समाजामध्ये खोलवर रुजलेल्या असतात. पर्यायाने बदलत्या भाषेवरही त्याची छाप दिसते.

समाजव्यवस्था ही जीवनसुकरतेसाठी अस्तित्वात आलेली असते. ही व्यवस्था म्हणजेच विशिष्ट समाजाची जीवनपद्धती म्हणता येईल. विवाह व कुटुंब पद्धती, विधी, सण- उत्सव, कुटुंबातील सदस्यांचे स्थान, समाजातील व्यक्तीची प्रतिष्ठा, त्याचबरोबर समाजात अस्तित्वात असलेले अलिखित नियम व संकेत, मूल्यकल्पना या सर्व बाबी या व्यवस्थेमध्ये अंतर्भूत असतात. त्यांचा परिणाम भाषेवर अपरिहार्यपणे होतोच. 'चार दिवस सासुचे चार दिवस सुनेचे' यासारख्या म्हणींचे उदाहरण यासंदर्भात पाहाता येईल. या म्हणीतून अभिप्रेत असलेला अर्थ व्यक्त करण्यासाठी इंग्रजी भाषेमध्ये "Every dog has it's day and every man has his hours' अशी म्हण प्रचलित आहे. एकत्र कुटुंब पध्दतीमध्ये सून एक दिवस सासू होतेच. त्यातून तिची भूमिका बदलते. अधिकार प्राप्त होतात. मराठी भाषेमध्ये रुढ झालेली वरील म्हण किंवा वाक्यप्रयोग मराठी समाजामध्ये प्रचलित असलेल्या कुटुंबपध्दतीमधून भाषेमध्ये आलेला आहे. परंतु इंग्रजीमध्ये या म्हणीचा आशय व्यक्त करण्यासाठी रुढ असलेली म्हण ही पाश्चात्य कुटुंबपद्धतीनुसार वेगळी आहे. तेथील संदर्भ वेगळे आहेत. थोडक्यात भाषा आकाराला येत असताना, तेथील स्थानिक संदर्भ घेऊनच येते.

मराठी समाजामध्ये कुटुंबाला आणि कुटुंब व्यवस्थेमध्ये नाते - संबंधाना महत्त्व आहे. स्त्री - पुरूष, ज्येष्ठ - कनिष्ठ हे भेद आणि समाजव्यवस्थेसाठी निर्माण केलेली विविध पदे, दर्जा, मान, अधिकार या बाबी देखील भाषेवर प्रभाव टाकतात. आहो-जाहो सारखे आदरार्थी शब्द केवळ वयानुसार नाही तर; पद, प्रतिष्ठा पाहून वापरले जात असल्याचे आपल्या लक्षात येते.

**४.५ भाषा व आर्थिक वर्गव्यवस्था**

भाषा व समाज यांचा अगदी जवळचा संबंध आहे. आणि या समाजातच विशिष्ट वर्ग गट असतात आणि या वर्गगटाचे संबंध सामाजिक-सांस्कृतिक संदर्भात या ठिकाणी येतात. त्या वर्गगटानुसार ती भाषा बोलली जाते. परंतु याचा अधिक सुक्ष्म अभ्यास केला तर भाषाभेद आणि सामाजिक आर्थिक स्तर यांच्यामध्ये एक विशिष्ट प्रकारचा संबंध असतो. आणि हे स्पष्ट करण्यासाठी बर्नस्टाईन या ब्रिटीश समाज वैज्ञानिकाने न्युन सिध्दांत मांडलेला आहे. सामाजिक भाषा विज्ञानात भाषा व समाज यांच्या भेदांचा अभ्यास करतांना हा सिध्दांत महत्वाचा ठरला तसेच तो आक्षेपार्हही ठरलेला आहे. हा सिध्दांत बर्नस्टाईनच्या विचारातून निर्माण झालेला आहे. त्याने ब्रिटीश समाजाचे विश्लेषण करताना हा सिध्दांत मांडलेला आहे, त्यात तो म्हणतो की, समाजातील आर्थिक स्तर व भाषाभेद यांमध्ये विशिष्ट प्रकारचा संबंध असतो. त्याने पुढील भाषाभेद मानले आहेत. ते म्हणजे मर्यादित प्रयोग व्यवस्था व विस्तारित प्रयोग व्यवस्था, याचा संबंध त्याने समाजातील अनुक्रमे निम्न व मध्यम आर्थिक स्तराशी दाखवलेला आहे. बर्नस्टाईनने भाषिक प्रयोग व्यवस्थेच्या संदर्भात जो फरक दाखवला आहे तो असा-

१) विस्तारीत प्रयोग व्यवस्था संदर्भ निरपेक्ष असते, म्हणजे शारीरिक हावभाव वा सामाजिक मूल्ये यांसारख्या भाषाबाह्य संदर्भाचा आधार येथे अर्थवहनासाठी फारसा घ्यावा लागत नाही. उलट मर्यादित प्रयोग व्यवस्था सामाजिक मुल्यांच्या भाषाबाह्य संदर्भ चौकटीशी जोडलेली आहे.

२) विस्तारीत प्रयोगव्यवस्था ही औपचारिक, बौध्दिक चर्चा, वादविवाद यामध्ये वापरली जाते. मर्यादित प्रयोग व्यवस्थेचा वापर कुटुंब वा मित्रमंडळीशी बोलताना सारख्याच अनौपचारिक संदर्भात केला जातो.

३) विस्तारीत प्रयोग व्यवस्थेत रचनात्मक घटनांचे वैपूल्य असते. त्यामुळे अर्थाचे संघटन करण्यासाठी कोणते घटक वापरले जातील याविषयी भाकिते करता येण्याची शक्यता कमी असते. मर्यादित प्रयोग व्यवस्थेत मात्र भाकीतांची शक्यता वाढते. कारण त्यात भाषिक घटकांचे वैविध्य कमी असते.

४) बोलणाऱ्याच्या व्यक्ती वैशिष्ट्यांवर विस्तारीत प्रयोग व्यवस्थेत भर दिला जातो. तर याउलट मर्यादित प्रयोगव्यवस्थेत व्यक्ती वैशिष्टयापेक्षा बोलणाऱ्याच्या सामाजिक अस्तित्वावर त्याच्या वर्ग वैशिष्टयांवर भर असतो.

बर्नस्टाईनने वरील दोन भाषिक प्रयोग व्यवस्थांचा संबंध समाजाच्या आर्थिक वर्गाशी जोडला. या दोन्ही प्रयोग व्यवस्था मध्यमवर्गातील मुले वापरु शकतात. तर मर्यादित प्रयोग व्यवस्था फक्त निम्न स्तरातील मुले अनेकदा वापरतात असे त्याला संशोधन करताना दिसून आले आहे. या संशोधनाचा आधार घेऊन अमेरिकेतील

बर्नस्टाईनच्या काही अनुयायांनी न्युनसिध्दांत मांडला आहे. विस्तारीत प्रयोग व्यवस्थेचा अभाव निम्न (कर्मचारी) या स्तरात दिसतो. कारण त्यामुळे निम्न आर्थिक वर्गातील मुले शालेय शिक्षणात अभ्यासात मागे पडतात. त्यांना केवळ मर्यादित प्रयोगव्यवस्थेचा उपयोग करणे शक्य असल्याने या मुलांमध्ये एक भाषिक व पर्यायाने बौध्दिक कमतरता किंवा न्युनता निर्माण होते. त्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगती होत नाही. असे झाल्याने सामाजिक यश त्यांना मिळत नाही. याउलट मध्यम वर्गातील अनेक मुले समाजामध्ये भरभर यशस्वी होतात. कारण विस्तारीत व मर्यादित या दोन्ही प्रयोग व्यवस्था मध्यम वर्गाकडे उपलब्ध असतात. या वरील प्रयोग व्यवस्थेचा अमेरिकन शिक्षण पध्दतीवर बराच परिणाम झालेला दिसतो. केनडी व जॉन्सन यांच्या अध्यक्षीय राजवटीत समाजविज्ञान, मनोविज्ञान व भाषाविज्ञान या क्षेत्रातील अभ्यासकांना निम्न आर्थिक स्तरातील लोकांचे जीवन व भाषा यांची तपासणी करण्यात आली. सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाची पाहणी करण्यासाठी अनेक ग्रंथ १९६० ते १९७० च्या दरम्यान निर्माण झाले. या वर्गातील ती मुले होती. त्यांच्यासाठी सामाजिक व आर्थिक दृष्ट्या अधिक उपयुक्त विकसनशील बनविण्यासाठी खास शैक्षणिक अभ्यासक्रम निर्माण करण्यात आले. परंतु हे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले. कारण आरंभी मांडलेला हा न्युनसिध्दांत उपयुक्त ठरला परंतु नंतर प्रत्यक्षात जेव्हा शिक्षण क्षेत्रातील उपयोजनेत त्याला अपयश आले, तेव्हा अनेक शिक्षणतज्ज्ञ व भाषाभ्यासक यांनी ह्या सिध्दांताचा पुनर्विचार सुरु केला. त्यातील उणीवा कमी केल्या. त्याचे योग्य ते निकष ठरविले गेले. तरीपण यावा अनेक प्रकारचे आक्षेप घेतले व आपला सिध्दांत हा अन्य अभ्यासकांनी व्यवस्थित हाताळला नाही. त्याकडे फक्त नकारार्थी दृष्टीने पाहिले, जर न्युनसिध्दांताचा गांभीर्याने विचार केला असता तर तो प्रत्यक्षात यशस्वी ठरला असता, असे त्याने ठामपणे प्रतिपादन केले.

तसेच लबव या सामाजिक भाषावैज्ञानिकाने बर्नस्टाईनच्या न्युन सिध्दांतावर व त्याच्या सामाजिक उपयोजनावर काही आक्षेप घेतलेत ते असे -

१) या न्युनसिध्दांताचा जो मूळ उद्देश होता, तो म्हणजे सामाजिक अन्याय दूर करणे, परंतु त्यात वर्ग व वर्णभेदाला अवास्तव महत्व मिळाल्यामुळे त्याचा मूळ उद्देश मागे पडला. शिवाय मागासवर्गीयांसाठी जो अभ्यासक्रम सुरु करण्यात आला होतो तो प्रयत्न सफल झाला नाही. कारण या वर्गातील मुले मुळातच बौध्दिकदृष्टया कुमकुवत असतात. त्यामुळे त्यांच्यासाठी हा अभ्याक्रम अयशस्वी ठरला गेला.

२) तसेच मर्यादित भाषिक प्रयोग व्यवस्था ही निम्न आर्थिक वर्गाकडे असते, हे लबवला मान्य झाले नाही. कारण कोणत्याही प्रकारची भाषा बोली बोलणारे लोक आपल्या क्षमतेनुसार अनेक वाक्य निर्माण करतात.

३) स्वत:च्या बोलीमध्ये मागासलेले वर्गातील मुल सुध्दा अशा संकल्पना अत्यंत कौशल्यपूर्वक हाताळतात. उदा. एका अमेरिकन निग्रो मुलाला 'देवाचा रंग कोणता ?' असा प्रश्न विचारला गेला. त्यावर त्याने तो श्वेतवर्णिय आहे, असे उत्तर दिले. त्याचे कारण त्याला विचारले असता, त्या मुलाने दिलेले उत्तर विस्तारित प्रयोग व्यवस्थेचा आधार घेऊन दिलेले नाही. तरी परंतु देव या अमूर्त कल्पनेविषयी त्याचा युक्तीवाद विलक्षण असा ठरतो. यावरुन तो कशाचाही आधार न घेता आपल्या युक्तीवादाचे समर्थन आपल्या बोलीच्या आधारे करु शकतो. तेव्हा संदर्भात बर्नस्टाईनने मांडलेल्या ज्या भाषिक प्रयोग व्याख्या आहेत. त्या या निकषावर

टिकू शकत नाहीत. लबवने मात्र याचा काटेकोर अभ्यास करुन न्युनसिध्दांताचा फोलपणा सिध्द केला.

या न्युनसिध्दांतावर मार्क्सवादी दृष्टीकोनातून टीका झालेली आहे. काही आक्षेप घेण्यात आले आहे. या टिकेचा रोख असा होता की, न्युनसिध्दांत हा मध्यमवर्गीय दृष्टीकोनातून निर्माण झाला आहे. याचे कारण असे की, अमेरिकन भांडवलशाही समाजव्यवस्थेमध्ये जी शिक्षणपध्दती आहे, त्यात फक्त मध्यमवर्गीय मुल्येच स्विकारली जातात व तीच भाषा आदर्श मानली जाते व ज्यांना ही भाषा बोलता येत नाही. त्याची गणना मागासवर्गात होते. आणि अशा या वर्गासाठी त्यांच्या भाषेतील अभ्यासक्रम तयार न करता मध्यमवर्गातील अभ्यासक्रम तयार करणे म्हणजे एक प्रकारे त्यांचीच मक्तेदारी दाखवणे हे होय. तेव्हा हा सर्व विचार करता त्याच्या भाषेतील जो अभ्यासक्रम त्यांना समजेल, तोच मागासवर्गासाठी सुरु केला पाहिजे. तरच तो त्यांना समजेल.

बर्नस्टाईनने जो सिध्दांत मांडला आहे, त्यात काही तथ्यांश आहे तो म्हणजे भाषाभेद हे सामाजिक वर्गभेदानुसार अस्तित्वात येत असतात. उदा. निम्न स्तरातील समाजाची जी भाषा आहे ते खरोखरीच खालच्या दर्जाची मर्यादीत स्वरुपाची मानता येईल का? या भाषेला शिक्षण क्षेत्रामध्ये काही स्थान देता येईल का? असे प्रश्न निर्माण झाले आहेत. आजही महाराष्ट्रात मध्यमवर्गीय समाजामध्ये अशुध्द स्वरुपाची भाषा बोलली जाते. उदा. आनी (आणि), पानी (पाणी) अशा ज्या भाषा बोलतात त्यांना आधी शुध्द बोलायला शिकवायला पाहिजे. शिवाय विशिष्ट वर्गाच्या भाषेचे पूर्णपणे उच्चाटन करुन त्याजागी फक्त प्रमाणभाषा वा बोली वापरली जायला हवी, अशी सक्ती करणे कितपत योग्य आहे, हा तेथे एक महत्वाचा प्रश्न आहे. शाळेत शिकवली जाणारी प्रमाणभाषा वा बोली व स्वत:च्या वर्गाची बोली या दोन्ही बोलींचा वापर करावा. अशी भूमिका अलीकडे काही भाषाभ्यासक घेत आहेत. प्रमाणेतर बोली या प्रमाण बोली इतक्या प्रभावीपणे कार्य करु शकतात असे समाजाला पटवून देणे गरजेचे आहे.

### ४.६ भाषा व वर्णव्यवस्था

भारतामध्ये अगदी प्राचीन काळापासून आर्थिक वर्गभेद मानले जात होते. विशेषत: या समाजव्यवस्थेत जातीनुसार त्याचे व्यवसाय ठरले जात होते. शिक्षण फक्त ब्राह्मण, क्षत्रिय यांनीच घ्यायचे. हलकी कामे निच्च वर्गानी करायचे, अशी सर्वसाधारण समाज व्यवस्था त्या काळात होती. आजही काही अंशी आपल्याला असेच दिसून येते. वर्ण वा जाती आज तरी जन्मावरुन ठरवल्या जातात. अगदी आजतागायत ही जातीभेदाची चौकट समाजात, अद्यापपर्यंत पक्की उभी आहे. त्या चौकटीवर प्रहार करणे अद्याप फारसे जमलेले नाही. वर्ग व जात हे घटक भाषाभेदांच्या बाबतीत आज तरी महत्वाचे ठरले आहेत. भारताच्या सर्व प्रातांत आज आपल्याला स्पृश्य आणि अस्पृश्य यानुसार भाषाभेद सर्रासपणे आढळतात. भाषाभेदानुसारच किंवा ते कोणती भाषा बोलतात, यावरच त्यांची जात ओळखली जाते. उदा दक्षिण भारतामध्ये (तामिळनाडू, कर्नाटक, आंध्रप्रदेश) तामीळ, तुळू, कानडी व त्याचबरोबर मराठी या भाषांमध्ये सवर्णातही ब्राम्हण व ब्राम्हणेतर असा भाषाभेद दिसतो. ब्राह्मणांच्या धार्मिक व सांस्कृतिक वर्चस्वामुळे बहुतेक ठिकाणी ब्राह्मणी बोली हिच प्रमाणबोली म्हणून रुढ झालेली आढळते. याशिवाय शिक्षण व नागरी कारणांमुळे ब्राह्मणेतर बोली प्रमाण ब्राह्मणी बोलींच्या जवळ

येणे ही प्रक्रिया ही निदान मराठी भाषेच्या संदर्भात सुरु झालेली आढळते. तसचे महाराष्ट्रापुरता जर विचार केला तर पुण्यामध्ये जी मराठी बोलली जाते, तिच खरी शुध्द मराठी पुणेरी बोली होय असे मानले जाते.

भारतात जसे वर्ण वा जातीचे भेद मानले जातात, तसेच अमेरिकन समाजात कृष्णवंशीय व श्वेतवंशीय हे भेद मानले जातात. त्या त्या प्रांतानुसार भाषाभेद झालेला दिसतो. इंग्रजीत बराच अभ्यास अमेरिकन निग्रोच्या संदर्भात झालेला आहे. अमेरिकन इंग्रजीची एक प्रमाणेतर बोली म्हणून निग्रोंची बोली समजली जाते. ही निग्रोंची बोली सर्व बाबतीत म्हणजे ध्वनी, शब्दसंग्रह, व्याकरण इ. संदर्भात ती श्वेतवंशियाच्या प्रमाण बोली पेक्षा बरीचशी वेगळी दिसते. उदा. दत टठ या क्रिया पदांचा उपयोग वर्तमान काळात बऱ्याचदा केला जात नाही. थडुठ, ज्ञठत्रण, त्ड्ट्टठ इ. क्रियापदांची तृतीय पुरुषी एकवचनी रुपे न प्रत्ययाशिवाय वापरण्याकडे त्यांचा कल असतो. अनेकदा दत टठ चे रुप बदलताना आढळत नाही. ओमतण्तज्ञ किंवा या ठत्रज्ञड्ठ शब्दांमध्ये दोन स्वरांच्या मध्ये येणारा ज्ञ हा वर्ण न उच्चारणारी प्रवृत्ती निम्नस्तरीय निग्रोंच्या बोलण्यात आढळते. थोडक्यात निग्रो बोली व श्वेत वर्णीयांची बोली यामध्ये बराचसा फरक आढळतो. तो जसा सामाजिकदृष्ट्या आढळतो. तसाच तो व्याकरणदृष्ट्याही आढळतांना दिसतो. मात्र निग्रोंची बोली ही अमेरिकन श्वेतवर्णियांना समजते. या भिन्नतेमुळे व त्या बोलीत प्रमाणेतर मानल्यामुळे त्या ठिकाणी काही शैक्षणिक प्रश्नही निर्माण झाले आहेत. जी निग्रो मुले आहेत त्यांना भाषिक व बौध्दीक जाण आहे. तरी ते अभ्यासात मागे पडतात याचे कारण म्हणजे तेथील बोलींच्या भिन्नतेमुळेच हिच अवस्था श्वेतवंशीय विदयार्थ्यांची त्यांना जर ती कृष्णवंशीय बोली शिकायला लागली असती तर श्वेतवंशीयाची झाली असते. कृष्णवंशीयांची बोली जर श्वेतवंशीय विदयार्थ्यांना शिकायला लागली असती तर त्यांची अवस्था निग्रो मुलांसारखीच झाली असती. भारतात जर याचा विचार केला तर अशीच परिस्थिती दिसून येते. आदिवासी व जे मागासलेले आहे त्यांना प्रमाण बोलीतील अभ्यासक्रम कळत नाही. उदा. हिंदी व इंग्रजी हे विषय अजूनही विद्यार्थीप्रिय झालेले आढळत नाहीत.

शाळेमध्ये ज्या विद्यार्थ्यांना शिकविले जाते ते प्रमाण बोलीतूनच मात्र त्यांच्या बोलीतून शिकवायचे ठरले तर स्वत: शिक्षकाला ती बोली आधी शिकावी लागेल तरच शिक्षक त्या विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊ शकेल. तसेच मराठी भाषेच्या संदर्भात जे विदयार्थी आनी-पानी करतात, त्यांनाही समजून घेऊन प्रमाणोतर बोलीचा अभ्यास करुन प्रमाण बोली विद्यार्थ्यांनी अधिक चांगली कशी शिकवता येईल, याचाही विचार शिक्षकाने करायला हवा. आज आपण बघतो की महाराष्ट्राच्या दुर्गम भागात शिक्षणाची बरीच हेळसांड झालेली आहे. कारण त्या विद्यार्थ्यांना प्रमाण बोली येत नाही म्हणून शिक्षक दूर्लक्ष करतात. त्यांच्या बोलीचा विचार करुन सरकारने जर त्यांच्या समस्या लक्षात घेतल्या तर काही बाबतीत सुधारण घडू शकेल. उदा. कोकण, विदर्भ या भागात जी बोली बोलली जाते, विशेषत: आदिवासी लोक बोलतात ती बोली अतिशय उर्मट व उध्दट वाटते. आणि अशुध्द सुध्दा खूप वाटते. उदा. वडापाव-वरापाव, गाडी - गारी इ. शब्द अशुध्द वाटतात.

तरी परंतु अलीकडच्या काळात प्रादेशिक बोली कथा, कादंबऱ्या निर्माण होऊ लागल्यामुळे त्या बोलींचे महत्व वाढले आहे. आपल्या स्वरुपविशेषांसह ती साहित्यात अवतीर्ण होत आहे. ही एक लक्षणीय घटना वाटते.

एकाच समाजात आपण राहत असतो. व एकच भाषा बोलतो तरी अनेक कारणांमुळे समाजात वेगवेगळे

स्तर निर्माण होतांना दिसतात. अनेक कारणांमुळे समाजात लहान-मोठे गट तयार होतात. उदा. शिक्षण, व्यवसाय, शहरी व ग्रामीण वातावरण, विविध जाती-जमाती, कौटुंबिक वातावरण, देश- विदेशाचा प्रवास यांमूळे अनेक गट निर्माण होतात. या गटांची भाषापद्धती भिन्न असते. प्रत्येकाच्या वागण्यात, बोलण्यात आपल्याला निराळेपण जाणवते. प्रत्येकाची प्रसंगानुसार भाषा बदलते. काही कार्यक्रमांमुळे अनेक जण एकत्र आले तर, त्यांच्यात काहीतरी वेगळेपण जाणवते. उदा. लग्नसमारंभ, सभा वा जत्रा, उत्सव इ. ठिकाणी जमलेल्या लोकांचे निरीक्षण जर आपण केले तर अनेक नवीन गोष्टी समजून येतात. नात्यानात्यांतील माणसे सुखदु:खाच्या गोष्टी करतात. काही व्यावसायिक धंद्याच्या गोष्टी करतात तर शाळकरी मुले अभ्यासाच्या गप्पा करतात. शेतकरी पिकपाणी, हवामान यासंदर्भात बोलतात. कारण हे सर्व विषय त्यांच्या जिव्हाळयाचे असतात. तसेच सामाजिक आणि आर्थिकदृष्टया काही व्यावसायिक समान पातळीवर चर्चा करतांना आढळतात. या निरनिराळया गटातील बोलणाऱ्यांची भाषा मराठी असली तरी या भाषेचा आविष्कार भिन्न स्वरुपात झालेला आढळतो. बोलणारे गट वेगळे आणि सर्वांचा मिळून एक सांस्कृतिक परिणाम भाषेच्या स्वरुपावर झालेला दिसतो. हे सहज आपल्या लक्षात येते. उदा. लहान मूले, युवक (तरुण), स्त्री-पुरुष, कामगार, विद्यार्थी, व्यावसायिक असे अनेक गटामधील भाषिक विविधता.

**● मुलांची भाषा**

लिंगभेदामुळे भाषेत पडलेले फरक व त्यामुळे एक प्रकारची निराळी भाषा होते, हे वर सांगितले. ह्या भेदाप्रमाणे वयाचा भेदसुद्धा भाषेमध्ये फरक पाडण्यास कारणीभूत होतो व त्यामुळे मुलांची भाषा व थोरांची भाषा असे फरक पडतात. बालभाषा तर सर्वांच्या परिचयाची असते. नागर भाषेपासूनही मुलांची भाषा निराळी असते. भाषेच्या परिणतीत अथवा अपभ्रंशांत मुलांची कामगिरी विशेष असते. स्त्रिया, खालच्या दर्जाचे असंस्कृत लोक व मुले हे तीन घटक भाषेत फरक घडवून आणतात. शब्दांच्या ठराविक उच्चारांपेक्षा काही निराळे उच्चार ह्या तीन घटकांकडून केले जातात. शब्दांच्या ठराविक उच्चारांपेक्षा काही निराळे उच्चार हया तीन घटकांकडून केले जातात. भाषा 'अपभ्रष्ट' हया तीन घटकांमार्फतच जास्त होते. संस्कृत भाषा अपभ्रष्ट होऊन ज्या पाली, प्राकृतादी प्रांतपरत्वे भाषा झाल्या त्यांना हयाच कारणांमुळे 'बालभाषा' असे विशिष्ट नाव दिले गेले. परंतु कोणतीही भाषा घेतली, तरी तिच्यात एक बालभाषा- मुलांची भाषा म्हणून भेद असतोच. मुलांच्या भाषेचा अर्थ लावणे तर पुष्कळ वेळा मुलांच्या प्रेमामुळे, ममतेमुळे, मोठया कौतुकाचा व करमणुकीचा विषय होतो. मुले आपला भाव दाखविण्यासाठी काही उच्चार करतात व नंतर त्याचा अर्थ थोर माणसांना करावा लागतो, आणि तेच मुलांचे उच्चार व शब्द त्या कुटूंबात रुढ होतात. थोरली माणसेही लडिवाळपणाने आपली शिष्ट भाषा सोडून त्या मुलांच्या भाषेतच मुलांशी बोलतात व अशा रीतीने बालभाषा किंवा पाळण्यातील भाषा तयार होते. मराठीच्या बाबतीत हा भेद कितपत दिसतो हे पाहू.

वर्णाच्या उच्चारास लागणाऱ्या इंद्रियांची वाढ जरुर तितकी न झाल्यामुळे म्हणा किंवा वर्णोच्चारांच्या स्थानांची हालचाल तितक्या सफाईदार रीतीने न करता आल्यामुळे म्हणा, किंवा वर्णोच्चाराचे कौशल्य तितकेसे आत्मसात न झाल्यामुळे म्हणा, मुलांचे उच्चार थोरांच्या उच्चारांपेक्षा पुष्कळ निराळे असतात. 'क' च्या ठिकाणी

'ट', 'स' 'च', हयांबद्दल 'त' कठोर व्यंजनाबद्दल मृदु व्यंजने, वर्णाचा लोप, 'ल' च्या ऐवजी 'द' असे वर्ण मुले वापरतात. उदा : काया काका, थायास खावयास, मांगू पांघरुण, तोत < कोट, टाटा < काका, तमता < चमचा, तात < सात, दादू < लाडू, बू < दूध, माई < पाणी.

काही तरी उच्चार ऐकावयाचे आणि त्याप्रमाणे केव्हा तरी उच्चार करण्याचा प्रयत्न करावयाचा हा खेळ तर मुलांचा सारखा चाललेला असतो. मुलांना प, ब, म, दन्त्य व्यंजने व आदय स्वर हे वर्ण लवकर उच्चारिता येतात. सर्व भाषांतील मुलांचे शब्द जर पाहिले, तर असे दिसून येईल की पितृवाचक शब्द 'प' ने व 'ब' ने आरंभ होणारे आहेत. उदा : पितृ, pater (lat.) father, papa (Eng.), व्हाटर, तरींशी (Ger.), बाबा, बाब (goth) बाबू (Ital) इत्यादी. मातृवाचक 'म' व 'न' ने आरंभ होणारे आहेत. उदा : मातृ matr, matu, (Lat.) Mutter (Ger.) -mma, नया, नानी, खाण्यासंबंधी सर्व शब्द 'म' ने आरंभ होणारेच असतात. उदा : मम, अम्म, men men, monsh, Muning (g), मांस, Mus (Ger), मम्म, (मराठी), Nyam (Scotch). मुले आपापल्या परीने काही नवीन शब्द फार चमत्कारिक रीतीने करीत असतात. साम्यसंभ्रम (False analogy) हे तत्त्व तर मुलांच्या भाषेत पदोपदी आढळून येते. मुलाला सर्व पुरुष घरातील वडील माणसेच वाटतात व त्यांना काका, बाबा असे संबोधिते. तसेच मोठया स्त्रिया – चित्रातीलदेखील – मुलाला आपल्या आयाबहिणीच वाटतात. म्यंव म्हणजे सर्व मांजरे, भू भू म्हणजे सर्व कूत्री, हम्मा म्हणजे सर्व गाई अशी त्यांची कल्पना असते. मुलांना प्रथमपुरुष सर्वनामाची कल्पना कधीकधी उशिरा येते. आपल्या स्वत:च्या नावानेच ते प्रथम पुरुषाची कल्पना दाखविते. 'धरले' हे जसे रुप होते त्याच धर्तीवर साम्यसंभ्रमाने करले, मरले अशी रुपे मुले तयार करतात. व्याकरणाची सर्व कल्पना त्याला दुसऱ्याची भाषा ऐकून त्यावरुनच करावी लागते. नकारार्थी प्रयोग मुलांना लवकर येतात. 'नाही' किंवा 'नको' हे दोन्ही शब्द काही मुले होकारार्थी प्रश्नाला उत्तरे म्हणून देताना आढळतात. 'नको पाहिजे किंवा नाही पाहिजे' असा दुहेरी प्रयोगही कधीकधी आढळतो. 'प्रश्नार्थक' वाक्येही मुलांना लवकर येतात. शब्दयोगी अव्ययांचा उपयोग मुले फार करु शकतात. 'काल, उद्या' किंवा 'वर, खाली' ह्यांमधील फरक मुलांना पुष्कळ दिवस कळत नाही. संख्येसंबंधीही त्यांची कल्पना ठाम नसते. 'एक, दोन, तीन, आठ, दहा, बारा, अठरा, वीस' ह्या क्रमाने मोजताना पुष्कळ मुले आढळतात.

मुलांचे भाषेतील काही शब्द वर दिले आहेत. ते आणखी पुष्कळ देता येतील, ह्यावरून नियम बसविणे तितकेसे बरोबर होणार नाही. शब्दांप्रमाणे त्यांचे प्रयोगही काही चमत्कारिक रीतीने बनतात. काही प्रयोग तर एखादया कुटुंबापुरतेच असतात. मम्म करणे, अंगाई करणे, न्हाई करणे, शी करणे, गयगय करणे, भूर्र जाणे, बुडुश करणे इत्यादी प्रयोग सर्वांच्या परिचयाचेच असतील. कोणत्या प्रयोगाला काय अर्थ होईल, हे सांगता येणे मुश्कील आहे. अशा स्वरूपाची लहान मुलांची भाषा असल्याचे दिसून येते.

**● युवकांची (तरुण) भाषा**

आपल्या मनातील भावना, विचार व कल्पना व्यक्त करण्याचे साधन म्हणजे भाषा होय. भाषा हे सामाजिक संपर्काचे अत्यंत महत्वाचे साधन आहे. मानव हा समाजप्रिय प्राणी आहे.त्यामुळे त्याचे समाजामध्ये अनेक व्यक्तिंशी सामाजिक नाते जोडलेले असते. व्यक्ती वेगवेगळ्या कारणासाठी, विशिष्ट ठिकाणी वेगवेगळया

संदर्भात एकत्र येत असतात.या सर्व घटकांच्या भाषेतदेखील विविधता दिसून येते. १८-३० वयोगटातील व्यक्ती म्हणजे युवक (तरुण) होय. महाविदयालयीन, व्यवसायिक, कामगार, कला, बँक, शासकीय-निमशासकीय कार्यालय, कारखाने, उदयोगधंदे, इत्यादी. क्षेत्रात असणाऱ्या युवकांच्या वापरातील भाषेत विविधता दिसून येते. संप्रेषणासाठी एकाच भाषेचा वापर होताना दिसून येत नाही. कारण आज त्यांच्यावर संगणक, इंटरनेट, भ्रमणध्वनी, दूरदर्शन, चित्रपट, व मालिका इत्यादींचा प्रभाव पडलेला आहे. व्यावसायिक व जातीय संदर्भीय शब्दही वापरत असल्याने युवकांच्या भाषेत विविधता आढळून येत असल्याचे दिसून येते. उदा. मला गंडवू नकोस, व्हेरी नाईस, मॅरेज पार्टी, चॅटींग, मेसेज, हॅपी बर्थडे, जन्म् दिन मुबारक, शुभ सकाळ, G. N., G.M., Fb, BF, TYSM², J1 झालं का?, ओ माय गॉड, चण, तुझं तुझं - माझं माझं, (TTMM²), पागल, चहा- दोन कटींग, पिस, वकिली करु नकोस, पारा चडवू नकोस, तोंड टाकू नकोस, ३० का? इत्यादी.

- **स्त्रियांची व पुरूषांची भाषा**

स्त्री- पुरुष लिंगभेद नैसर्गिक आहे. समाजजीवनामध्ये मानवाच्या बाबतीत विविध भेद पाहण्यास मिळतात. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक परिस्थिती, जाती-जमाती, धर्म, विविध व्यवसाय इत्यादी नुसार कितीतरी मानवनिर्मित भेदांमध्ये पृथ्वीवरील मानव विभागला आहे. या भेदाचा व्यापक परिणाम भाषेवर झालेला आढळतो. मानवामधील स्त्री-पुरूष हा भेद नैसर्गिक आहे. या भेदाचा समाजावर, मानवी जीवनावर खोलवर परिणाम झालेला आहे. स्त्री-पुरुषांच्या समाजातील स्थानासंबंधी जाती, जमाती, धर्मानुसार विविधता आढळते. तरीही भारतीय समाजजीवनामध्ये बहुतांश समाजात पुरुषसत्ताक समाजव्यवस्था प्राचीन काळापासून प्रभावी असल्याचे दिसते. या वर्चस्ववादी व्यवस्थेचा स्त्री-पुरुषांच्या भाषेवर सुक्ष्म आणि खोलवर परिणाम झाल्याचे दिसते.

स्त्रियांचे समाजातील दुय्यमत्व सांगणारी आणखी काही उदाहरणे देता येतील. स्त्रीच्या बाबतीत सर्वसामान्य समाज सहजपणे बोलताना 'पायातली वहान पायात बरी' किंवा 'आपलं जनावर आपल्या ताब्यात हवं' अशी भाषा वापरतो. स्त्रीसंबंधी भाषा वापरताना स्त्री ही वापरावयाची वस्तू, उपभोग घ्यावयाची वस्तू किंवा तिचा आस्वाद घेतल्याप्रमाणे भाषा वापरलेली दिसते. तिच्यावर झडप घातली (शिकार), तिचा चोळा मेळा केला (पाचोळा), तिला पाहून लाळ टपकायला लागली (आवडता पदार्थ) ही भाषा सर्रास पुरुषांच्या तोंडामध्ये दिसते. स्त्रियांबाबत पुरुषांच्या तोंडी येणारे शब्द अनेकदा विकृत, अश्लिल, घाणेरडे असतात. वैज्ञानिक दृष्टिकोणाचा प्रसार झालेला असला तरी; अजूनही समाजात स्त्रीला दुय्यम स्थान आहे. भाषेतही आपणास हे जाणवते. स्त्री ही नाजूक, हळवी, भावूक, सहनशील, घाबरट अशी समजूत समाजामध्ये दृढ आहे. ही बाब स्त्री - पुरुषांच्या मनावर चांगलीच बिंबवलेली आहे. अय्या, इश्श्य, गडे असा लाडिक सूर स्त्रियांच्या भाषेत दिसतो. स्त्रियांची भाषा इतकी वेगळी, स्वतंत्र असते की; एखाद्या पुरुषाच्या बोलण्यात असा स्त्रीचा सूर आढळला तर त्याला समाज बायकी, बाईलबुद्ध्या ठरवतो. स्त्रिया स्वत:च्या पतीच्या नावाचा उल्लेख टाळतात. यासाठी त्या 'अहो', 'इकडून अजून होकार नही', 'ते आलेले नाहीत' असे शब्दप्रयोग करतात. पुरुष मात्र अगं, तूगं आणि नावाने आपल्या बायकोला बोलावतो. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या बाबतीत बऱ्याचदा नादमय,

सूत्रमय भाषेतून संवाद चालतो. प्रांतिक भेदामुळे काही भेद भाषेमध्ये पडतात व तसे ते मराठीत पडलेही आहेत. त्यापैकी लैंगिक व वयोभेद हे आहेत. समाजात भाषा बोलणारे जसे पुरुष असतात तशा स्त्रियाही असतात व मुलेही असतात. तेव्हा हया तीन घटकांप्रमाणे भाषेत पुरुषांची भाषा आणि स्त्रियांची भाषा असे दोन प्रकार स्वाभाविकच पडतात. मुलांचीही भाषा एक निराळीच असते. परंतु तिचा विचार आपण पुढे करु. प्रत्येक समाजात स्त्रियांची भाषा ही पुरुषांच्या भाषेहून निराळी असते. निराळी म्हणजे अगदी भिन्न दोन्हींमध्ये काहीही संबंध नसलेले असा प्रकार नसून भाषेचे सामान्य बाह्य स्वरुप एकच. परंतु आतमध्ये सूक्ष्म व पुरुषांच्या भाषेपासून अलग करण्याइतके स्पष्ट असे फरक स्त्रियांच्या भाषेत असतात.

स्त्रियांची भाषा निराळी असे ह्याला जुन्या काळातीलसुध्दा दाखला मिळतो. आर्यांचा समाज ज्या वेळी हिंदुस्थानात स्थायी झाला त्या वेळी त्यांना स्त्रिया दुसऱ्या समाजातून घ्यावा लागल्या. तेव्हा या उपऱ्या आलेल्या स्त्रियांची भाषा अर्थात निराळी पडली. पूर्वीच्या संस्कृत नाटकांतील पात्रांपैकी पुरुष संस्कृत भाषा बोलत, परंतु त्यांच्या स्त्रिया मात्र प्राकृत, शौरसेनी वगैरी भाषा बोलत. आणि ही गोष्ट राजांच्या पत्नींची, अप्सरांची म्हणजे सुसंस्कृत घराण्यांतील चांगल्या स्त्रियांची. समाजात जे काही प्रत्यक्ष आढळले असेल तेच नाटकांत गोवले असले पाहिजे. सध्यासुध्दा आपण तीच स्थिती पाहतो. स्त्रियांची भाषा अशी निराळी होण्यास कारणेही तशीच आहेत. एक तर वर्णोच्चारांत जी एक स्वाभाविक सफाई पुरुषांत दिसून येते तशी सफाई समान परिस्थितीतील स्त्रियांत नसते. त्यांचा सर्व दैनिक व्यवहार घरातच पडल्यामुळे बाहेर उघडया हवेच्या परिणामामुळे पुरुषाच्या आवाजाला जो एक मर्दानीपणा आला आहे, तो स्त्रियांच्या आवाजाला कसा येणार? त्यांचा आवाज जात्याच कोमल व त्यात हया दिवाणखानी सवयीमुळे जास्तच कोमलत्व येते. वर्णाच्या उच्चारांबाबत स्त्रीपुरुष हयांमुळे पुष्कळ फरक पडतो. स्त्रियांमध्ये दीर्घ उच्चार फार येतात. त्याचप्रमाणे मृदू व्यंजनाचे उच्चार फार, अनुनासिके फार, द्वित व्यंजने तोडल्याची उदाहरणे फार असे काही फरक दिसतात. दुष्ट साधाच शब्द परंतु ब्राह्मणांच्या शेकडा नव्याण्णव स्त्रिया 'द्रुष्ट' असा उच्चारतात. तसा बृहस्पतिवार हा शब्द बेस्तरवार, ब्रेष्पतवार, भ्रस्पतवार असा उच्चारतात.

काही वेळेस त्यांच्या काही सवयीमुळे वर्णेच्चारांत फरक पडतो. यांच्या दागिन्यांमुळेही वर्णोच्चार बदलतो. ब्राह्मण स्त्रिया जी नथ वापरत त्यामुळे वर्णोच्चार कदाचित बदलला असेल, हे सांगितलेले पुष्कळांना पटणार नाही. महमदी स्त्रिया असाच एक दागिना घालतात. त्याचाही परिणाम त्यांच्या वर्णोच्चारांवर झाला असला पाहिजे. काही रानटी लोकांत तर स्त्रियांच्या तोंडात एक लाकडाचा तुकडा घालतात. त्यामुळे त्यांच्या वर्णोच्चारात फरक पडत असतो. स्त्रियांची भाषा पुरुषांच्या भाषेहून भिन्न होण्यास त्यांच्या वाटणीत जे सामाजिक निर्बंध आले आहेत. तेही कारणीभूत आहेत. स्त्रियांनी नवऱ्याचं, सासऱ्यांचे, सासूचे किंवा जो कोणी वडील माणसे असतील त्यांची नावे घ्यावयाची नाहीत असा आपल्या समाजाचा निर्बंध आहे. आपल्या हिंदू ब्राहमण स्त्रीला जर नवऱ्यासंबंधी निर्देश करावयाचा असेल तर 'तिकडे, घरी, येणे झालें, स्वारी, मालक, सावकार, धनी, यजमान' इतक्या निरनिराळया मार्गांनी ती तो निर्देश करील. इतर समाजात हीच चाल आहे. नवऱ्याचे नाव घेण्याने त्यांचे आयुष्य कमी होते, अशी काहींची समजूत आहे. त्याचप्रमाणे स्त्रियांना औचित्यही राखावे लागते. काही विषयांसंबंधी पुरुष जितका स्वैर वृत्तीचा उपभोग समाजाच्या दृष्टीने घेतो, तितका स्त्रीला घेता येत नाहीत.

तसेच शिव्यागाळीचे नाना प्रकार मोठया दिमाखाने मनमुराद वापरण्याचा जसा हक्क पुरुषांचा आहे, तसा हक्क स्त्रियांना नाही. हया व इतर अशाच निषेधांमुळे स्त्रियांची भाषा एक निराळीच, मृदु, कोमल, सभ्य, उच्चाराच्या दृष्टीने अपभ्रष्ट पण अर्थाच्या दृष्टीने शिष्ट अशी बनलेली असते.

हे जे काही निर्बंध समाजात स्त्रियांवर घातले जातात, त्यांचा एक फायदाही आहे. उच्चारांच्या दृष्टीने स्त्रियांची भाषा पुरुषांच्या भाषेपेक्षा जास्त अपभ्रष्ट असू शकेल; परंतु अर्थाच्या दृष्टीने मात्र स्थिती उलट आहे. पुरुष जी भाषा मनमुराद रीतीने वापरतो तिला विरोध करण्याचे काम स्त्रिया करतात. भाषेत जो नवीन प्रकार रुढ होतो तो पुरुषांमुळे, स्त्रियांमुळे नाही. परदेशात वसाहतीत लोक गेले, तर स्त्रिया आपली मातृभाषाच घरी बोलतील. बाहेरच्या जगाशी त्यांचा संबंध न आल्यामुळे, त्यांच्याजवळचा शब्दसमूहही बेताचाच असतो. लिंगाच्या दृष्टीने तर त्यांची भाषा 'जाते, करते, बोलते' अशी स्वरुपात निराळी दिसतेच. स्त्रियांच्या भाषेत सर्वनामे जास्त येतात. 'तो, मी, ती, ते, आम्ही' हयांचाच भरणा फार दिसतो. स्त्रिया भावनावश होतात. त्यामुळे त्यांच्या वाक्यरचनेवर त्याचा फार परिणामच होतो. लांब, दीर्घ, संयुक्तवाक्य, पुष्कळ 'जे, ते' असलेले वाक्य हे स्त्रियांच्या बोलण्यात फारसे येत नाही. त्यांची वाक्ये जोडलेली असतात, पण ती व्याकरणाच्या दृष्टीने नसून ती भावनेच्या, विकाराच्या जोरावर जोडलेली असतात. भावनेचा किंवा विकाराचा जोर जास्त झाला की. त्यांचे वाक्य अर्धे सोडले जाते. त्यांच्या बोलण्यात अर्धी वाक्ये अशीच जास्त असतात. मात्र एकंदरीत स्त्रिया पुरुषांपेक्षा जास्त बडबडया असतात. अगदी उत्तम अप्रतिम पहिल्या वर्गाच्या जरी त्या वक्त्या नसल्या, तरी काही पुरुषांप्रमाणे त्या अगदी अबोलही नसतात. काही फारच जलद बोलणाऱ्या असतात.

उदा. हात्तेच्या, डोंबल, खेटर, बाई, इश्श्, जळलं, मेलं, गडे, गं, अगंबाई, इकडे, तिकडे, स्वारी, स्वत: किनई, कोणीतरी, घरी (पतिदर्शक), चांडाळ, चावट, बाहेरची, धिंडका, जोगवा, मेला, मांग, मुदलीच, उजवणे, बोलभांड, जम्मत, पुनव, अवस, उट्टे, उणेपाणे, कोकणभर, कुवारीण, घोडनवरी, चुडेदान, म्हटले, लगीन, सवाष्ण, पोटचा गोळा, जलमभर, द्रुष्ट, ब्रेष्पतवार, आखाड, पइलटकरीण, पांढरापिठूक, मामंजी, भावोजी, वइन्स, न्हातीधुती, पण, मुरवण, विरजण, खिमटा, सुग्रण, कित्ती, कित्ती, अय्या.

प्रयोगविशेष – स्त्रियांमध्ये विशेष प्रचारात असलेले प्रयोग उदा. अंगावर विटाळ जाणे, कसेसेच वाटणे, कावळा अगर कुत्रे शिवणे, घर पाहणे, जीव तिळ तिळ तुटणे, जिवात धस्स होणे, बाहेरची बसणे, विटाळ करुन घेणे, ओटीत घालणे, ओटीत घेणे, ओव्या गाणे, घरी येणे, दहीभात लिंपणे, देवाला जाणे, लगीन काढणे,सोवळे घेणे, बोहले सारवणे, सुखावर वरवंटा फिरणे, मारग मळणे, जीभ रेटणे, मांडवर घेणे – देणे, नशीबाला आग लावणे, नाव घेणे, पदरात घेणे, माणसाचे काय बोलायचे? कुंकू वाढविणे, थोर करणे, ओटी भरणे, ओवाळणी काढणे, काळया दगडावरील रेघ, मंगळसूत्र वाढविणे, कपाळावरील कुंकू वाढविणे इत्यादी.

● **कामगारांची भाषा**

औद्योगिक विकासाबरोबर भारतात कामगार वर्ग निर्माण झाला आहे. द्रव्य रुपाने वा वस्तुरुपाने मिळणाऱ्या मोबदल्यात शारीरिक वा मानसिक श्रम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस 'कामगार' असे म्हणतात. फक्त मनोरंजनाच्या उद्देशाने जे शारीरिक व मानसिक श्रम केले जातात. ते कामगारासंबंधी विचार करताना वगळले पाहिजे. या

दृष्टीने सर्वच क्षेत्रातील मजूर, त्याचप्रमाणे विविध क्षेत्रातील पांढरपेशा नोकर यांचा समावेश कामगार वर्गात व्हायला हवा. मात्र अनेकदा कामगार असा ज्यावेळी उल्लेख केला जातो त्यावेळी भूमीहीन मजूर वा वरिष्ठ श्रेणीचा पांढरपेशा नोकरदार वर्ग आपल्या नजरेसमोर येत नाही. भांडवलदार वर्गाने चालविलेल्या छोट्या-मोठ्या कारखान्यात श्रम करुन आपली उपजिविका करणारा श्रमिकांचा वर्ग कामगार वर्गात समाविष्ट केला जातो. आधुनिक अर्थरचनेत कामगारांना नेमनारा व्यवस्थापकही बरेच वेळा कोणीतरी नेमलेला असतो तो देखील वास्तविक कामगारच असतो पण व्यवहारात आपण ऐकीकडे भांडवलदार व व्यवस्थापक वर्ग आणि दुसरीकडे मजुर असा भेद करतो व त्या दृष्टीने पाहत असतो. श्रमिक वर्गास विशेषत: शारीरिक श्रम करणाऱ्यांना जी सामाजिक प्रतिष्ठा असते त्यावरुनच समाजाची जडण घडण व मूल्ये आपल्या लक्षात येतात.

युरोपात ज्याप्रमाणे कारगिरांच्या श्रेणी होत्या त्याप्रमाणे भारतात धर्मावर आधारित वर्णव्यवस्था होती. प्राचीन काळी कर्मानुसार ठरत होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या वर्णांची अनुक्रमे अध्ययन-अध्यापन, रक्षण, शेती व व्यापार आणि सेवा ही कर्मे ठरलेली होती. म्हणजेच प्रत्येकाने कोणत्या प्रकारची मजुरी करावयाची हे निश्चित होते. सुरुवातीस व्यक्तीला कर्मानुसार एका वर्णातून दुसऱ्या वर्णात प्रवेश मिळत होता पण पुढे हे वर्ण व त्यानुसार ठरणारी कर्मे जन्मावर ठरु लागली. गुणांच्या होणाऱ्या अनुवंशिक प्रकर्षाचा फायदा त्या-त्या वर्णातील लोकांना मिळाला. त्याचप्रमाणे काही लोकांना कित्येकदा न आवडणारी कामे करावी लागत असल्याने वर्णासंबंधी श्रेष्ठ-कनिष्ठ वाद निर्माण झाला. जन्मावर ठरणाऱ्या वर्णांच्या संकरातून अनेक जाती-जमाती व समाज गट निर्माण झाला. यानंतर वर्ण व कर्मे यांच्यामध्ये हरकत होऊ लागले व वर्ण व्यवस्थेचे आर्थिक फायदे तर संपलेच होते. पण सामाजिक जाच मात्र तसाच राहिला आहे. औद्यागिक क्रांतीनंतर मात्र हे जाचक तट कोसळू लागले आहेत आणि जागृत नवसमाज व कामगार वर्ग निर्माण झाला आहे.

शारीरिक व मानसिकदृष्ट्या श्रम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस कामगार असे म्हणतात. काम करणाऱ्या कामगारांचे पाच गटामध्ये वर्गीकरण करता येते. त्यावरुन कामगारांच्या कामाचे स्वरुप व त्यांच्यातील भाषिक विविधता आढळून येते. कामगारांच्या वर्गीकरणानुसार अनेकर प्रकारचे कामगार ज्यात्या क्षेत्रात करीत असतात.

- **कामगारांचे वर्गीकरण**

**१. शारीरिक श्रम करणारे कामगार**

उदा. ऊस तोड कामगार, शेतातील कामगार, बांधकाम कामगार, लाकूड वखारीतील कामगार, माथाडी कामगार, दगड फोडणारे, विटभट्टी कामगार, बीडी कामगार, लोहार, सुतार

उदा. भाषिक विविधता- एका कोयत्याला रोज किती देताय?, जोडप्याला काय पेमेंट देताय?, ऊसाचा फड दमदार आलाय, न्याहारी पर्यंत ऊसाच्या चार पाती लागायला हव्यात, बांधकाम कस ब्रास करणार? बांधकामासाठी कोणकोणतं मटेरियल वापरणार? वाळू ऐवजी आपण कच वापरणार वाटतं ! बांधकामाचा दर स्क्वेअर फुटाव असेल, बालु चांगली वापरा.

**२. बौध्दिक श्रम करणारे**

उदा. वकील, शिक्षक, डॉक्टर, सीए, लेखनिक, जिल्हाधिकारी, तहसिलदार, प्रांत अधिकारी, पोलिस विभाग, बँक इ.

उदा- भाषिक विविधता- तुमची विरोधक पार्टी हजर नाही. आज आर्ग्युमेंट होणार नाही, उदया हाय कोर्टात या, सुप्रिम कोर्टात अपील दाखल करु, वारंट विद्यार्थ्यांनी चांगला स्टडी करावा, मॅनर्स, मुबारक, बेस्ट ऑफ लक, रिजल्ट, फेल, सिस्टर, नर्स, इमरजन्सी, ऑपरेशन, व्हेंटीलेटर, ऑक्सिजन, डेड, इंतकाल इ.

**३. कौशल्यात्मक श्रम करणारे**

उदा. अभियंता, सोनार, कासार, कुंभार, शिंपी, चांभार, लोहार, सुतार, डॉक्टर, शिक्षक, शास्त्रज्ञ, वाहन चालक इ.

उदा. भाषिक विविधता- बिल्डिंग मटेरियल, ब्रास, स्क्वेअर फुट, चमकी, बाली, पायल, बांगडी, मडक, डेरा, कुर्ता, ब्लाऊज, शर्ट, बंडी, इत्यादी.

**४. उत्पादकामध्ये श्रम करणारे**

उदा.- साखर कारखाना, गुळाचे गुऱ्हाळ, दूध कारखाना, लोखंड व पोलाद कारखाना, वाहन बनविण्याचा कारखाना, सुत गिरणी, ऑईल कारखाना, फायबर बनविण्याचा कारखाना, पेय मद्य कारखाना इत्यादी.

उदा- भाषिक विविधता - उदा. शक्कर, साखर, शुगर, दुध, मिल्क, वाहन, मोटार, फॅक्टरी, कारखाना, ऑईल मिल, फायबर इत्यादी.

**५. कौशल्यविरहीत श्रम करणारे**

उदा. कापड व किराणा दुकान, सोने-विक्रिचे दुकान, हमाल, हॉटेल, भांडी दुकान, स्टेशनरी दुकान, पेय मद्य विक्री दुकान, मिठाई दुकान इत्यादी. या वर्गीकरणानुसार ज्या त्या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या भाषेतील विविधता आपल्या लक्षात येते.

- **स्वाध्याय**

**१. योग्य पर्याय निवडा.**

१) ज्ञानभांडाराचे संचित कशामुळे जतन करता येते?

अ)भाषेमुळे ब) संस्थेमुळे क) पिढीमुळे ड) साहित्यामुळे

२) भाषा ही मानवी ध्वनींनी ............ बनलेली काय आहे?

अ) संप्रेषण ब) संरचना क) वैशिष्ट्य ड) अस्तित्व

३) समाजात भाषा ही कशाला संक्रमित करत असते?

अ) धार्मिक ब) संस्कृतीला क) मदत ड) समूह

४) समाजभाषाविज्ञानाचा कोणता उद्देश असतो?

अ)सांस्कृतिक संदर्भाचा शोध घेणे. ब)ऐतिहासिक संदर्भाचा शोध घेणे.

क)सामाजिक संदर्भाचा शोध घेणे. ड) भौगोलिक संदर्भाचा शोध घेणे.

५) समाजव्यवस्थेत कशानुसार व्यवसाय ठरविण्यात आले?

अ) जाती ब) धर्म क) संस्कृती ड)आर्थिक

६) 'तमता' हा शब्द खालीलपैकी कोणत्या गटाचे उदाहरण आहे?

अ) कामगार ब) युवक क) स्त्री ड) लहान मुलांचे

७) स्त्रियांची भाषा इतकी वेगळी आणि काय असते?

अ) स्वतंत्र ब) बोली क) महत्त्वाची ड) सामाजिक

८) भारतात कशावर आधारित वर्णव्यवस्था होती?

अ) संस्कृती ब) धर्म क) व्यवसाय ड) समाज

९) सामाजिक भाषाविज्ञान या ग्रंथाचे लेखक कोण?

अ) रमेश धोंगडे ब) डॉ.अनिल गवळी क) डॉ. नंदकुमार मोरे ड) कृ. पां. कुलकर्णी

१०) प्रभाकर जोशी यानी खालीलपैकी कोणता ग्रंथ संपादित केला आहे?

अ) सामाजिक भाषाविज्ञान ब) सामाजिक भाषाविज्ञान : कक्ष आणि अभ्यास

क) भाषा संवाद ड) भाषा आणि संस्कृती

**उत्तरे –**

१) भाषेमुळे २) संरचना ३) संस्कृतीला ४) सामाजिक संदर्भाचा शोध घेणे. ५) जाती ६) लहान मुलांचे ७) स्वतंत्र ८) धर्म ९) रमेश धोंगडे १०) सामाजिक भाषाविज्ञान

**२. दीर्घोत्तरी प्रश्न**

१) समाजगट म्हणजे काय ते सांगून लहान मुलांच्या भाषेचे स्वरूप सांगा.

२) स्त्री-पुरुष यांच्या भाषेतील विविधता विशद करा.

३) युवक आणि कामगार यांच्या भाषेतील विविधता स्पष्ट करा.

**३. लघुत्तरी प्रश्न**

१) विविध भेद व आर्थिक वर्गव्यवस्था स्पष्ट करा.

२) कामगारांच्या वर्गीकरणानुसार भाषिक विविधता स्पष्ट करा.

३) युवक वापरत असलेल्या भाषेतील विविधता विशत करा.

## ४.७ संदर्भ ग्रंथ


१) भाषासंवाद - डॉ. अनिल गवळी / डॉ नंदकुमार मोरे

२) भाषा आणि संस्कृती - डॉ. ना. गो. कालेकर

३) समाजिक भाषाविज्ञान - सं. प्रभाकर जोशी / चारुता गोखले

४) सामाजिक भाषाविज्ञान - रमेश धोंगडे

५) सामाजिक भाषाविज्ञान : कक्षा आणि अभ्यास - सं. डॉ. जयश्री पाटणकर

६) माध्यम : भाषा आणि भाषा व्यवहार - अशोक केळकर

७) भाषा आणि जीवन - सं. प्र. ना. परांजपे

८) समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी - डॉ. नंदकुमार मोरे

९) भाषा : इतिहास आणि भूगोल - डॉ. ना. गो. कालेकर

१०) भाषाविज्ञान आणि मराठी भाषा - डॉ. अनिल गवळी


●●●

## घटक-१

## भाषाव्यवहार आणि भाषासंपर्क

### १.१ उद्दिष्ट्ये

या घटकाचे अध्ययन केल्यामुळे आपणास

१. भाषा व्यवहाराची विविधता समजावून घेता येईल .

२. भाषा संपर्काचे स्वरूप समजावून घेता येईल.

३. भाषिक समाज ही संकल्पना समजावून घेता येईल.

४. समाजामध्ये असणाऱ्यास असंख्य सामाजिक गटांची कल्पना येईल.

५. वास्तवात व्यक्तीचा संपर्क भाषिक गटांशी येत असतो भाषिक समाजाशी नाही हे लक्षात येईल .

६. व्यक्तीचा भाषाव्यवहार हा लहान - लहान संपर्क गटांच्या भाषाव्यवहाराने संस्कारित होतो हे समजेल.

### १.२ प्रस्तावना

संप्रेषणासाठी माणूस भाषेचा माध्यम म्हणून वापर करतो. भावभावनांच्या अभिव्यक्तीसाठी मानवाने शारीरिक हावभावांसोबत मुखावाटे निर्माण होणाऱ्या ध्वनींचे सहाय्य घेतले. मानवी ध्वनींना विशिष्ट संकेत दिले त्यातून अर्थपूर्ण शब्द निर्माण झाले व भाषा आकाराला आली. भाषेच्या शोधामुळे मानवी जीवन सुकर झाले. जगामध्ये विविध मानव समूहांकडून हजारो भाषा बोलल्या जातात. प्रत्येक भाषिक समूहाने आपल्या भाषेत ध्वनी आणि अर्थाची सांगड घालत असताना भिन्न संकल्पना गृहीत धरल्या आणि आपापल्या भाषेची निर्मिती केली. एका भाषिक समूहाला दुसऱ्यास भाषिक समूहाची भाषा दुर्बोध वा किचकट वाटत असली तरी त्या त्या भाषिक समूहाला ती सहज आकलन होत असते. किंबहुना जगातील सर्वच मानवी समूहाची भाषा ही सारखीच प्रभावी आणि परिणामकारक असते. तिच्यामध्ये त्या भाषिक समूहाच्या गरजेप्रमाणे अर्थ अभिव्यक्त करण्याची क्षमता सारखीच असल्याने संपर्कामध्ये अडथळा निर्माण होत नाही. समाजामध्ये वास्तव्य करत असताना परस्परांशी संबंध निर्माण करणे, राखणे, वाढवणे आणि प्रसंगी संबंध तोडणे सुद्धा भाषेच्या माध्यमातून सहज साध्य होते. परस्परांशी संभाषणाची क्रिया घडणे किंवा न घडणे या गोष्टींवर सामाजिक संपर्क क्रिया आणि माणसामाणसांतील संबंध अवलंबून असतात. समाजातील सुशिक्षित-अशिक्षित, शहरी-ग्रामीण, औपचारिक - अनौपचारिक असे अनेक भेद भाषेच्या माध्यमातून व्यक्त होत असतात. सामाजिक रूढी, प्रथा, परंपरा, नातेसंबंध, सामाजिक - सांस्कृतिक मूल्ये इत्यादी सर्वच गोष्टी भाषेतून प्रवाहीत होत असतात. जगातील सर्वच भाषा व्यवहार व्याकरणिक नियमांनी चालत नाहीत तर ते सामाजिक संदर्भाचा आधार घेऊनच चालतात. त्यामुळे प्रत्येक भाषिकाला भाषा वापराचे स्वातंत्र्य प्राप्त होते.

## १.३ विषय विवेचन

भाषा समाजाच्या मालकीची असल्या कारणाने सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक इत्यादी समाजाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये तिचा मुक्त वावर व वापर असलेला पाहावयास मिळतो. प्रत्येक जण आपल्या पद्धतीने भाषा वापरत असतो. भाषेच्या या समाजसापेक्ष वापराचा विचार करून भाषेचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास सुरू झाला. या अभ्यासातूनच पुढे 'समाजभाषाविज्ञान' किंवा 'सामाजिक भाषाविज्ञान' ही स्वतंत्र अभ्यास शाखा निर्माण झाली. समाजामध्ये भाषेचा वापर हा एकमेकांशी संप्रेषण साधण्यासाठी केला जात असतो. किंबहुना संप्रेषण हे भाषेचे अंतिम उद्दिष्ट मानले जाते. संप्रेषणाच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीशी संपर्क प्रस्थापित करत असते व भाषाव्यवहार पार पाडत असते.

रमेश धोंगडे यांनी आपल्या 'सामाजिक भाषाविज्ञान' या ग्रंथामध्ये भाषेविषयी काही दृष्टिकोन मांडलेले आहेत. ते पुढील प्रमाणे भाषेचा अभ्यास किंवा भाषाविज्ञान म्हणजे भाषा या चिन्हव्यवस्थेचा अभ्यास किंवा मानवी मेंदूमध्ये असणाऱ्या भाषा क्षमतेचा अभ्यास असा दृष्टिकोन घेता येतो. भाषेचा अभ्यास म्हणजे समाजात भाषा कशी वापरली जाते याचा अभ्यास असाही दृष्टिकोन घेता येतो. म्हणजे भाषा व समाज यांचे संबंध तपासणे हाही भाषाविज्ञानाचा भाग होऊ शकतो. भाषा व समाज यांचे संबंध म्हणजे भाषा व ती भाषा बोलणाऱ्या समाजाचे संबंध किंवा भाषा व भाषिक समाज यांचे संबंध पण भाषिक समाज ठरवायचा कसा ? सर्व माणसे भाषेचा वापर सारखाच करतात असे नाही सर्व माणसांची भाषा एकसारखी नसते' (धोंगडे रमेश, सामाजिक भाषाविज्ञान, दिलीपराज प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे द्वितीय आवृत्ती १५ सप्टेंबर २०१२) जरी माध्यम भाषा एकच असली तरीही व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने भाषाव्यवहार व्यक्तिपरत्वे भिन्न असलेला आपणास पाहावयास मिळतो. प्रत्येक व्यक्ती आपापल्या परीने भाषेचा उपयोग करून संवाद साधण्याचा प्रयत्न करत असते.

### १.३.१ भाषाव्यवहार

भाषा ही समाजाच्या मालकीची असली तरी समाजातील प्रत्येक व्यक्तीकडून तिचा वापर होत असतो. प्रत्येक व्यक्ती आपापल्या परीने भाषेचा वापर करत असते. या वापराबाबत ती पूर्ण स्वातंत्र्य घेत असते तरीही भाषा वापराच्या सामाजिक बंधनांचे पालन व्यक्तीकडून होत असते. या बंधनांचे पालन केल्यामुळेच भाषा समाजाच्या आकलन क्षमतेच्या मर्यादेत राहते, सर्वांना समजते व समाजाचा भाषाव्यवहार सुरळीत पार पडतो. समाजांतर्गत होणाऱ्या भाषाव्यवहाराचा अभ्यास हा समाजभाषाविज्ञानातील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे.

पूर्वी आधुनिक भाषाविज्ञानाचा अभ्यास हा भाषेच्या ऐतिहासिक अंगावरच लक्ष केंद्रीत करून सुरू होता. किंबहुना भाषेच्या ऐतिहासिक अंगाने केलेला अभ्यास म्हणजेच भाषाविज्ञान अशी अभ्यासकांची धारणा होती. (काळे कल्याण, सोमण अंजली, (संपा.) आधुनिक भाषाविज्ञान : संरचनावादी, सामान्य आणि सामाजिक) पुढे स्विस भाषावैज्ञानिक फेर्दिनां द सोस्यूर यांनी भाषेचा ऐतिहासिक अभ्यास आणि भाषेचा एककालिक वर्णनात्मक अभ्यास यांमधील भेद स्पष्ट करून भाषेच्या वर्णनात्मक अभ्यासाकडे अभ्यासकांचे लक्ष वेधले. त्यांनी भाषाव्यवस्था आणि भाषाव्यवहार हा मूलभूत भेद केला. या संदर्भात प्रा. डॉ. नंदकुमार मोरे लिहितात 'सोस्यूर यांनी भाषाभ्यासामध्ये 'भाषिक व्यवहार' हा भेद केलेला असला तरी; भाषिक वर्तनाच्या अभ्यासापेक्षा तो या

वर्तनातून किंवा व्यवहारातून मिळणाऱ्या भाषेच्या व्यवस्थेवर लक्ष केंद्रित करतो. सोस्यूरला समाजामध्ये व्यक्तीनुसार बदलत राहणाऱ्या भाषेच्या रूपाला आपल्या अभ्यास पद्धतीमध्ये बसवणे शास्त्रीय वाटले नसावे. परंतु सपीर, वॉर्फ, मॅलिनोवस्की वगैरे अभ्यासकांना लौकिक जीवनातील सामाजिक संकेतांनी युक्त आणि व्यक्ती- व्यक्तीनुसार स्वतःचे रूप बदलणाऱ्या भाषाव्यवहारातून भाषेची स्थिर अशी 'व्यवस्था' कल्पिने आणि अलौकिक पातळीवरील भाषाव्यवस्थेचा अभ्यास करणे अशास्त्रीय वाटल्यामुळेच पुढे 'समाजभाषाविज्ञान' या अभ्यास क्षेत्राचा उदय झालेला आहे.' (मोरे (डॉ.) नंदकुमार, समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे) भाषेचा वापर करून समाज आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करत असतो या भाषा वापरालाच भाषाव्यवहार म्हटले जाते. लोक भाषेचा वापर कशाप्रकारे करतात याचा अभ्यास सामाजिकभाषाविज्ञानात होतो. पर्यायाने भाषाव्यवहाराचा अभ्यास हा समाजभाषाविज्ञानाचा केंद्रबिंदू ठरतो.

समाजात संप्रेषणासाठी किमान एका भाषेची आवश्यकता असते. त्या भाषेवरून त्या विशिष्ट समाजाला नाव दिले जाते. उदाहरणार्थ मराठी भाषा बोलणाऱ्या समाजाला 'मराठी भाषिक समाज' किंवा 'मराठी समाज' असे संबोधले जाते. हा भाषिक समाज अस्तित्वात येण्यासाठी समाजामध्ये एकमेकांशी सतत आंतरक्रिया व्हावी लागते. भाषिक समाजाविषयी डॉ. रमेश धोंगडे लिहितात, 'एकमेकांशी नित्य व्यवहार करणाऱ्या लोकांचा समूह तो एक भाषिक समाज' या दृष्टीने विचार केला असता भाषिक समाज निर्माण होण्यासाठी समाजात नित्य व्यवहार असावा लागतो. समाजातील कोणताही व्यवहार हा मग तो लिखित असो अगर मौखिक असो तो भाषेच्या माध्यमातूनच संपन्न होत असतो.

कोणत्याही भाषिक समाजामध्ये असणाऱ्या सर्व लोकांची भाषा एकच असली तरी प्रत्यक्षात मात्र एकाच शहरात वास्तव्यास असणाऱ्या लोकांना शहरातील इतर लोकांच्या भाषा व्यवहाराची कल्पना नसते, कारण अनेक व्यक्तींच्या छोटे छोट्या गटांमधून हा भाषाव्यवहार संपन्न होतो. उदाहरणार्थ : एखाद्या शहरातील हमाल, भाजीविक्रेते, फेरीवाला यांना कोणत्याही कार्यालयातील प्रशासना संदर्भातील भाषाव्यवहार समजणार नाही तर प्रशासनातील अधिकारी, लिपिक यांना हमालांमध्ये होणारा भाषाव्यवहार समजणार नाही कारण डाग, हमाली, वारणी, भरणी, उतरणी, टिप्पण, डाग यांसारखे अनेक शब्द हमालांच्या भाषा व्यवहारात आढळतात. सामान्य माणसांना वैद्यकीय क्षेत्रातील भाषाव्यवहार सहजपणे आकलन होत नाही. कारण उपरोक्त सर्वच क्षेत्रातील लोक हे एकाच भाषेचे भाषिक असले तरीही प्रत्येकाची भाषा वापराची पद्धत वेगवेगळी असते. यासंदर्भात डॉक्टर रमेश धोंगडे लिहितात, 'कुठल्याही शहरातील हातगाडीवाल्यांना विद्यापीठातील भाषाव्यवहाराची सुतराम कल्पना नसते. कारखान्यातील कामगार वर्गातील भाषा, संप्रेषण, त्यातील शब्द वाक्यरचना वगैरे- सरकारी नोकरवर्गाला विचित्र वाटावे इतके वेगळे असते. अशा परिस्थितीत सर्व मराठी भाषिक एकाच प्रकारे मराठीचा वापर करतात असे म्हणणे अज्ञानमूलक आहे. (धोंगडे रमेश, सामाजिक भाषाविज्ञान) भाषावापर हा व्यक्तिपरत्वे भिन्न असतो व प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तीनुसार पुन्हा त्यामध्ये भिन्नता आढळते. या संपूर्ण भाषाव्यवहाराचा अभ्यास म्हणजे भाषेचा अभ्यास असतो. 'कोणत्याही सामाजिक व्यवहाराचा अभ्यास करायचा झाल्यास प्रथम त्यातील वैयक्तिक अंश काढून त्यामागील स्थिर अशा सार्वत्रिक व्यवस्थेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. असे एकोणिसाव्या शतकातील समाजशास्त्रज्ञ डर्कहाईम यांचे मत होते. सोस्यूरनी हाच विचार भाषाव्यवहाराच्या बाबतीत लागू

केला. नित्याच्या भाषाव्यवहारात वैयक्तिक लकबी, तात्कालिक अविष्कार, शारीरिक व्यंगामुळे येणारे दोष इत्यादींची सरमिसळ झालेली असते. त्यातून तात्कालिक स्वरूपाचा वैयक्तिक अंश वगळल्यानंतरच भाषेची साररूप व्यवस्था हाती लागते. भाषावैज्ञानिकांनी याच व्यवस्थेचा अभ्यास केला पाहिजे असे त्यांचे मत होते. ही साररूप व्यवस्था सर्व समाजाच्या मालकीची असून आदर्शभूत असते. व्यवहारात आविष्कृत होत असताना तिच्या वैयक्तिक लकबी समाविष्ट होतात. त्या तात्कालिक स्वरूपाच्या असल्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे असा त्यांचा अभिप्राय होता. (काळे कल्याण, सोमण अंजली, (संपा.) आधुनिक भाषाविज्ञान : संरचनावादी, सामान्य आणि सामाजिक)

पुढे नोम चॉम्स्कीने भाषिक क्षमता आणि भाषाव्यवहार या दोन क्रांतिकारक कल्पना मांडल्या. त्यांच्या मते माणसाच्या संपूर्ण भाषिक व्यवहारामागे त्याच्या मनात स्थिर झालेली एक भाषिक नियमव्यवस्था उभी असते. या अप्रकट नियमव्यवस्थेला चॉम्स्की भाषिक क्षमता म्हणतो. ही नियम व्यवस्था अथवा क्षमता माणसाला भाषा शिकत असतानाच प्राप्त झालेली असते. या क्षमतेचा आविष्कार भाषाव्यवहारामध्ये होत असतो. ही आदर्श नियम व्यवस्था म्हणजे भाषेचा अंत:स्तर तर तिचा प्रत्यक्ष व्यवहार हा पृष्ठस्तर होय. असे चॉम्स्की मानतो.

चॉम्स्कीच्या भाषिक क्षमतेवर अनेक अभ्यासकांनी टीका केली. 'भाषा शिकणे म्हणजे केवळ सुरचित वाक्यांमधील नियमव्यवस्था जाणून घेणे नव्हे तर सामाजिक संदेशासाठी भाषा सुयोग्य रीतीने कशी वापरावी याबद्दलच्या नियमांचेही ज्ञान करून घेणे. या विचारामधूनच सामाजिक भाषाविज्ञानात संदेशात्मक क्षमता (Communicative competence) ही महत्त्वाची संकल्पना उदयास आलेली आहे. भाषेच्या अंतर्गत रचनेविषयीचे ज्ञान व त्याचबरोबर भाषेच्या सामाजिक वापराविषयीचे ज्ञान, या दोहोंचा अंतर्भाव व्यापक अशा भाषिक क्षमतेच्या संकल्पनेमध्ये व्हायला हवा असे सामाजिक भाषावैज्ञानिकांचे म्हणणे आहे. एखाद्या लहान मुलाला भाषा शिकत असताना फक्त भाषेच्या व्याकरण व्यवस्थेचे ज्ञान मिळाले व भाषेच्या प्रत्यक्ष वापराविषयी तो अंधारातच राहिला तर समाजामध्ये त्याची गणना अतिविचित्र, अमानवी प्राण्यांमध्ये (monster) होईल असे उद्गार एका लेखकाने काढले आहेत. तेंव्हा व्याकरणबद्ध क्षमतेबरोबरच संदेशात्मक क्षमताही प्रत्येक निजभाषिकाकडे असते व तिचाही विचार भाषाविज्ञानाने करायला हवा. असे सामाजिक भाषावैज्ञानिक मानतात.' (मालशे मिलिंद, आधुनिक भाषाविज्ञान सिद्धांत आणि उपयोजन) कोणतीही भाषा ही फक्त आदर्श नियमव्यवस्थेवर (व्याकरणावर) आधारित नसते तर तिचा वापर समाजामध्ये कशाप्रकारे करावा या विषयी काही संकेत समाजामध्ये निर्माण झालेले असतात. या संकेतांमुळे भाषाव्यवहार सुकर होतो. भाषेची 'संदेशात्मक क्षमता' म्हणजेच विशिष्ट संदेश, संकल्पना, विचारांची देवाण- घेवाण यालाच 'भाषाव्यवहार' म्हणतात. भाषाव्यवस्थेपेक्षा भाषाव्यवहाराचा अभ्यास केला पाहिजे हा विचार मॅलिनोवस्की आणि फर्थ यांनी आग्रहाने मांडला.

समाजामध्ये चालणारा भाषाव्यवहार हा अत्यंत सूक्ष्म गुंतागुंतीचा आणि व्यामिश्र स्वरूपाचा असतो. या भाषा व्यवहाराबाबत डॉ. रमेश वरखेडे आपल्या 'समाजभाषाविज्ञान: प्रमुख संकल्पना' या ग्रंथात एडवर्ड सपीरचे

मत नोंदवताना म्हणतात 'सपीरच्या मते भाषानिरपेक्ष अनुभव संभवत नाही; किंबहुना भाषेच्या दयेवरच मनुष्य वास्तवाला सामोरे जात असतो. वास्तव जगताची प्रतिमा तो भाषिक आधारानेच आपल्या मनात उभी करतो आणि या प्रतिमेच्या आधाराने तो आपला जाणिवेच्या पातळीवरील संज्ञापन व्यवहार करीत असतो.' त्यामुळे कोणताही मानवी अनुभव हा केवळ भौतिक विश्वाशी निगडीत नसतो, तर तो त्या व्यक्तीच्या भाषिक उपयोजन क्षमतेशी निगडित असतो. म्हणून मानवी अनुभवविश्वावर लिंग, विभक्ती, काळ, संख्या वा मापनवाचक शब्दांची सत्ता चालत असते. ही भाषिक सत्ता एकंदर अनुभव प्रक्रियेवर नियंत्रण ठेवीत असते. म्हणूनच व्यक्तीच्या नेणिवेतील खरे जग हे 'भौतिक' नसून 'भाषिक' असते असा सपीरचा दावा आहे. समाजाच्या भाषिक सवयींनी मानवाचा जीवनविषयक दृष्टिकोन नियंत्रित होत असतो. त्यामुळे कोणत्याही समाजाची जडणघडण त्या समाजाच्या भाषिक जडणघडणी वरून लक्षात येते. समाजाच्या प्रत्येक व्यवहारावर भाषिक सत्ता असते कोणत्याही गोष्टीविषयी एक दृष्टिकोन प्राप्त करून देण्याचे कार्य भाषा करत असते. मराठी भाषेतील लिंग व्यवस्था हे त्या दृष्टिकोणाचे फलित आहे. मराठीत नदी-सागर, वृक्ष-वेली, चंद्र-चांदणी यांकडे पाहताना प्रियकर-प्रेयसी किंवा पती-पत्नी अशा दृष्टिकोनातून पाहिले जाते. याला कोणताही वास्तवाचा अथवा कार्यकारण संबंधांचा आधार नाही. फक्त कल्पना आणि भाषिक दृष्टिकोनावर हा भाषाव्यवहार अवलंबून असतो.

समाजामध्ये परस्परांमध्ये आपण बोलतो ते बोलणे म्हणजेच आपला भाषाव्यवहार असतो. या भाषाव्यवहाराच्या माध्यमातूनच आपण आपल्या भाव-भावना अभिव्यक्त करत असतो. आपल्या गरजा लोकांना सांगत असतो व त्या भागवण्याचा प्रयत्न करत असतो. भाषाव्यवहार मानवाच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा घटक असतो. कारण भाषाव्यवहाराशिवाय माणसाच्या अस्तित्वाला अर्थ उरणार नाही. भाषाव्यवहार हा समाजामध्ये संपर्क प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वाचा दुवा ठरतो. समाजामध्ये परस्परांशी संबंध निर्माण करणे, राखणे, वाढवणे आणि प्रसंगी संबंध तोडणे हेही भाषाव्यवहाराच्या माध्यमातूनच होत असते.

### १.३.२ भाषिक समाज

समाज या संकल्पनेचा उल्लेख केल्याबरोबर आपणासमोर व्यक्ती व्यक्तींनी मिळून बनलेल्या एका विशिष्ट समुदायाची अथवा समूहाची प्रतिमा येते या संदर्भात प्रभाकर जोशी लिहितात, 'समाज म्हणजे व्यक्तींचा समूह होय. विशिष्ट भौगोलिक प्रदेशात दैनंदिन गरजांच्या पूर्तीसाठी, स्वसंरक्षण व स्वसंवर्धन या हेतूने एकत्र आलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे समाज होय.'(जोशी प्रभाकर, गोखले चारुता, (संपा.) सामाजिक भाषाविज्ञान, निराली प्रकाशन, पुणे)

समाज ही संकल्पना स्पष्ट करताना 'भारतीय समाजविज्ञान कोशा'मध्ये असे म्हटले आहे की, 'ज्या मानवी गटाला दीर्घकालीन सातत्य असलेली श्रद्धा, मूल्ये, आचार व नियम असतात अशा गटाला समाज म्हटले पाहिजे.' हा समाज विविध घटकांनी बनलेला असतो. भिन्न जातीतील, भाषेतील, पंथातील, धर्मातील माणसे एकत्र आली म्हणजे समाज आकाराला येतो. समाजामध्ये वेगवेगळ्या वयोगटातील अनेक स्त्री-पुरुषांचा समावेश होत असतो. व्यक्तीसमूहात एकत्वाची भावना वाढीस लागली म्हणजे समाजात स्थैर्य प्राप्त होते. हा समाज आपल्या दैनंदिन व्यवहारपूर्तीसाठी भाषेचा वापर करतो.

भाषिक समाजामध्ये होणारे संप्रेषण हे आकलन क्षमतेच्या मर्यादेत घडण्यासाठी वक्ता आणि श्रोता या दोघांनाही माध्यम भाषेचे ज्ञान असावे लागते. मग ते दोघेही वेगवेगळ्या भाषेचे भाषिक असेनात पण त्यांच्यात या माध्यम भाषेद्वारे सतत आंतरक्रिया घडत असेल तर ते दोघेही एकाच 'भाषिक समाजाचे' घटक ठरतात. 'भाषिक समाज' ही अमूर्त आणि गुंतागुंतीची संकल्पना आहे. या संकल्पनेमध्ये सर्व मातृभाषिकांचा समावेश होतो. मग त्यांच्यात आंतरक्रिया, संपर्क असोत अगर नसोत आणि ते जगाच्या पाठीवर कोणत्याही देशात वास्तव्याला असोत किवा कोणत्याही देशाचे नागरिकत्व त्यांनी स्वीकारलेले असो. ते एकाच भाषिक समाजाचा घटक ठरतात. तसेच शिक्षण, व्यवसाय किंवा नोकरीच्या निमित्ताने स्वत:च्या प्रांतांमधून दुसऱ्या प्रांतात आलेले पण त्या विशिष्ट प्रांताची भाषा स्वीकारून त्या भाषेमध्ये समाज व्यवहार पार पाडणारे भाषिकही जरी त्यांची मातृभाषा भिन्न असली तरीही ते त्या भाषिक समाजाचे घटक ठरतात. 'भाषिक समाज' या संकल्पनेचा विचार करताना डॉ. रमेश धोंगडे यांनी भाषिक समाज ही संकल्पना चार दृष्टिकोनातून मांडली असल्याचे दिसते ते चार दृष्टिकोन पुढील प्रमाणे.

### १. समान भाषेद्वारे परस्परांत संपर्क साधणारा भाषिक समाज

प्रत्येक भाषेला एक भाषिक समाज असतो. या भाषिक समाजातले लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे त्या समाज भाषेद्वारे संपर्क साधतात. उदाहरणार्थ, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, बेळगाव, नांदेड, मुंबई, रत्नागिरी इत्यादी महाराष्ट्राच्या विविध भागातील लोक एकमेकांशी संपर्क साधत असताना किंवा संभाषण करत असताना विशिष्ट एका भाषेचा वापर करतात. ती भाषा म्हणजे मराठी म्हणून ते एका मराठी भाषिक समाजाचा भाग बनतात. परंतु भारतामधील तंजावर प्रांतांमध्येही मराठी भाषिक वास्तव्याला आहेत. त्या भाषिकांचा या महाराष्ट्रातील भाषिकांशी प्रत्यक्ष संपर्क नसेल तर ते या भाषिक समाजाचे घटक होत नाहीत. या उलट अहमदाबादमध्ये अगर इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, दुबई इत्यादी ठिकाणी स्थायिक झालेल्या महाराष्ट्रातील मराठी भाषिकांचा संपर्क या महाराष्ट्रातील लोकांशी असेल तर मात्र ते या मराठी भाषिक समाजाचा घटक बनतात. कारण त्यांचा संपर्क हा एक महत्त्वाचा दुवा मानला जातो. याचाच अर्थ असा की भाषिक समाजाचा घटक बनण्यासाठी परस्परांचा संपर्क असणे अत्यंत आवश्यक आहे. परस्परांत सतत अंतरक्रिया असावी लागते तेव्हा त्या समाजाला भाषिक समाज म्हणता येईल.

### २. विविध भाषा वापरूनही पण परस्परात संपर्क साधणारा भाषिक समाज

एक किंवा अनेक भाषा वापरणारे लोक जर एकमेकांच्या सतत संपर्कात येत असतील, तर त्या लोकांचा समूहही भाषिक समाज मानावा लागेल. या दृष्टिकोनात समान भाषेचा आग्रह नाही. मात्र एकमेकांशी नित्य व्यवहार असण्याचा आग्रह आहे. मुंबईमध्ये गुजराती भाषक, मराठी भाषिक, हिंदी भाषिक, तामिळी आणि मल्ल्याळी भाषिक एकमेकांशी व्यवहार करीत असतात, देवाण - घेवाण करीत असतात. या सर्वांना एकच भाषिक समाजाचे घटक मानावे लागेल. त्यांना फार तर 'मराठी भाषिक समाज' असे म्हणता येणार नाही, पण त्यांना 'मुंबईचा भाषिक समाज' असे मात्र म्हणता येईल. भारतासारख्या बहुभाषिक राष्ट्रामध्ये तर असे भाषिक समाज सर्वच मोठ्या शहरांमध्ये निर्माण झालेले दिसतात. या भाषिक समाजामध्ये अनेक भाषांची सरमिसळ

असते. तरीही त्यांच्यामध्ये एक संवादित्व असते. एक सहजता असते.या भाषिक समाजात भाषावापराचे संकेत निश्चित झालेले असतात .

**३. समान भाषा मानक, समान औचित्य कल्पना, समान ज्ञान व श्रद्धा असणारा समाज तो भाषिक समाज**

भाषिक समाजाला एक भाषा असणे बंधनकारक नाही. सामाजिक व्यवहारात समान मानकांचा वापर, समान सामाजिक औचित्याच्या कल्पना, ज्ञानाची समान क्षेत्रे, जगाविषयी समान दृष्टीकोन आणि सामान संभाषण पद्धती यांवरून भाषिक समाज ठरतो.

**मुंबईत असलेले सर्वच विविध भाषांचे भाषक :** गट एकसंघ मुंबई समाज निर्माण करू शकणार नाहीत. कारण त्यांचे परस्परांशी संवाद साधण्याचे नियम, भाषा वापराचे संकेत वेगवेगळे असतील. धारावीतले चमड्याच्या वस्तू विकणारे लोक, क्रॉफर्ड मार्केटमधील दलाल आणि दादरच्या शिवाजी पार्क भोवताली राहणारे लोक यांचा एक भाषिक समाज असणार नाही. मुख्य म्हणजे भाषा वैज्ञानिक किंवा इतर बाहेरच्या लोकांनी एखाद्या मानवी समूहाला 'भाषिक समाज' ठरवण्यापेक्षा समाजातील लोकांना जेव्हा आपण एका समाजाचे घटक आहोत अशी भावना असेल, तेव्हाच तो समाज भाषिक समाज होईल. या तिसऱ्या दृष्टिकोनात समाज भाषा किंवा नित्य संपर्क यापेक्षा एकत्वाचा व समान मूल्यांच्या भावनेला महत्त्व आहे.

परस्परांशी नेहमी संपर्कात असल्यामुळे भिन्न भाषिकांतही एक प्रकारचा आपलेपणा निर्माण होत असतो. त्यामुळे ते जेव्हा एकमेकांच्या संपर्कात येतात तेव्हा परस्परांशी संपर्क साधताना ते त्या भाषिक गटाची अप्रत्यक्षपणे मान्य केलेली भाषा वापरतात. या आपलेपणाच्या भावनेतून या भिन्न भाषिकांत भाषिक आदानप्रदान होत असते. आपण ज्या ठिकाणी वास्तव्य करतो त्या परिसरात जे भाषिक वास्तव्य करतात त्यांच्या भाषेचा परस्परांवर परिणाम होत असतो. सतत आंतरक्रिया होत असते.त्यातून त्या समाजात एकजिनसीपणा येतो.

**४. व्यक्ती ही एकाच वेळी वेगवेगळ्या भाषिक गटाची सभासद असते**

प्रत्येक भाषक हा एकाच किंवा एकापेक्षा जास्त अशा भाषा समाजाचा घटक असला पाहिजे असे नाही. तो एकाच वेळी अनेक लहान – लहान भाषिक समाजाचा घटक असू शकतो. खरे तर 'समाज' या शब्दापेक्षा 'गट' हा शब्द चांगला. प्रत्येक माणूस हा विभिन्न भाषिक गटाचा एकाच वेळी सभासद असतो प्रत्येक माणूस त्याच्या इच्छेप्रमाणे आणि प्रत्येक व्यक्ती त्यातील काही भाषिक गटांशी तादात्म्य पावू शकते किंवा इच्छिते.

हा दृष्टिकोन समाजाकडून पुन्हा व्यक्तीकडे , व्यक्तीच्या महत्त्वाकडे वळणारा आहे. एखादा माणूस जसा एकाच वेळी घरात, स्वयंपाकघरात व खालच्या मजल्यावर असू शकतो; त्याप्रमाणे तो एकाच वेळी अनेक भाषा–गटांचा सभासद असू शकतो. उदाहरणार्थ 'त्याचा अगदी बॅक–स्टेज आर्टिस्ट झाला' असे म्हणणारा महाविद्यालयीन युवक हा तो वापरत असलेल्या 'बॅक स्टेज आर्टिस्ट होणे' याच्या गुपित अर्थांनी समवयस्क तरुणांच्या गटाचा सभासद आहे, 'त्येचा' 'जाला' असे शब्द न वापरता तो 'त्याचा' 'झाला' असे शब्द वापरतो म्हणून शहरी गटाचा सभासद आहे. 'बॅक स्टेज आर्टिस्ट' हा व्रात्य प्रयोग इंग्रजी शब्दांच्या उसनवारीचा नमुना असल्याने तो भाषा सरमिसळ करणाऱ्या शिक्षित गटाचाही सभासद आहे आणि त्याचे दृष्टिकोन, त्याचे आचार

विचार, त्याची वृत्ती, या बाजूने तो अमेरिकन, युरोपियन, मध्यपूर्व नागालँड, मिझोराम, मणिपुरी येथील समाजापेक्षा वेगळया असणाऱ्या महाराष्ट्रीय किंवा मराठी समाजाचाही सभासद आहे .

कधी कधी दोन भाषिक गटात विरोध असतो त्या वेळी बोलणारा त्यातील एकाची निवड करतो. 'स्टेजवर बक्षीसं वाटायच्या लोकांची यादी द्या' असे आयोजकांच्या गटात खाजगीत बोलणारी निवेदिका व्यासपीठावर मात्र 'बक्षिसांचे मानकरी' असे म्हणेल.

हे भाषिक गट समाजशास्त्रज्ञ किंवा भाषावैज्ञानिकांनी ठरवलेले नसतात. सर्व गट मिळून एक समाज पूर्ण होतो असेही नसते. हे गट बोलणाऱ्या व्यक्तीच्या वैयक्तिक दृष्टिकोनाचा भाग असतात. बहुमिती अशा सामाजिक अवकाशात प्रत्येक व्यक्ती स्वतःचे स्थान एका निश्चित मिती असणाऱ्या छोट्या अवकाशात पाहते. वय, शिक्षण, आवड, लिंग, भौगोलिक परिसर, जात, धर्म अशा विविध निकषांवर व्यक्ती भाषिक गट ठरविते या गटाला मर्यादित करता येत नाही आणि म्हणून समाजातील भाषा गटांच्या संख्येवरही मर्यादा घालता येत नाही. भाषा गट असंख्य असतात. (धोंगडे रमेश, सामाजिक भाषाविज्ञान, दिलीपराज प्रकाशन, पुणे द्वितीय आवृत्ती १५ सप्टेंबर, २०१२) एक व्यक्ती एकाच वेळी अनेक भाषिक समाजाची किंवा गटाची सभासद असू शकते. एक भाषिक समाज अस्तित्वात येण्यासाठी विशिष्ट समाजाने मान्य केलेले संकेत त्या व्यक्तींना ज्ञात असावे लागतात. समाजातील विविध मानक औचित्य व औचित्य भंगाचे संकेत, समान संभाषण पद्धती, समान दृष्टिकोन आणि अज्ञानाची सामान्य क्षेत्रे इत्यादी गोष्टींवरून 'भाषिक समाज' प्रस्थापित होऊ शकतो. मग त्या भाषिकांची मातृभाषा भिन्न असली तरीही भाषिक समाज प्रस्थापित होण्यास अडचण येत नाही.

### १.३.३ भाषिक समाज अस्तित्वात येण्याची तत्त्वे

ज्या समाजात भाषिक प्रयोग आणि भाषा आकलन यात सुसंवादित्व व परस्पर मेळ असतो. त्या समाजाला भाषिक समाज (speech community) म्हणतात. त्या समाजात परस्पर विनिमयासाठी भाषा प्रयोगाची एक संकेत सरणी रूढ असते. निजभाषिकाला ह्या संकेतसरणीचे ज्ञान बालपणीच सुरू होणाऱ्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून अवगत झालेले असते. कोणताही भाषिक समाज सामान्यतः चार तत्त्वांवर अस्तित्वात येतो.

**१ संप्रेषणाचे घनत्व**

भाषिक सुसंवादित्वाची घनता ही भाषिक समाजाच्या अस्तित्वाची खूण आहे. परस्पर भाषिक विनिमयातील अंतर वाढत गेले तर कालांतराने दोन भिन्न भाषिक समाज अस्तित्वात येऊ शकतात. याचा अर्थ जर एकाच भाषिक समाजातील काही लोकांमध्ये सतत संप्रेषणक्रिया घडत नसेल, परस्परांमध्ये संपर्क होत नसेल तर कालांतराने त्या एकाच भाषिक समाजातील लोकांच्या दोन गटांमध्ये अंतर पडत जावून त्या दोन गटांची वेगवेगळी भाषा निर्माण होऊ शकते. म्हणजे कालांतराने दोन भिन्न भाषिक समाज अस्तित्वात येऊ शकतात.

**२ प्रतीकात्मक एकता**

त्याच्या भाषिक समाजाच्या एकात्मतेचे प्रतीक म्हणून विशिष्ट भाषा किंवा बोलीस प्रतिष्ठा असते.

उदाहरणार्थ, दिल्लीच्या भाषिक समाजात पंजाबी, हिंदी, हरियाणवी, इंग्रजी इत्यादी विविध भाषा बोलल्या जातात. परंतु दिल्लीचा भाषिक समाज 'हिंदी भाषिक' म्हणून प्रतीकात्मक पणे ओळखला जातो. भाषिक अस्मिता ही सामाजिक अस्मितेचा अविभाज्य घटक असते.

म्हणजे एकाच वेळी वेगवेगळ्या भाषा बोलणारा समाज किंवा समाजातील काही लोक एकत्र येऊन स्वतंत्र भाषिक समाज अस्तित्वात येताना आढळतो. भाषिक समाज ही एक प्रतीकात्मक ओळख असलेली आपणास निदर्शनास येते या वेगवेगळ्या भाषेतील भाषिकांचा समान धागा असणारी विशिष्ट एक भाषा मात्र अस्तित्वात असावी लागते. ही माध्यमभाषा सर्व भाषिकांना एकाच भाषेमध्ये किंवा एकाच भाषिक समाजांमध्ये बांधून ठेवण्याचे कार्य करते.

**३. भाषिक कोष**

विशिष्ट क्षेत्रातील लोक परस्पर विनिमयासाठी ज्या भाषा अथवा बोलींचा प्रयोग करतात, त्या सर्वांचा मिळून एक 'भाषिक कोश' तयार होतो. उदाहरणार्थ, मुंबईचा भाषिक समाज मराठी, गुजराती, हिंदी, इंग्रजी भाषांचा वापर करतो. बनारसचा भाषिक समाज भोजपुरी, हिंदी, बांगला, इंग्रजी भाषांचा वापर करतो. मुंबईचा किंवा बनारसच्या समाजाचा भाषिक कोश हा असा त्या ठिकाणी बोलल्या जाणाऱ्या बोलींचा अथवा भाषांचा मिळून तयार होत असतो. त्या त्या क्षेत्रातील समाज विशेष व्यावसायिक, आर्थिक, सामाजिक स्तर यांचा त्या भाषिक कोशावर प्रभाव असतो. या भाषिक कोशात समाविष्ट होणाऱ्या विशिष्ट भाषा व बोलींच्या वापराला अलिखित मान्यता हे त्या भाषिक समाजाचे आणखी एक वैशिष्ट्य असते. त्यामुळे एकाहून अधिक भाषा अथवा बोलींचा परस्पर विनिमयासाठी उपयोग होतो मुंबईचा मराठी माणूस टॅक्सीत बसल्यावर हिंदी बोलू लागतो. प्रसंग पाहून इंग्रजी व गुजरातीचाही वापर करतो. त्यामुळे अमुक एकच भाषा विनिमय माध्यम म्हणून वापरण्याचे बंधन नसले तरी किमान कोणकोणत्या भाषेत सामाजिक संज्ञापन होते, याचे संकेत त्या भाषिक समाजात रूढ झालेले असतात. मराठी भाषिक समाजातील व्यक्ती आपल्या घरात प्रादेशिक बोली अथवा उपबोली वापरील, औपचारिक व्यवहारात प्रमाण मराठीचा वापर करील, मुंबईसारख्या महानगरात हिंदीचा अथवा इंग्रजीचा उपयोग करील आणि तरीही ती व्यक्ती 'मराठी भाषक' म्हणूनच ओळखली जाईल. कारण त्या व्यक्तीची भाषिक अस्मिता !

प्रयोगाच्या दृष्टीने समाजाच्या भाषिक कोशातील भाषा आणि बोली यांच्या प्रामुख्याने तीन स्थिती आढळतात.

१ वेगवेगळ्या परिस्थितीत एकाहून अधिक भाषांचा प्रयोग होऊ शकतो.

२ एकाच परिस्थितीत एकाहून अधिक भाषांचा प्रयोग होऊ शकतो.

३ कधी दोन किंवा त्याहून अधिक भाषांचे मिश्रण होते. उदाहरणार्थ, मराठी बोलताना बरेच लोक मधून मधून इंग्रजी शब्दांचे मिश्रण करतात. भाषिक प्रतिष्ठेच्या धारणेतून हे भाषा मिश्रण होते या उलट हिंदी – उर्दू मिश्रित प्रयोग हे कोणत्याही प्रतिष्ठेशी संबंधित नसतात. तेथे भाषा मिश्रणाची स्वाभाविक स्थिती आढळते.

### ४. भाषिक सवयी

भाषा आणि समाज यात आंतरिक सुसंवाद असतो. त्यामुळे केवळ उच्चार धाटणीवरूनच बोलणारा मध्यम वर्गीय आहे की कनिष्ठवर्गीय, व्यापारी आहे की अधिकारी, कोकणातला आहे की खानदेशातील आहे हे ओळखायला येते. हेल काढून बोलणारा 'ळ' ऐवजी 'य' किंवा 'ड' (कमळ – कमय, बाळ – बाय ) उच्चारण करणारा, चहा पिऊन टाकला, सामान घेऊन घेतले अशी क्रियापदे वापरणारा माणूस खानदेशी आहे हे चटकन ओळखता येते. या उलट नासिक्य उच्चारण करणारा भाषिक कोकणी आहे हे असे खुशाल समजावे. (वरखेडे रमेश, समाजभाषाविज्ञान प्रमुख संकल्पना, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. दुसरी आवृत्ती, फेब्रुवारी २००१) भाषिक समाज अस्तित्वात येण्यासाठी भाषिक सुसंवादित्व अत्यंत महत्त्वाचे असते. अनेक भाषिक एकत्र येऊन व्यवहार पार पाडत असतात तेव्हा त्यांच्यात प्रतिष्ठा पावलेली एक माध्यम भाषा असावी लागते. या भाषेच्या नावावरूनच त्या विशिष्ट भाषिक समाजात प्रतीकात्मक नाव दिले जाते. उदाहरणार्थ 'हिंदी भाषिक समाज', 'मराठी भाषिक समाज' विविध भाषिक जेव्हा एका विशिष्ट शहरात किंवा भूभागावर एकत्रितपणे विनिमय किंवा व्यवहार पार पाडत असतात, तेव्हा अनेकविध भाषांच्या सरमिसळीतून व्यवहारासाठी विशिष्ट शब्दकोश तयार होतो. त्या शब्दकोशाला या भाषिक समाजाकडून अप्रत्यक्ष मान्यता प्राप्त होत असते.

भाषिक समाजाकडून भाषा प्रयोग होत असताना एकाच वेळी एकाहून अधिक भाषांचा वापर होऊ शकतो तर कधी वेगवेगळ्या परिस्थितीत अधिक भाषांचा वापर होताना दिसतो. प्रतिष्ठेसाठी काही वेळा दोन किंवा अधिक भाषांच्या मिश्रणातून व्यवहार संपन्न होतो रमेश धोंगडेच्या मते, भाषेवरून भाषिक समाज ठरविणे व समाजावरून भाषा ठरविणे यात गोलगोल फिरण्याचा दोष आहे. (धोंगडे रमेश, सामाजिक भाषाविज्ञान, दिलीपराज प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १५ सप्टेंबर, २०१२)

### १.३.४ समाजातील विविध सामाजिक गट आणि भाषाव्यवहार

भाषिक समाज ही अमूर्त आणि अनिश्चित अशी संकल्पना आहे. भाषिक समाजाला काटेकोर सीमारेषांमध्ये बांधता येत नाही. एका भाषिक समाजामध्ये एकाच वेळी एकापेक्षा जास्त भाषांचा वापर होऊ शकतो. आणि हा भाषावापर हा पूर्णपणे समाजातील प्रत्येक व्यक्तीकडून होत असतो.

मानवी समाज लिंग, वय, व्यवसाय, परंपरा इ. अनेक कारणांनी विभागला जात असतो. या सर्व घटकांवर आधारित असे निरनिराळे सामाजिक गट तयार झालेले असतात त्यांच्यामुळे भाषाव्यवहारातही अनेक भेद निर्माण झालेले असतात. त्यामागची सामाजिक, सांस्कृतिक कारणे समजावून घेवून करण्यात येणारा भाषाभ्यास म्हणजे समाजभाषाविज्ञान होय. (काळे कल्याण, सोमण अंजली, (संपा.) आधुनिक भाषाविज्ञान : संरचनावादी, सामान्य आणि सामाजिक)

डॉ. रमेश धोंगडे यांनी आपल्या 'सामाजिक भाषाविज्ञान' या ग्रंथांमध्ये 'भाषिक समाज' ही संकल्पना स्पष्ट करताना त्यासंबंधी चार दृष्टिकोन मांडलेले आहेत. त्यातील 'व्यक्ती ही एकाच वेळी वेगवेगळ्या भाषिक गटाची सभासद असते. भाषा गट असंख्य असतात.' या चौथ्या दृष्टिकोनानुसार समाजामध्ये प्रत्येक व्यक्ती ही

विशिष्ट अशा भाषिक गटांशी संपर्कात येते. भाषिक समाजाशी तिचा प्रत्यक्ष संबंध येत नाही. परंतु प्रत्येक समाज हा असंख्य अशा छोट्या छोट्या सामाजिक गटांचा बनलेला असतो. कारण एकच व्यक्ती समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये एकाच वेळी वावरत असते. एखादी व्यक्ती एकाच वेळी विद्यापीठात, मराठी विभागात, एम. ए. भाग दोनच्या वर्गात आणि व्यासपीठावरही असू शकते. त्याचप्रमाणे एखादी व्यक्ती एकाच वेळी अनेक सामाजिक गटांची सभासद असते.

समाजामध्ये एखाद्या व्यक्तीचा वावर ज्या ज्या सामाजिक क्षेत्रात असतो तेवढ्या सामाजिक गटांमध्ये ती व्यक्ती वावरत असते. त्या व्यक्तीचे प्रत्येक ठिकाणचे संभाषण संकेत ठरलेले असतात. विविध क्षेत्रानुसार आणि व्यवसायानुसारही अनेक सामाजिक गट समाजात अस्तित्वात असतात. उदाहरणार्थ कुटुंब, शाळा, कॉलेज, सरकारी कार्यालय, वाचनालय / ग्रंथालय, बाजार, दुकाने, दवाखाने, हॉटेल, रेल्वे स्टेशन, बसस्थानक, विमानतळ, विद्यापीठे, त्याच बरोबर वरील सर्वच क्षेत्रांमध्ये  वय, लिंग, भौगोलिक परिसर, जात ,धर्म इत्यादी विविध निकषांवर व अनेक कार्यक्षेत्रानुसार अनेक सामाजिक गट निर्माण होत असतात.

उपरोक्त विविध कार्यक्षेत्रांशिवाय समाजातील प्रत्येक वयोगटानुसार वेगवेगळे सामाजिक गट अस्तित्वात येताना आढळतात. मग त्यामध्ये लहान मुलांचा गट, प्राथमिक शाळेतील मुलांचा गट, माध्यमिक शाळेतील मुलांचा गट, महाविद्यालयीन मुलांचा गट, शाळेत न गेलेल्या अशिक्षित मुलांचा गट उपरोक्त सर्वच गटांमधील मुलींचा गट व त्यांची भाषा पूर्णत: वेगळी असते. पुन्हा मुले आणि मुली यांचे एकत्र भाषिक गट, विद्यार्थी आणि शिक्षक यांचा भाषिक गट या प्रत्येक भाषिक गटातील संवादसंकेत व भाषिक भांडार भिन्न असल्याचे दिसते.

महाविद्यालयाचा विचार केला तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळे सामाजिक गट असतात आणि प्रत्येक गटानुसार संभाषण संकेत ठरलेले असतात. नेहमी अध्ययनात गोडी घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा गट वेगळा तर महाविद्यालयातील विशिष्ट कट्ट्यावर बसणाऱ्या विद्यार्थ्यांचा सामाजिक गट वेगळा ठरतो. कट्ट्यावरील सामाजिक गटाची संकेतबद्ध भाषा अभ्यासू मुलाला कदाचित कळणार नाही, कारण तो त्या सामाजिक गटाचा सभासद नसतो. मात्र कट्ट्यावरचे हे जग तात्पुरते असते ते सतत बदलत असते. चार किंवा पाच वर्षांनंतर वातावरण बदलले की ही भाषाही विस्मृतीत जाते प्रत्येक महाविद्यालयात प्रत्येक वर्षी असे अनेक कट्टे अस्तित्वात असतात आणि काही विस्मृतीतही जातात. त्या त्या महाविद्यालयातील त्या त्या कट्ट्यांवरील मर्यादित विद्यार्थ्यांचा गट एवढीच त्याची व्याप्ती मर्यादित असते. त्यामुळे त्यांची भाषा त्या त्या वर्तुळातील सभासदालाच अधिक समजते. गाव, महाविद्यालय बदलले की त्यांची भाषाही थोडी थोडी वेगळी जाणवते.

महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या भाषिक गटात ए. पी. आय., सिल्याबस, लेक्चर, एल.आय.सी., रिसर्च पेपर, नॅक, एन. आय. आर. एफ., महाविद्यालयातील विविध समित्या त्या समित्यांची नावे व कार्य, प्लेसमेंट यांसारखे अनेक चर्चेचे विषय असतात. ते त्या भाषिक गटाचा सदस्य नसणाऱ्या समजातील इतर लोकांच्या लक्षात येणार नाहीत किंवा समजणार नाहीत.

वैद्यकीय क्षेत्र  विचारात घेतले तर एखाद्या हॉस्पिटलमधील दोन डॉक्टर किंवा डॉक्टर आणि नर्स तसेच डॉक्टर आणि कंपाऊंडर किंवा डॉक्टर आणि मेडिकल रिप्रेझिंटेटिव्ह (एम.आर.) यांच्यात चाललेले संवाद एखाद्या वैद्यकीय क्षेत्राशी संबंध नसणाऱ्या  व्यक्तीला समजणार नाहीत. कारण डॉक्टर, नर्स, कम्पाऊंडर ,एम. आर.  हे वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या सामाजिक गटाचे सदस्य आहेत त्यांच्यातील भाषाव्यवहार हा त्या क्षेत्राशी निगडीत असणार.

समाजातील प्रत्येक व्यक्तीची भाषा ही स्थलकालानुसार बदलत असते. आपण आपल्या व्यवसायाच्या ठिकाणी ज्या पद्धतीने बोलतो त्या पद्धतीने घरी आल्यानंतर बोलत नाही. प्रत्येकाचे संप्रेषण हे आपल्या जिवलग मित्रांसोबत असताना वेगळे असते, अनोळखी माणसांसोबत वेगळे असते, नवीन पाहुण्यांशी बोलताना वेगळे असते, आपल्या व्यावसायिक सहकाऱ्यांशी बोलताना वेगळे असते. म्हणजे या प्रत्येक ठिकाणच्या किंवा व्यक्तींसोबतच भाषिक गटात संभाषणासाठी स्वतंत्र पद्धतीने भाषा वापर होताना आढळतो.

समाजातील विविध लघु क्षेत्रानुसार प्रत्येक लघु क्षेत्रात अनेक भाषिक गट अस्तित्वात असतात. हे सर्व गट मिळून समग्र भाषिक समाज अस्तित्वात येतो.

### १.३.५  भाषा संपर्काचा अभ्यास

कुठलाही भाषिक समूह केवळ आपल्यापूरते सर्व जीवनव्यवहार सिमित करू शकत नाही. विविध कारणांनी घडणारी स्थलांतरे, आक्रमणे, व्यापारी व इतर क्षेत्रातील देवाण-घेवाण या कारणांनी प्राचीन काळापासून भिन्न भाषिक समूहाचा संपर्क नित्य येत राहिला आहे. संबंधित भाषांवर या संपर्काचे विविध  प्रकारांनी परिणाम होतात. केवळ काही शब्दांची उसनवारी होण्यापासून नव्या भाषांची निर्मितीपर्यंत अनेक प्रकार त्यामध्ये दिसतात.

### १.३.५.१ भाषा संपर्काच्या प्रक्रियेवर परिणाम करणारे घटक

भाषा संपर्काचा परिणाम नेमका कशा प्रकारे होईल हे विविध घटकांवर अवलंबून असते. त्या दोन भाषिक समूहाचा संपर्क किती काळ घडून येतो आहे, तो कितपत घनिष्ठ आहे, त्यांच्यातील परस्पर संबंध राजकीय सामाजिक आर्थिक दृष्ट्या कसे आहेत, संपर्का मागील हेतू कोणते आहेत अशा विविध गोष्टी त्यावर प्रभाव टाकत असतात. काही वेळा परस्परांशी साम्य असणाऱ्या भाषांमध्ये अधिक सहज देवघेव होते, तर वेगळ्या वाटणाऱ्या भाषांमध्ये तशी ती होत नाही असेही दिसते. उदाहरणार्थ मराठी व हिंदीतील साम्यामुळे द्रविडी कुळातील भाषांपेक्षा हिंदीतील शब्द मराठीत सहज प्रवेश करू शकतो. कधी कधी प्रत्यक्ष संपर्क नसला तरीही शिक्षण, ग्रंथव्यवहार यांच्या माध्यमातूनही एखादी भाषा इतर भाषांवर प्रभाव टाकते. इंग्रजीच्या संदर्भात असेही झालेले दिसेल.

भाषा संपर्काच्या प्रक्रियेत दोन परस्परविरोधी प्रेरणाही कार्यरत होत असतात. एक संपर्काच्या गरजेतून भाषिक तडजोडी करण्याची, भाषिक देवाण घेवाणीस अनुकूल असणारी असते; तर दुसरी आपल्या समाजाचे भाषिक वेगळेपण, अस्मिता टिकवण्याची, त्यासाठी परभाषिक प्रभावांना विरोध करण्याची असते. पहिल्या प्रेरणेमुळे आदान प्रक्रिया शक्य होते, विविध स्तरावरील बहुभाषिकत्व व भाषा मिश्रण निर्माण होऊ शकते.

भाषाशुद्धीच्या चळवळी या दुसऱ्या प्रेरणेतून जन्माला येतात. त्याच प्रमाणे भाषिक अंतर टिकवण्याचेच नव्हे तर वाढवण्याचेही प्रयत्न काही वेळा होतात.

भाषा संपर्कातून भाषामिश्रण व भाषा बदल या प्रक्रिया होताना आढळतात. भाषाद्वित ही प्रक्रिया भाषा संपर्कामुळे प्रभावित होत असते. त्याच बरोबर बहुभाषिकतेवरही भाषा संपर्काचा परिणाम होताना आढळतो. या भाषा संपर्कामुळे विविध भाषिक क्षेत्रे निर्माण होत असतात. त्याचबरोबर नवीन भाषांची निर्मितीसुद्धा भाषिक संपर्कामुळे होताना आढळते. यातूनच पिजीन भाषा आणि क्रिओल भाषा निर्माण होताना दिसतात.

### १.३.५.२ भाषा संपर्काची विविधता

आज विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने स्वतःची संपर्क कक्षा अमर्याद वाढवलेली पाहावयास मिळते. त्यामुळे  व्यक्तीचा संपूर्ण जगातील भाषिकांशी संपर्क होताना आढळतो. व्हॉट्सअॅप, फेसबुक, ऑर्कुट, ट्विटर यांसारख्या अनेक समाज माध्यमांमुळे या संपर्काच्या कक्षा अधिकच विस्तारलेल्या आहेत. 'प्रत्येक समाजाकडे आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीकडे भाषिक भांडार उपलब्ध असते, समाजातील व्यक्तींच्या संदेशाच्या गरजेनुसार व या गरजांतून निर्माण झालेल्या संपर्क – प्रक्रियेच्या स्वरूपानुसार हे भाषिक भांडार वाढत, बदलत असते. या भांडाराचे वर्णन सामाजिक व्यवस्थेचा संदर्भ घेऊन कसे करायचे, हा सामाजिक भाषा विज्ञानातील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. लघुक्षेत्र ,आर्थिक वर्ग, वर्ण, जाती ,वंश, लिंग इत्यादी सामाजिक सांस्कृतिक भेदांच्या व संकल्पनांच्या साहाय्याने हे वर्णन कसे केले जाते, समाजातील व्यक्ती आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी परस्परांशी संपर्क साधतात हा संपर्क कधी कधी भिन्न भाषिक समाजामध्ये प्रस्थापित होत असतो. या संपर्क प्रक्रियेच्या स्वरूपानुसार भाषिक भांडार बदलते किंवा वाढतही असते. या संज्ञापन अथवा संपर्क प्रक्रियेमध्ये एकापेक्षा अधिक भाषांशी संपर्क येण्याची ही प्रक्रिया समाजभाषाविज्ञानाचा आस्थाविषय आहे. दोन भाषिक समाजातील भाषा संपर्कातून हे दोन्ही भाषिक समाज परस्परांच्या भाषा शिकतात आणि द्वैभाषिक किंवा बहुभाषिक बनतात. या संपूर्ण संपर्काला संचालित करण्यासाठी एक भाषिक व्यवस्था कार्यरत असते. रमेश वरखेडे यांनी आपल्या 'समाजभाषाविज्ञान प्रमुख संकल्पना' या पुस्तकात या भाषा संपर्काचे तीन स्वरूपांमध्ये वर्गीकरण केले आहे.

१. व्यक्ती बोली संपर्क

२. शेजार भाषा संपर्क

३. परभाषा संपर्क

### १. व्यक्ती बोली संपर्क

भाषा ही एक सामाजिक संस्था असली तरी भाषेचा वापर समाजातील प्रत्येक व्यक्ती करत असते. भाषा बोलणाऱ्या व्यक्तीत प्रत्येक व्यक्तीची बोली तिच्या लकबीनुसार वेगळी ठरते. दोन व्यक्ती एकत्र आल्या की व्यक्ती बोली संपर्क ही संपर्क प्रक्रिया होते. अनेक व्यक्तींचा मिळून संपूर्ण समाज बनलेला असतो व समाजातील सर्व व्यक्तींनी मान्य केलेल्या संकेतांवर भाषा संचलित होत असते. म्हणजे समाजातील व्यक्ती ही मूलभूत घटक

ठरते व समाजातील व्यक्तींकडूनच प्रत्यक्षपणे भाषेचा वापर होत असतो. प्रत्येक समाजामध्ये समाजमान्य संकेतावर आधारित असणारी भाषा असते. उदाहरणार्थ, महाराष्ट्रामध्ये वास्तव्य करणाऱ्या बहुतांश समाजाची भाषा ही मराठी भाषा आहे. मराठी ही महाराष्ट्र राज्याची राज्यभाषा आहे. मराठी ही महाराष्ट्रातील माणसाची मातृभाषा आहे. परंतु संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जी मराठी भाषा बोलली जाते ती पूर्णत: एकच आहे असे म्हणता येत नाही. कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, खानदेश / उत्तर महाराष्ट्र, सीमा प्रदेश या प्रत्येक प्रांतानुसार मराठी भाषा बदलताना दिसते आणि हा भाषेत होणारा बदल हा नजरेत भरण्या इतपत वेगळा असलेला पाहावयास मिळतो. पुन्हा प्रत्येक प्रांतातील भाषा वेगळी. पश्चिम महाराष्ट्रातील मराठी भाषेसंदर्भात बोलायचे झाले तर महाराष्ट्र कर्नाटक सीमाभागातील बोलीभाषा वेगळी, चंदगड प्रांतातील चंदगडी ही नव्याने पुढे येत असलेली बोली वेगळी, कोल्हापुरी बोली वेगळी, सातारची भाषा वेगळी आणि पुणे सोलापूर जिल्ह्यातील भाषा वेगळी कोल्हापूरमधील व्यक्ती 'तो मोळा दे' असे म्हणाली तर सातारमधील व्यक्तीला कदाचित अर्थबोध होणार नाही. कारण कोल्हापूरमध्ये ज्या वस्तूला 'मोळा' म्हणतात त्या वस्तूला सातारमध्ये 'खिळा' म्हंटले जाते. प्रत्येक प्रांतातील व्यक्ती आपापल्या पद्धतीने भाषा वापरत असते.

व्यक्ती बोलीवर व्यक्तीचे वय, शिक्षण, आजूबाजूचा समाज इत्यादी अनेक घटक प्रभाव टाकत असतात. एखादी उच्चशिक्षित व्यक्ती दुसऱ्या उच्चशिक्षित व्यक्तीशी ज्या पद्धतीने संवाद साधते त्या पद्धतीने अशिक्षित व्यक्तीशी संवाद साधत नाही. एकाच भाषेचे भाषिक असणारे दोन अशिक्षित आणि दोन सुशिक्षित यांच्यातील संवादाचे स्वरूप पूर्णत: भिन्न असते. भाषा तीच पण वापरण्याची पद्धती पूर्णत भिन्न असते. एखादी व्यक्ती समवयस्कांशी, आपल्यापेक्षा मोठ्या व्यक्तींशी आणि आपल्यापेक्षा लहान व्यक्तींशी संपर्क साधत असताना तिची भाषा बदलते. दोन व्यक्ती परस्परांशी खाजगीत संपर्क साधताना भाषा वेगळी तर त्याच दोन व्यक्ती एखाद्या सार्वजनिक व्यासपीठावर गेल्यानंतर परस्परांना आदराने संबोधतात. तिथे त्यांच्या भाषेचे स्वरूप पूर्णत: बदललेले असते. म्हणजे पुन्हा व्यक्ती बोली संपर्काला अनेक सामाजिक संदर्भ प्रभावित करत असतात. व्यक्तीवर अनेक व्यक्तींचा प्रभाव असतो विशिष्ट व्यक्तीच्या अनुकरणांतूनही व्यक्ती स्वतःची भाषा वापरण्याचा प्रयत्न करते. त्यामध्ये अनेक वक्ते, राजकीय पुढारी यांचे अनुकरण करून त्यांच्याप्रमाणे आपली भाषा वापरण्याकडे अनेक कार्यकर्त्यांचा कल असतो.

**२. शेजार भाषा संपर्क**

दोन भिन्न भाषा बोलणाऱ्या व्यक्तींमध्ये होणारा भाषा संपर्क; उदाहरणार्थ मराठी, गुजराती व एकाच भाषेच्या दोन भिन्न बोली बोलणाऱ्या व्यक्तींमध्ये होणारा भाषिक संपर्क. दोन भिन्न भाषा बोलणाऱ्या व्यक्तींमध्ये परस्परात संपर्क साधण्यासाठी शेजार भाषा संपर्क ही भाषिक प्रक्रिया घडताना दिसते. भारत हे एक बहुभाषिक राष्ट्र आहे. १९६१ सालच्या जनगणनेनुसार भारतात सुमारे १६५२ भाषा बोलल्या जात होत्या. जी भाषा दहा हजार लोकसंख्येपेक्षा जास्त लोकांकडून बोलली जाते तिची जनगणनेमध्ये मातृभाषा म्हणून नोंद करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला असल्याने भारतातील भाषांची निश्चित संख्या उपलब्ध होत नाही. जगामध्ये आज सुमारे साडेसहा हजार भाषा बोलल्या जातात. विज्ञान तंत्रज्ञानाच्या या युगात जग हे एक खेडे बनत चाललेले

आहे. त्यामुळे जगातील अनेक भिन्न भाषिक एकमेकांच्या अगदी जवळ आलेले आहेत, त्यामुळे भिन्न भाषिक संपर्क प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढत चाललेला आहे. भिन्न भाषिक संपर्काची प्रक्रिया भारतासारख्या देशात तर प्रचंड मोठ्या प्रमाणावर होताना दिसते. भाषावार प्रांतरचनेमुळे सीमावर्ती भागांमध्ये शेजारी असणाऱ्या प्रांतातील अनेक भाषिकांशी नेहमीच संपर्क होत असतो. त्यामुळे त्यांच्यातील भाषिक आदान प्रदान अटळ ठरते. महाराष्ट्राच्या प्रत्येक शहरात मारवाडी लोकांची दुकाने दिसतात. या दुकानात मराठी माणूस गेला तर ते मराठीतून बोलण्याचा प्रयत्न करतात. पण आपल्या सहकाऱ्याशी मात्र ते त्यांच्या बोलीभाषेतून बोलतात. व्यापारासाठी मराठी भाषा ते आत्मसात करतात. हा परभाषा संपर्क आहे.

आज भारतातील मुंबई, दिल्ली, चेन्नई, कोलकत्ता यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये भारतातील सर्वच प्रांतातील नागरिक नोकरी धंद्याच्या निमित्ताने शिक्षणाच्या निमित्ताने एकत्र आलेले आहेत. मग या भिन्न मातृभाषा असणाऱ्या लोकांमध्ये परस्पर संपर्क आल्यानंतर भाषिक आदान प्रदान होत असते. एखादा कन्नड भाषिक मराठी समाजाच्या संपर्कात आल्यानंतर तो ज्या पद्धतीने मराठी बोलण्याचा प्रयत्न करतो ती त्यांची मराठी भाषा आणि मूळ मराठी भाषिकांची मराठी भाषा यामध्ये बरीच तफावत असल्याचे दिसते. कन्नड भाषिक आपल्या कन्नड भाषेचा हेल ठेवून मराठी भाषा बोलतो. अनेक कन्नड शब्द बोलण्याच्या ओघात त्यांच्याकडून मराठीत मिसळले जातात. तीच प्रक्रिया मराठी भाषिक कन्नड भाषिकाच्या संपर्कात आल्यानंतर कन्नड शिकताना अथवा बोलताना घडत असते.

**३. परभाषा संपर्क**

विविध कारणांमुळे परकीयांच्या भाषेशी होणारा संपर्क किवा राजकीय सांस्कृतिक आक्रमणांमुळे येणारा भाषा संपर्क. हा परभाषा संपर्क म्हणून पाहता येईल. मराठी भाषेच्या इतिहासाचा आढावा घेताना मराठीवर अरबी-फारसी, उर्दू भाषांचा प्रभाव दिसतो. मुसलमानी राजवट्यांमुळे हा प्रभाव मराठी भाषेवर पडलेला आहे. तर इंग्रजांच्या राजवटीमध्ये इंग्रजांचा प्रभाव मराठीवर पडलेला आहे. या राजवट्यांच्या मराठी प्रदेशावरील आक्रमणामुळे आक्रमण कर्त्यांच्या भाषेशी आलेल्या संपर्कातून परभाषा संपर्क अस्तित्वात येतो.

छत्रपती शिवाजी महाराजांनी तयार करून घेतलेला 'राज्यव्यवहार कोश' परकीय भाषांचा मराठीवर पडलेला प्रभाव दूर करण्यासाठी होता. हा कोश म्हणजे भाषा संपर्क प्रक्रियेचे मध्ययुगीन कालखंडातील ठळक उदाहरण म्हणता येईल. (मोरे (डॉ.) नंदकुमार, समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे)

जगामध्ये आज सुमारे ६५०० भाषा बोलल्या जातात या भाषिकांमध्ये स्वभाषा अभिमान असलेला पाहावयास मिळतो. पूर्वी अनेक देशांमध्ये साम्राज्य विस्ताराची लालसा होती त्यामुळेच नेपोलियन बोनापार्टने फ्रान्सचे साम्राज्य जगभर विस्तार करण्याचा प्रयत्न केला. हिटलर आणि मुसोलिनी यांचेही आपापल्या देशांच्या संबंधाने तेच स्वप्न होते. इंग्रजांच्या साम्राज्यावर तर सूर्य मावळत नव्हता एवढा त्यांच्या साम्राज्याचा विस्तार झाला होता. त्यामुळेच आज इंग्रजी ही जगन्मान्य भाषा झाली, ज्ञानभाषा झालेली आहे.

भारतावरही इंग्रजांनी सुमारे १५० वर्षे राज्य केले त्यातून भारतीय भाषिक आणि इंग्रजी या परभाषेचा भाषिक यांचा संपर्क आला. परस्परांच्या संपर्काने भाषिक आदान प्रदान होऊ लागली. या आदानप्रदानामध्ये जीत-जेते हा राजकीय संदर्भ होता. अनेक भारतीयांनी इंग्रजी ही जेत्यांची / विजय मिळवलेल्या लोकांची भाषा म्हणून ती आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. तर इंग्रजांनी भारतामध्ये राज्यकारभार, व्यापार, धर्मप्रसार करण्यासाठी भारतीय भाषिकांच्या भाषा आत्मसात केल्या. धर्मप्रसाराचे कार्य नजरेसमोर ठेवून ख्रिस्तपुराण, मॅथ्यूचे शुभवर्तमान सारखे ग्रंथ निर्माण केले. ही संपूर्ण प्रक्रिया परभाषा संपर्क या सदरात येते.

इंग्रजांनी भारतावर राज्य करत असताना भारतीय संस्कृतीतील अनेक बाबींचा स्वीकार केला संस्कृतीशी संबंधित अनेक संकल्पनांचा अथवा शब्दांचा स्वीकार केला हळदी-कुंकू, पदर, साडी यांसारखे शब्द इंग्रजी भाषेत स्वीकारले. भारतीयांवर तर इंग्रजीचा इतका प्रभाव पडला की आज व्यवहारांमध्ये वापरत असणाऱ्या अनेक इंग्रजी शब्दांसाठी आपणास मराठी शब्द कोणता हे शोधावे लागते. आणि मराठी शब्दांपेक्षा इंग्रजी शब्दच आपणास सोयीस्कर वाटतात. उदाहरणार्थ, रेल्वे स्टेशन, सिग्नल, आइस्क्रीम, ए.सी. इत्यादी हा परभाषा संपर्काचा परिणाम आहे.

आज दळणवळणाची साधने आणि प्रसारमाध्यमांमुळे संपूर्ण जग अतिशय जवळ आलेले आहे. अनेक मल्टिनॅशनल कंपन्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये प्रवेशित झालेल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक देशातील भाषिकांचा पर भाषिकांशी संपर्क होताना आढळतो. कारण एकाच कंपनीच्या शाखा वेगवेगळ्या देशांमध्ये असतात त्यामुळे कर्मचार्यांच्या बदलीमुळे एका देशातील कर्मचाऱ्याला दुसऱ्या देशात बदली होऊन जावे लागते. तो त्या देशात जात असताना स्वतःसोबत स्वतःची भाषा आणि संस्कृतीचेही वहन करीत असतो. नवीन देशाची भाषा आणि संस्कृती आत्मसात करीत असतो त्यातून भाषिक आदान प्रदान होत असते .

या भाषा संपर्क प्रक्रियेत भाषिक आदान - प्रदान अटळ असते. व्यक्ती बोलीतील संपर्कात प्रतिष्ठित, शिष्टमान्य व्यक्तींच्या बोलण्यातील लकबीचे, उच्चार धाटणीचे निम्नस्तरीय व्यक्तीकडून किंवा प्रभावक्षेत्राखाली येणाऱ्या व्यक्तीकडून अनुकरण होते. राजकीय नेत्यांच्या बोलीचे अनुयायांकडून होणारे अनुकरण हे व्यक्तीबोली संपर्कातील ऋणग्रहणाचे उदाहरण सांगता येईल. शेजार भाषा संपर्कातील आदान- प्रदान नैसर्गिक असते. व्यापार उद्योग आप्त संबंध यामुळे होणाऱ्या संपर्कात दोन भाषिकांत परस्पर आदान - प्रदान प्रक्रिया चालू असते. परभाषा संपर्कात सामान्यत: जेत्यांच्या भाषेचा जितांच्या भाषेवर प्रभाव असतो. त्यामुळे जितांच्या भाषेतून जेत्यांच्या भाषेत ऋणग्रहणाची प्रक्रिया सुरू राहते. सांस्कृतिक व राजकीय दृष्ट्या श्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या गटाच्या भाषांतून निम्नस्तरीय गटातील भाषकांकडून ऋणग्रहण होत असते. या भाषा संपर्क प्रक्रियेचे तपशीलवार अध्ययन समाजभाषाविज्ञानात केले जाते.' (वरखेडे रमेश, समाजभाषाविज्ञान प्रमुख संकल्पना, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. दुसरी आवृत्ती, फेब्रुवारी २००१)

वास्तविक पाहता व्यक्तीबोली संपर्क, शेजारभाषा संपर्क, परभाषा संपर्क या तिन्ही संपर्क प्रक्रिया या परस्परांमध्ये गुंतलेल्या आहेत. यातील व्यक्तीबोली संपर्क ही मुलभूत संपर्क प्रक्रिया आहे. कारण संपर्क कोणताही असो तो कोणत्या तरी व्यक्तीकडूनच साधला जातो. मग त्या व्यक्तीचा आपल्या परिसरातील इतर

भाषिकांशी संपर्क येतो व त्यातून त्या भाषेतील शब्द, वाक्यरचना ती व्यक्ती स्वीकारते त्यातून शेजार भाषा संपर्क निर्माण होतो. दळणवळणाच्या आधुनिक साधनांमुळे जगातील वेगवेगळ्या देशातील नागरिक पर्यटन, व्यापार, शिक्षण, किवा नोकरीनिमित्त दुसऱ्या देशात स्थलांतर करतात तेव्हा त्यांचा त्या देशातील नागरिकांशी संपर्क येतो. हा येणारा संपर्क परभाषिक संपर्क असतो. त्यातून त्या स्थानिक भाषेतील शब्द, वाक्यरचनांची आदान-प्रदान होते. काहीवेळा भारतातील अनेक तरुण इंग्रजी, फ्रेंच, इटालियन सारख्या परभाषा जाणीवपूर्वक शिकून त्या त्या देशात नोकरीनिमित्त जातात तेव्हा त्यांचा त्या देशातील नागरिकांशी संपर्क येतो तेव्हाही परभाषिक संपर्क ही प्रक्रिया घडते.

महाराष्ट्रातील एखादा व्यक्ती गोव्यासारख्या राज्यामध्ये पर्यटनासाठी गेली तर तिला एकाच वेळी व्यक्तीबोली संपर्क, शेजारभाषा संपर्क, परभाषा संपर्क या तिन्ही संपर्क प्रक्रियेतून जावे लागेल. कारण तिचा कोकणी भाषिकांशी संपर्क येणार, गोव्यात अनेक परदेशी पर्यटक येत असल्याने त्याचा परभाषिकांशीही संपर्कही होताना आढळतो. विविध आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांच्या निमित्ताने सुद्धा हे तिन्ही संपर्क एकाच वेळी होताना दिसतात.

### १.४ समारोप

भाषेचा जन्मच मुळी आपल्या भाव-भावना, कल्पना, विचार अभिव्यक्त करण्यासाठी झालेला आहे. अभिव्यक्त होणे ही मानवाची मूलभूत आवश्यकता आहे. ही अभिव्यक्ती दुसऱ्या व कोणत्यातरी व्यक्तीशी संपर्क साधून केली जाते. व्यक्तींच्या समूहात सतत अंतरक्रिया होत असेल तर त्या समूहाचे समाजात रूपांतर होते. समाजात होणाऱ्या संपर्काचे स्वरूपानुसार व्यक्ती बोली संपर्क, शेजार भाषा संपर्क, परभाषा संपर्क अशा प्रकारात वर्गीकरण केले जाते. या तीन प्रकारात जरी वर्गीकरण केले जात असले तरी कोणताही संपर्क हा शेवटी व्यक्तीकडूनच साधला जात असतो. मग त्या व्यक्ती आपापसात कोणत्या भाषेत बोलतात हा भाग नंतर येतो. संप्रेषण साधत असताना वक्त्याचे बोलणे श्रोत्याला समजले की भाषेचे उद्दीष्ट साध्य होत असते. हेच भाषेचे प्रमुख कार्य आहे.

समजात अनेक छोटे छोटे समाजगट निर्माण होत असतात व समाजातील भाषाव्यवहार हा समाजात असणाऱ्या या असंख्य समाजगटांकडून संचालित होत असतो, पार पडत असतो. समाजातील प्रत्येक व्यक्ती एकाच वेळी असंख्य समाजगटांची सभासद असते. या प्रत्येक समाजगटाचे भाषाविश्व वेगळे असते.विशेषतः तरुणांच्या समाजगटांची सांकेतिक भाषा वृद्ध वयोगटातील समाजगटाला समजेलच असे नाही. समाजगटाची एक भाषा असते ती त्या गटातील प्रत्येक व्यक्तिला आकलन होत असते. एक संवादीत्व त्या भाषेत असते. त्या समाजगटाला विशिष्ट भाषेच्या नावाने ओळखले जाते. समाजगटात आपण एकाच गटाचे सदस्य आहोत ही एकीची भावना असते. एकापेक्षा जास्त भाषांचाही वापर समाजगटात होताना दिसतो. त्या समाजगटाला भाषेच्या नावाने नव्हे तर विशिष्ट शहर किवा क्षेत्राच्या नावाने ओळखले जाते. भाषेमध्ये आपापसात आदान प्रदान सुरू असते हे भाषा समृद्धीचे लक्षण आहे. भाषा संपर्कातूनच ही समृद्धी शक्य आहे. परंतु भाषा संपर्कातूनच भाषिक अतिक्रमणाचा धोकही संभवतो. त्यातून भाषाशुद्धीच्या चळवळी उभ्या राहतात.

## १.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नोत्तरे

### १.५ .१ योग्य पर्याय निवडा

१) आपल्या समाजाचे भाषिक वेगळेपण, अस्मिता टिकवण्याच्या व परभाषिक प्रभावांना विरोध करण्याच्या प्रेरणेमुळे कोणती चळवळ या जन्माला येते ?

अ) भाषाशुद्धीची ब) भाषासमृद्धीची क) भाषाभूगोलाची ड) भाषासंपर्काची

२) परकीयांच्या भाषेशी होणारा संपर्क किवा राजकीय सांस्कृतिक आक्रमणांमुळे येणारा भाषा संपर्क हा संपर्काचा कोणता प्रकार आहे ?

अ) माध्यम संपर्क ब) व्यक्ती बोली संपर्क क) शेजार भाषा संपर्क ड) परभाषा संपर्क

३) भाषेच्या सामाजिक दृष्टिकोनातून केलेल्या अभ्यासातून पुढे कोणती स्वतंत्र अभ्यास शाखा निर्माण झाली ?

अ) समाजशास्त्र ब) मानववंशविज्ञान क) समाजभाषाविज्ञान ड) नीतिशास्त्र

४) पुढीलपैकी कोणती संकल्पना अमूर्त आणि गुंतागुंतीची आहे ?

अ) भाषाशास्त्र ब) भाषिक समाज क) सामाजिक गट ड) व्याकरण

५) ज्या समाजात भाषिक प्रयोग आणि भाषा आकलन यात सुसंवादित्व व परस्पर मेळ असतो. त्या समाजाला काय म्हणतात ?

अ) सामाजिक गट ब) भाषिक समूह क) भाषिक गट ड) भाषिक समाज

६) भाषिक समाजाच्या एकात्मतेचे प्रतीक म्हणून कोणत्या विशिष्ट गोष्टीस प्रतिष्ठा असते ?

अ) भाषा किंवा बोलीस ब) व्यक्तीस क) समाजास ड) भाषिक प्रयोगास

७) विशिष्ट क्षेत्रातील लोक परस्पर विनिमयासाठी ज्या भाषा अथवा बोलींचा प्रयोग करतात, त्या सर्वांचा मिळून काय तयार होतो ?

अ) समाज ब) समूह क) साहित्य ड) भाषिक कोश

८) भाषा मिश्रणा मागे कोणती धारणा असते ?

अ) भाषिक प्रतिष्ठेची ब ) भाषिक समूहाची क ) भाषिक प्रयोगाची ड) भाषाशुद्धीची

९) 'भाषेवरून भाषिक समाज ठरविणे व समाजावरून भाषा ठरविणे यात गोलगोल फिरण्याचा दोष आहे.' हे मत कोणाचे ?

अ) रमेश धोंगडे ब) रमेश वरखेडे क) अश्विनी धोंगडे ड) नंदकुमार मोरे

१०) 'भाषानिरपेक्ष अनुभव संभवत नाही' हे मत कोणी मांडले?

अ) फेर्दिनां द सोस्यूर   ब) रमेश वरखेडे   क) मॅलिनोवस्की   ड) एडवर्ड सपीर

**उत्तरे –**

१) – अ) भाषाशुद्धीची   २) – ड) परभाषा संपर्क   ३) – क) समाजभाषाविज्ञान

४) – ब) भाषिक समाज   ५) – ड) भाषिक समाज   ६) – अ) भाषा किंवा बोलीस

७) – ड) भाषिक कोश   ८) – अ) भाषिक प्रतिष्ठेची   ९) – अ) रमेश धोंगडे

१०) – ड) एडवर्ड सपीर

### १.५.२ दीर्घोत्तरी प्रश्न

१. भाषिक समाज ही संकल्पना स्पष्ट करा.

२. भाषा संपर्काची विविधता स्पष्ट करा.

### १.५.३ लघुत्तरी प्रश्न

१. सामाजिक गट ही संकल्पना स्पष्ट करा.

२. भाषिक समाज अस्तित्वात येण्याची तत्त्वे स्पष्ट करा.

## १.६ अधिक वाचन


१. समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी : डॉ. नंदकुमार मोरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

२. सामाजिक भाषाविज्ञान : डॉ. रमेश धोंगडे दिलीपराज, प्रकाशन प्रायोगिक लिमिटेड, पुणे

३. समाजभाषाविज्ञान प्रमुख संकल्पना : रमेश वरखेडे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.


## १.७ पूरक वाचन


१. सामाजिक भाषाविज्ञान कक्षा आणि अभ्यास : जयश्री पाटणकर, ससंदर्भ प्रकाशन, नाशिक.

२. आधुनिक भाषाविज्ञान सिद्धांत आणि उपयोजन : मिलिंद मालशे, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई.

३. मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान : डॉ. महेंद्र कदम, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.


●●●

घटक–२

# भाषानियोजन आणि भाषाशिक्षण

## २.१. उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्हाला,

- या घटकाच्या अभ्यासानंतर भाषा नियोजन हा समाजभाषा विज्ञानाचा एक महत्वपूर्ण विषय आहे, हे लक्षात येईल.
- भारत हा द्वैभाषक व बहुभाषिक देश आहे येथे भाषा नियोजन आवश्यक का आहे हे लक्षात येईल.
- स्वभाषेतून शिक्षण घेणे का गरजेचे आहे हे लक्षात येईले
- स्वभाषा विकास कशाप्रकारे करता येईल यांची ओळख होईल तसेच भाषा जतन करण्यासाठी आपला वाटा उचलता येईल.
- तसेच आदिवासी व इतर भाषा मागास समाजघटकांचे भाषाशिक्षण व त्यात निर्माण होणाऱ्या अडचणी याचा परिचय होईल.

## २.२ प्रास्ताविक

भाषा म्हणजे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग बनले आहे. माणसाची व्याख्या 'बोलणारा प्राणी' अशीच करणे योग्य आहे. मानवाच्या जीवन विकासक्रमात भाषेचे महत्व अनन्यसाधारण आहे. मानवाला भाषा समाजाच्या संदर्भात शिकावी लागते. इतरांनी बोललेले ऐकून आपण भाषा शिकतो मूल ज्या समाजात वाढतो त्या समाजाची भाषा शिकते. समाजातील वेगवेगळे स्तर, वर्ग याचा परिणाम भाषेवर होत असतो. भारतीय समाज व बहुधर्मीय, बहुजातीय, बहुसांस्कृतिक असा समाज आहे. भारतासारख्या देशात बहुभाषिकता हा वैशिष्ट्याचा आणि संघर्षाचाही मुद्दा ठरतो. भारतातील प्रत्येक राज्याची आपली अशी वेगळी प्रमाणित राज्यभाषाही आहे. या भाषा त्या त्या प्रदेशाचे प्रतिनिधित्व करतात त्यामुळे त्या त्या भाषेचा विकास, तिचा वापर वाढविणे, विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे, बोलीभाषेचे जतन करणे या गोष्टी महत्वाच्या ठरतात. तसेच स्वभाषेतून शिक्षण घेणे गरजेचे आहे. कारण स्वभाषेमुळे माणूस अनेक शतकाच्या इतिहासाला जोडलेला असतो. जागतिकीकरणाने एकूणच जगाचे अर्थकारण, समाजकारण, राजकारण इ. क्षेत्रांत बरीच उलथापालथ झाली. तंत्रज्ञानाचे नवेनवे मार्ग उपलब्ध झाले त्यामुळे सामाजिक व सांस्कृतिक वातावरणात मोठे बदल घडले. त्यामुळे भाषिक प्रश्नांची तीव्रता आणि गुंतागुंतही वाढली. इंग्रजी भाषा आपले हातपाय पसरू लागली. इंग्रजीच्या प्रभावाखाली अनेक भाषा आल्या. अनेक भाषा अस्तगंत होत चाललेल्या असताना भाषांचे जतन आणि संवर्धन एक जटील समस्या निर्माण झाली. या घटकांत आपण भाषांचे जतन कसे करता येईल हे अभ्यासणार आहोत.

● **विषय विवेचन**

पृथ्वीवरील भाषिक विविधता ज्या वेगाने नष्ट होत आहे. ती पाहता पुढच्या शतकात फार थोड्या भाषा शिल्लक राहातील आता जग इतके जवळ आले आहे की, संपर्काची एकच भाषा स्वीकारण्याकडे लोकांचा कल वाढतो आहे. कोणतीही भाषा स्वयंभू नसते तिचे जगणे-मरणे, वाढणे हे सर्वस्वी संबंधित भाषक समाजावर अवलंबून असते. या घटकात आपण भाषानियोजन या घटकाद्वारे भाषिक समस्या सोडविण्यासाठी होणाऱ्या विविध प्रयत्नाचा अभ्यास करणार आहोत. शिक्षणाची भाषिक बाजू ही भाषा नियोजनातील महत्त्वाची गोष्ट असते भाषा शिक्षणाचे माध्यम स्वभाषाच का असावे? स्वभाषा शिक्षण याचे विवेचन तसेच बहुभाषिकता त्यामुळे येणाऱ्या अडचणी व फायदेही अभ्यासणार आहोत. तसेच आदिवासी व इतर मागास समाजघटकांचे भाषा शिक्षण व निर्माण होणाऱ्या अडचणीवर उपाय करण्याचे मार्ग पाहणार आहोत.

**२.३.१ बहुभाषिकता**

एकाहून अधिक भाषांचे उपयोजन असे संदर्भानुसार व प्रसंगपरत्वे होत असते या संज्ञापन व्यवहाराला 'बहुभाषिकता' असे म्हणतात. भारतात त्रिभाषा सुत्राचा वापर होतो. प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून उच्चशिक्षण हिंदी/इंग्रजीतून समाजातील वेगवेगळे स्तर, वर्ग यांचा परिणाम भाषेवरही होत असतो. किंबहुना सामाजिक स्तर भाषेच्या वारातही प्रतिबिंबीत होतात. हे भारतीय समाजाच्या बाबतीत अधिक प्रकर्षाने पहावयास मिळते कारण भारतीय समाज हा बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक असा समाज आहे. शिवाय तो बहुभाषिकही आहे. समाजात भाषा अतिशय विविध पातळ्यांवर वापरली जाते आणि भारतासारख्या बहुधर्मीय आणि बहुजातीय देशात तर ती अधिक वैविध्याने वापरली जाते. भारताचे बहुभाषिकता हे महत्वाचे वैशिष्ट्ये आहे. एकाच व्यक्तीला दोन किंवा अधिक भाषा सारख्याच कार्यक्षमतेने वापरता आल्या की दोन्ही भाषांमधून मुक्त संचाराची प्रक्रिया आपोआप व्हायला लागते. मुंबई/पुणे या सारख्या शहरामध्ये विविध जाती, धर्माचे व भाषेचे लोक एकत्र राहतात. त्यामुळे एकमेकांच्या भाषेचे आदान प्रदान सहज होते व विविध भाषा एखादी व्यक्ती आत्मसात करते. केरळी लोक जेव्हा महाराष्ट्रात येतात तेव्हा त्यांना नीट हिंदी भाषाही येत नाही. मराठी शिकल्याशिवाय पर्याय राहत नाही. संवादाची भाषा त्यांना आत्मसात करावी लागते. घरी आपल्या नातेवाईकाशी हे लोक मातृभाषेतून बोलतात. व्यवहारात तिथली भाषा बोलावी लागते. त्यांच्या मुलांना शाळेत संस्कृत, इंग्रजी, हिंदी, मराठी भाषांचा अभ्यास करावा लागतो व ती बहुभाषिक होतात. मातृभाषे खेरीज अन्य भाषेचा अभ्यास करून जी भाषा शिकली जाते ती खूप कष्ट करुन मिळवलेली असते. त्यामुळे मातृभाषा व इतर भाषा त्याच्या संपादनात अंतर पडते.

कॅनडा सारख्या द्वैभाषिक राष्ट्रात द्वैभाषिक शाळा (Bilingual Schools) असून फ्रेंच व इंग्रजी या दोन्ही भाषांत समान प्रभूत्व असावे यासाठी द्वैभाषिक माध्यमाचा अवलंब केलेला दिसून येतो. समाजातील द्वैभाषिकतेचा अनेक अंगानी अभ्यास केला जातो. उदा. सामाजिक स्तरभेद आणि द्वैभाषिक उपयोजन यातील परस्पर संबंधाचे स्वरुप सामान्यतः निम्नस्तरीय लोक एकभाषिक असतात परंतु उच्चवर्गीय, अभिजन हे द्विभाषीक बऱ्याचदा बहुभाषिक असलेल्या व्यक्तीला बोलता सगळ्या भाषा येतात पण लिहिता येईलच असे नाही. गरजेपुरती ती बोलता येते. एखाद्या व्यक्तीच्या किंवा समाजाच्या संज्ञापन व्यवहारात तीन किंवा त्याहून अधिक भाषांचा उपयोग

केला जातो तेव्हा अशा संज्ञापन व्यवहाराला बहुभाषांकरता (Multilingualism) म्हणतात.

बहुभाषिक व्यक्तीचे स्वरुप पुढील प्रमाणे :

१. एक भाषा उत्तमप्रकारे समजते बोलता येते.

२. एकाच भाषेत उत्तमप्रकारे लिहीता येते.

३. लघुक्षेत्रानुसार विशिष्ट भाषेचा उपयोग करण्याचे संकेत ठरलेले असतात. घरात एक भाषा, व्यवसायात दुसरी भाषा, बाजारात तिसरी भाषा.

४. कोणत्या क्षेत्रात कोणती भाषा वापरायची यांचे संकेत ठरलेले असतात. उदा. ज्ञान-विज्ञानाची भाषा, धर्माची भाषा, व्यक्तिगत संभाषणाची भाषा.

या भाषांच्या उच्चारावर त्याच्या मातृभाषेच्या वैशिष्ट्यपूर्ण प्रभाव असला तरी या सर्व भाषांवर त्याने प्रभूत्व मिळवलेले असते. या भाषांचा या व्यक्तीकडून वापर प्रसंग, संदर्भ पाहून होत असलेला दिसतो. आपल्या कडील समाज बहुभाषिक असला तरी आणि अनेक माणसे व्यवहारापुरतीच २-३ भाषा वापरु शकत असली तरी माणसे भाषेकडे आपल्या आर्थिक व सामाजिक उन्नतीचे साधन म्हणून बघतात अमकी भाषा शिकलो तर उच्च शिक्षण घेता येईल चांगली नोकरी मिळेल व एकूण सामाजिक प्रतिष्ठा मिळेल असे त्यांना वाटते. आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी त्यांनी इतर भाषा शिकाव्यात गैर काहीच नाही, परंतु मातृभाषेचा त्याग करु नये. मातृभाषेमुळे माणूस अनेक शतकाच्या इतिहासाला जोडलेला असतो. केवळ ३-४ भाषा बोलता येणे पुरेसे नाही तर समाजाची गरज म्हणून बहुभाषिक चौफेर कौशल्ये श्रवण, भाषण, वाचन, लेखन-संपादन करुन वैचारिक देवाणघेवाणीसाठी वापरणे ही काळाची गरज आहे.

### २.३.२ समाजाचे भाषिक प्रश्न

भारतावर अनेक आक्रमणे झाली त्याचा परिणाम भाषेवर दिसून येतो. इतर भारतीय भाषांबरोबर मराठी भाषेचा उगमही खुप जुना आहे. आजचा प्रश्न आहे तो म्हणजे तिच्या भवितव्याबद्दल व्यक्त होणारी चिंता कारण मराठी ज्ञानभाषा होण्याऐवजी इंग्रजी होत आहे. मराठी शाळा बंद पडण्याचे प्रमाण वाढत आहे. दैनंदिन जीवनात मराठीचा वापर चालू आहे. परंतु मूळ मराठी माध्यमातून शिकले तर मागे पडेल ही भिती पालकांच्यात वाढत आहे. तसेच भारत हा अनेक भाषा असलेला देश आहे. ही बहुभाषिकता भारताच्या सांस्कृतिक बहुविधतेचा भाग आहे. त्यामुळे भाषिक प्रश्नांचा सामना करावा लागतो कारण बहुभाषिकतेसाठी द्यावी लागणारी किंमत अनेकविध आहे. त्यामुळे नोकऱ्या, शिक्षणाच्या सोयी, तांत्रिक शोध इत्यादीच्या बाबतीत देशभर खुलेपणाने अभिसरण होऊ शकत नाही. भारतातील अनेक प्रदेश शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आहेत. बहुभाषिकतेमुळे हे मागासलेपण दूर करणे जिकीरीचे होते आहे.

- **समाजाचे भाषिक प्रश्न**

जग जवळ येत आहे तशी भाषिक प्रश्नांची तीव्रता आणि गुंतागुंत वाढत आहे. इंग्रजी भाषा ही संपर्काची

भाषा म्हणून आपले हातपाय पसरु लागली आहे. या सगळ्याचा परिणाम भाषेवर होऊ लागला आहे.

इंग्रजीच्या वाढत्या प्रभावामुळे अनेक भाषा अस्तगत होत चालल्या आहेत. इंग्रजी हे ज्ञानो, शिक्षणाचे, संवादाचे, व्यवहाराचे आणि सर्वच प्रकारच्या दळणवळणाचे माध्यम बनत असताना अस्तंगत होत चाललेल्या भाषांचे जतन आणि संवर्धन एक जटील समस्या बनली आहे. भाषिक प्रश्नापैकी एक प्रश्न म्हणजे भाषिक ध्रुवीकरण होय. एका भाषिक प्रदेशात दोन भाषिक समूह तयार होणे आणि ते दोन टोकांच्या भाषिक भूमिकांचे असणे म्हणजे भाषिक ध्रुवीकरण होय यात एक भाषेला (परकीय) अवाजवी महत्व मिळते व स्वभाषा मागे पडते. त्यामुळे भाविक विकासाला खिळ बसते.

जागतिकीकरणामुळे निमार्ण झालेल्या परिस्थितीत लोक स्वतःहून निजभाषेला दूर सारुन परकीय भाषेला स्विकारत आहेत. हा भाषासंहार एक चिंतेचा विषय आहे. बहुतेक भाषिक समूहाला आपली भाषा मृत होते आहे हे शेवटपर्यंत लक्षात येत नाही. त्यामुळे भाषा वाचविण्याची वेळ निघून जाते. भाषा अचानक मृतप्राय होत नाहीत त्या सामूहिक उपक्षेने मरतात.

जेष्ठ अभ्यासक डॉ. प्रमोद तेलगिरी यांच्या मते, 'राष्ट्र-राज्य संकल्पनेचा अभाव आणि बहुभाषकता यामुळे भारतातील सर्वच भाषांचे नुकसानही झाले असले तरी आपल्या तुलनेत कमी भाषेचा अधिक क्षेत्रांमध्ये वापर होईल तितकी तिची अधिक प्रगती होते. त्यामुळे इंग्रजी समृद्ध होते आहे व स्वभाषा खंगत आहे.'

मराठीतील कोषनिर्मिती कुंठीतावस्थेत आहे. इंग्रजी भाषा आली नाहीतर लोक आपल्याला गांवढळ समजतील ह्या भितीत लोक स्वभाषा बोलायचे टाळतात.

### २.३.३. भाषिक सवयी

भाषा आणि समाज यांत आंतरिक सुसंवाद असतो त्यामुळे केवळ उच्चार धारणीवरुनच बोलणारा मध्यमवर्गीय आहे की कनिष्ठ वर्गीय, व्यापारी की अधिकारी, सुशिक्षीत की अशिक्षीत, साताऱ्यातला की कोल्हापूरचा, कोकणातला की खानदेशातला हे ओळखता येते. हेल काढून बोलणारा 'ळ' ऐवजी 'य' किंवा 'ड' कमळ-कमय, बाळ-बाय उच्चारणारा, चहा पिऊन टाकला, सामान घेऊन घेतले अशी संयुक्त-क्रियापदे वापरणारा माणूस खानदेशी आहे हे चटकन लक्षात येते. तर अहिराणी मराठी जरी कानाला सोपी वाटली तरी त्या भाषेतून लिहणे कठीण आहे. मुंबईतील मराठीवर इतर भाषांचा प्रभाव पडलेला दिसतो. संमिश्र मराठी, कपाटमध्ये कागद नीट ठेवले पुस्तकामध्ये कागद नीट ठेवले. अहिराणी, नागपुरी बोलीत आजी, आजोबा हे शब्द नाहीत बय, बा, बाबाजी, खानदेशात 'ळ' च्या बद्दल 'य' येतो तसेच करुन राहीलचे, येऊन राहीलसे असे हिंन्दी प्रभावाचे संयुक्त क्रियादर्शक शब्द ही या बोलीत आढळतात. व्यक्ती बोलायला लागली की तिच्या बोलण्याच्या सवयीवरुन आपण तात्काळ तिचा स्तर ओळखतो, प्रांत ओळखतो. शिक्षीत अशिक्षीत या बद्दल अंदाज घेत अगदी घरची आर्थिक परिस्थिती बोलण्याच्या सवयी वरुन लक्षात येते. थोडक्यात भाषिक सवयी व्यक्तीची ओळख करुन देते म्हटल्यास वावगे ठरणार नाही. स्त्रियांचा आवाज जात्याच कोमल असतो. मृद् व्यंजनाचे उच्चार फार, अनुनासिके फार 'दुष्ट' हा शब्द साधाच पण ९० टक्के स्त्रीया 'द्रुष्ट' असा उल्लेख करतात. काही वेळेस त्याच्या काही सवयीमुळे

वर्णउच्चारात फरक पडतो. सामाजिक निर्बंध, औचित्य राखावे लागणे, भावनावश होण्याची सवय त्यामुळे शब्दाचे अर्थ बदलतात. तसेच भाषेच्या बाबतीतही त्या अतिशय दक्ष राहतात. चूल-मूल हेच तिचे कार्यक्षेत्र होते खूप काळ जावा लागला पुरुषांच्या बरोबरीने काम करायला सुरुवात करायला. अनेक नोकरी व्यवसायातील महत्वाच्या जागा पुरुषच सांभाळत होते. त्यामुळे पुरुषी भाषाच समाजात वापरली जात होती. आता हे चित्र बदलते आहे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या स्त्री स्वतंत्र झाली आहे. त्यामुळे तिच्या भाषिक सवयी बदलत आहेत. युवा, विद्यार्थ्यांच्या भाषिक सवयी बदल डॉ. जयश्री पाटणकर पुढील विशेष नोंदवितात.

१. समानअर्थी शब्दांचा विपुल भरणा चांगल्या सुंदर मुलीसाठी पीस, कटपीस, चवळीची शेंग, हिरॉईन, ॲटम इत्यादी.

२. उच्चारानुसारच शब्दांचे लेखन - बिडू, येडछाप, कोरपड, जाताणा (जाताना).

३. आघात युक्त बोलण्याची पद्धती दिसते. शब्दातील अनुस्वारावर वाजवी पेक्षा अधिक जोर देणे, जोर येऊन बोलण्याची पद्धती उदा. डुंबर - जक्कास.

४. लेखनात अशुद्धता उदा. मराठि, ज्वारि, दाळिंब, गित.

५. परकीय संकल्पनाबरोबर शब्दांचे आदान उदा. हॅपी दिवाळी, फास्ट लाईफ.

६. मिश्र भाषा उदा. फॉर्ममध्ये येणे, लाईन मारणे इ.

७. भावनांची गुप्तता राखण्यासाठी अपरिचीत शब्दांचा वापर केला जातो. उदा. छप्पनछुरी, नेपची, रापचिक.

८. भाषेच्या वापरात समकालीन समाजमनाचे सामाजिक संदर्भाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. विद्यार्थ्यांना अनेक चुकीच्या भाषिक सवयी आहेत. भाषिक वापरात वाक्यरचना विषयक अज्ञान व ढिलाईमुळे अनेक प्रमाद घडताना दिसतात. हिंदी व इंग्रजी च्या वाढत्या संपर्कामुळे भाषिक सवयी बदलत आहेत.

### २.३.४. शब्दसंग्रह

मराठी समाजाप्रमाणेच मराठीच्या शब्दसंग्रहाची जडणघडण संमिश्र स्वरुपाची आहे. प्रत्येक भाषांचा निरनिराळ्या भाषेशी निरनिराळ्या कारणांनी संबंध येतो. त्यामुळे भाषेच्या शब्दभांडारात सतत भर पडत असते. मराठीच्या उद्गमापासून तिचा अन्य भाषांशी संबंध आहे. कन्नड सारख्या द्रविडभाषा, फारशी, अरबी, तुर्की ई. मुसलमानी समाजाच्या भाषा आणि पोर्तुगीज इ. पाश्चात्य भाषा यामुळे मराठीच्या शब्दसंग्रहामध्ये वेळोवेळी भर पडत गेली. काळाच्या ओघात काही शब्द मागे पडतात. तर नवीन सामाजिक व राजकीय स्थित्यंतरामुळे नवे शब्द, स्विकृत होणे हा प्रकार सातत्याने चालत राहील्याने भाषेचा शब्द संग्रह कायम स्वरुपाचा नसतो. संस्कृत भाषेतून न सापडणारे किंवा संस्कृतातून किंवा द्रविड भाषेतून न येणारे असे जे शब्द त्यांना देशी नाव मिळाले आहे. 'देशी' शब्द हा मराठीचा सर्वात प्राचीन वारसा म्हणता येईल. हेमचंद्र याने 'देशीनाममाला' या ग्रंथात देशी शब्दांचे

एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात अनेक द्रविडी, फारशी अशा शब्दांनाही स्थान मिळाले असा आरोप घेतला गेला. काही देशी शब्द उदा. भोसरी, कचरा, चिखल इत्यादी.

संस्कृत शब्दसंग्रहाचा समृद्ध वारसा मराठीने अभिमानाने स्विकारलेला दिसतो. मराठी भाषेत १२ व्या शतकापासून ग्रंथरचना होण्यास प्रारंभ झाला. या प्रारंभकाळात संस्कृतीच्या तत्सम शब्दांना ओहोटी लागून तद्भाव शब्दांनी मोठ्या प्रमाणावर भाषेमध्ये स्थान मिळविले. याच काळात संस्कृत शब्दांनी मोठ्या प्रमाणावर भाषेमणे स्थान मिळविले याच काळात संस्कृत शब्दांच्या पुनरुज्जीवनाची एक लाट निर्माण झाली. शिवाजी महाराजांनी फारशी शब्दांचा अतिरेकी प्रसाराला पायबंद घालण्यासाठी राज्यव्यवहार कोश निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापने नंतरमराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा म्हणून स्विकारली. 'जग एक खेडे' या संकल्पनेमुळे भाषेमध्ये नवनवीन शब्दांची भर पडत आहे. तंत्रज्ञान, दळणवळण यामुळे एक भाषिक गतिमानता प्राप्त झाली आहे. सामाजिक, राजकीय, धार्मिक, शिक्षण, तत्वज्ञान यामुळे भाषेची उलथापालथ होत आहे. संगणक, मोबाईल यामुळे संमिश्र शब्द वाढत आहेत. मराठी शब्दसंग्रहाचा विचार करता १८३१ मधील मोलस्वर्थ मराठी इंग्रजी शब्दकोशात चाळीस हजार मराठी शब्द होते. १८५८ मध्ये त्यांची संख्या साठ हजार झाली. महाराष्ट्र शब्द कोशात मराठी शब्दांची संख्या एक लाख बारा हजार एकोणतीस इतकी आहे. मराठीतील शब्दसंख्या वाढत चालली आहे हे निश्चित.

स्वराज्यानंतर फारशीचा प्रभाव कमी झाला इ.स. १७२२ मध्ये लिहलेल्या पत्रातील मराठी शब्दाचे प्रमाण शेकडा ९३ पर्यंत वाढले फारशी शब्दाचे प्रमाण उत्तर काळात कमी होऊन संस्कृत शब्दाचा वापर उत्साहाने सुरु झालेला असला तरी शेकडो फारशी शब्द राज्यव्यवहारा बरोबर सरकारमान्य व्यवहारातही शिरुन कायमचे स्थिर झाले. उदा. अमंलदार, कारकून, मामलेदार, वकील, अर्ज, जमाखर्च, दिवाळखोर, गुन्हेगार, फिर्याद इत्यादी.

१५१० मध्ये पोर्तुगिजांनी गोवा जिंकून घेतले आणि जवळजवळ ४५० वर्ष त्याच्या तब्यात हा प्रदेश राहीला. साहजिकच पोर्तुगीज शब्दाचा शिरकाव मराठीत झाला. उदा. अननस, साबुदाणा, इस्त्री, नाताळ, पिंप, तिजोरी इत्यादी. पाश्चात्य भाषेपैकी मराठी भाषेवर बहिरंगावर आणि अंतरंगावर देखील इंग्रजी भाषेच्या प्रभावाने अतिशय व्यापक स्वरुपाचे परिणाम घडून आले व इंग्रजी शब्दांचा वापर नित्य व्यवहारात बेसुमार वाढला.

### २.३.५ भाषेचे सामाजिक स्थान

मानव हा समाजात राहणारा प्राणी आहे. जीवनामध्ये अनेक गोष्टीसाठी तो इतरांवर अवलंबून राहातो. स्वतःच्या सर्व गरजा तो पूर्ण करु शकत नाही. त्यासाठी त्याला इतरावर अवलंबून राहावे लागते. एकत्र राहाणे ही मानवाची मूलभूतप्रवृत्तीच आहे. त्यामुळेच समाजाचे अस्तित्व निर्माण होते. समाजाच्या निर्मितीसाठी भाषा सहाय्य करते समाजव्यवहार मुख्यतः भाषेमुळेच शक्य होतो. समाजामध्ये अनेक बाबीसाठी व्यक्त व्हावे लागते. जीवन संक्रमणासाठी सर्वमान्य पद्धती समजावून घ्यावी लागते. एकत्र राहाणे ही मानवाची मूलभूतप्रवृत्ती आहे. त्यामुळेच समाजाचे अस्तित्व निर्माण होते. समाजाच्या निर्मितीसाठी भाषा सहाय्य करते. समाजव्यवहार मुख्यतः भाषेमुळे शक्य होतो समाजामध्ये अनेक बाबीसाठी व्यक्त व्हावे लागते. जीवन संक्रमणासाठी सर्वमान्य पिढीकडून शिकाव्या

लागतात. विचार, भावनांची देवाणघेवाण सतत सुरु असते. आपण मिळविलेली ज्ञानाचे संचित पुढील पिढीकडे संक्रमित करावयाचे असते. ही सर्व व्यवहार भाषेच्या माध्यमातून चाललेला असतो. त्यामुळे भाषा ही समाजव्यवहाराचे सर्वश्रेष्ठ साधन आहे.

समाजीकरण या प्रक्रियेमध्ये प्रत्येक व्यक्तीवर होणारा भाषा हा एक संस्कार आहे. म्हणूनच तो इतर प्राण्यांपेक्षा वेगळा ठरतो. भाषा मानवी जीवनामध्ये अभिव्यक्तीचे महत्वपूर्ण कार्य करते. दैनंदिन गरजांची पूर्तता समाजाशिवाय होऊ शकत नाही. त्यामुळे मानवाचे सामाजिक जीवन हे अपरिहार्य असेच आहे. अशावेळी भाषाच मदतीला धावून येते व्यक्तीला सतत व्यक्त होण्याची गरज पडते. भाषा हे साधन विचार अभिव्यक्तीसाठी सर्वात महत्त्वपूर्ण आणि प्रभावी आहे. भाषा ही दैवी देणगी किंवा निसर्गाची किमया नाही ती मानवाला अर्जित करावी लागते. भाषा शिकणे ही सहज प्रेरणा आहे. ती समाजाची निर्मिती आहे. ती समाजामध्ये राहूनच शिकावी लागते. बदलते समाजजीवन, नागरीकरण, औद्योगिकीकरण, नवे तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमाचा वाढता प्रभाव अशा असंख्य कारणामुळे समाजजीवन बदलते आहे आणि भाषेतही परिवर्तन होत आहे.

भाषा ही व्यक्तीची अस्मिता सिद्ध करणारी बाब आहे. माणसाचे अस्सलपण, ज्ञानीपण, स्वतंत्र अस्तित्व व त्याला समाजात प्रतिष्ठीत करणारी बाब आहे. भाषा हे समाजाचे विचारविनिमयाचे साधन असल्यामुळे भाषेचे अस्तित्व समाजाच्या अस्तित्वावर अवलंबून असते हे उघड आहे. भाषेची घडण व स्वरुप या गोष्टी समाजाच्या घडण आणि स्वरुपाने प्रभावित झालेल्या असतात. भाषा हा समाजाचाच अभ्यास असतो. गतिशिल समाजाबरोबर भाषेतही परिवर्तन होत असते. "language can be said to be a condition of culture" अशी लेव्हीस स्ट्राऊस या मानववंश विज्ञानाच्या अभ्यासकाने संस्कृतीची व्याख्या केली आहे. भाषेशिवाय संस्कृती अस्तित्वात येऊ शकत नाही. भाषा ही मुलतः एक सामाजिक प्रक्रिया असल्यामुळे माणसाच्या सांस्कृतिक इतिहासातील स्थित्यंतराचा आलेख भाषिक अध्ययनातून मांडता येतो. भाषिक सवयीतून त्याला समाजाची घडण, त्याची सामाजिक पार्श्वभूमी लक्षात येते. भाषा आणि समाज यातील परस्परसंबंध अतिशय घनिष्ठ असतात. त्यामुळे बोलणाऱ्या व्यक्तीच्या भाषेतून समाज प्रकट होतो.

ब्रॉझिल बर्नस्टीन या भाषावैज्ञानिकाने भाषेची प्रतिकात्मक व्यवस्था आणि समाजाची घडण यातील आंतरसंबंधाचा अभ्यास केला व सामाजिकीकरणाचे चार स्त्रोत सांगितले १. कुटुंब २. समवस्यकांचा परिवार ३. शाळा ४. व्यवसाय क्षेत्र सामाजिकरणाच्या या प्रक्रियेत व्यक्ती भाषा शिकत असते. भाषा ही अनेक भाषिक संकेताचा समुच्चय असतो आणि हे संकेत नेहमी संदर्भसापेक्ष असतात. त्यामुळे कोणत्या वेळी कोणत्या शब्दाचा प्रयोग करावा हे सामाजिक सांस्कृतिक संदर्भाची इरत असते. त्यामुळे भाषा ही समाजव्यवहाराचे सर्वश्रेष्ठ साधन आहे.

### २.३.६ भाषा जतन

भाषा टिकवून ठेवणे, तिचा वापर वाढविणे, तिच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे, दैनंदिन वापरातून कालबाह्य झालेल्या अनेक शब्दांचे पुनरुज्जीवन करणे, अधिक व्यापक अर्थअभिव्यक्तीसाठी नवे शब्द

निर्माण करणे, जुन्या शब्दांना नवा अर्थ देणे अशा अनेक बाबी भाषा जतनत्वाचा भाग आहे. महाराष्ट्र शासनाने १९६१ साली स्थापन केलेले 'भाषा सल्लागार मंडळ' हा भाषाजतनासाठी शासकीय पातळीवरचा प्रयत्न आहे. भाषेचे अस्त्वि टिकविणे, तिचा विकास करणे या गोष्टी शासनामार्फत सुरु ठेवल्या तर या प्रयत्नांना व्यापकत्व लाभते. या बाबतीतले गांभीर्य मराठी भाषेच्या बाबतीत आढळत नाही. जागतिकरणाच्या रेट्यामुळे अनेक स्थानिक बोली नष्ट होत आहेत. इंग्रजी, हिंदी भाषेच्या भारतातील सर्व भाषांवर प्रभाव दिवसेंदिवस वाढतो आहे. या दोन्ही भाषा लोक जाणीवपूर्वक आत्मसात करीत आहेत. मराठी भाषेचा विचार केला तर दलित साहित्य, ग्रामीण साहीत्य या साहित्यातून बोलीभाषेचा जाणीवपूर्वक केलेला वापर हा भाषा जतनाचाच एक प्रकार आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ऐतिहासिक, पौराणिक कादंबरीत त्याकाळातले शब्द वापरले जातात. जुने, व्यवहारातून हद्दपार झालेल्या शब्दांना पुन्हा वापरण्यात येते. भाषा जतनाच्या दृष्टीने ही महत्वाची गोष्ट आहे. कारण, ऐतिहासिक, पौराणिक कथाभागांवर लेखन करताना तत्कालिन काळखंडातील भाषेचा आधार घ्यावा लागतो. तारा वनारसे यांच्या 'श्यामिनी' या रामायणातील कथा भागावर आधारे लिहलेल्या कादंबरीमध्ये, अर्ध्य, भ्रतार, आन्हिक, घडा, पर्णकुटी, टापूत, अग्नीदेवता, पाचारण इत्यादी शब्द आलेले आहेत. वरील शब्द फारसे वापरले जात नसले तरी काही शब्द नव्या संदर्भात भाषेत आढळतात. डॉ. कल्याण काळे म्हणतात, 'प्रत्येक पिढीतील तरुणांची भाषा स्वतःचा वेगळेपणा घेऊन मिरवत असते. त्या, त्या कालातील इतर समाजाच्या भाषेपेक्षा ती अधिक ताजी व रसरशीत असते.' ''भाषाजतन'' या पारिभाषिक शब्दांचे विश्लेषण डॉ. रमेश धोंगडे यांनी ''स्थलांतरीत अल्पसंख्य अशा गटाने भोवताली वेगळी भाषा बोलणारा समाज मोठा असला तरी त्याच्याशी फार संपर्क न आल्याने किंवा जाणीवपूर्वक आपली स्वतःची भाषा टिकवून धरणे'' असे दिलेले आहे.

जागतिकरणाच्या रेट्यामुळे अनेक स्थानिक बोली नष्ट होत आहेत. हिंदी, इंग्रजीचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत आहे. स्मार्टफोनचा वापर वाढला आहे. नव्या युगाच्या गरजेसाठी व्यापक संपर्कासाठी आवश्यक असणाऱ्या हिंदी, इंग्रजी भाषा लोक जाणीवपूर्वक शिकू लागले आहेत. परकीय मराठी समोरुन बोलणारा ही मराठीच असतो तथापी संभाषण मात्र इंग्रजी किंवा हिंदीतून केले जाते तसे न करता संवादाचा प्रारंभ मराठी भाषेने केला पाहिजे (किंवा मातृभाषेने). मराठी भाषा, नाटक, पुस्तके, सिनेमा यांचा दर्जाही वाढवला पाहिजे. कोणत्याही राज्याचा नागरिक हा त्या राज्यात वर्षानुवर्षे राहातो. त्याला त्या राज्याची मातृभाषा शिकणे, बोलणे अनिवार्य हवे कारण प्रत्येक राज्याचा कारभार हा त्या राज्याच्या भाषेत चालतो बोलीभाषेचे अस्तित्व या प्रवाहातील मुख्य भाषा जिवीत असल्याचं प्रमाण मानलं जातं, त्यामुळे न्यूनगंड न बाळगता आपली भाषा जास्तीत जास्त बोलणं हे कोणत्याही भाषेच्या संवर्धनाचं पहिलं पाऊल आहे. याशिवाय शाळा, महाविद्यालये व घरात मुलांना दर्जेदार मराठी शिकवण्याकडे कटाक्षाने लक्ष देणंही तितकंच महत्वाचं आहे. संगणकापासून स्मार्टफोन पर्यंत विविध तांत्रिक बाबीमध्ये मराठीचा मोठ्या प्रमाणात शिरकाव होणं. तालुका व जिल्हा पातळीवर न्यायालयामधील कामकाज मराठीत व्हावे. घटनात्मक तरतुदीप्रमाणे ही उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा व्हावी याकडे संस्था विशेष लक्ष पुरवत आहे. मराठी अभ्यास परिषद ही संस्था अनेक वर्षांपासून मराठी विकासासाठी काम करत आहे. संस्थेतर्फे १९८३ पासून 'भाषा आणि जीवन' हे त्रैमासिक प्रकाशीत करुन ही मराठी संशोधन मंडळ संस्था मराठीच्या संवर्धनाला हातभार लावीत आहे. मराठी अभ्यास केंद्राचे शाळांपासून न्यायालयापर्यंत मराठीच्या वापर वाढविण्यासह

तिला मुख्य प्रवाहात आणणं हे प्रमुख उद्दिष्ट आहे. मराठी भाषा संरक्षण व विकास संस्थेचे कामही तितकंच महत्वाचे आहे. राज्यात सरकारी न्यायालयीन कामकाजात पूर्णतः मराठीचा वापर व्हावा, ती ज्ञानभाषा व्हावी यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. ८० टक्के पालक स्वतः मराठी शाळेत शिकलेले असून आपल्या पाल्यांना मात्र भरमसाठ फी देऊन इंग्रजी शाळेमध्ये घालून मोकळे होतात. या मुलांना अस्खलित इंग्रजी येते पण कोणतीही भारतीय भाषा चांगल्या तऱ्हेने येत नाही. त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण दिले तर भाषेचे संवर्धन होईल. मराठी माध्यमाच्या सर्व संस्थाचालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षण विभागातील अधिकारी यांनी मराठी माध्यमाच्या शाळेत शिकणे बंधनकारक करावे. त्यामुळे दर्जा आपसूकच सुधारेल. महाराष्ट्रात सर्वच ठिकाणी नोकरीसाठी मराठीचे ज्ञान असणे अनिवार्य असावे. ज्याचे बाजारमूल्य आहे तेच टिकते हा बाजाराचा सार्वत्रिक नियम आहे. मराठी भाषेचे बाजारमूल्य अधिक अधिकच वृद्धिंगत करणे हाच मराठी भाषा जतन व संवर्धनावरील सर्वोत्तम मार्ग असू शकतो मराठी भाषेची निकड निर्माण करणे गरजेचे आहे. मराठी माध्यमातून शिकूनही चांगले इंग्रजी येऊ शकते हा विश्वास निर्माण करण्याची गरज आहे.

संगणकाशी जोडणारे तंत्रज्ञान मराठी भाषेत उपलब्ध व्हायला हवे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्व भेद विसरुन एक व्हायला हवे. मराठी भाषेच्या आगरी, कुणबी, मालवणी, नागपुरी, मांगेली अशा अनेक बोली आहेत. मराठीचे संवर्धन करायचे असेल तर या प्रत्येक बोलीभाषेचा विकास झाला पाहिजे.

डॉ. गणेश देवी भाषा संवर्धनात पुढील मुद्दे ठळकपणे मांडतात. भाषिक प्रश्न कोणा एका समाजाचा, जाति–जमातीचा नाही तर तो पूर्ण भारतीय समाजाचा प्रश्न आहे. आपल्या भाषेत बोललो तर गाववाला, गावंढळ, असंस्कृत समजतील या भीतीने आपल्या मूळ भाषेपासून दूर जाऊ नये. आपल्या समाजविषयक व भाषाविषयक पुर्वसंस्कारापासून विचलित होऊ नये. भय आणि संशय यातून सर्वच भारतीय भाषिक विश्वासार्हता धोक्यात येऊ शकते. आपली भाषा इतर भाषिक लोकांना शिकविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तरच भाषाजतन करण्यात आपण यशस्वी होऊ.

### २.३.७ भाषिक नियोजनाच्या पायऱ्या

विज्ञान, तंत्रज्ञान यामुळे संपर्क व व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रजी भाषेचा बोलबाला होत आहे. त्यामुळे स्वभाषेवर परिणाम होताना दिसत आहे. जग जवळ येत आहे. तसतशी भाषिक प्रश्नांची तीव्रता वाढत आहे. परंतु भाषा ही त्याच्या समाजाची ओळख असते. तिला एक इतिहास असतो केवळ संप्रेषणापुरती ती मर्यादित नसते तर ती एक व्यवस्था आहे. डेव्हीड फिस्टल यांच्या मते, जगातील प्रत्येक भाषा जगली, जगवली पाहिजे यासाठी आग्रह धरला पाहिजे. जगात आज उपलब्ध असलेले भाषिक संचित नष्ट होऊले दिले तर मानवी इतिहासातील आजवरची सर्वात मोठी दुर्घटना असेल. या पार्श्वभूमीवर 'भाषा नियोजन' या समाजभाषा वैज्ञानिक संकल्पनेवर प्रकाश टाकला पाहिजे. भाषा नियोजन ही संज्ञा सर्वप्रथम युराईल वाईनराईश यांनी वापरली. भाषानियोजन संकल्पनेचे मूळ भाषेच्या स्वरुपात व कार्यात आहे. भाषानियोजन ही सामाजिक प्रक्रिया असून तिचा सामाजिक व राजकीय विकासाशी संबंध आहे. समाजाच्या भाषावृत्ती आणि भाषिक वर्तन यात बदल घडवून आणणे हा भाषानियोजनाचा मुख्य हेतू आहे.

● **भाषा नियोजन**

विशिष्ट विकास किंवा बदल घडवून आण्यासाठी केलेली पद्धतशीर कालबद्ध कृती समाजाच्या भाषिक वर्तनात तसेच भाषिक संरचनेत बदल घडवून आण्यासाठी केलेले जाणिवपूर्वक प्रयत्न म्हणजे भाषानियोजन.

● **व्याख्या**

१. भाषिक प्रश्नांची विशेषतः राष्ट्रीय स्तरावरील सोडवणूक करण्यासाठी केलेले संघटित प्रयत्न म्हणजे भाषानियोजन होय – फिशमन

२. नियोजन यंत्रणांनी निर्धारीत केलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी एक सामाजिक संसाधन म्हणून भाषा व भाषाव्यवहार यांच्या बदलाची तसेच जडणघडणाची कृती म्हणजे भाषा नियोजन होय – कॅरॉल ईस्टमन

● **भाषानियोजनाची ठळक वैशिष्ट्ये**

१. भाषानियोजन म्हणजे भाषिक प्रश्न सोडविण्यासाठी केलेली कृती.

२. समाजाच्या भाषाकृती व भाषिक वर्तन यात बदल करणे.

३. भाषाभेदांची निवड करणे.

४. लेखनपद्धती घडवणेतील बदल किंवा सुधारणा करणे.

५. भाषेचे संवर्धन व जतन करणे.

६. अल्पसंख्यांकाना भाषिक अधिकार मिळवून देणे व त्यांच्या भाषांचे संरक्षण करणे.

७. भाषेच्या वापरक्षेत्राचा विस्तार करणे.

८. सामाजिक ऐक्याची, राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करणे.

● **भाषानियोजनाच्या पायऱ्या**

**१. लेखीकरण (Graphisation)**

एखादी भाषा जोवर फक्त मौखिक स्वरुपात असते तोवर तिच्या विकासाचा वेग फार मंद व मर्यादित असतो. तिचे जतन करावयाचे असेल तर तिची स्वतःची लिपी असणे गरजेचे ठरते. अनेक पिढ्यापर्यंत लिखित भाषा जिवंत ठेवता येते तिचे संवर्धन करता येते. त्यातूनच भाषेच्या विकासाला चालना मिळते.

**२. प्रमाणीकरण** (Standardization)

बदल हा भाषेचा स्थायीभाव आहे. ती सतत हळूहळू का होईना पण बदलत राहाते. त्यामुळे भाषेच्या प्रमाणीकरणाचा मुद्दा महत्वाचा आहे जोवर भाषा प्रमाणीत होत नाही तोवर तिच्या वापरपद्धतीचे नियमन होऊ

शकत नाही. भाषा असंख्य बोलीच्या रुपात बदलत राहाते. एक प्रमाणभाषा मात्र सर्व बोलीना एका छताखाली सामावून घेते. बोलीचा विकास करायला मदत करते.

**३. आधुनिकीकरण (Modemization)**

भाषा ज्ञान भाषा होऊ लागली की तिचे आधुनिकीकरण होते. वापरक्षेत्र वाढतात. नवनवीन क्षेत्रात ती वावरु लागते व त्यामुळे भाषाविकासाला चालना मिळते.

भाषा नियोजन ही भाषिक प्रश्नांची सोडवणूक करणारी एक उपयुक्त सामाजिक प्रक्रिया आहे. नियोजनाची कार्यपद्धती ठरविताना भाषातज्ज्ञ, शासन, व्यक्ती यांची भाषा नियोजन करण्याची जबाबदारी आहे. द्वैभाषिक व बहुभाषिक देशांमध्ये भाषिक नियोजनाला फार महत्व आहे शिक्षणाचे माध्यम व शासन व्यवहाराची भाषा याबाबत भाषिक नियोजन आवश्यक असते भाषिक समस्यांच्या सोडवणुकीसाठी होणारे विविध प्रयत्न 'भाषा नियोजन' या संकल्पनेत येतात.

## २.३.८ भाषाविकास :

भाषेचा विकास ही संकल्पना ही भाषा संपादन करण्याची प्रक्रिया या अर्थाने येते तर समाजभाषा विज्ञानात विशिष्ट भाषेची वाढ किंवा प्राप्ती या अर्थाने येते. भाषाशास्त्राज्ञांनी भाषेच्या विकासाचे निकष पुढीलप्रमाणे सांगितले आहेत.

**१. स्वतःचा भूप्रदेश असणे :**

भाषा बोलणारे एका विशिष्ट भूप्रदेशावर राहाणारे असतील तर तो प्रदेश त्या भाषिक समूहाचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. त्यामुळे मोकळेपणाने विकास व्हायला व वाढीला वाव मिळतो. ज्यू धर्मीय लोक जेव्हा जगभर विखुरले तेव्हा हिंदू भाषेला नगण्य स्थान होते पण जेव्हा इस्त्राईल या स्वतंत्र राष्ट्रात एकत्र येऊन जेव्हा स्थानिक झाले तेव्हा भाषेची भरभराट झाली. स्वतःच्या भूप्रदेशात मोकळेपणाने भाषेची देवाणघेवाण तर होतेच परंतु सहज होणाऱ्या संवादामुळे भाषेचा मोकळेपणाने विकास होतो.

**२. संबंधित भाषकांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण**

एखाद्या भाषेच्या निजभाषकांचे प्रमाण लोकसंख्येत अत्यल्प असेल तर भाषेच्या विकासात अडथळा निर्माण होतो. जास्त प्रयत्न करावे लागतात. कारण लहानमूल १८ ते ४८ महिने या वयात निजभाषा आत्मसात करीत असते. भाषा आत्मसात करणे ही तर माणसाच्या सामाजिक सांस्कृतिक अस्तित्वासाठी अत्यावश्यक असणारी गोष्ट आहे. त्यामुळे निजभाषकाचे प्रमाण चांगले असेल तर तेवढा त्या भाषेचा मुबलक वापर होण्याला वाव असतो पर्यायाने त्या भाषेच्या विकासालाही चालना मिळू शकते.

**३. भाषेच्या वापरक्षेत्राची व्याप्ती आणि गुणवत्ता**

भाषेच्या वापरक्षेत्राची व्याप्ती किती व्यापक आहे आणि किती गुणवत्तेची आहे यावरही भाषेचा विकास अवलंबून असतो. भाषा समाजातील महत्त्वाच्या ठिकाणी वापरली जात असेल उदा. शिक्षण, औद्योगिक क्षेत्र,

न्यायालये भाषा वापताना भाषा शुद्धीला महत्व दिले तर तिची गुणवत्ता वाढेल. जास्तीतजास्त वापर व गुणवत्ता याने भाषेच्या विकासाला चालना मिळेल.

**४. संबंधित भाषकांच्या भाषिक प्राविण्याची पातळी**

भाषिक प्राविण्य शैक्षणिक दर्जावर तर ठरतेच पण संबंधित भाषेत लिखाण किती झाली आहे ग्रंथनिर्मिती चे प्रमाण, साहित्याची गुणवत्ता यावरुनही भाषेची गुणवत्ता ठरते त्यामुळे एखाद्या भाषेत साहित्यनिर्मीती किती झाली यावरही तिचा विकास अवलंबून असतो.

**५. संबंधित भाषकांचा स्वभाषेकडे पाहण्याचा दृष्टीकोन**

एखाद्या भाषेचे निजभाषक तिच्याकडे कोणत्या दृष्टीकोनातून पाहातात यावर तिचा विकास अवलंबून आहे. आपल्याच भाषेचा अपमान किंवा तिला कमी लेखणे किंवा निजभाषेतून संवाद करण्याचे टाळणे परभाषेला जवळ करून तिचाच वापर जास्त करणे या गोष्टी भाषेच्या विकासात अडथळा ठरू शकतात.

**६. अधिकृत स्थान व शासकीय भाषाधोरण**

एखाद्या भाषेला राष्ट्रभाषा, राज्यभाषा, प्रमाणित भाषा, अधिकृत भाषा असा दर्जा मिळतो तेव्हा तिच्या विकासाची दारे आपोआपच खुली होतात. विकासाला चालना मिळते भाषेचा हा दर्जा वाढविण्याचा प्रयत्न निजभाषकानीच केला पाहिजे.

**७. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमण**

भाषा प्रवाही असणे हा तिचा सगळ्यात मोठा गुण आहे. भाषेला हस्तांतरीत केले पाहिजे किंबहुना आधीच्या पिढीने चांगल्या स्थितीत भाषा जपून दुसऱ्या पिढीकडे सपुर्द केली पाहिजे. ती आपली जबाबदारी आहे असे समजले पाहिजे तसे झाले नाही तर भाषेला साचलेपण येऊन ती मृतवत होते.

**८. भाषाशिक्षणाच्या साधनसामग्रीची उपलब्धता**

आधुनिक जगाच्या प्रगतीनुरुप भाषाही प्रगत झाली पाहिजे. नवनवीन माध्यमाचा भाषाशिक्षणासाठी उपयोग केला पाहिजे. नवनवीन तंत्रज्ञानाला भाषेने स्विकारले पाहिजे. अधिकअधिक आकर्षक आणि वेधक पद्धतीचा भाषाशिक्षणात अंतर्भाव यामुळे भाषेच्या विकासाला चालना मिळते.

भाषेच्या विकासासाठी शासन, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था या पातळ्यावर आणि व्यक्तिगत पातळीवर प्रयत्न होणे अत्यंत गरजेचे आहे. या शिवाय विश्वकोश, विकिपीडियाचा वापर परिभाषाकोश, माहिती कोश, बोलीचा अभ्यास अशा सर्वच साधनाचा उपयोग भाषाविकासासाठी होऊ शकतो.

**२.३.९ भाषा शिक्षणाचे माध्यम**

भाषा हे शिक्षणाचे माध्यम असते. ज्ञान संपादनासाठी भाषा साधन म्हणून वापरली जाते. या साधनाची माहिती चांगल्या प्रकारे करुन घेणे हा भाषा शिक्षणाचा मूळ हेतू असतो. शिक्षण म्हणजे एका पिढीच्या ज्ञानाचे,

संस्काराचे एकंदर संस्कृतीचे संचित दुसऱ्या पिढीपर्यंत पोहचविण्याची व्यवस्था मानले किंवा भाषा म्हणजे एका व्यक्तीला आलेला अनुभव दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहचविण्याचे एक साधन असे मानले तर भाषा आणि शिक्षण यांचा निकटचा संबंध आहे हे लक्षात येते. शिक्षणाचे माध्यम स्वभाषा असावे की परभाषा असावे अशी चर्चा आपल्याकडे चालते. शिक्षणाचे माध्यम म्हणजे परीक्षेचे माध्यम एवढाच विचार नसून लायब्ररी लॅग्वेजची कल्पना त्यात आली. प्राथमिक शाळेत तर स्वभाषेतला पर्याय नाही. एखाद्या विशिष्ट भाषेचा अभ्यास करणे म्हणजे ती भाषा शिकणे होय म्हणजेच संभाषण करता येणे. लिहिता-वाचता येणे व्यवहार करता येणे होय. स्वभाषा शिक्षणाचे माध्यम असावे कारण स्वभाषेतील शिक्षणाचे अनेक फायदे आहेत. स्वभाषेतील शिक्षण कमी श्रमात होते. आपल्याला स्वभाषा नीट येत असेल तर शिक्षणातील उंची वाढते. विनाअडथळा ज्ञान प्राप्त होण्यास मदत होते, संकल्पना लवकर कळतात, अभ्यास कंटाळवाणा होत नाही, वर्गातही एकटे पडण्याची भिती नसते, आकलन नीट होते त्यामुळे आत्मविश्वास वाढतो. निरोगी व निकोप शिक्षण प्रवास चालू राहतो. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मुलांना ज्ञान द्यायचे असेल, त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारायच्या असतील तर स्वभाषेतून आकाराला येणारे विश्व आणि शाळेतून मिळणाऱ्या ज्ञानाचे विश्व यांचा सांधा जुळला पाहिजे. स्वभाषेतून शिक्षण देणे ह्यासाठी आवश्यक असते त्यामुळे ज्ञानाची ओढ उत्पन्न होते.

आपल्याकडे इंग्रजी माध्यमाचे खूळ दिवसेंदिवस वाढते आहे. इंग्रज अधिकारी लॉर्ड मेकॉले याने इंग्रजीतून शिक्षणाचे मूळ भारतात रोवले. अधिक चांगले राज्य करता यावे म्हणून घेतलेला हा धोरणात्मक निर्णय होता. पुढे इंग्रज इथून निघून गेले. देश स्वतंत्र झाला, परंतु इंग्रजी मात्र कायमची राहिली. इंग्रजी बोलण्याविषयी कुतूहल आणि श्रेष्ठत्वाची भावना आजही आहे. युनस्को ही जागतिक स्तरावरील संस्था मातृभाषेतून शिक्षणाबद्दल आग्रही असते. बहुभाषिक देशांना मातृभाषेतून शिक्षणाचा पुरस्कार करण्याचे सतत आवाहन केलेले आहे. जगातील ४० टक्के मुलं अशा भाषेत शिक्षण घेतात जी त्यांना सहज समजत नाही, जी त्यांची मातृभाषा नाही. अनेक देशांनी मातृभाषेतून प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार केला आहे. काही देशात तर तसे कायदे ही आहेत. गव्हर्नमेंट ऑफ हाँगकाँग ने आपले शैक्षणिक धोरण स्पष्ट करताना या तरतुदी केल्या आहेत. परंतु महाराष्ट्रात व इतरही राज्यात इंग्रजीचाच पगडा दिसतो. त्यामुळे भाषिक वैविध्येतून खुलणारी संस्कृती आणि तिची संपन्नता ही नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. वैज्ञानिकदृष्ट्या व्यक्त होणे ही भावनिक गरज असून आरोग्यासाठी अनिवार्य आहे. बहुभाषिक व्यक्तीलाही व्यक्त होण्यास मदत करते ती म्हणजे मातृभाषा, परंतु मातृभाषेतून त्याच शिक्षण झालेलं नसतं त्यांना इतर भाषा शिकणं ही अतिशय कठीण जाते. कारण मेंदू आणि जग यात दुवा निर्माण होण्याऐवजी दुरावा निर्माण होतो. भाषाशिक्षण ही एक नैसर्गिक व स्वाभाविक प्रक्रिया आहे तिचा विकास सामाजिक घटक करत असतात. प्रत्येक जण आपापल्या गरजा आणि क्षमतांनुसार भाषा हे स्वतःच्या बुद्धीचे अंग जीवनात वापरु शकतो. ही प्रक्रिया तेव्हाच सहजपणे घडेल जेव्हा अत्यंत नैसर्गिकपणे त्याचे शिक्षण मातृभाषेतून विनासायास होईल.

**● स्वभाषा शिक्षण**

स्वभाषा म्हणजे माणूस जी पूर्णपणे आत्मसात करतो ती भाषा. जी भाषा बोलताना किंवा लिहिताना त्यांना आत्मविश्वास असतो, आपण चूक करू अशी धास्ती नसते ती स्वभाषा. अगदी आयुष्याच्या सुरूवातीलाच ती

तो शिकतो. पण कधी कधी आई वडील दोघांची वेगवेगळी भाषा असेल तर दोन्ही भाषा मूल आत्मसात करते भाषेचे प्राथमिक धडे आपल्या आईकडून मिळतात म्हणजे ती मातृभाषा. मातृभाषा हा आपल्या कुटूंबाकडून, समाजाकडून मिळालेला वारसा असतो. कोणतेही लहान मूल सहजगत्या मातृभाषा आत्मसात करते. प्रत्येक व्यक्तीची एक स्वभाषा असतेच. स्वभाषा आपण केव्हा शिकलो हे आपणासही जाणवत नाही. वयाच्या १८ व्या महिन्यापासून ते ४८ व्या महिन्यापर्यंत मूल आपल्या मातृभाषेतून कोणताही अडथळा न येता व्यवहार करू लागते. स्वभाषा शिक्षणाचे टप्पे आहेत. दहाव्या महिन्यापासून ते तिसऱ्या वर्षा अखेरीस बालक स्वभावशिक्षणाच्या दृष्टीने प्राथमिक अवस्थेत असते. आई, बाबा, काका, मामा असे विशिष्ट शब्द, नातेसंबंध लक्षात घेते. हम्मा, बाऊ, पमपम, पापा, इइ, गाईगाई, भूभ, ममम या सारखे शब्द सुरूवातीच्या काळात उच्चारले जातात हा स्वभाषा शिक्षणाचा पहिला टप्पा असतो. चौथे वर्ष ते सातवे वर्ष हा दुसरा टप्पा असतो. या काळात मुलाचे भाषा संपादन जवळजवळ पूर्ण होते. स्वतंत्र संभाषण करणे, ऐकूण विचार करून उत्तर देणे, भावनाचे प्रकटीकरण करणे. लहानमोठे, लिंगभेद, भाषेची संरचना, व्याकरण, भाषेचे नियम हे लक्षात येऊ लागते. वाक्याची निर्मिती करता येते. साहित्याबद्दल रुची निर्माण होते. स्वभावा शिक्षणाचा तिसरा टप्पा म्हणजे विद्यार्थ्याची एक भावनिक व्यवहाराची व साहित्यिक दृष्टी तयार होते. तसेच उच्चारण, लेखनपद्धती, व्याकरण, शब्दसंग्रह, अर्थनिष्पती या भाषेच्या विविध अंगाबद्दल आणि त्याच्या परस्परसंबंधा बद्दल स्पष्ट जाणीव करुन देण्याचे सुयोग्य स्थान म्हणजे स्वभाषाशिक्षण होय. महात्मा गांधी म्हणतात. ''मातृभाषा शिक्षणाचे योग्य माध्यम आहे आणि अधिक योग्य माध्यम अनुभव असतो'' तर जेष्ठ शास्त्रज्ञ अनिल काकोडकर म्हणतात ''मातृभाषाच मुलांच्या शिक्षणाचे स्वाभाविक माध्यम असून त्याच भाषेतून त्याचा सर्वांगीण विकास होऊ शकतो'' स्वभाषेतील शिक्षणामुळे मुलांची आकलन शक्ती वाढते, विषयाची समज वाढते व सृजनशिलतेला अधिक वाव मिळतो.

स्वभाषा अडाणी माणूस श्रवण आणि भाषण याद्वारे स्वभाषा सहजपणे आत्मसात करतो. भाषेच्या विकसित रुपाचा परिचय होण्यासाठी स्वभाषा शिक्षण आवश्यक असते. भाषा केवळ व्यवहारात उपयोगी पडते असे नाही. ती नवनिर्माणक्षम असते. विविध विचार, कल्पना, संकल्पना यांचे प्रकटीकरण स्वभाषेतून होते. स्वभाषेतून ते अधिक चांगल्या प्रकारे होते. स्वभाषाशिक्षणातून विविध बोलीचाही परिचय होतो. आपण स्वभाषेत पारंगत होणे खूप आवश्यक आहे. त्यामुळे भाषेविषयी सामान्यज्ञान प्राप्त होते त्यांचा फायदा इतर भाषा शिकताना होतो.

### २.३.१० आदिवासी व इतर मागास गटाचे भाषाशिक्षण

प्रगतांच्या संपर्कात आदिवासीतील नवीन पिढी प्रगतांची भाषा आत्मसात करू लागली. पण त्याचबरोबर आपल्या स्वतःच्या मूळ बोलीभाषेकडे ते दुर्लक्ष करू लागले त्यामुळे त्यांना मुळ भाषेतील आपल्या जमातीच्या संस्कृतीचे विस्मरण होऊ लागले. त्यातूनच त्यांच्या संस्कृतीचे अस्तित्व नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला. शिवाय जुनी पिढी जिला नवीन भाषा येत नाही व प्रगतीची भाषा आत्मसात केलेली नवीन पिढी यांच्यात सांस्कृतिक व मानसिक दुरावा वाढत गेला. आदिवासीच्या एकात्मतेला तडा गेला.

शासनाने स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी क्षेत्रात अंगणवाड्या, बालवाड्या, आश्रमशाळा यांच्यावर भर दिला. आदिवासी शिक्षण हा अत्यंत नाजूक विषय आहे. आदिवासी भागात काम करणाऱ्या बिगरअदिवासी

शिक्षकांनी स्थानिक आदिवासी भाषा व संसकृती यांचे प्रशिक्षण देणे. शिक्षण हा विकासातील एक महत्वाचा घटक आहे. शिक्षणामुळे माणसाला बऱ्याच गोष्टी समजतात पण अजूनही आदिवासी भागामध्ये हे प्रमाण कमीच आहे. आता थोडी फार जागरुकता निर्माण होत आहे. तरीही अतिमागास जमातीत हे प्रमाण नगण्यच आहे. शिक्षणपद्धती वर बऱ्याचदा चर्चा होते यांना मुख्यभाषेत त्याला राज्यात शिक्षण दिले जाते परंतु आदिवासी लोकांना त्यांची बोली भाषा सोडून इतर भाषेत शिकणं खूप जड जाते. सुरवातीला जर त्यांना त्याच्याच भाषेत समजावून सांगितले तर विषय समजायला सोपा जाईल. गणित, विज्ञान सारखे अवघड विषय सोपे करुन त्यांच्या बोलीभाषेतून शिकले पाहिजेत मुळात घरात शिक्षणाचे वातावरणचं नसते त्यामुळे आधीगोडी निर्माण केली पाहिजे. पाचवी नंतर मोठ्या गावात शहरात जावे लागते. पैशाची अडचण, स्पर्धेला सामोरे जाताना होणारी दमछाक यामुळे शिक्षण सोडण्याकडे कल वाढतो. आदिवासी जमातीमध्ये शिक्षक व शैक्षणिक साहित्य हे त्यांच्या भाषेत उपलब्ध नसते. त्यामुळे मातृभाषेत शिक्षण होत नाही व ते द्यायचे म्हटले तरी बऱ्याचशा भाषा या बोलीभाषा आहेत. त्यांची स्वतःची अशी लिपी नाही. त्यांचे स्वतःचे वाङ्मय नाही.

● **भाषाविषयक समस्या**

प्रत्येक आदिवासी समाजाची स्वतंत्र बोलीभाषा असते. बाह्य समाजाच्या संपर्कामुळे आदिवासी स्वतःच्या मूळ भाषेसोबतच सभ्य समाजाची भाषा सुद्धा शिकू लागला. ही योग्य बाब असली तरी स्वतःच्या मूळ भाषेचा त्याला विसर पडू लागला परीणामी नव्या पिढीला स्वतःची बोलीभाषा परकी वाटत आहे. उदा. गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी क्षेत्रात बंगाली निर्वासिताचे पुनर्वसन करण्यात आले त्यांनी शाळेत बांगला शिकविण्याचा आग्रह धरला प्रत्येक जिल्हा परिषदेच्या शाळात बांगला भाषा शिकवले जाते. परंतु परंपरेने मूळचे रहिवासी असलेल्या 'माडिया' भाषेची कोणतीही व्यवस्था न केल्यामुळे माडिया भाषेचा अस्त होत आहे. आदिवासी हिंदी, मराठी, इंग्रजी भाषेतून शिक्षण घेत आहेत. त्यांची मायबोली नष्ट होत आहे. त्यांना आपल्या मातृभाषेतूनच शिक्षण मिळायला हवे. बाह्य संस्कृतीच्या संपर्कातून आदिवासीची द्विभाषाविषयक समस्या निर्माण झाली आहे. बाह्य समाजाच्या संपर्कामुळे आदिवासी मूळ भाषेच्या जोडीला सभ्य समाजाची भाषा बोलू लागले आहेत. मातृभाषेशिवाय इतर भाषा शिकणे मुळीच चूक नाही. परंतु स्वतःच्या मातृभाषेचा विसर पडू लागला आहे. परिणाम दोन आदिवासी समाजातील पिढ्यांत सांस्कृतिक देवाणघेवाणीत अडथळा निर्माण होऊ लागला आहे. द्विभाषावाधाने त्यांच्या सामुदायिक भावनेस तडा गेला सांस्कृतिक मुल्यांचा ऱ्हास होऊ लागला. भाषेचा लेश म्हणजे परंपरागत जीवनपद्धती हळुहळू पण निश्चित नाहीशी होणे होय.

बहुसंख्य आदिवासी पालकांना आपल्या मुलांनी शाळेत जावे असे वाटते. परंतु त्यांनी आदिवासी भाषेतून शिक्षण न घेता प्रांतीय भाषेतून घ्यावे असे त्यांच्या पालकांना वाटते. ही प्रांतीय भाषा शिकण्यातच पहिली ३-४ वर्षे जातात आणि त्यामुळे अभ्यासात कायमची मागे पडतात. महाराष्ट्राचा भाग असलेल्या शाळेमध्ये ही आदिवासी मुले मराठी शिकतात ती त्यांना अजिबात येत नाही. शाळेच्या बाहेर मराठी कानावर पडत नाही. शिक्षकांना आदिवासी भाषा येत नाही त्यामुळे स्वयंअध्ययन करणे त्यांना अवघड जाते.

द्रारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, आदिवासी समाजाची राहाणी इत्यादी मुळे शिक्षणाचा प्रसार आदिवासी मध्ये

फारसा नाही तसेच आदिवासी स्त्रीयांची शिक्षण कमी व लहानवयात लग्न त्यामुळे शिक्षण होत नाही.

आर्थिक अडचणी मुळे शिक्षण सोडल्याचे प्रमाणे जास्त आहे. शासनाच्या आदिवासी विषयक शैक्षणिक व अन्य सोयी स्वतःची माहिती सर्व अठदिवासीपर्यंत पोहचत नाही. गरिबी आणि अज्ञान या कारणामुळे बहुसंख्य आदिवासी समाज शिक्षणापासून वंचित राहातो.

शिक्षणाच्या सोयी निवासस्थानाच्या जवळपास उपलब्ध नसल्यानेही शिक्षणावर परिणाम झाला आहे. आदिवासी समाजाला शिक्षणाचे महत्व समजावे यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.

थोडक्यात आदिवासी व इतर मागास समाजाच्या भाषाशिक्षणात पुढील अडचणी उद्भवतात.

१. दारिद्र्य २. शैक्षणिक सुविधांची कमतरता ३. भाषेची अडचण ४. शाळांची कमतरता ५. शिक्षकांचा नकारात्मक दृष्टीकोन ६. बालमजूरी ७. अज्ञान ८. शिक्षण देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सदोष पद्धती ९. आर्थिक अडचण.

## २.४ शब्दार्थ व टिपा

स्वभाषा – मातृभाषा.

भाषानियोजन – भाषा जतन करण्याचा मार्ग.

ध्रुवीकरण – एका भाषिक प्रदेशात दोन भाषिक समूह तयार होणे. यात बहुधा निजभाषा मागे पडून परकीय भाषेला अवाजवी महत्व मिळणे.

भाषिक समाज – भाषा वापरणारा समाज.

बहुभाषिकता – एका पेक्षा जास्त भाषा बोलल्या जाणे.

द्वैभाषक – दोन भाषा येणारा समाज.

भाषाजतन – भाषा वाचविणे.

डॉ. गणेश देवी – भारतीय साहित्य समीक्षक आणि भाषाशास्त्रज्ञ 'पिपल्स लिंग्विटिक सर्व्हे ऑफ इंडिया' नावाचा ग्रंथ २०१० मध्ये प्रसिद्ध.

ब्रॉझिल बर्नस्टीन – भाषा वैज्ञानिक.

लॉर्ड मॅकॉले – इंग्रजी भाषेतून शिक्षणाची मुळं भारतात रोवली.

मिश्र भाषा – हिंदी, इंग्रजी, मराठी एकत्र करून बोलणे.

## २.५ समारोप

भाषा नियोजना मध्ये व्यक्ती, संस्था आणि सरकार या तीनही घटकांना महत्वाचे स्थान आहे. भाषाशिक्षण

संस्था, सामाजिक संस्था, प्रसारमाध्यमे यांचे नाही कारण तिचे स्वरुप व कार्य अन्य क्षेत्रापेक्षा वेगळे आहे. भाषा नियोजनाचा मुख्य हेतू भाषाव्यवहार व भाषिक संरचना यात बदल घडवून आणणे हाच असल्यामुळे भाषिक परिवर्तन आणि भाषिकनियोजन यांना अलग करता येणार नाही. जग जवळ येत चालले आहे. जगाच्या भाषिक विविधतेचे अस्तित्वही धोक्यात येऊ लागले आहे. अनेक भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. बोलीभाषेचा विकास केला पाहिजे. स्वभाषा टिकविण्यासाठी भाषा सक्षम बनवायला हव्यात. स्वभाषेतून प्राथमिक शिक्षण अनिवार्य व्हायला हवे. भाषा जतन करणे ही केवळ सरकार किंवा सामाजिक संस्थांची जबाबदारी नाही तर इच्छाशक्ती व सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. अशा प्रयत्नांचा एक विश्वासार्ह मार्ग म्हणजे भाषानियोजन होय. इथून पुढे केवळ बहुभाषिक समाजात नव्हे तर एकभाषक, द्वैभाषक समाजातही भाषा व्यवस्थापनासाठी भाषानियोजनाची गरज लागणार आहे. गेल्या कित्येक वर्षापासून भाषा नष्ट होण्याविषयी किंवा अभ्यास झाला त्यातून अनेक तथ्ये पुढे आली. त्यातील सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे स्वभाषकांना आपली भाषा मरत आहे हे शेवटपर्यंत लक्षात येत नाही. जेव्हा येते तेव्हा वेळ निघून गेलेली असते कारण स्वभाषेला गृहीत धरले जाते. भाषाविकासात प्रत्येक व्यक्तीने सहभागी झाले पाहिजे हे काम आव्हानात्मक आहे. भारतासारख्या बहुभाषिक देशातील अनेक प्रश्न भाषांशी निगडीत आहेत. तरीही हे आव्हान पेललेच पाहिजे. जगात आज उपलब्ध असलेल्या भाषा नष्ट झाल्या तर ती मोठी दुर्घटना असेल.

## २.६ सरावासाठी प्रश्न

### वस्तुनिष्ठ प्रश्न

१) भाषेची प्रतिकात्मक व्यवस्था आणि समाजाची घडण यातील आंतर संबंधाचा अभ्यास कोणी केला?

(ब्रॉझिल, बर्नस्टीन/लेव्हीस स्ट्राऊस/डॉ. जयश्री पाटणकर/लॉर्ड मॅकॉले)

२) 'क' ऐवजी 'य' किंवा 'ड' कोणत्या भाषेत वापरतात?

(खानदेशी/अहिराणी/माडीया/बांगला)

३) समाजाच्या भाषावृत्ती आणि भाषिक वर्तन यात बदल घडवून आणणे हा मुख्य हेतू कशाचा असतो?

(भाषानियोजन/भाषाविकास/स्वभाषा/भाषिक सवयी)

४) भारतात कोणते भाषा सूत्र वारले जाते?

(द्विभाषा/त्रिभाषा/एकभाषा/स्वभाषा)

५) आदिवासी क्षेत्रात कोणत्या निर्वासितांचे पुनर्वसन करण्यात आले?

(बंगाली/मुस्लीम/ख्रिश्चन/सिंधी)

६) भाषा सल्लागार मंडळाची स्थापना कधी झाली?

(१९६१/१९६२/१९६६/१९६५)

७) अननस, साबुदाणा, इस्त्री हे शब्द कोणत्या भाषेतून मराठी भाषेत स्थिरावले?

(फारसी/अरबी/पोर्तुगीज/हिंदी)

८) द्वैभाषिक शाळा (bilingual schools) कोणत्या देशात आहेत?

(कॅनडा/जर्मनी/भारत/इंग्लंड)

९) इंग्रजीतून शिक्षण ही मुळे भारतात कोणी रोवली?

(लॉर्ड मॅकॉले/लेव्हीस स्ट्राऊस/ब्रॉझिल बर्नस्टील/फिशमन)

१०) मराठी अभ्यास परिषदेचे 'भाषा आणि जीवन' हे त्रैमासिक कोणत्या वर्षा पासून प्रसिद्ध होत आहे?

(१९८३/१९८८/१९८९/१९९०)

**उत्तरे :–** १. ब्रॉझिल बर्नस्टीन, २. खानदेशी, ३. भाषानियोजन, ४. त्रिभाषा, ५. बंगाली, ६. १९६१, ७. पोर्तुगीज, ८. कॅनडा, ९. लॉर्ड मॅकॉले, १०. १९८३.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) भाषा नियोजन म्हणजे काय सांगून भाषानियोजनाच्या पायऱ्या सांगा.

२) भाषाविकासाचे स्वरुप स्पष्ट करा.

३) आदिवासी व इतर मागास गटाच्या भाषा शिक्षणात येणाऱ्या अडचणीची चर्चा करा.

४) बहुभाषिकता ही संकल्पना स्पष्ट करा.

**क) लघुत्तरी प्रश्न**

१) 'स्वभाषा' शिक्षणाचे माध्यम असावे थोडक्यात लिहा.

२) भाषेचे सामाजिक स्थान स्पष्ट करा.

३) 'समाजाचे भाषिक प्रश्न' थोडक्यात चर्चा करा.

४) 'भाषा जतन' ही संकल्पना स्पष्ट करा.

## २.६ अधिक वाचन


१) वैखरी : भाषा आणि भाषा व्यवहार – अशोक केळकर. मॅजेस्टीक, प्रकाशन

२) आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन – मालशे मिलिंद, लोकवाङमय गृह

३) समाज भाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी – नंदकुमार मोरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

४) भाषा संवाद – डॉ. अनिल गवळी, डॉ. नंदकुमार मोरे, सायन पब्लिकेशन्स प्रा. लि. पुणे.

५) सामाजिक भाषाविज्ञान – संपादन डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन प्रकाशन. पुणे.

६) भाषा, समाज आणि संस्कृती – सोनाली देशपांडे – गुजर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.

७) समाजभाषाविज्ञान : प्रमुख संकल्पना – रमेश वरखेडे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.

**२.७ उपक्रम**

१) मराठी भाषाच्या बोलीचा अभ्यास करुन निरीक्षणे नोंदवा.

२) स्वभाषेतून शिक्षण घ्यावे ते का? हे पटवून द्या.

३) आपल्या भागातील बोलीभाषेतील शब्दांचा संग्रह करा.

४) समवयस्कराच्या भाषिक सवयीची निरिक्षणे नोंदवा.

●●●

## घटक–३

## समाजभाषाविज्ञान व इतर अभ्यासशाखा

### (समाजभाषाविज्ञान आणि समाजशास्त्र, समाजभाषाविज्ञान आणि मानववंशशास्त्र, समाजभाषाविज्ञान आणि संस्कृती विज्ञान)

**अनुक्रमणिका**


३.१ उद्दिष्ट्ये

३.२ प्रस्तावना

३.३ विषय विवेचन

- ३.३.१ भाषेचा पूर्वाभ्यास
- ३.३.२ आधुनिक भाषाविज्ञान
- ३.३.३ समाजभाषाविज्ञान पार्श्वभूमी
- ३.३.४ समाजभाषाविज्ञानातील अभ्यासाचे उद्देश व दिशा
- ३.३.५ भाषा जतन
- ३.३.६ समाजशास्त्र आणि समाजभाषाविज्ञान

३.४ समारोप

३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.६ सरावासाठी प्रश्न.

३.७ संदर्भ ग्रंथ


## ३.१ उद्दिष्ट्ये :

विद्यार्थी मित्रांनो, हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्हाला,

१. भाषेचे स्वरूप आणि भाषाविज्ञान पद्धतीची वाटचाल समजून घेता येईल.

२. समाजभाषाविज्ञान अभ्यास शाखेचे स्वरूप व व्याप्ती समजून घेता येईल.

३. समाजभाषाविज्ञान व समाजशास्त्र यांचा अन्योन्य संबंध समजून घेता येईल.

४. समाजभाषाविज्ञान व मानववंशशास्त्र यांचा परस्पर संबंध समजून घेता येईल.

५. समाजभाषाविज्ञान व संस्कृतीविज्ञान यांचा संबंध समजून घेता येईल.

६. समाजभाषाविज्ञान, समाज, संस्कृती व मानववंशशास्त्र यांचा एकत्रित अभ्यास का आणि कसा करावा हे समजून घेता येईल.

## ३.२ प्रस्तावना

जगात अनेक जीव जन्मास येतात. जळ, जमीन, आकाशात ते जगत असतात. जीवाला जगण्यासाठी अन्नाची गरज आहे. तसेच जीव जिथे जन्मास आले तिथे समूहात जगण्यासाठी त्यांना व्यक्त होण्याची गरज वाटली. हे अभिव्यक्तीचे माध्यम म्हणजेच भाषा होय. हावभावाची भाषा, ध्वनींची भाषा याद्वारे जीव संदेशाची देवाण घेवाण करतात. माणूसही इतर जीवाप्रमाणे व्यक्त होत आला आहे. निसर्गत: पडलेल्या प्रश्नांचा विचार करत करत तो वेगवेगळ्या रीतीने व्यक्त होत गेला आहे. वस्तूला नावे आणि अर्थ प्राप्त करून देण्याचे काम माणसाने केले. जगातल्या विविध देशात माणूस वेगवेगळ्या पद्धतीने राहतो आहे. या मानवी समाजातच मानवी भाषेचा विकास झाला आहे. सगळ्या जगातल्या माणसांची भाषा एक आहे का? अर्थातच नाही. माणूस गरज पडेल तसा बोलत आहे. ज्या प्रदेशात तो राहतो तिथल्या निसर्गाचे, भौगोलिक परिस्थितीचे पडसाद त्याच्या भाषेत दिसत असतात. जगातल्या मानवी विविध भटक्या जमातीचे आपण निरीक्षण केले तर त्यांचे आचार, विचार, व्यवहार आणि भाषा या गोष्टी भिन्न आढळतात. त्यांचे शरीराची ठेवण देखील वेगवेगळी आपल्याला दिसते. माणूस आहे तसा कधीच राहिला नाही, त्याने आपले राहणीमान आणि जीवनमान बदलले आहे. एका मानवी टोळीचा दुसऱ्या टोळीशी संबंध आल्यानंतर एकमेकांची संस्कृती पाहत स्वत:च्या आहार विहारामध्ये बदल केले आहे. माणूस नुसता विचार करत नाही. त्याला कल्पना सुचतात त्यानुसार तो नवे काही करत असतो. त्याची भाषा ही देखील त्याच्या कल्पकतेमुळे बदलत गेली आहे. जिला आपण आज भाषा म्हणतो ती त्या समाजाच्या मूळ बोलीतून जन्मास येताना दिसते. बोली अगोदर आणि नंतर मग प्रमाण भाषा तयार होत गेली असे आपणास म्हणता येते. भाषा ही सतत प्रवाही असते. परिवर्तनशील असते हे आपल्याला माणसाच्या जीवन प्रवासात जाणवत आले आहे. भाषा एका माणसाने निर्माण केली का? ईश्वराने निर्माण केली का? तर याचे उत्तर नाही असेच आहे. भाषिक संवाद होण्यासाठी किमान दोन माणसांची आवश्यकता भासते. भाषा ही समाजाने निर्माण केलेली संस्था आहे. भाषा जरी सामाजिक असली तरी ती आपोआप माणसांच्या मुलांना मिळत नाही, ती मुलांना ऐकून कळते. ती त्याला शिकावी लागते याबाबत डॉ. नंदकुमार मोरे म्हणतात, ''समाजातील प्रत्येक व्यक्ती बाल्यावस्थेत त्याच्या मेंदूमध्ये असणाऱ्या भाषार्जनाच्या क्षमतेमुळे स्वत:च्या परिसराची भाषा नैसर्गिकपणे आत्मसात करते. नवजात बालक भाषा शिकत जाते तेव्हा त्याच्या समोर कोणतेही व्याकरण नसते. ते बालक जी भाषा शिकते ते सामाजिक संदर्भाच्या आधारे.'' (डॉ. नंदकुमार मोरे, समाजभाषा विज्ञान आणि मराठी कादंबरी, पद्मगंध प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २७ फेब्रुवारी २०१२, पान नं. १२)

बोलीभाषा आधी नंतर व्याकरण अशी स्थिती आहे. माणूस आधी बोलायला शिकला नंतर मग बोलतो

कसा त्याचा अभ्यास करायला लागला. भाषा ही सामाजिक संकेताची प्रणाली आहे. पण प्रत्येक माणूस तरीही आपल्या आपल्या खास शैलीत आणि वेगळेपणाने बोलत असतो. त्यामुळे भाषा ही समाजाची मालमत्ता असली तरी व्यक्ती त्याची स्वत:ची अशी खासियत तयार करत असते. माणसाने देहबोलीचा उपयोग करून संदेश देवाण केली, आणि माणसाने अर्थयुक्त ध्वनींचा वापर करून संदेश दिले घेतले. माणसाला जेव्हा भाषा येत नव्हती तेव्हा त्याने रेखाटने, हावभाव यातून आपल्या भावना विचार प्रकट करायचा प्रयत्न केला आहे. ध्वनीच्या सह्याने त्याने असंख्य रचना करून अनेक अर्थ व्यक्त केले. ध्वनींच्या साहाय्याने अगणित अर्थ व्यक्त करण्याची क्षमता मानवी भाषेत आहे. संवाद करण्याच्या गरजेतून भाषा निर्माण झाली. मानवी संस्कृती जसजशी प्रगत होत गेली, तसे भाषेच्या मौखिक रुपाला लिखित रुप देण्यासाठी लिप्या निर्माण झाल्या. चित्रे, रेषा, रेखाटने, बिंदू या स्वरूपात तयार केलेल्या लिप्या कालांतराने अधिक काटेकोर व नियमबाह्य झालेल्या दिसतात. भाषा म्हणजे लिपी नव्हे. लिपी ही मौखिक भाषेला दृश्य परिणाम देणारे एक साधन आहे. जगात भाषा अधिक आहेत, लिप्या ज्यांनी ज्यांनी तयार केल्या त्यांच्या आहेत. उदा. मराठीची देवनागरी ही लिपी आहे. शिवाय मराठी मोडी लिपीत देखील लिहितात. याचा अर्थ असा की एक भाषा अनेक लिपीत लिहिता येऊ शकते. उदा. नामदेव, Namdev इथे मराठी माणूस देवनागरी लिपीत नामदेव लिहितो तसेच इंग्लिश (लॅटिर्न/रोमन) लिपीचा आधार घेऊन तो आपले नाव लिहितो. याचा अर्थ असा की, जगात जेवढ्या भाषा आहेत त्यांच्या वेगवेगळ्या लिप्या त्यांनी तयार केल्या आहेत. पण प्रत्येक लिपीत व्यक्त झालेल्या शब्दांना त्या त्या भाषिकांनी अर्थ दिलेला असतो.

भाषेची विविध वैशिष्ट्ये सांगितली जातात ती पुढीलप्रमाणे–

१. ध्वन्यात्मकता/चिन्हात्मकता (Symbolic) : भाषा ही ध्वनींनी बनलेली असते तसेच चिन्हांनी बनलेली असते.

२. द्विस्तरीय रचना (Duality of patterning) : सांगितले जाते की, मानवी भाषेत ३० ते ४० मुलध्वनी असतात. मानवी भाषेचे दोन स्तर असतात. १. भाषेत वापरल्या जाणाऱ्या मुलध्वनींचा साठा मर्यादित असतो. २. या मुल ध्वनींची जुळणी भाषिक विषयाच्या आधारे करून आपण असंख्य रचना करू शकतो.

३. यादृच्छिकता (Aribitrariness) : सूर्याला सूर्य का म्हणायचे ? तर पूर्वी ठरवले म्हणून. एखाद्या वस्तूला हेच नाव का दिले? तर तसे म्हणावे वाटले म्हणून. त्यामुळे भाषेत कोणते शब्द का वापरले तर, 'सुरूवातीच्या वापरकर्त्याला वाटले म्हणून,' चिन्ह म्हणजे शब्द. आणि चिन्हित म्हणजे त्या शब्दाचा अर्थ यांचा कोणत्याही प्रकारे कार्यकारण संबंध नसतो. त्या त्या वेळी इच्छेने अर्थ दिला असेल. पुढेही माणूस इच्छेने अर्थ बदलतो. म्हणूनच भाषा यादृच्छिक असते. मानवाची भाषा सतत बदलते कारण इच्छेनुसार त्यात बदल होतात.

४. अदलाबदल/भूमिकांतर (Interchangeability) : दोन माणसे आहेत एकमेकांशी ती बोलत असतात, कधी तो बोलतो, तर कधी हा बोलतो. बोलत बोलत कितीतरी भाषिक रचनांची देवाण घेवाण ते

सहज करीत असतात. त्यामुळे माणसांची बोलताना अदलाबदल झाली तरी संवाद चालू राहतो. आपण इंग्रजी भाषा देवाण करतो, जरी ती आपली मूळ भाषा नसली तरी अनुकरण व शिकण्याने भाषितील नवीन नवीन शब्द आपण बोलत जातो. त्यामुळे भाषा ही अशी सार्वत्रिक होत जाते.

५. स्थलकालातीतता (Displacement) : भाषा ही स्थळ काळाच्या पल्याड जाते. एखादी गोष्ट समोर नसली तरी आपण भाषेतून उभी करत असतो. स्वर्ग आपण पाहत नाही, पण कल्पनेने भाषेद्वारे तो उभा करतो. आपण अनुभव सांगतो, आठवणी सांगतो. किंवा स्वप्न रंगवतो हे सर्व भाषेच्या सहाय्याने प्रत्यक्ष समोर वस्तू, व्यक्ती नसतानाही उभा करतो. उदा. सैराट चित्रपट पाहून आल्यावर त्याची कथा आपण पुन्हा पुन्हा भाषेतून दुसऱ्याला सांगत उभा करत असतो.

६. सामाजिकता (Social) : हे देखील भाषेचे वैशिष्ट्य आहे. भाषा आकाशातून आपण शिकत नाही. ती समाजातच आपल्या कानी पडते. कानावर पडणारे शब्द, ध्वनी मुल ऐकते. श्रवणशक्ती मात्र हवीच. ध्वनीचे अर्थ त्याला समाजातून माहित होतात. ध्वनी संकेत अर्थ कळण्यासाठी आई, बाबा, नातेवाईक, समाज, शिक्षक यांची त्यात मदत होते. जसे भाषिक पर्यावरण मिळते तसे मुल शिकते. माणूस या समाजात विविध भाषा शिकू शकतो. प्रत्येक भाषा या त्या त्या समाजाचा सांस्कृतिक वारसा असतो. पशु पक्षी आहे तोच आवाज पिढ्यान पिढ्या काढतात पण माणूस जिज्ञासू आणि बुद्धिमान असल्याने तो सतत भाषेत बदल करत राहतो.

७. सर्जनशीलता (Productivity) : माणसाला असंख्य ध्वनी निर्माण करता येतात. मानवी भाषेतले संदेशन हे केवळ त्याच्या त्या शब्दांनी होत नाही. नवनवीन शब्द आणि त्यांची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी याद्वारे भाषा प्रयोग केले जातात.

८. परिवर्तनशीलता : माणूस सतत नवे काही करतो तेव्हा तो सतत बदल घडवीत असतो. तो सतत नवनवीन क्षेत्र जाणून घेतो, प्रवास करतो, वेगवेगळ्या संस्कृतीशी त्याचा परिचय होतो. त्यातूनच नवनवीन शब्द त्याला मिळतात तसेच तो काही शब्द तयार करत राहतो. गरजेनुसार व स्थळ काळानुसार भाषेत बदल होणे अपरिहार्य आहे. शब्द संरचना आणि अर्थ यात बदल होत असतात. अनेक कारणांनी भाषेत बदल होतात म्हणूनच भाषा परिवर्तनशील आहे असे आपण म्हणतो.

९. संस्कृतीत संक्रमण भाषा आणि संस्कृती याचा जवळचा संबंध आहे. भाषा हे संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. भाषा ही आधीच्या पिढीकडून नव्या पिढीकडे संक्रमित होत असते. भाषेच्या माध्यमातून संस्कृतीचे देखील पुढच्या पिढीकडे वहन होते. विविध संस्कृती संपर्क आल्यामुळे संस्कृतीतील वेश, आहार, वस्तू, कला, साहित्य, दागदागिने यांचे आदान प्रदान होते. परभाषेतले शब्द स्वत:च्या संस्कृतीत येतात आणि पुन्हा त्या भाषेचे होऊन जातात. संस्कृतीचे जतन, संवर्धन व संक्रमण हे भाषेमुळे होते. ही सर्व भाषेची वैशिष्ट्ये आहेत.

संदेशाची देवाण घेवाण करणे हे भाषेचे मूळ कार्य आहे. माणूस समाजात राहतो त्यामुळे त्याची भाषा ही सामाजिक आहे. समाजातील विविध माणसांशी गरजेनुसार नातेसंबंध प्रस्थापित करण्यासाठी देखील

भाषेचा उपयोग होत असतो. मानवी साहित्य, कला, क्रीडा, ज्ञान, तत्त्वज्ञान, धर्म यामध्येही भाषेचा उपयोग माणूस करतो. रोमान याकबसन यांनी भाषेची सहा कार्ये सांगितली आहेत. तो संदेशन प्रक्रियेत सहा मुल घटक मानतो.

१. संदेशनात संदेश पाठविणारा (sender), २. संदेश ग्रहण करणारा (receiver), ३. संदेश पाठविताना असणारे भोवतालचे वातावरण (स्थळ काळ) (context) ४. संदेश पाठविणारा आणि घेणारा याचा संपर्क, ५. संदेश माध्यम code – भाषा आणि ६. संदेश (message) या घटकानुसार भाषेची कार्ये त्याने सांगितली.

उदा. १. प्रेषक : सांगणारा किंवा बोलणारा हा काहीतरी सांगतो, म्हणजे अविष्कार करतो. भावना विचार इत्यादी आविष्कृत करणे हे भाषेचे एक कार्य आहे.

२. ग्रहण करणारा : या ग्रहणकर्त्याच्या मनावर परिणाम घडवून आणणे हे भाषेचे दुसरे कार्य आहे.

३. परिसर / किंवा संदर्भनिष्ठ्ता : भाषा नुसते संदेश देत नाही तर सभोवतालच्या परिसराचे, स्थळ काळाचे वर्णनही करते. हवामान, व्यक्ती, वस्तू, स्थळ काळ याचे वर्णन करते. म्हणजेच संदर्भानुसार स्थळ काळाचे वर्णन करणे हे भाषेचे तिसरे कार्य आहे.

४. संपर्कनिष्ठा : प्रेषक आणि ग्रहणकर्ता यांच्यात संपर्क वाढविण्याचे चौथे कार्य भाषा करते.

५. अतिभाषात्मक कार्य : भाषेचा अभ्यास करण्यासाठी भाषेचाच उपयोग केला जातो. उदा. नाम. सर्वनाम इ. याला अतिभाषात्म कार्य असे म्हटले आहे.

६. काव्यात्म / सौदर्यात्मक कार्य : साहित्य निमिती करताना भाषेचे सौंदर्यात्मक कार्य होते.

ही ६ कार्ये भाषेची आहेत. संदेशाची देवाण घेवाण करणे हेच प्रमुख कार्य आहे.

भाषेचे स्वरूप व वैशिष्ट्ये आपण पूर्वीच्या अभ्यासात पाहिली आहेत. समाजभाषाविज्ञान या शाखेचा अभ्यास करण्यापूर्वी भारतात आणि पाश्चात्य देशात भाषिक अभ्यास कसा झाला हे समजून घेणे आवश्यक ठरेल. म्हणूनच येथे आपण संक्षेपाने भाषेचा पूर्वाभ्यास समजून घेऊन समाजभाषाविज्ञान ही पद्धती आणि त्यातील अभ्यासाचे स्वरूप समजून घेऊ. भाषा अभ्यासाचा आढावा घेणे इथे महत्त्वाचे ठरते.

## ३.३ विषय विवेचन

### ३.३.१ भाषेचा पूर्वाभ्यास

**भारतातील भाषा अभ्यास :** भारतात भाषेचा अभ्यास कधीपासून सुरू झाला या प्रश्नाचा शोध घेता संस्कृत भाषेमध्ये भाषाविषयक अभ्यास झाल्याचे आपणास आढळते. याबाबत रमेश वरखेडे म्हणतात, ''भारताच्या भाषेच्या पद्धतशीर अध्ययनाचा शास्त्रीय प्रयत्न स.स. पूर्व ७०० किंवा त्याच्या आधी झाला. वैदिक वाङ्मयाच्या अध्ययन प्रक्रियेतून भारतातील भाषाशास्त्राचा जन्म झाला. ब्राह्मण्ये, प्रतीशाखे, निघंटू, निरुक्त ही

वेदांगे, पाणिनीची अष्टाध्यायी आणि तिचे टीकाकार, भर्तुहारीचे 'वाक्यपदीय' 'हेमचंद्राचे हेमव्याकरण' अशी भाषा अभ्यासाची प्रदीर्घ परंपरा भारतात आढळते. (रमेश वरखेडे, समाजभाषाविज्ञान, प्रमुख संकल्पना, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, पहिली आवृत्ती १९९२, पान नं. ९) वरखेडे यांनी सांगितलेल्या ग्रंथात भाषेचा अभ्यास कसा झाला याचा परामर्श घेता असे आढळते की भारतात पूर्वी भाषा विज्ञान नावाने कोणतही शाखा अस्तित्वात नव्हती. वर्ण व स्वर यांच्या उत्पत्तीचे शास्त्र 'शिक्षा' या नवाने अस्तित्वात होते. ब्राह्मण्ये या ग्रंथाचा काळ म्याक्समुल्लरने इ.स. पूर्व ८०० ते ६०० असा सांगितला आहे. या ग्रंथात निगम (परिच्छेद वाक्ये) निघंटू (शब्द) आणि निरुक्त (स्पष्टीकरण, विश्लेषण) या प्रकारचा भाषिक अभ्यास आढळतो. प्रतीशाख्ये वेदाच्या अध्ययन प्रक्रियेतील उच्चार शुद्धीचा बारकाईने विचार मांडणारे शिक्षा ग्रंथ म्हणून प्रतीशाख्ये ओळखली जातात. वेदांचे व्याकरण सांगण्याचे काम प्रतीशाख्ये यांनी केले. निघंटू मध्ये वैदिक वाङ्मयातील शब्दांचे वर्गीकरण. कठीण शब्दांची नामावली आणि पर्यायी शब्दांचा संग्रह आढळतो. यास्काचार्याचे निरुक्त हा वैदिक भाषा अभ्यासातील महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. पूर्व षटक व उत्तरा षटक असे ग्रंथाचे दोन भाग आहेत. शब्द उत्पत्ती विषयक मीमांसा आणि वैदिक शब्दांचे विवरण पहिल्या भागात तर तर उत्तर षटकात भिन्न भिन्न देवतांची नावे याचे विवेचन आहे. भारतीय भाषा अभ्यासात भाषांचे व्याकरण लिहिणारे पणिनी, कात्यायन, पतंजली, भटोजी दीक्षित, भतृहरी, वररुची, हेमचंद्र सुरी हे होते. पाणिनीने ३९८३ सूत्रात संस्कृत भाषेचे पहिले व्याकरण लिहिले तो ग्रंथ म्हणजे अष्टाध्यायी हा होय. आठ अध्यायात व्याकरण मांडले म्हणून अष्टाध्यायी या ग्रंथास शब्दानुशासन असेही म्हणतात. शब्दांची रुपे कशी तयार होतात. शब्दांचे लहानात लहान घटक शोधून काढण्याचे काम अष्टाध्यायी या ग्रंथाने केले. कात्यायनाने १५०० वार्तिका लिहून समग्र पाणिनी व्याकरणाचे संशोधन केले. पतंजलीने महाभाष्य हा ग्रंथ लिहून पाणिनीच्या व्याकरणावर भाष्य केले. भटोजी दीक्षित याने सिद्धांत कौमुदी हा ग्रंथ लिहून पाणिनीच्या सूत्रांचे स्पष्टीकरण दिले. भर्तुहरीने वाक्यपदीय या अर्थ विचाराची विस्तृत मांडणी केली, वाक्य वादाचा सिद्धांत त्याने मांडला. हेमचंद्र याने प्राकृत भाषेतील शब्दांचे निरुपण करणारे व्याकरण लिहिले. सिद्धहेमशब्दानुसन असे त्या ग्रंथाचे नाव आहे. तसेच देशिनाममाला देशी शब्दांचा कोश तयार केला. वररूची यांनी देखील प्राकृत प्रकाश हा ग्रंथ लिहून प्राकृत भाषेचे व्याकरण मांडले. महाराष्ट्री प्राकृत ही भाषा महाराष्ट्राची नसून संपूर्ण देशाची असल्याचे त्यांनी सांगितले. थोडक्यात असे म्हणता येईल की शब्द अर्त संबंध, वाक्यप्रचार, व्युत्पत्ती, भाषा व्यवस्थेची नियमावली असा अभ्यास भारतातील या ग्रंथातून झाला आहे.

- **पाश्चात्यांचा भाषा अभ्यास**

भारतात ज्या प्रमाणे भाषा अभ्यास परंपरा आढळते तशी परंपरा समृद्धतेने पाश्चात्य देशात आढळत नाही. युरोपमध्ये अठराव्या शतकाच्या अखेरीस भाषेच्या शास्त्रीय अभ्यासाला प्रारंभ झाला. तत्पूर्वी सॉक्रेटीस, प्लेटो, अरिस्टॉटल यांनी काव्यशास्त्र विवेचन करताना शब्द, अर्थ व ध्वनीच्या वर्गीकरणाचे काम केले आहे. रुसो, कॅडीलॉक, जोहान हर्दन, जेनिश या अभ्यासकांनी अभ्यास केला पण तो नगण्य आहे.

सर विल्यम जोन्स यांनी कलकत्त्याच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या तिसऱ्या अधिवेशनात रविवार दिनांक २ फेब्रुवारी, १७८६ रोजी एक व्याख्यान दिले. या व्याख्यानात त्यांनी इंडो युरोपीय भाषाकुलातील

साधर्म्यासंबंधी निबंध सादर केला आणि ऐतिहासिक व तौलनिक भाषाविज्ञानाचा पाया घातला. जोन्स यांनी असे सांगितले की, संस्कृत, ग्रीक व लॅटिन या तीन भाषांचा अभ्यास करता त्यामध्ये साम्यस्थळे आढळतात. या तिन्ही भाषांची तुलना करता असे आढळते की, या तिन्ही भाषांची जनकभाषा एकच असावी. ही जनक भाषा आज मृत आहे. इतिहासात जाऊन प्राचीन भाषांचा अभ्यास करण्याची अभ्यास पद्धती म्हणजे ऐतिहासिक भाषाविज्ञान पद्धती ही अशाप्रकारे आपल्याला मिळाली. तसेच तीन भाषांची तुलना पाया जोन्सने घातला. जोन्सच्या या अभ्यास पद्धतीची एक परंपराच निर्माण होऊन फ्रांझ, बॉप, ग्रीम, रास्क, स्लाईसर, थिमे या अभ्यासकांनी ही परंपरा विस्तारीत केली. डार्विनच्या उत्क्रांतिवादी संकल्पनेमुळे भाषा कशा उत्क्रांत होतात असाही विचार सुरू झाला. माणसाच्या सुलभीकरण पद्धतीमुळे भाषेच्या मूळ रुपात कसे बदल होतात हे कळू लागले. ध्वनी परिवर्तन कसे होते त्याचे नियम शोधण्याचा अभ्यास सुरू झाला. भाषेचे कुळ शोधणे हा ही अभ्यास सुरू झाला. प्राचीन हस्तलिखिताचे काळ ठरविणे हा अभ्यास सुरू झाला. हस्तलिखितांचे अभ्यासासाठी फिलोलोजी हे शास्त्र पुढे आले. अशाप्रकारचा अभ्यास चालू असताना भाषेत होणारे बदल हे केवळ उत्क्रांतीनुसार होत नसून ते सामाजिक राजकीय क्रांतीने होतात. ही नवी दृष्टी अभ्यासकांना मिळाली. विसाव्या शतकाच्या प्रारंभी ऐतिहासिक भाषाविज्ञान मागे पडू लागले. ऐतिहासिक व तौलनिक भाषा अभ्यास पद्धतीच्या मर्यादा फेदीना द सोस्युर याने दाखविल्या. त्याने वर्णनात्मक किंवा एककालिक पद्धतीचा पाया घातला. त्याच्यापासून आधुनिक भाषाविज्ञान पद्धती सुरू झाली असे आपणास म्हणता येते.

### ३.३.२ आधुनिक भाषाविज्ञान

- **नवनव्या अभ्यास पद्धतीचे उपयोजन**

भाषेचे निरीक्षण करणे, तिच्या अंतर्गत संरचनेचा विविध पातळ्यावर शोध घेऊन काटेकोरपणे तिचे वर्णन करणे आणि त्यासाठी आवश्यक असणारे सिद्धांत मांडणे हे काम भाषेच्या आधुनिक अभ्यासात केले जाते. या प्रकारच्या वैज्ञानिक भूमिकेतून भाषेकडे पाहण्याची दृष्टी फेर्दिना द सोस्युर (१८५७ ते १९१३) या स्विस भाषेच्या अभ्यासकाने आपल्याला दिली आहे. रुप, व्यवस्था आणि संरचना या भाषेच्या अमूर्त संकल्पना या भाषेच्या अभ्यासकांना माहित झाल्या. सोस्युर यांनी एककालिक अभ्यासात भाषा संरचनेला स्थान दिले. सोस्सुर ने भाषाविज्ञान हे स्वतंत्र व स्वायत्त अभ्यासक्षेत्र असल्याची जाणीव निर्माण केली. सोस्युरच्या पूर्वी भाषेच्या ऐतिहासिक आणि तुलनात्मक अभ्यास केला जात असे. भाषा ही प्रवाही आणि परिवर्तनशील असली तरीही एका विशिष्ट कालबिंदूवरील भाषेच्या स्थितीचे वर्णन करणे हे भाषाभ्यासाचे उद्दिष्ट त्याने ठरविले. Course de linguistique हा ग्रंथ १९१६ मध्ये त्याच्या विद्यार्थ्यांनी सहकाऱ्यांनी प्रसिद्ध केला. या ग्रंथाने आधुनिक संरचनावादी भाषाविज्ञानाचा व चिन्हमिमांसेचा पाया घातला. भाषिक वर्तनामागे अचल किंवा स्थिर अशी भाषिक व्यवस्था असते असे त्याचे मत होते. भाषा एक चिन्हव्यवस्था असून ध्वनिरूप चिन्हक आणि अर्थरूप चिन्हीत यातील संबंधातून भाषिक चिन्ह अस्तित्वात येते. या चिन्हांची त्या त्या भाषेत एक व्यवस्था असते. भाषा ही एक चिन्ह व्यवस्था आहे. भाषा ही सामाजिक स्वरूपाची असते भाषिक चिन्ह (sign) म्हणजे ध्वनिरूप चिन्हक (signifier) आणि अर्थरूप चिन्हित (signified) यांच्यातील संबंध होय. या चिन्ह-चिन्हीत संबंधाची

नियम व्यवस्था म्हणजे भाषा हे प्रमेय सोस्यूर यांनी मांडले. सासेरने भाषिक वर्तनाला पारोल (parole) आणि भाषिक व्यवस्थेला लांग (langue) या संज्ञा वापरल्या. भाषिक वर्तन हे निरीक्षण योग्य असते तर भाषिक व्यवस्था ही अमूर्त असते असा भेद त्याने सांगितला. त्याच्या मते भाषिक व्यवस्था ही समरूप किंवा एकजिनसी (homogeneous) असते तर भाषिक वर्तन हे विषमरूप किंवा व्यक्तिविशिष्ट (heterogeneous) असते. व्यक्ती विशिष्ट भाषिक प्रयोगाचे नमुने गोळा करून त्या आधारे भाषिक नियम शोधून काढण्यावर त्याने भर दिलेला दिसतो.

या सिद्धान्ताजवळ जाणारा असा एक सिद्धांत नोम चोम्स्की याने मांडला. प्रत्यक्ष भाषिक प्रयोगाला तो भाषिक प्रयोग (linguistic competence) म्हणतो. मूर्ता अशा भाषिक प्रयोगामागे अमूर्त अशी एक भाषिक व्यवस्था असते. या नियम व्यवस्थेच्या आधारे आपण नवीन शब्द, नवीन वाक्यरचना शिकतो, आत्मसात करतो. या भाषिक नियम व्यवस्थेचे ज्ञान म्हणजे आपली भाषिक क्षमता असते असे तो म्हणतो. त्याचा हा सिद्धांत म्हणजे भाषिक क्षमतेचा सिद्धांत होय.

वर्तनवादी मानसशास्त्र दृष्टीने भाषिक वर्तन करणाऱ्या लेनार्ड ब्लूमफिल्ड (१९१३-३३) या अमेरिकन भाषा शास्त्रज्ञाने संरचनावादी भाषाविज्ञानाचा विस्तार केला आहे. भाषा ही भौतिक घटना आहे. तिचे वर्णन, वर्गीकरण, विश्लेण करता येते. भाषेतील नमुने गोळा करून भाषेतील स्वनीम निश्चित करणे, शब्दातील लघुतम घटक शोधणे, रूप कसे तयार झाले स्पष्ट करणे, वाक्याच्या संरचनेचे नियम शोधून काढणे ही त्याची अभ्यास पद्धती होती.

नोआम चोम्स्की या अमेरिकन भाषा वैज्ञानिकाने १९५७ साली सिंटेटीक स्टक्चर या ग्रंथात जनकसूत्री रचनांतरण वाद हा सिद्धांत मांडला. प्रत्येक भाषिक व्यवहारामागे एक अमूर्त नियम व्यवस्था असते. या नियम व्यवस्थेचे ज्ञान भाषिकाला असते. त्यामुळे त्यातील रचना सूत्राच्या आधारे तो अनेक वाक्य तयार करतो. मर्यादित स्वनिमांच्या आधारे जसे अर्थपूर्ण शब्द तयार करता येतात, तशी अनंत वाक्ये तो तयार करत असतो. जसे तू गावाला जाऊ नकोस, तू गावाला जातोस ? इ.

वरील भाषा विज्ञान पद्धतीत समाज निरपेक्ष अभ्यासावर भर आहे असे वरखेडे म्हणतात. भाषिक क्षमता किंवा व्यवस्था ही जर अमूर्त असेल तर ती मानसिक पातळीवर अधिक असते. आपण बोलतो तो सर्व भाषा व्यवहार हा सामाजिक संकेतसरणीने नियंत्रित असतो हे या पद्धतीने विचारात घेतले नाही. थोडक्यात भाषेची तांत्रिक बाजू सोस्यूर, ब्लूमफिल्ड व चोम्स्की यांनी विचारात घेतली. त्यामुळे भाषेच्या बहिरंगाकडे अधिक लक्ष झाले. समाजातून भाषा जन्मत: असल्यामुळे सामाजिक अंतरंग पाहणे आवश्यक ठरते. त्यामुळेच समाज भाषाविज्ञानाचा पुढे जन्म झाला.

● **उपयोजित भाषाविज्ञान**

समाजशास्त्र, मानसशास्त्र, मानसशास्त्र, मानववंश शास्त्र, माहिती विज्ञान यांच्या सहाय्याने भाषेचा आंतर विद्याक्षेत्रीय अभ्यास उपयोजित भाषा विज्ञानात झाला. शब्दकोश-निर्मितीशास्त्र, भाषांतर विद्या, भाषा शिक्षण,

भाषा नियोजन, शैली विज्ञान या क्षेत्रातील अभ्यास हे उपयोजित भाषा विज्ञानात मोडतात. मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून भाषेचा अभ्यास करणारी शाखा म्हणजे मनोवैज्ञानिक भाषाविज्ञान होय. भाषेची अभिव्यक्ति आणि आकलन यांचा अभ्यास या शाखेत होतो. सामाजिक व मानसिक घटकांचा विचार घेऊन भाषेचा अभ्यास पुढे होऊ लागला. यालाच समाजमनोवैज्ञानिक भाषाविज्ञान शाखा असे नाव देण्यात आले. मनोवैज्ञानिक भाषा विज्ञान ही संकल्पना १९५० च्या सुमारास आली. जॉर्ज मिलर आणि नोम चोम्स्की यांनी या शाखेची पायाभूत मांडणी केली.

विसाव्या शतकाच्या सुरूवातीला मायलेक ब्रेओल यांनी चिन्हार्थ विज्ञान (semantics) किंवा अर्थ विज्ञान ही अभ्यास शाखा सुरू केली. शब्द आणि वाक्ये यातील अर्थ मीमांसेला यात महत्त्व आले. मुख्यत: अर्थाचा विचार करणारी ही भाषा आहे. भाषेत वापरले जाणारे शब्द हे क्षेत्र विशिष्ट असतात. भाषेतील शब्द कोठून आणि कशासाठी आले त्यांना हाच अर्थ का मिळाला हे अर्थविज्ञान शाखेत अभ्यासले जाते. गणिती भाषा विज्ञान अशीही एक शाखा आहे. बोलींचा अभ्यास करणारी बोली विज्ञान एक स्वतंत्र शाखा आहे.

**२.३.३ समाजभाषाविज्ञान पार्श्वभूमी :**

या पूर्वीच्या अन्य लेखात समाजभाषाविज्ञान ही संकल्पना आपण समजून घेतली असली तरी या संकल्पनेचे स्वरूप आणि व्याप्ती सारांश रूपाने पाहणे योग्य होईल, कारण तिचा अन्य शाखाशी काय संबध आहे याचे सविस्तर विवेचन पुढे करणे सोपे जाईल.

१. फेर्दीना दि सोस्यूर यांनी भाषिक व्यवस्थेवर लक्ष केंद्रित केले होते. भाषा विचारात भाषेचे सामाजिक अंग जाणीवेने बाजूला ठेवले होते. भाषिक व्यवहाराचा विचार सर्व अभ्यासकांनी केला. पण भाषेच्या रचना, तांत्रिक बाजू, रूप याकडे त्यांचे लक्ष अधिक राहिले. समाजभाषांविज्ञानात एक नवी समाजसापेक्ष दृष्टी आपल्याला दिसते. समाजभाषाविज्ञान ही १९६० नंतर उदयास आलेली शाखा आहे.

२. एडवर्ड सपीर (१८४४ ते १९३९) बेन्जामिन ली वोर्फ (इस. १८९७ ते १९४१) डेल हार्सम्स, आणि मॅलीनोवस्की (१९८४ ते १९४२) या मानववंश विज्ञानातील अभ्यासकांनी भाषेच्या सामाजिक, सांस्कृतिक संबंधातील दखल घेऊन भाषेच्या जडण घडणीचा अभ्यास केला, यातील लेखनाचा आधार या अभ्यास पद्धतीस आहे. फिशमन, लेबोव, बर्नस्टीन यांनी समाजविज्ञान दृष्टीने भाषिक जडण घडणीचे स्वरूप तपासून पाहिले आहे.

३. सपीर - वोर्फ हायपोथेसिस म्हणून भाषिक सापेक्षवादाचा सिद्धांत समाजभाषाविज्ञानात प्रसिद्ध आहे. या दोघांनी ओरिझोना मधील होप भाषेचा मानववंशीय दृष्टीने अभ्यास केला. एडवर्ड सपीर याने भाषा व संस्कृतीच्या अन्तर संबंधाचा अभ्यास केला. एथ्नो लीन्वीस्टिक्स या ज्ञानशाखेचा पाया घातला. सपीरची मते पुढीलप्रमाणे आहेत.

अ) भाषानिरपेक्ष अनुभव संभवत नाही.

ब) वास्तव जग हे भाषिक आधाराने माणूस उभा करतो. मानवी अनुभव केवळ भौतिक विश्वाशी निगडीत नसून तो त्याच्या भाषिक उपोजन क्षमतेशी निगडीत असतो.

क) मानवी अनुभवविश्वावर लिंग, विभक्ती, काळ वा मापन वाचक शब्दांची सत्ता चालते. व्यक्तीच्या नेणिवेतील खरे जग हे भौतिक नसून भाषिक असते. समाजाच्या भाषिक सवयीनी मानवाचा जीवनविषयक दृष्टीकोन नियंत्रित होत असतो.

४. बेन्जामिन ली वोर्फ याने भाषिक सापेक्षवादाचा सिद्धांत मांडला. भाषेने व्यक्तीचा जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन तयार होतो असा त्याचा निष्कर्ष आहे. युरोपियन जगात काळ आणि गती याचे उल्लेख भाषेत सतत आढळतात. मात्र होपी या भाषेत काळ रहितता दिसते असे त्यांना आढळले. सपीर आणि वोर्फ या दोघांच्या सिद्धांताचे मर्म साररूपाने रमेश वरखेडे सांगतात -

१. भाषा ही समूहाची एकात्मक आणि अस्मिता यांची वैशिष्ट्यपूर्ण खूण असते.

२. मानवाचा जीवन विषयक दृष्टिकोन भाषेने नियंत्रित होतो.

३. समाजाच्या जीवनसरणीचा भाषेवर परिणाम होतो.

४. भाषेतून समाजाची घडण होते. (रमेश वरखेडे, समाजभाषाविज्ञान प्रमुख संकल्पना, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती १९९२)

मॅलीनोवस्की या मानववंश शास्त्रज्ञ प्राध्यापकाने दक्षिण पॅसिफिक समुद्रातील Trobriand या बेटातील आदिम संस्कृतीचा अभ्यास केला. त्याचा निष्कर्ष असा की आदिम जमातीत भाषा ही माणसाच्या वर्तनाची अंगभूत घयक होती. भाषा ही व्यक्तीच्या अनुभव विश्वाशी आंतरिक धाग्यांनी बांधली गेली आहे. बोलणे हे केवळ भाषण नसून भाषिक वर्तन असते. भाषिक कृती या भावभावनांशी निगडीत असतात. भाषा हा एक वर्तन प्रकार आहे, भाषाव्यवहार हा संदर्भाने होतो हे लक्षात घेऊनच भाषेचे वर्णन, विश्लेषण करावे हा त्याचा दृष्टीकोन आहे.

५. डेल हाईम्स यांनी संदेश वहन क्षमतेची संकल्पना मांडली. त्यामध्ये भाषा शिकताना कोण कुणाशी, कुठे, कशाविषयी बोलतो याच्याशी संबंधित सामाजिक नियमांचे ज्ञान आवश्यक ठरते ते त्याचे मत आहे.

वरील सर्व ५ मतांचा परामर्श घेता असे आढळते की, एककालिक अभ्यास पद्धती किंवा संरचनात्मक भाषा विज्ञानातील केवळ शब्द अर्थ तांत्रिक अभ्यासापेक्षा व्यक्तीचे अनुभवविश्व, त्याच्या बोलण्याचे सामाजिक संदर्भ. त्याचे वर्तन, सामाजिक संकेत, परंपरा इत्यादी त्याच्याशी निगडीत सामाजविन्वाचा आणि त्याच्या भाषेच्या संबंधाचा अभ्यास समाजभाषाविज्ञानात केला जातो. भाषेचा अभ्यास म्हणजे त्या समाजाचा अभ्यासच असतो. भाषेच्या वापराची सामाजिक प्रमाणके कोणती? त्यातील प्रतिष्ठीत संकल्पना कोणत्या? संदर्भानुसार व परिस्थितीनुसार एकाच भाषिक समाजात भाषिक भेद का आणि कसे अस्तित्वात असतात? सामाजिक संदर्भानुसार भाषा व्यवहार स्वरूप कसे असते? असा अभ्यास समाज सापेक्ष दृष्टीने समाजभाषाविज्ञानात केला जाते.

### ३.३.४ समाजभाषाविज्ञानातील अभ्यासाचे उद्देश व दिशा

१. भाषेला असणाऱ्या सामाजिक संदर्भाचा शोध घेणे. लिंग, धर्म, जाती, उपजाती, परंपरागत व्यवसाय, उद्योग, समजुती, अर्थिक स्तर, वर्ग, पारंपारिक आधुनिक कल्पना, असे वेगवेगळे भेद लक्षात घेऊन सामाजिक संदर्भाने भाषा अभ्यास करता येतो.

२. भाषेद्वारे व्यक्त केलेले विचार आणि सामाजिक संदर्भ तपासणे आवश्यक ठरते.

३. प्रत्येक समाजाची भाषा त्या समाजाशी संबंधित परंपरा, रूढी, समजूती, संस्कृती, व्यवसाय यामुळे समृद्ध बनते. या संदर्भाचा अभ्यास करणे ही एक अभ्यास दिशा असू शकते.

४. सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरण, भौगोलिक परिस्थिती आणि भाषा यांचे संबंध तपासणे. पर्यावरण बदलले की भाषेत बदल होतो हे शोधणे, तसेच धर्म, जाती, नोकरी वसतीस्थान आणि भाषिक प्रभाव संबंध पाहणे.

५. भाषेला सांस्कृतिक पार्श्वभूमी असते. समाजाला, प्रदेशाला विशिष्ट सांस्कृतिक परंपरा असते. संस्कृती जितकी प्राचीन तितके ऐतिहासिक, पौराणिक, साहित्यीक संदर्भ मिळतात. भाषेत ते कसे येतात त्याचा शोध घेणे आवश्यक ठरते.

६. समाजाला इतिहास असतो. ऐतिहासिक पायवाट पुढे हमरस्ता झालेली असते. त्यामुळे भाषा आणि इतिहास यांचा संबंध असतो. अनेक म्हणी, वाक्प्रचार आपल्याला इतिहासात मिळतात. इतिहास आणि भाषा यांचे संदर्भ तापसणे आवश्यक असते.

७. समाजव्यवस्था एक जीवन पद्धती असते. प्रत्येक जाती जमातीची जीवन पद्धती वेगळी आढळते. कुटुंब पद्धतीत असलेल्या अनेक बाबी आणि भाषा यांचा संबंध आढळतो. प्रत्येकाची समाजाची जीवन पद्धती आणि भाषा यांचा संदर्भ शोधणे.

८. समाजात उद्योग व्यवसाय असतात. त्यावरच जीवन चाललेले असते. आपल्या उद्योग व्यवसायानुसार आपली भाषा असते. प्रत्येक उद्योग हा भाषेला कितीतरी शब्द पुरवत असतो. म्हणून उद्योग आणि भाषा यांचे संदर्भ कसे ते पाहणे.

९. प्रत्येक समाजात धर्म आहे. समाजातील एक संस्था धर्म आहे. जन्मापासून मरेपर्यंत कितीतरी धार्मिक विधी होतात. त्या संदर्भाने मोठ्या प्रमाणात भाषा व्यवहार होतो. म्हणून धर्म आणि भाषायांचे संदर्भ शोधणे. भारतासारख्या विविधता असलेल्या बहुधार्मिक व बहु सांस्कृतिक देशात धर्म आणि भाषा यांचे संदर्भ हा अभ्यास करता येतो.

१०. ज्या समाजात भाषिक प्रयोग आणि भाषा आकलन यात सुसंवादित्व असते वा परस्पर मेळ असतो. त्या समाजाला भाषिक समाज म्हणतात. (रमेश वरखेडे २००१) एक भाषिक समाजाचा अभ्यास करणे, हा ही अभ्यास विषय होतो.

११. समाज भाषा विज्ञानातील भाषिक भांडार ही संकल्पना जॉन गम्परझ यांनी मांडली. प्रत्येक समाजाचे एक भाषिक भांडार असते (linguistic verbal), स्थळ काळ, लिंग, वेळ याचा विचार करून व्यक्ती शब्दांचा उपयोग करते. हिला संदेशन क्षमता म्हणतात. ती व्यक्तीच्या भाषिक भांडारावर अवलंबून असते. कोणत्याही समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केले तर वेगवेगळे पैलू आणि पातळ्या असणारे भाषिक भांडार त्या समाजात असते. हा समाजातील विविध बोलींचा कोश असतो. या शब्द भांडाराचा शोध घेणे आणि त्यांची सामाजिक संदर्भ तपासणे हा देखील अभ्यास विषय आहे.

१२. प्रत्येक समाजाचे भाषिक भांडार असते. समाजानुसार हे भिन्न भिन्न असते. समाजात विविध क्षेत्रानुसार भाषा असते. उदा. डॉक्टर यांच्या क्षेत्रातील भाषेत इंजेक्शन, गोळ्या, टॉनिक, सलाईन असे शब्द आढळतात. अशी कितीतरी लघुक्षेत्र समाजात असतात. गवंडी भाषा, पारधी भाषा, दलालाची भाषा, आडतीची भाषा ही सगळी लघुक्षेत्र आहेत. लघु क्षेत्राची संकल्पना जर्मन अभ्यासक श्मिट आणि रोर यांनी मांडली. प्रत्येक व्यक्तीचा गरजेनुसार विविध ठिकाणी संबंध येतो. उदा. विद्यार्थी कधी व्यायाम करतो, पोहायला जातो, कॉलेजला जातो, कधी शहरात जातो, गावात राहतो, मंदिरात जातो. जिथे जातो तिथे प्रसंगानुसार व संदर्भानुसार तो भाषा बदलत असतो. म्हणूनच संकल्पना क्षेत्र बदलले की व्यक्तीची भाषा बदलते. कारण बदललेला प्रत्येक संदर्भ म्हणजे एक लघु क्षेत्र असते. उदा. शिक्षण क्षेत्र, कृषी क्षेत्र, क्रिकेट, व्यापार क्षेत्र, न्यायालय क्षेत्र इत्यादी क्षेत्रे ही लघु क्षेत्रे असून तिथली भाषा वेगळी असते.

१३. भाषा बोलण्यासाठी असते. विचार व्यक्त करण्यासाठी ती वापरली जाते. भाषा किंवा बोली या व्यवहार करण्यासाठी वापरल्या जातात. भाषा ही एक व्यवस्था असते. भाषिक संरचना म्हणजे भाषेची व्यवस्था. असे असले तरी प्रत्येक व्यक्ती ही वैयक्तिक स्वरूपाचा भाषा व्यवहार करत असते.

उदा. जांभळे कशी दिलीत मावशी?

जांभळाचे एक माप कितीला ओ?

जांभळे कशी लावलीत?

या तिन्ही भाषिक प्रयोगात वैविध्य आहे. अशी अनेक वाक्ये बोलणारा तयार करत असतो. यालाच भाषिक प्रयोग किंवा व्यवहार म्हणतात. अशा प्रकारचे प्रयोग कसे केले जातात हा अभ्यासाचा विषय आहे.

१४. सततच्या परस्पर संपर्कामुळे भाषेत नवनवीन शब्द येतात आणि उत्तरोत्तर विविध शब्द वापरण्याचे ज्ञान माणसाला प्राप्त होत असल्याने व्यक्तीची संदेशन क्षमता वाढत आहे, त्यामुळे त्याच्या संवाद व्यवहाराचा विकास होत आहे. जागतिकीकरण झाल्यामुळे अनेक शब्द, अर्थ, संकल्पनांची देवाण घेवाण होत राहते. त्यामुळे भाषेत परकीय शब्द मोठ्या प्रमाणात येत आहेत. उदा. पुण्यात, मुंबईत राहणाऱ्यांची भाषेत अनेक परकीय शब्द, इतर अनेक भाषांशी येणारा संपर्क यामुळे भाषेत बदल होतात. भाषा संपर्काचा अभ्यास करणे हे देखील समाजभाषाविज्ञानाचे काम आहे. भाषा संपर्काचे काही प्रकार पुढील प्रमाणे आहेत. भाषा संपर्काचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

● **भाषा संपर्क प्रकार**

क) व्यक्ती बोली संपर्क : प्रत्येक व्यक्तीची भाषा अन्य व्यक्तीपेक्षा वेगळी असते. व्यक्तीच्या सवयी वेगवेगळ्या त्यामुळे बोलणे वेगवेगळे असते. प्रत्येक लेखकाची भाषाशैली आढळते, प्रत्येक लेखक कवी भाषा सर्जकतेने वापरतो. व्यक्ती बोली देवाण घेवाण होत असल्याने समाजाच्या भाषा प्रयोगात बदल होतात. बोलीचे देखील अनुकरण काही अंशाने होतच असते.

ख) भिन्न भिन्न बोलींचा संपर्क : एकाच भाषेच्या दोन भिन्न बोलीचा संपर्क येतो. उदा. सोलापुरी, नगरी, कोल्हापूरी, पुणेरी अशा अनेक बोलींचा संपर्क होतो. यातूनच कधी देवाण घेवाणीमुळे मिश्र भाषा जन्मते. या बोली एकाच भाषेच्या असल्यामुळे संवाद होत राहतो.

ग) देशान्तर्गत भिन्न भाषा संपर्क : देशातील अनेक महानगरात विविध प्रांतातून आलेल्या माणसांच्या मुळे विविध प्रादेशिक व भिन्न भाषेचा संपर्क होतो. आज मुंबईत उत्तरप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, कर्नाटक, आंध्र, तामिळनाडू, गुजरात, राजस्थान, पंजाब या प्रदेशातील कामगार, व्यवसायिक येतात. त्यामुळे मराठी भाषेशी त्यांचा संपर्क येतो. या संसर्गाने शब्द, वाक्य पातळीवर देवाण घेवाण होते. यातूनच द्वैभाषिक समाजाची निर्मिती होते. विविध कारणांनी भिन्न भाषांशी संपर्क वाढत आहे.

घ) परदेश-परकीय भाषा संपर्क : भारतात अनेक परकीय समूहांनी आक्रमण केले, त्यामध्ये इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच, मोगल इ. नी आपल्या देशातील अनेक प्रांत जिंकून आपली राज्यव्यवस्था इथे स्थापन केली. या जेते असलेल्या लोकांच्या भाषेचा व स्थानिक भाषांचा फारशीशी आलेला संपर्क, किंवा ब्रिटीशांच्यामुळे भारतीय प्रादेशिक भाषेत आलेला इंग्रजी भाषा संपर्क आपल्याला सांगता येतो. आजही जागतिकीकरणाच्या काळात अनेक भारतीय परदेशात विशेषत: अमेरिका, इटली, जपान, चीन, इंग्लंड या देशात ये-जा करतात. परदेशात कधी स्थायिक देखील होतात. त्यामुळे आपली व परकीय अशा दोन भाषा ते बोलतात. यामुळे द्वैभाषिक समाज अस्तित्वात येतो. आज प्रादेशिक पातळीवर हे मोठ्या प्रमाणात घडते. अशा एकमेकांच्या भाषा संपर्कामुळे भाषेतही बदल सतत होत राहतात. हा देखील समाजभाषाविज्ञानाचा विषय आहे.

च) द्वैभाषिकता आणि बहुभाषिकता : रमेश वरखेडे यांनी 'समाजभाषाविज्ञान' या ग्रंथात या संकल्पनेची व्याख्या केली आहे ते म्हणतात, ''एखादी व्यक्ती किंवा विशिष्ट प्रांतातील समाजगट दोन भाषेतून भाषा व्यवहार करतो. तेव्हा या प्रकारच्या संज्ञापन व्यवहाराला द्वैभाषिक (bilingual) म्हणतात.'' अशी व्याख्या नंदकुमार मोरे यांनी केली आहे. ''एखाद्या प्रदेशातील भाषिक समाज दैनंदिन व्यवहारामध्ये दोन भाषांचा आधार घेऊन व्यवहार करतो; त्या समाजाला द्वैभाषिक समाज म्हणतात. दोघांच्या व्याख्येतून दोन भाषांचा आधार घेत व्यवहार करणारा समाज हा द्वैभाषिक असतो असे म्हणता येते. कॅनडा हा द्वैभाषिक देश आहे. इथे इंग्रजी व फ्रेंच या दोन भाषेतून व्यवहार चालतो. तेथील शाळा महाविद्यालयात दोन्ही भाषेवर प्रभुत्व यावे यासाठी जाणीवेने द्वैभाषिक शिक्षण पद्धतीचा उपयोग केला जातो. जरी असे असले तरी सर्वसाधारणपणे द्वैभाषिक समाजात देखील एखाद्या भाषेवर जास्त प्रभुत्व व दुसरी कामकाजापुरती प्रसंगानुरूप व औपचारिक रित्या

वापरली जाते असे रमेश वरखेडे यांचे मत आहे. समाजभाषाविज्ञानात सामाजिक स्तर आणि दुसरी भाषा समजू शकतात पण लिहू किंवा बोलू शकत नाहीत. गरजेपुरता वापर करतात. महानगरीय संस्कृतीत द्वैभाषिक व्यवहार अटळ असतो असे त्यांचे मत आहे.

बहुभाषिकतेची व्याख्या संगताना रमेश वरखेडे लिहितात, ''एखाद्या व्यक्तीच्या किंवा समाजाच्या/ देशाच्या संज्ञापन व्यवहारात तीन किंवा त्याहून अधिक भाषांचा उपयोग केला जातो. तेव्हा अशा संज्ञापन व्यवहाराला बहुभाषिकता (multilingualism) म्हणतात. भारत हा बहुधार्मिक, बहुजातीय व बहुभाषिक देश आहे. भारत, मलेशिया, आफ्रिका, इस्रायल, सिंगापूर ही राष्ट्र बहुभाषिक म्हणून ओळखली जातात. भारतात तर शेकडो बोलीभाषा बोलल्या जातात. नंदकुमार मोरे यांना भारतीय बोली अभ्यासाच्या इतिहासात सर जॉर्ज ग्रीअर्सन यांनी राबविलेला 'भारतीय भाषा आणि बोली अभ्यास' हा प्रकल्प मोठा वाटतो. सर जॉर्ज ग्रीअसन यांनी इ.स. १८९४ ला प्रकल्प सुरू केला आणि सुमारे ३४ वर्षांनी १९२८ ला तो पूर्ण केला. बडोदा येथील भाषा संशोधन आणि प्रकाशन या संस्थेमार्फत संपूर्ण देशातील भाषा बोलींचा अभ्यास गणेश देवींच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. भारतीय भाषांचे सर्वेक्षण (peoples linguistic survey of indian languages) असे या प्रकल्पाचे नाव आहे. ७८० भाषा भारतात अस्तित्वात असल्याचे महत्त्वाचे निरीक्षण या प्रकल्पात नोंदवले आहे. हिंदी मातृभाषा असलेला प्रदेश वगळता भारतात बहुतांशी प्रदेशात इंग्रजी, हिंदी, आणि स्थानिक भाषा बोलतात. जवळपास राज्यातून तीन भाषा शिकवतात. स्थानिक भाषा, हिंदी भाषा आणि आंतरराष्ट्रीय अशी इंग्रजी भाषा अभ्यासक्रमात आढळते. अशा प्रकारे एकाहून अधिक भाषांचे उपयोजन कसे होते त्याचा अभ्यास हा समाज भाषा विज्ञानाचा विषय आहे.

छ) भाषाद्वित्व (Diaglossia) ही संकल्पना चार्ल्स फर्गसन याने मांडली. प्रत्येक व्यक्तीची भाषा किंवा बोली ही स्वतंत्र असते. या व्यक्ती बोलीची साधारण दोन रुपे असतात. एक म्हणजे मुक्त रूप ज्या मध्ये व्यक्ती अनौपचारिक बोलते. घरात, मित्रात किंवा दैनंदिन जीवनात स्वाभाविकपणे वापरली जाते ती बोली. अणि दुसरी म्हणजे औपचारिक बोली. पत्रव्यवहार, शासन व्यवहार अशा ठिकाणी लिखित किंवा मौखिक वापरली जाणारी बोली. जी बऱ्याचदा प्रमाणभाषा असते. समाजभाषाविज्ञानात याचाही शोध घेता येतो.

ज) भाषिक मिश्रण आणि परिवर्तन : समाजात नेहमीच एक भाषा दुसरीला भेटते आणि त्यांची देवाणघेवाण होते. आपल्या महाराष्ट्रात मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड, कोकणी, गुजराती आ कितीतरी भाषा एकत्र भेटतात. त्यामुळे या भाषेतले शब्द त्या भाषेत जातात येतात. त्यामुळे भाषा मिश्रण अटळ आहे. निरनिराळ्या कारणांनी भाषामिश्रण होत असल्यामुळे भाषेत जे बदल होतात तेथे भाषा परिवर्तन घडून येते.

उदा. काय यार, तुना साला बेवकूफ आहे. तुझ्या डोक्यात भुसा भरलाय, तुझा केमिकल लोच्या झालाय, जा हेड तपासून घे, नोंसेंस. यात हिंदी, इंग्रजी शब्द मिसळले आहेत. यालाच भाषिक प्रदूषण किंवा मिश्रण म्हणतात. हे मिश्रण कसे घडते ती पद्धती शोधणे हा एक अभ्यास आहे. पर संस्कृतीतील वस्तूंची नावे उदा. रेल्वे, पिझ्झा, ढोकळा, पोस्टमन, प्रशासन, व्यवस्थेतले शब्द. उदा. कलेक्टर, एडिटर इ. वाक्प्रचार उदा. हाय, हेलो, नाईस, सभ्यतेसाठी घेतलेले शब्द उदा. मिसेस, फादर, मदर इ.

झ) भावना आणि भाषा संबंध अभ्यास: भाषेचा जन्मच मुळी भावनेतून झाला. भावना किंवा विचार व्यक्त करण्यासाठी भाषा उपयोगात आणली जाते. माणसाच्या मनातील राग, प्रेम, द्वेष, मत्सर, भीती, असूया किंवा अन्य भावनांचा अविष्कार भाषेतून होत असतो. त्याचे डोके भडकले, त्याचे हात पाय गळले. त्याचे हृदय जळत होते. अशा वाक्य प्रयोगात भावना आढळतात. माणूस कधी नैसर्गिक व्यक्त होतो तेव्हा त्याच्या भावना मुक्त असतात. अशा भावना आणि ते व्यक्त करण्यासाठी वापरलेली भाषा यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करणे हे समाजभाषाविज्ञानाचे कार्य आहे. (अधिक माहितीसाठी, समाजभाषा विज्ञान आणि मराठी कादंबरी, हे नंदकुमार मोरे यांचे पुस्तक वाचावे).

त) संपर्क भाषेमुळे तयार झालेल्या भाषा निर्मितीचा अभ्यास: व्यापार उदीम किंवा अन्य कारणाने पूर्वी जगभरात व्यापारी वसाहती निर्माण झाल्या. उदा. पोर्तुगीज हे पोर्तुगालचे. त्यांनी हिंदी महासागर परिसरात काही बंदरे तयार केली. उदा. गोव्यात ते राहिले असतील तर त्यांचे तिकडून आलेले संत, अधिकारी, व्यापारी गुलाम यांचा संपर्क गोव्यातील मुळ स्थानिक नागरिकांशी आला. बराच काळ स्थानिक आणि ते एकत्र राहिल्यामुळे भाषेचे आदान प्रदान आहे. त्यातून एक व्यवहार उपयोगी नवीनच संकरित भाषा तयार झाली असणार, अशा संकरित भाषेला पिजिन भाषा किंवा वाणिज्य भाषा म्हणता येईल.

**● पिजिन भाषेची वैशिष्ट्ये :**

१. दोन भिन्न भाषिक समाज एकत्र आल्यानंतर एकमेकांचा व्यवहार सुकर होण्यासाठी दोन्ही भाषेतील गरजेपुरते शब्द घेऊन एक नवीनच संकरित भाषा कामचलाऊ म्हणून उपयोगात आणली जाते, तिला पिजिन भाषा म्हणतात.

२. पिजिन भाषा ही दोन्ही समाजाचीही मूळ भाषा नसते. त्यामुळे तिच्याशी कोणचेच भावनिक नाते नसते.

३. ही केवळ बोलण्यासाठी वापरतात लिहिण्यासाठी नाही.

४. या भाषेचे आयुष्य एका पिढी एवढेच असते.

५. पिजिन भाषेची शब्द मर्यादा मर्यादित असते.

६. पिजिन भाषा व्याकरणिक नियमांनी बद्ध नसते. त्यामुळे ती सुलभ असते.

७. या भाषेची गरज संपली तर तिचे अस्तित्व संपते.

८. पण हीच पिजिन भाषा ही सतत विविध क्षेत्रात वापरली गेली तर या भाषेतून बोलणारे यांचे भावनिक नाते दृढ होते. पुढे एका पिढीकडून दुसऱ्या पढीकडे ही भाषा संक्रमित होत होत तिच्या शब्द संग्रहात वाढ होते. तेव्हा तिची व्याकरण रचना सूक्ष्म बनते, परिणामी ती एखाद्या समाजाची मातृभाषाही होते, अशावेळी पिजिन भाषेपासून विस्तारलेल्या या भाषेला क्रिओल भाषा असे म्हणतात. पिजिन आणि क्रिओल भाषा कोणत्या त्याचाही अभ्यास समाजभाषाविज्ञानात केला जातो.

डॉ. वसंत खोकले यांनी मराठी भाषा क्रिओल भाषा हे प्रतिपादन केले आहे. आर्य आणि द्रविड यांच्यातील व्यापारी संबंधातून महाराष्ट्री ही वाणिज्य भाषा (पिजिन) उदयाला आली असे त्यांचे मत आहे.

**१५. स्त्री पुरुष भेद भाषा :** जगामध्ये माणसात स्त्री अणि पुरुष असे दोन भेद आढळतात. नर आणि मादी हे लिंग भेद निसर्ग निर्मित आहेत. स्त्रियांना समाजात कशा प्रकारचे स्थान आहे त्यावरून त्यांची भाषा ही पुरुषाहून वेगळी असल्याचे निदर्शनास आलेय. भारतात पुरुषप्रधान व्यवस्था असल्यामुळे स्त्रीला दुय्यम स्थान असते. त्याचा परिणाम तिच्याविषयी पुरुषाच्या भाषेत हेटाळणीचा सूर आढळतो. उदा. रांड हा शब्द नवरा मेलेल्या स्त्रीस वापरतात. तिला भोगदासी समजून काही शब्द पुरुषाच्या भाषेत येतात. तिला कुस्करली, चोळा मोळा केली, किंवा पायातली वहाण इ. त्यामुळे समाजात स्त्रीची तिच्या विषयीची वेगळी भाषा आढळते. त्याचा अभ्यास समाजभाषांविज्ञानात केला जातो.

१६. समाज आणि साहित्य भाषा : कोणत्याही समाजात मौखिक साहित्य आणि लिखित साहित्य आपल्याला आढळते. समाजाची बोलीभाषा आणि साहित्याची भाषा वेगळी असते. मौखिक भाषेत जिवंतपणा, नैसर्गिकता, रसरशीतपणा आणि ताजेपणा असतो. लिखित भाषा स्थिर असते. व्याकरण किंवा अन्य नियमांनी बद्द असते. भाषा ही सामाजिक संस्था आहे. समाजातूनच साहित्य निर्माण होते. व्यवहाराच्या भाषेपेक्षा साहित्याची भाषा ही जीवन्सापेक्ष, लवचिक आढळते. साहित्यात भावना, कल्पना असतात, अनुभव रोचकपणे मांडलेला असतो. साहित्यिक, भाषेची मोडतोड करून नाविन्यपूर्ण भाषा तयार करतात.

उदा. १. तुझी चाल तुरुतुरु, उडती केस भुरु भुरु, डाव्या डोळ्यावर बट ढळली.
जशी मावळच्या उन्हात, केवड्याच्या बनात नागीण सळसळली.

२. रुपेरी वाळूत माडांच्या बनात येना
चंदेरी चाहूल

३. डॉ. आंबेडकर यांच्या विषयी लिहिलेली अरुण काळेंची कविता,
तू मदर बोर्ड माझ्या संगणकाचा
आणि मल्टी मिडिया की बोर्ड
ही संगणक, ही मेमरी अन्
अपडेट प्रोग्रामही तूच दिलेला

वरील कवितेच्या भाषेत कवीने ज्या उपमा दिल्यात ही खास त्याची निवड आहे. पण या उपमा देखील समाजातीलच आहेत. त्यामुळे सामजिक-सांस्कृतिक संदर्भ घेतच साहित्य निर्मिती होत असते असे म्हणता येते. साहित्य भाषेचा अभ्यास करण्यासाठी समाजभाषाविज्ञान अभ्यास पद्धती उपयुक्त ठरते.

अशाप्रकारे समाजभाषाविज्ञान या शाखेत अभ्यास केला जातो.

● **समाजभाषाविज्ञान आणि समाजशास्त्र :**

आधुनिक काळात शास्त्रीय अध्ययन मोठ्या प्रमाणात होत आहे. जीवशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी. शास्त्रांचे वर्गीकरण प्रामुख्याने दोन प्रकारात केले जाते. १. नैसर्गिक किंवा भौतिक शास्त्रे (natural or physical sciences), २. सामाजिक शास्त्रे (social sciences) निसर्गातील भौतिक वस्तूंचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन केले जाते. तेव्हा ती नैसर्गिक शास्त्रे होत. वनस्पती शास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थ शास्त्र ही नैसर्गिक किंवा भौतिक शास्त्रे आहेत. समाजातील राजकीय पैलूंचा अभ्यास करणारे ते राज्यशास्त्र, मानवाच्या आर्थिक जीवनाचा अभ्यास करणारे ते अर्थशास्त्र. अशी समाजाच्या वेगवेगळ्या अंगांचा अभ्यास करणारी मानवशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, नीतिशास्त्र इत्यादी सामाजिक शास्त्रे आहेत.

समाजशास्त्र हे आधुनिक शास्त्र आहे. १९ व्या शतकात समाजशास्त्राच्या वस्तुनिष्ठ अभ्यासाला सुरूवात झाली. मानवी समाज हा प्राचीन असला तरी शास्त्रीय दृष्टिकोनाचा अभाव असल्यामुळे समाजाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास झाला नाही. समाजशास्त्र हा शब्द फ्रेंच समाजशास्त्रज्ञ ऑगस्ट कॉम्त (August comte) यांनी उपयोगात आणला. मानवाच्या सहयोगाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्राला कोम्त यांनी Sociology हे हे नाव दिले. August comte ने पोझीतीव्ह फिलोसोफी या ग्रंथाच्या चौथ्या खंडात Sociology या शब्दाचा उल्लेख केला. Sociology ही संज्ञा लॅटिन भाषेतील Socious आणि ग्रीक भाषेतील logas या दोन शब्दांनी मिळून बनलेली आहे. socious म्हणजे सहचर किंवा सवंगडी आणि logous म्हणजे शास्त्र किंवा सिद्धांत. Sociology म्हणजे समाजाचे विज्ञान किंवा शास्त्र... समाजशास्त्र, समाजाविषयीचे सामान्यज्ञान म्हणजे समाजशास्त्र, मानव आणि त्याचे पर्यावरण यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास यात केला जातो. मानवाच्या आंतरक्रिया आणि त्याची कारणे व परिणाम याचा अभ्यास यात होतो. १९ व्या शतकापासून मानवी समस्या व मानवी वर्तनाचा अभ्यास केला जात आहे. समाजशास्त्राचा उदय फ्रान्समध्ये झाला. समाजशास्त्र ही स्वतंत्र ज्ञान शाखा आहे. मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे हे पूर्वी सांगितले गेले आहे. १७८९ ला फ्रान्समध्ये सरंजामशाही नष्ट झाली. समाजाच्या सर्व पैलूचा अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली. सामाजिक वर्तनपद्धतीच्या अभ्यासाने मानवी आंतरक्रिया अधिक चांगल्या होतील अशी भूमिका August comte याने घेतली. यासंबंधी अनेक विध व्याख्यांच्या जंजाळात न पडता या शास्त्रात कोणत्या बाबींचा अभ्यास केला जातो तो आपण पाहू. १. मानवी समाजाचे अध्ययन, २. सामाजिक संबंधाचे अध्ययन, ३. सामाजिक समूहाचे अध्ययन, ४. सामाजिक क्रियांचे अध्ययन होते. समाजशास्त्राचे अभ्यास विषय पुढील प्रमाणे सांगता येतात.

१. सामाजिक संबंधाचा अभ्यास : (Social Relationship) या मध्ये व्यक्ती आणि दुसरी व्यक्ती यांच्यातील संबंध, व्यक्ती आणि समूह संबंध, समूह-समूह संबंध असा अभ्यास केला जातो.

२. सामाजिक समूह : सामाजिक संबंध हे समूहसमुहातून घडत असतात. सामाजिक समूहांचा अभ्यास करणारे शास्त्र हे समाजशास्त्र आहे.

३. सामाजिक संस्थांचा अभ्यास : समाजात कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, राज्यसंस्था, विवाह संस्था इत्यादी सामाजिक संस्था आहेत. या संस्थांचा परस्परांशी घनिष्ठ संबध असतो. सामाजिक संस्थांची रचना, कार्ये आणि विविध संस्थांचे परस्पर संबंध इत्यादी गोष्टीचा समाजशास्त्रात अभ्यास केला जातो. उदा. विवाह संस्था ही एक सामाजिक संस्था आहे. एकल विवाह ही बहु विवाह? या निमित्ताने निर्माण होणारे पती-पत्नी संबंध, विवाह करीत धर्म. जात, गोत्र, वंश, रक्तसंबंध यानुसार प्रत्येक समूहात वेगवेगळ्या प्रथा असतात. या प्रथांचा परस्पर संबंधाचा अभ्यास इथे केला जातो. धर्मानुसार विवाह पद्धती वेगवेगळ्या आहेत. हिंदू धर्मात तर अनेक जातींच्या अनेक प्रथा आहेत. बौद्ध पद्धतीचा विवाह, मुस्लीम विवाह पद्धती वेगळ्या आहेत. प्रत्येकाचे विधी वेगळे. अशाप्रकारे विविध सामाजिक संस्थांचा अभ्यास करता येतो.

४. सामाजिक प्रक्रियांचा अभ्यास : व्यक्ती व्यक्तीच्या संपर्कातून आंतरसंबंध निर्माण होतात. त्यांच्या आंतर संबंधातून सामाजिक प्रक्रिया घडून येतात. सहकार्य, समायोजन, स्पर्धा, संघर्ष इत्यादी प्रक्रियांचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो.

५. सामाजिक परिवर्तन : समाज हा स्थिर नाही, समाजात विविध कारणामुळे परिवर्तन घडत असते. सामाजिक परिवर्तनामुळे सामाजिक संबंध, सामाजिक संस्था, समाजरचना यात बदल घडून येत असतो. सामाजिक परिवर्तनामुळे भूमिका, प्रमाणके, मुल्ये यातही बदल घडतो.

६. सामाजिक नियंत्रण : प्रत्येक व्यक्तीच्या भावना, विचार, आकांक्षा या वेगवेगळ्या असतात. प्रत्येक व्यक्तीला आपल्या मताप्रमाणे वर्तन करावे वाटते. पण प्रत्येक व्यक्ती आपल्या मनाला वाट्टेल तशी वर्तन करू लागली तर समाजात गोंधळ निर्माण होईल. हे लक्षात घेऊनच समाज लोकरूढी, लोकनीती, परंपरा, धर्म, कायदा इत्यादी निर्माण करून माणसावर नियंत्रण ठेवणे. प्रत्येकाने सामाजिक कायदा, रिती रूढी पाळूनच आवश्यक इच्छा पूर्ण कराव्यात ही अपेक्षा असते. म्हणूनच सामाजिक नियंत्रण हे समाजात होत श्रअसते. आपल्याकडे हिंदू कायदे, मुस्लीम कायदे, धर्म कायदे, भारतीय कायदे, सामाजिक नियंत्रण करत असतात.

७. सामाजिक समस्या : समाजात वैयक्तिक आणि समूहाच्या विघटनातून विविध समस्या निर्माण होत असतात. या सामाजिक समस्याचे समाजशास्त्रीय दृष्टीने समाज शास्त्रात अध्ययन केले जाते.

८. सामाजिक नियोजन : आर्थिक नियोजनाप्रमाणे सामाजिक नियोजन देखील केले जात असते. समाजात अधिक चांगला बदल घडविण्याचे दृष्टीने समाज काही निर्णय घेऊन भविष्य चांगले होण्यासाठी नियोजन करीत असतो. समाजाची पाण्याची गरज कायमस्वरूपी भागावी म्हणून समाज आपल्या परिसरातील ओढ्या नाल्यावर बंधारे बांधतो, जल युक्त शिवाय कार्यक्रम करतो हे उद्याच्या शाश्वत सुखासाठीच करत असतो. जात पंचायतीद्वारे समाजातील चुकीच्या प्रथांची जाणीव समाजाला झाली तर प्रथेत हिताचे बदल केले असतात. हे एक प्रकारचे चांगले नियोजन असते. अपंग व्यक्ती जन्मास येऊ नये म्हणून पोलिओमुक्त थेंब बालकास दिले जातात. हे एक प्रकारचे नियोजन असते. समाज अशा कोणकोणत्या गोष्टीवर नियोजन करीत असतो हा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो.

९. नैसर्गिक, सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरण कसे आहे याचा परिणाम जीवनावर होत असतो. नैसर्गिक आपत्तीमुळे जनजीवन विस्कळीत होते, पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे समाजाच्या पर्यावरणात बदल होत आहे. भिन्न संस्कृती भाषा याचाही प्रभाव पडत आहे.

असा अभ्यास समाजशास्त्रात होतोच. पण कुटुंब, सामाजिक दर्जा, भूमिका इत्यादी विविध विषयाचा अभ्यास समाजशास्त्रात होतो. समाजशास्त्राच्या ग्रामीण, नागरी, राजकीय, औद्योगिक समाजशास्त्र, सामाजिक मानवशास्त्र, अपराध शास्त्र, धर्माचे समाजशास्त्र इत्यादी विविध शाखा आहेत. समाजशास्त्र आणि मानवशास्त्र, समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र, समाजशास्त्र आणि मानसशास्त्र, समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र, समाजशास्त्र आणि इतिहास, समाजशास्त्र आणि समाजकार्य यांचे जवळचे संबंध आहेत.

समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पनांना विचार करता आपणास असे आढळून येते की,

समाज हा शब्द वेगवेगळ्या अर्थाने वापरला जातो. उदा. हिंदू समाज, जैन समाज, गोसावी समाज, डोंबारी समाज, इत्यादी यावरून निष्कर्ष निघतो की, कधी कधी धर्मावरून, कधी जाती किंवा जमाती वरून, तर कधी देश प्रांतावरून, कधी लिंगावरून सुद्धा समाज म्हटले जाते. पण समाजशास्त्र समाजाची अशी व्याख्या करत नाही.

मानवा मानवामधील परस्पर संबंधाची व्यवस्था म्हणजे समाज होय. यावरून मानवी किंवा सामाजिक संबंध समाजात महत्त्वाचे असतात. सामाजिक संबंधाचे जाळे म्हणजे समाज होय. व्यक्तीच्या परस्पराविषयीच्या अस्तित्वाच्या जाणीवेतून निर्माण होणाऱ्या सामाजिक संबंधाना सामाजिक संबंध म्हणतात. परस्पर अस्तित्वाची जाणीव महत्त्वाची आहे. यामुळे व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह आणि समूह-समूह यात परस्परीक क्रिया होतात. यांनाच आपण आंतरक्रिया असे म्हणतो. पती-पत्नी, आई-मुलगा, मित्र-मित्र, शिक्षक-विद्यार्थी यात जे संबंध असतात हे स्थायी संबंध असतात. एस.टी. मध्ये बसल्यावर काही काळ आपला इतरांशी संबंध येतो. त्याला अस्थायी संबंध असे आपण म्हणतो. सामाजिक संबंध निर्माण होण्यासाठी दीर्घकालीन स्वरूपाचे संबंध आवश्यक असतात. व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह किंवा समूह-समूह यांच्या दीर्घकाळ एकत्र येण्याने सामाजिक संबंध निश्चित होतात. पती-पत्नीचा संबंध हा स्थायी स्वरूपाचा संबंध आहे. समाज हा व्यक्तींचा केवळ समूह नसून ती परस्पर संबंधाची व्यवस्था असते. स्थिर व सातत्यपूर्ण संबंध हे समाजाचे वैशिष्ट्य आहे. विशिष्ट प्रकारचे वर्तन, सामान्य भूभाग, सामान्य जीवनपद्धती, परस्परात आपले पणाची भावना, समान सवयी, कल्पना, अभिवृत्ती, समूह भावना ही समाजाची वैशिष्ट्ये ठरतात. डॉ. प्रदीप आगलावे म्हणतात, ''समाज ही संकल्पना अमूर्त आहे. समाजाचे स्वरूप स्पष्ट करणारी वैशिष्ट्ये सर्वसाधारण पुढीलप्रमाणे आहेत. १. सामान्य भूभाग, २. विशाल समूह, ३. लोकांचा समूह, ४. सामाजिक आंतरक्रिया, ५. स्थायित्व, ६. आत्मनिर्भरता, ७. सामान्य जीवन पद्धती, राजकीय स्वातंत्र्य, ''(डॉ. प्रदीप आगलावे मानसशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, तिसरी आवृत्ती ऑगस्ट २०१०, पान नं. ४६) यावरून समाजाचा निश्चित भूप्रदेश असतो. प्रजोत्पादन समाजात होत असते आणि त्याद्वारे समाजातील सदस्यांची संख्या वाढते. स्वतंत्रता हे एक समाजाचे वैशिष्ट्य आहे. समाजाच्या गरजा कोणत्या? हा प्रश्न उपस्थित केल्यास समाज का जगतो हे आपल्याला कळते. १. समाज

अस्तित्वासाठी जीवाचे जतन केले पाहिजे. त्यासाठी जीवंत राहण्यासाठी अन्न, हवा, पाणी हे जीवाच्या पोषणासाठी आवश्यक आहे. जीवाच्या किंवा लोकांच्या संरक्षणासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. थंडी, उष्णता, वादळ, पाऊस यांच्या पासून तसेच हिंस्र पशुपक्षी इतरापासून जीवाचे संरक्षण आवश्यक गरज आहे. जीवाचे उत्पादन हेही आवश्यक, म्हणूनच जीव पोषण, जीव संरक्षण व जीव उत्पादन ही शाश्वत गरज आहे. २. त्या समाजातील कार्य करण्यासाठी सहकार्य व कौशल्य प्राप्त करण्याची गरज आहे. समाजाच्या सदस्यांच्या गरजा पाहून कार्य विभागणी व सहकार्य याची गरज असते. ३. समाजाची तिसरी गरज म्हणजे ऐक्य भावना राहिलीच पाहिजे असे काम करणे. समाजाचे ऐक्य दृढ राहील असे कार्यक्रम घेणे. ४. समाजाचे सातत्य टिकविण्याची गरज महत्त्वाची आहे. समाजाची निरंतरता राहण्यासाठी समाजाने काही यंत्रणा विकसित केल्या पाहिजेत.

समाजशास्त्राची इतकी माहिती घेतल्यानंतर आपण समाजभाषा विज्ञान आणि समाजशास्त्र यांचा संबंध काय आहे ते समजावून घेऊ. एक म्हणजे समाजात असणाऱ्या इतर अनेक संस्थांपैकी भाषा ही अत्यंत महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. समाजातले बहुसंख्यांक व्यवहार भाषेच्या द्वारा होतात. सामाजिक जीवन काय आहे आणि कसे आहे हे पाहण्यासाठी भाषांचा संदर्भान्वित वापर कसा केला जातो हे पाहणे आवश्यक आहे.

**● समाजशास्त्र आणि समाजभाषाविज्ञान :**

मानवा मानवातील परस्पर संबंधाचा अभ्यास समाजशास्त्र करते. समाजभाषाविज्ञान सामाजिक संदर्भ घेऊन भाषेचा अभ्यास करते. भाषेला असलेल्या सामाजिक संदर्भाचा शोध घेणे हे समाज भाषा विज्ञानाचे उद्दिष्ट आहे.

व्यापक समाजाचा अभ्यास करणारे समाजशास्त्र आहे, तर एमिल ड्युरखाईम यांनी समाजव्यवहाराचा अभ्यास करावयाचा असेल तर व्यवहारातील वैयक्तिक अंश काढून टाकून व्यवहारामागच्या स्थिर आणि सार्वत्रिक व्यवस्थेकडे लक्ष केंद्रित करावे असे मत मांडले होते. भाषेच्या सामाजिक अंगाचा विचार भाषा विज्ञान करते. समाजभाषाविज्ञान ही समाज सापेक्ष दृष्टी असून समाजातील विविध वर्ग, त्यांच्या बोलीभाषा, विविध वर्गातून आलेल्या मिश्र भाषा, काळ आणि अवकाशानुसार बदलत जाणारी भाषिक रुपे, समाजातील संपूर्ण भाषिक व्यवहाराचा अभ्यास समाजभाषाविज्ञानात होतो.

व्यक्ती समाजात वाढते. व्यक्तीला सामाजिकीकरण होताना भाषा संदर्भासहित माहिती होत जाते. परंपरा, रूढी, श्रद्धा, समजुती, व्यवसाय, सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरण, अन्य भाषेचा प्रभाव, ऐतिहासिक संदर्भ, पौराणिक संदर्भ, धार्मिक संदर्भ, राजकीय संदर्भ, जीवनपद्धती, उद्योग व्यवसाय, एक भाषिक किंवा द्वि भाषिक समाज, भाषिक भांडार, भाषेची लघु क्षेत्रे, व्यक्ती-बोली संपर्क, स्व भाषा आणि परभाषा यांच्या संपर्काने झालेल्या भाषिक बदलाचा आवाज, भाषेत सतत होत जाणारे बदल, भाषा आणि भावना, विविध भाषिक दृष्टीकोन, साहित्य भाषा इत्यादी सामाजिक संदर्भाचा अभ्यास केला जातो.

'भाषा व्यवहार आणि सामाजिक संरचना यात परस्पर संबंध आहेत. लौकिक जीवनात भाषेचा उपयोग

हा केवळ व्याकरणीक नियमांनी होत नाही, तर सामाजिक संकेत घेऊनच भाषा बोलली जाते, याचा अर्थ असा भाषेचा अभ्यास हा समाजाचा अभ्यास असतो. समाजभाषाविज्ञान समाजघटकातील संदर्भांचा अन्वय लावत भाषेचा अभ्यास करते. म्हणूनच समाजभाषाविज्ञान व समाजशास्त्र हे परस्परावर अवलंबून आहे. भाषा आणि समाजातील आंतरसंबंधाचा अभ्यास समाजभाषा विज्ञान करते. समाजात असणारे उच्च, मध्यम व कनिष्ठ वर्ग, स्त्री आणि पुरुष, ग्रामीण लोक आणि शहरी लोक, आदिवासी लोक, विविध व्यवसाय करणारे लोक, जिंकलेले आणि पराजित झालेले लोक असे स्तर आपल्याला दिसतात. या सर्वांची भाषा एकच नसते. प्रत्येकाचे वेगळेपण असते. त्यामुळे सामाजिक विविध स्तरानुसार भाषिक संकेत देखील वेगवेगळे असू शकतात. शब्द वेगळे असतात. त्यांचे संदर्भ भाषाविज्ञान शोधते. त्यामुळेच समाजशास्त्रात समाजातल्या घटकांचा आणि परस्पर संबंधाचा अभ्यास होतो, तसाच अभ्यास समाजभाषाविज्ञान भाषेचे सामाजिक संदर्भ लक्षात घेऊन करते. समाजभाषा विज्ञानास समाजशास्त्र मदत करते. तर भाषेचा अभ्यास सामाजिक संदर्भाने केल्यास समाज घटकांची उकल होते. भाषा आणि शिक्षण, भाषा आणि राजकारण, भाषा आणि सामाजिक जडणघडण, भाषा आणि साहित्य अशा विविध अंगांनी भाषेच्या कार्याचा वेध घेतला जातो. भाषावार प्रांत रचना, भाषिक अल्पसंख्यांक दबाव गट, एक राष्ट्र, एक भाषा, एक लिपी या संदर्भातील प्रश्न किंवा शासन व्यवहाराची भाषा शिक्षणाचे माध्यम किंवा अलिकडेच हिंदी भाषा हा द्वितीय भाषा असावी हा केंद्र सरकारचा प्रस्ताव आणि त्या विरुद्ध दक्षिण भारतात होत असलेला विरोध या प्रश्नांचा शोध देखील सामाजिक संदर्भ घेत समाजभाषा विज्ञानात घेतला जाऊ शकतो. या संदर्भात भाषिक संघर्षाचे समाजशास्त्र हे रविंद्र केळेकर यांचे पुस्तक अवश्य वाचावे. रविंद्र केळेकर म्हणतात ''भारतवर्ष ही समाजशास्त्राची एक मोठी प्रयोगशाळा आहे. समाजशास्त्राचे कोणतेही अंग शिकायला या सारखा दुसरा देश जगात सहसा मिळायचा नाही. धर्माचे समाजशास्त्र शिकावयाचे असल्यास समाजशास्त्राच्या विद्यार्थ्याला याच देशात यावे लागेल. निरनिराळे मानववंश एकेच ठिकाणी येऊन राहिले तर काय व्यवस्था करणे योग्य आहे, हे बघायचे असल्यास याच देशात येऊन पहावे लागेल. ''(रविंद्र केळेकर, भाषिक संघर्षाचे समाजशास्त्र, राजहंस वितरण पणजी, प्रकाशन क्रमांक ८७३, पान नं. १४)

केळेकर यांनी समाजभाषाविज्ञानास भाषेचे समाजशास्त्र असे म्हटले आहे. बोली आणि भाषा यांची माहिती देताना ते समाजभाषाविज्ञान दृष्टीने लिहितात, ''माणूस बोलतो तो त्याला जे काय सांगायचे असते ते दुसऱ्याला कळावे म्हणून प्रत्येकाची बोलण्याची एक विशिष्ट अशी लकब असते. प्रत्येकाचा उच्चार वेगळा असतो. शब्द वापरण्याची आणि वाक्य घडविण्याची शैलीही प्रत्येकाची निराळी असते. पण एकच भाषा बोलणाऱ्या दोघांची लकब जरी वेगवेगळी असली तरीही दोघेही एकमेकांना समजावे म्हणूनच बोलत असतात. एकमेकांना समजावे, समजावून द्यावे म्हणून माणूस जे प्रयत्न करतो त्यातूनच त्याची भाषा उदयाला येते. माणूस हा एक सामाजिक प्राणी आहे. तो समाजातच राहत आलेला आहे. जी माणसे मिळून मिसळून राहतात त्यांचा एक समाज बनतो. त्याची भाषाही एक असते. पण माणसाचे एक वैशिष्ट्य आहे. जात, धर्म, धंदा वगैरे भेदाभेद त्याला एकाच समाजात राहून देखील एकमेकांपासून दूर ठेवतात. त्यामुळे एकच भाषा बोलणाऱ्या लोकांमध्ये थोडा थोडा भाषिक भेद निर्माण होतो. भाषा विज्ञान हा भाषिक भेदांना वर्गबोली-क्लास डायलेकटस् या नावाने ओळखते. पुन्हा, एकच भाषा बोलणारी माणसे निरनिराळ्या गावात राहत असतात. आणि एकमेकांपासून दुरही असतात.

त्यामुळे गावागावाच्या भाषेतही फरक पडतो. याना भाषा भेदांना भाषाविज्ञान प्रादेशिक बोली-रिजनल डायलेकटस् या नावाने ओळखते. एकाच भाषेच्या या निरनिराळ्या जातीय, वर्गीय, किंवा प्रादेशिक बोली बोलणारे लोक ज्या प्रमाणात एकमेकांच्या जवळ येतात. त्या प्रमाणात त्यांच्या बोलीमध्ये अंतर कमी होते. ज्या प्रमाणात ते एकमेकांपासून दूर राहतात त्या प्रमाणात त्यांच्या बोलीमधले अंतर कायम राहते. हे अंतर कमी करण्यासाठी त्या बोली बोलणाऱ्या लोकांचे सतत इंटरक्शन अन्योन्य क्रिया होत राहणे नितांत आवश्यक असते. त्यांचा एकमेकांवर प्रभाव पडत राहणे जरूरीचे असते. या निरनिराळ्या बोलीपैकी कुठलीतरी एक बोली काही कारणामुळे प्रतिष्ठा पावते. तिला मग आपण भाषा म्हणतो. बोली म्हणजे भाषा सागरावर उसळणाऱ्या लाटा, प्रत्येक लाटेची धाव बारा कोस असली तरी या बोलीपैकी जी भाषा बनते ती स्वत:त बाराशे चौरस कोसाचा प्रदेश सामावून घेते.'' (रविंद्र केळेकर, भाषिक संघर्षाचे समाजशास्त्र पान नं. ७)

समाजभाषाविज्ञानात बोलीविज्ञान अभ्यास ही महत्त्वाचा आहे. सामाजिक बोली विज्ञानात वर्ग, वय, जात, वंश, धर्म यासारख्या कारणांनी परस्परांच्या भाषेच्या आकलनात पडणारे अंतर आणि अडथळे यांचा विचार केला जातो. उदा. गवंड्याची भाषा, शेतकऱ्यांची भाषा, ब्राह्मणाची भाषा, बिल्डरची भाषा, उच्च लोकांची भाषा, दलित जातीतील भाषा, यातल्या बोलींचे वेगळेपण आपणास जाणवते. समाजातील स्थितीचा प्रभाव व्यक्तीच्या भाषेत येत असतो, हे आपल्याला सामाजिक संदर्भ समजून घेऊन अभ्यास केल्यानेच कळते. व्यक्ती समूह-समाज यांचे आंतरसंबंध आणि भाषा असा अभ्यास केल्यास भाषाभ्यास अधिक उपयोगी ठरतो असे आपणास म्हणता येते.

**● समाजभाषाविज्ञान आणि मानववंशशास्त्र :**

उत्खननामध्ये सापडणाऱ्या अस्थी अवशेषांचा म्हणजे हाडाचा अभ्यास करून मानव वंश कसा कसा विकसित होत गेला याचा अभ्यास ज्या शास्त्रात केला जातो त्याला ''मानववंशशास्त्र'' म्हणतात. मानवाच्या उत्क्रांतीचा अभ्यास केला जातो. मानवाचे पूर्वज, त्याची स्वभाववैशिष्ट्ये, मानवी वागणूक, मानवी समुदायातील भिन्नता व वेगळेपण, मानवी उत्क्रांतीचा समाजबांधणी व संस्कृतीवर परिणाम यांसारख्या विषयांचा अभ्यास मानववंशशास्त्रात केला जातो. हा अभ्यास करताना मानवाचा उगम, भौतिक वैशिष्ट्ये, रीती, भाषा, परंपरा, वस्तुसंचय तसेच सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक श्रद्धा व पद्धती आदी विषयांचा समावेश होतो. समाजशास्त्र, विकास, अर्थशास्त्र, गुन्हेविषयक मानसशास्त्र व कायदेव्यवस्था, स्त्री-पुरुष समानता या सर्वात मानववंशशास्त्राचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो.

मानववंश शास्त्र किंवा मानववंश विज्ञान हे माणसाच्या विविध जाती जमातीच्या आदिम संस्कृतीचा अभ्यास करणारे क्षेत्र आहे. मानवाच्या प्राचीन, सांस्कृतिक स्थितीचा अभ्यास इथे केला जातो. अमेरिकेत भाषेचा अभ्यास प्रारंभी मानववंश अभ्यासकांनी केला. कोणत्याही विशिष्ट समाजाच्या आदिम संस्कृतीचा अभ्यास करताना त्याच्या भाषेचा अभ्यास करणे आवश्यक असते. कारण कोणताही समाज आणि संस्कृती ही भाषेद्वारे पुढच्या पिढीला कळत असते. संस्कृतीचा अभ्यास करायचा असेल तर भाषेचा अभ्यास करणे मानववंश शास्त्रज्ञ यांना गरजेचे वाटले. एखाद्या समाजाच्या रीतीरिवाजाचा अभ्यास करायचा असेल तर, त्या संदर्भात

भाषेत काय काय साठवून ठेवले आहे हे पहावे लागते. प्राचीन संस्कृतीचा शोध घेताना आपण मौखिक साहित्य अभ्यासून त्याचे संदर्भ समजून घेत असतो. म्हणजे अभ्यास करण्यासाठी भाषिक पुरावे महत्त्वाचे ठरतात. मानववंश शास्त्र आणि भाषा असा जोडून अभ्यास करायचा प्रयत्न प्रथम अमेरिकन भाषा अभ्यासक फ्रान्झ बाओज (१८५८ ते १९४२)यांनी केला. या अभ्यासाविषयी डॉ. नंदकुमार मोरे म्हणतात, ''भाषाभ्यासामध्येही विशिष्ट समाजातील भाषेचे स्वरूप समजून घेताना भाषेला असणारा सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ तपासावा लागतो. कारण भाषेचे कार्य सामाजिक, सांस्कृतिक, संदर्भयुक्त असते. त्यामुळे बहुतांश वेळा भाषाभ्यासासाठी मानववंश शास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. सामाजिक वर्तन अभ्यासण्यासाठी त्या समाजातील प्रत्येकाचे वर्तन समजून घ्यावे लागते. व्यक्तीच्या बोलण्याचा संदर्भ तपासणे यासाठी आवश्यक ठरते. हे संदर्भ त्या व्यक्तीच्या समाजातील सामाजिक व्यवस्थेने नियंत्रित असतात. यासाठीच मानववंश शास्त्राला भाषाविज्ञानाचा आधार घेऊन अभ्यास करावा लागतो.'' (डॉ. नंदकुमार मोरे, समाजभाषा विज्ञान आणि मराठी कादंबरी, पद्मगंधा प्रकाश पुणे, पृष्ठ २४)

समाजभाषा विज्ञानाचा आधार घेऊनच हा अभ्यास अधिक योग्य होतो असे आपणास म्हणता येईल.

आपण संत जनाबाई यांच्या –

*डोईचा पदर आला खांद्यावरी। भरल्या बाजारी जाईन मी।।धृ।।*
*हाती घेऊन टाळ खांद्यावरी वीणा। आता मज मना कोण करी ।।१।।*
*पंढरीच्या पेठे मांडियले पाल। मनगटावर तेल घाला तुम्ही ।।२।।*
*जनी म्हणे देवा मी झाले वेसवा। निघाले केशवा घर तुझे ।।३।।*

या अभंगाचा अभ्यास करावयाचा म्हटले तरी डोईचा पदर खांद्यावर येणे म्हणजे काय? पंढरीच्या पेठे मांडियले पाल म्हणजे काय? पाल शब्द का योजला? त्याचे सामाजिक संदर्भ शोधावे लागतात. भाषेचा उपयोग सामाजिक संदर्भ देत जनाबाई का करतात हे समजून घ्यावे लागते.

रमेश वरखेडे यांनी समाजभाषाविज्ञान संकल्पना स्पष्ट करताना मानववंश शास्त्राचे सहाय्य लक्षात घेऊन आपले मत नोंदवलेले आढळते ते म्हणतात, ''समाजभाषा विज्ञान आणि मानववंशशास्त्र यांच्या सहाय्याने भाषेचा अभ्यास करणाऱ्या प्रणालीला भाषेचे समाजविज्ञान म्हणतात. ''(रमेश वरखेडे, समाजभाषा विज्ञान, पान नं. १६)'' समाजभाषाविज्ञान आणि मानववंश शास्त्र या अभ्यास शाखातील अध्ययन पद्धतीचा आधार घेऊन भाषेचा अभ्यास करणारे समाजभाषा विज्ञान हे शास्त्र असल्याचे सांगून एडवर्ड सपीर, बेन्जामिन ली, डेल हार्डम्स, मॅलीनोवस्की यांनी मानववंश शास्त्राच्या अध्ययनातून भाषिक जडणघडणीचे अध्ययन केले आहे. आपण तू हा शब्द लहान मुलांना, मित्रास, पत्नीस किंवा जवळच्या ओळखीच्या समवयीन व्यक्तीस वापरतो पण अनौपचारिक असे त्याचे रूप असते, पण तुम्ही हा शब्द आपण आदराने जेष्ठ व्यक्तीस वापरतो. भाषेचा वापर सामाजिक संकेत आणि संदर्भांनी आपण करत असतो. प्रत्येक समाजात वापरली जाणारी भाषा ही त्या त्या समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक संदर्भाने वापरली जाते.

समाजशास्त्र आणि मानववंश शास्त्र याची माहिती देताना मानववंश शास्त्राची माहिती डॉ. प्रदीप आगलावे यांनी दिलेली आहे. ते म्हणतात. ''मानवाविषयीचे विज्ञान म्हणजे मानवशास्त्र होय. तर मानव समाजाचे विज्ञान म्हणजे समाजशास्त्र होय. या दोन विज्ञानाच्या व्याख्येवरून मानव्य शास्त्राचा व्यापक अर्थ लक्षात घेतला तर प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत अस्तित्वात असलेल्या मानवाचा अभ्यास या विज्ञानात केला जातो. प्राचीन काळातील मानव, त्याची संस्कृती, राहणीमान, आचार, विचार आणि परंपरा इत्यादी बाबत अध्ययन करणे हे या विज्ञानाचे प्रमुख प्रयोजन आहे. मानवशास्त्राच्या दोन प्रमुख शाखा आहेत. १. सांस्कृतिक किंवा सामाजिक मानवशास्त्र, २. शारीरिक मानवशास्त्र. ''(डॉ. प्रदीप आगलावे, समाजशास्त्र, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, तिसरी आवृत्ती २०१५, पृ. २८)

सामाजिक मानवशास्त्राचा समाजशास्त्राशी संबंध आहे. सामाजिक मानवशास्त्रात मानवाने निर्माण केलेल्या संस्कृतीचा अभ्यास केला जातो. त्यामध्ये आर्थिक परिस्थिती, भाषा, कला कौशल्य, तंत्रज्ञान, राज्य व्यवस्था, समाजरचना, धर्म कल्पना, इत्यादी संस्कृतीच्या विविध अंगाचा अभ्यास करण्यात येतो. परंतु अलिकडे आधुनिक काळातील मानवांचा सुद्धा अभ्यास केला जातो. ग्रामीण समुदाय, श्रमिकांचे प्रश्न, नागरिकरणाच्या समस्या, अशा समस्यांचा देखील अभ्यास केला जातो. मालीनोव्हस्की, रद्क्लीफ, ब्राऊन, इवान्स प्रीटयार्ड, फ्रेजर इत्यादी मानवशास्त्रज्ञांनी आदिवासी समाजाचे केलेले अध्ययन समाजशास्त्राच्या दृष्टीने उपयुक्त ठरते. मानववंश शास्त्रात शक्यतो प्राचीन समाजाचे अध्ययन केले जाते. मानववंशशास्त्रात वर्णनात्मक दृष्टीकोनाचा अवलंब केला जातो. समाजभाषाविज्ञान मानवी भाषेचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करते. प्राचीन काळातील मानवी संस्कृतीचा अभ्यास करते ते मानववंश शास्त्र. प्राचीन काळातील भाषेचा अभ्यास करण्यासाठी मानववंश शास्त्राची मदत घ्यावी लागते. मानववंश शास्त्रात असलेल्या ऐतिहासिक साधनाच्या आधारे तसेच संक्रमित होत आलेल्या प्राचीन शब्दांच्या आधारे संस्कृती आणि भाषा असा अभ्यास समाजभाषा विज्ञानास उपयोगी ठरतो. वंश म्हणजे शारीरिक वैशिष्ट्ये, पूर्वज, सामाजिक संबंध या सर्व घटकांच्या परस्परसंबंधावर आधारित माणसांचे वर्गीकरण. इंग्रजीमध्ये याला रेस (race) म्हणतात. रेस या संज्ञेचा वापर सुरूवातीला समान भाषा बोलणाऱ्या समूहाला उद्देशण्यासाठी होई. त्यानंतर राष्ट्रीय संलग्नता दर्शवण्यासाठी होई व १७ व्या शतकात शारीरिक (दृश्य रूपी / फीनोटिपिकल) वैशिष्ट्ये दर्शविण्यासाठी होई. १९ व्या शतकापासून तिचा वापर जीवनवर्गीकरणशास्त्राच्या (बायॉलॉजिकल टॅक्सॉनमी) संदर्भात दृश्य रुपामुळे (फीनोटाईप) परिभाषित होणाऱ्या मानवी समूहाच्या जनुकीय निराळेपणाला दर्शवण्यासाठी होऊ लागला. मानववंशशास्त्रात पूर्वजांच्या शारीरिक रचनेचा अभ्यास तसाच प्राचीन मानवी समूहाचा, समाज व संस्कृतीचा अभ्यास केला जातो.

सांस्कृतिक मानवशास्त्र मानववंश शास्त्राचा अभ्यास करण्याची एक पद्धत म्हणता येईल.

मनुष्य व त्याच्या भोवतीचे विश्व मिळून निसर्ग बनतो. या निसर्गामध्ये जीवनाच्या उत्कर्षाला अनुकूल असे बदल करून म्हणजेच निसर्गावर काही संस्कार करून मनुष्य आपली जीवनयात्रा चालवितो. तो केवळ बाह्य विश्वातील पदार्थांवर संस्कार करतो असे नव्हे, तर स्वत:चा देह, मन आणि बुद्धी यांच्यावरही संस्कार करून स्वत:त बदल घडवून आणतो. संस्कृती या शब्दात हे दोन्ही प्रकारचे बदल अभिप्रेत आहेत.

असे म्हटले जाते की, संस्कृतीचे निर्णय माणूस करतो. इ. बी. टायलर यांच्या मतानुसार, संस्कृतीत ज्ञान, विश्वास, कला, नीती, कायदा, विधी, रितीरिवाज यांचा किंवा अशा क्षमता की ज्या माणसाच्या सवयी असतात यांचा समावेश होतो. सांस्कृतिक मानववंश शास्त्रज्ञ हा खालील प्रमाणे अभ्यास करत असतो.

१. माणूस निसर्गात आणि समाजात कसा जगतो आहे?

२. माणूस रीतीरिवाज कसे शिकत जातो?

३. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हे रिवाज तो कसे देत असतो?

४. परिवारात व समाजात त्या माणसाचे संबंध कसे असतात?

५. कोणत्याही जातीत जन्मल्यानंतर तिथल्या परंपरा, संस्कृती चा स्वीकार व्यक्ती कशी करते?

६. विशिष्ट काळात व वेळेत ही माणसे कशी जगतात? जगली?

मानववंशशास्त्रात संस्कृतीचे अर्थ पुढील प्रमाणे घेतले जातात. संस्कृती संदर्भात काही गृहीतके पुढीलप्रमाणे–

१. माणूस संस्कृतीबरोबर जन्म घेत नाही, पण त्याच्यामध्ये संस्कृती ग्रहण करण्याची क्षमता असते. तो जे शिकतो या शिकण्याला संस्कृतीकरण असे म्हणतात.

२. संस्कृतीचा उगम हा माणसाचे प्राणी म्हणून असणारे वैशिष्ट्य, परिसर प्रभावावर ऐतिहासिक स्थितीवर यावर होते.

३. संस्कृतीतील छोट्या भागाला सांस्कृतिक तत्व (culture trait) म्हणतात.

४. संस्कृती ही अनेक विभागात विभागलेली असते. जसे भौतिक संस्कृती, तंत्रज्ञान व अर्थव्यवस्था), सामाजिक संस्था, संघटना, शिक्षण, राजकीय संघटना, धर्म, विश्वास, कला, भाषा इत्यादी.

५. संस्कृती ही परिवर्तनशील असून तिच्या प्रत्येक अंगात परिर्वतन होत असते. त्याची गती कधी वेगवान तर कधी मंद असू शकते. संस्कृतीवर होणारा बाह्य प्रभाव विनाकारण, विनाविचार स्वीकारला जात नाही.

६. संस्कृतीत विभिन्नता आढळते.

७. संस्कृतीत एक प्रकारची नियमबद्धता आढळते.

८. संस्कृती माध्यमामुळे माणूस परिसरात व्यवस्थित राहतो आणि रचनात्मक अभिव्यक्ती करतो.

अशी काही वैशिष्ट्ये आढळतात. मानववंश शास्त्र हे प्राचीन इतिहासातील गूढ रहस्यांचा शोध घेत असते. त्यातील काही अभ्यासक हे पृथ्वीच्या पोटात खणून प्राचीन संस्कृतीचा शोध घेतात. मोहेंजदडो व हडप्पा याचे उत्तम उदाहरण आहे. त्या त्या काळातील माणसाची संस्कृती, विकास, राहणीमान, आचार, विचार, समाज,

धर्म, विश्वास, श्रद्धा यांची रुपरेखा शोधण्याचा ते प्रयत्न करत असतात.

भाषेच्या माध्यमातून संस्कृतीचा जन्म झाला आहे. सृष्टीच्या आरंभापासून मनुष्याने आपल्या इच्छा आणि गरजा प्रकट केल्या. सुरूवातीस हावभावाच्या आधारे व नंतर ध्वनीयुक्त भाषेचा आधार घेतला. प्रत्येक भाषेत त्या त्या मानवी समाजाच्या मान्यता असतात. स्पष्ट किंवा अस्पष्ट विचार आणि बौद्धिक व भावनिक क्रिया असतात. अदिम समाजाची सांस्कृतिक तत्वे ही त्याच्या भाषाभांडारात सुरक्षित असतात. त्याच्या म्हणी, कोडी, लोककथा, लोकगीते, प्रार्थना, मंत्र यातून समाजाच्या संस्काराचे दर्शन घडत असते. समाजाच्या किंवा संस्कृतीच्या आंतरिक वृत्तीचा परिचय करून घेण्यासाठी त्याच्या भाषेचे ज्ञान करून घेणे आवश्यक असते. संस्कृतीत बाह्य प्रभावामुळे जी परिवर्तने होतात ती भाषेत प्रतिबिंबित होत असतात. नवनव्या वस्तू व नवे विचार जेव्हा व्यवहारात येतात. तेव्हा त्या बरोबर शब्दही येतात. त्यामुळे संस्कृती आणि भाषा यांचा समान रूपात विकास होत असतो. आदिम संस्कृतीत भाषेची विविधता, परस्पर संबंधाची सामग्री असते. ज्या प्रकारे भाषेच्या स्वरूपाचे विश्लेषण करून आपण संस्कृती रहस्यांचा शोध घेतो त्या प्रकारे संस्कृतीच्या व्यवस्थेची तत्वे व पद्धतीच्या ज्ञानाने आपल्याला भाषेच्या प्रश्नांचा शोध घेता येतो.

मानववंश शास्त्राची व्याप्ती वाढत आहे. सामाजिक मानववंश शास्त्र, आर्थिक मानवशास्त्र, धार्मिक मानवशास्त्र इत्यादी. समाजभाषा विज्ञानात मानववंश शास्त्राचे सहकार्य आपल्याला घ्यावे लागते. संस्कृतीतील धर्म, श्रद्धा आचार, विचार कला यांचे सांस्कृतिक संदर्भ भाषेत असतात. भाषेने सांस्कृतिक संदर्भाकडे बोट केलेले असते. आणि संस्कृती भाषेतून पुढे पुढे वाहत असल्यामुळे प्राचीन काळातील किंवा आधुनिक काळातील मानवी भाषेचा सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ समजून घेण्यासाठी समाजभाषाविज्ञान व मानववंशशास्त्र यांचे परस्परांचे एकत्र येणे आवश्यक असते.

**● समाजभाषाविज्ञान व संस्कृतीविज्ञान :**

भाषा आणि संस्कृती यांचा अन्योन्य संबंध असतो हे आपण सांस्कृतिक मानववंशशास्त्र मीमांसा करताना पाहिले आहे. समाजशास्त्र, मानववंशशास्त्र आणि संस्कृतीविज्ञान हे परस्पर पूरक आहेत असे आपल्याला आढळते. या प्रत्येक शास्त्रातले घटक एकमेकात अभ्यासले जातात. हे आपल्याला आढळले. समाजभाषाविज्ञान देखील या तीन्हीशी संबंधित आहे. दृष्टीकोन कोणता घेऊन अभ्यास करायचा हेच महत्त्वाचे ठरते.

संस्कृती म्हणजे काय? मानवी समाज आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध आहे. पृथ्वीवर संपूर्ण जीवनसृष्टीमध्ये मानव असा आहे की, ज्याने आपल्या बुद्धिमत्तेचा उपयोग करून स्वत:ची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती तयार केली आहे. व्यक्ती प्रथम कुटुंबात आणि नंतर आंतरक्रिया करून संस्कृती शिकते. म्हणूनच संस्कृती माणसाला जन्माने प्राप्त होत नाही. लोकांच्यात ती शिकायची असते. प्राणी आणि मानव याबाबत काही साम्ये आहेत. भूक, मैथुन आणि झोप या गरजा सारख्या आहेत. या जैविक गरजा पूर्ण करताना माणसाने मात्र या बाबतीत नियम केलेत. जगण्याचे विशिष्ट वर्तन प्रकार निश्चित केले. व्यक्ती सांस्कृतिक नियम पाळून जगत असते. याचा अर्थ ती संस्कृतीनुसार वर्तन करते. प्राण्याजवळ निर्मिती क्षमता नाही. संस्कृती ही मानवनिर्मित

आहे. समाजात राहताना ज्या गोष्टीचे ज्ञान झाले, तसेच विश्वास वाटला अशा गोष्टीचा मूल्य म्हणून माणसाने स्वीकार केला. बहुतेक गोष्टी अमूर्त आहेत. त्यामुळे त्याने अशा गोष्टीना नावे किंवा चिन्हे दिली. ज्ञान, विश्वास, मूल्य, प्रमाणके आणि चिन्हे यांचा समावेश संस्कृती होतो. संस्कृतीचे अध्ययन केल्याशिवाय माणसाचा अभ्यास होत नाही. संस्कृती माणसाचे अविभाज्य अंग असले तरी जगातील सर्व माणसांची संस्कृती सारखी नाही. कारण समाज आणि प्रदेश यानुसार संस्कृती वेगवेगळी आढळते.

● **संस्कृतीच्या विविध व्याख्या :**

संस्कृतीच्या काही व्याख्या खालीलप्रमाणे –

**१) एडवर्ड टायलर :** समाजाचा एक सदस्य म्हणून मानव जे ज्ञान, कला, श्रद्धा, नीती तत्वे, कायदे परंपरा आणि क्षमता, सवयी तसेच इतर तत्सम गोष्टी संपादित करतो, त्या सर्वांच्या संमिश्र एकीकरणास संस्कृती असे म्हणतात.''

(Culture is that complex whole, which includes knowledge, beliefe, art, morals, law, customs and other capabilities and habits acquried by a man as a member of society - Edward Tylor.)

**२) राल्फ लीटन :** संस्कृती ही शिक्षित वर्तन प्रकार व शिक्षित वर्तन प्रकारच्या फळांची संघटीत किंवा साचेबंद समग्रता होय. मनुष्य एका विशिष्ट समाजाचा सदस्य या नात्याने जे जे वर्तप्रकार शिकतो, ते सर्व वर्तन प्रकार व या वर्तन प्रकाराच फ्ले संस्कृतीमध्ये समाविष्ट होतात.

(A culture is the configuration of learned behaviour whose component elements are shared and transmitted by the members of particular society. - Raliph Linton)

**३) मॅलीनोव्हस्की :** ज्यांच्याद्वारे मानव आपली उद्दिष्ट साध्य करतो, ती मानव निर्मित साधने व माध्यम म्हणजेच संस्कृती होय.

(Culture is the handiwork of man and the medium through which he achives his ends - Malinovaski)

**४) डॉ. इरावती कर्वे :** मानवी समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी परंतु विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय.

वरील सर्व व्याख्यांचा परामर्श घेता टायलरची व्याख्या प्रसिद्ध मानली जाते. संस्कृती ही मानवनिर्मित असून व्यक्तीला ती शिकावीच लागते. समाजाचा एक सदस्य या नात्याने ज्ञान, विश्वास, परंपरा, फायदे, व्यक्ती संपादित करते आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत करते. संस्कृती अमूर्त असते.

संस्कृतीचे भौतिक संस्कृती व अभौतिक संस्कृती असे दोन प्रकार आहेत. माणसांने आपल्या गरजा पूर्ण

करण्यासाठी अनेक भौतिक गोष्टी निर्माण केल्यात. कपडे, घरे, यंत्रे, अवजारे, ज्या आपण डोळ्यांनी पाहू शकतो. आणि त्यांना स्पर्शही करू शकतो. बुद्धिचा उपयोग करून नवनवीन वस्तू बनवणे ही भौतिक संस्कृती आहे. पण डोळ्यांना न दिसणाऱ्या पण मनाला जाणवणाऱ्या अशा ज्या अभौतिक गोष्टी असतात त्या मध्ये ज्ञान, मुल्ये, विचार, परंपरा, विश्वास या बाबी असतात. हिलाच अभौतिक संस्कृती असे म्हणतात. माणूस भौतिकदृष्ट्या लवकर बदलतो पण अभौतिक दृष्ट्या लवकर बदलत नाही. अभौतिक संस्कृती अमूर्त असते. हॅरी जॉन्सन यांनी अभौतिक संस्कृतीलाच फक्त संस्कृती मानले आहे. कॉम्प्युटर हा दिसत असला तरी चालवायचे ज्ञान नसेल तर उपयोग नाही. म्हणूनच ज्ञान ही संस्कृती आहे, असे त्यांना वाटते. ज्ञान हे अभौतिक म्हणून संस्कृती ही अभौतिक असते. संस्कृतीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितली जातात.

१) संस्कृती ही मानवनिर्मित आहे (culture is man created). निसर्गातील काही गोष्टी मानव निर्मित नाहीत, जसे वारा, पाणी, आकाश, सूर्य इ. माणसाने निसर्गातल्या गोष्टी घेऊन बुद्धीच्या सहाय्याने अनेक नव्या गोष्टी केल्या. उदा. माती पासून विटा आणि विटापासून घरे.

२) संस्कृती ही अमूर्त असते. संस्कृतीमध्ये विश्वास, ज्ञान, प्रथा, परंपरा, कायदा, चिन्हे यांचा समावेश होतो. या गोष्टी अदृश्य व अस्पर्श असल्याने संस्कृती ही अमूर्त आहे असे टायलर, जॉन्सन आदींनी मानले आहे.

३) संस्कृती ही शिकावी लगाते. लहान मुल जन्माला येताना शिकून येत नाही ते ज्या परिसरात वाढते तेथील संस्कृती त्याला शिकावी लागते.

४) संस्कृती एका पिढी कडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होते. भाषा आणि संकेतादवारे हे हस्तांतरण होते.

५) संस्कृती ही टिकवली जाते. कारण एकाकडून दुसऱ्याकडे ती दिल्यामुळे तिचा परीघ वाढत राहतो.

६) संस्कृती परिवर्तनशील असते. माणसाला नवनवीन ज्ञान प्राप्त होते तसे संस्कृतीमध्ये परिवर्तन होत राहते. संस्कृतीत बदल लवकर होत नाही ही प्रक्रिया हळूहळू होते.

७) संस्कृती कोणाच्या मालकीची नसते. संस्कृतीची निर्मिती एक व्यक्ती करीत नाही. व्यक्तीच्या परस्पर संबंधातून संस्कृती नष्ट होत नाही. ती व्यक्ती निरपेक्ष आहे.

९) संस्कृती ही समूहाचा आदर्श असते. संस्कृतीनुसार वर्तन असावे ही समाजाची अपेक्षा असते. समूह संस्कृतीतील श्रद्धा, विश्वास, परंपरा, मुल्ये, प्रमाणके आणि संकेत हे व्यक्तीसाठी आदर्श असतात. त्यामुळे समाज समूहास तिच्याबद्दल आपुलकी असते.

१०) संस्कृती ही मानवी गरजांची पूर्ती करते. मानवी गरजांची पूर्ती कोणत्या मार्गाने करावी, याबाबत संस्कृती मार्गदर्शन करीत असते. विश्वास, मुल्ये, परंपरा, प्रमाणके यांना घरूनच व्यक्ती वर्तन करते. गरजेप्रमाणे बदल घडवूनही आणले जातात.

११) संस्कृती प्रतीकांचा आधार घेत असते. अशोक चक्र हे बौद्ध धर्माचे तर ॐ हे हिंदू धर्माचे प्रतिक मानले जाते.

१२) प्रत्येक समूह किंवा समाजाची संस्कृती ही वेगळी असते. जगात वेगवेगळे समूह, समाज राहतात. प्रत्येकाची संस्कृती ही वेगवेगळी आहे. महाराष्ट्रात माडिया गोंड, महादेव कोळी, वारली, कोरकू, कातकरी अशा कितीतरी जमाती आहेत. पण प्रत्येकाची संस्कृती ही वेगळी आहे. संस्कृतीचे घटक प्रामुख्याने चार सांगितले जातात. ज्ञान हा संस्कृतीचा महत्त्वाचा घटक आहे. विविध सामाजिक संस्था आणि निसर्गाचे ज्ञान मिळविणे हे व्यक्ती सतत करत राहतो. विश्वास किंवा श्रद्धा हा संस्कृतीचा घटक आहे. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञान जसे संक्रमित होते तसे श्रद्धा ही होतात. संस्कृतीतील श्रद्धा नाकारणाऱ्यांना नास्तिक म्हणतात. मुल्ये आणि प्रमाणके हा तिसरा घटक आहे. सर्व समाजाच्या संस्कृतीत मुल्ये आणि प्रमाणके आढळतात. उदा. जातीय विषमता जपली जाणे हे एक मूल्य पूर्वी होते, पण आता भारतीय संविधान निर्मितीनंतर समता हे मूल्य स्वीकारले गेले याचा अर्थ मूल्यात परिवर्तन घडवून आणले जाऊ शकते. मूल्ये ही मानवी वर्तन नियंत्रित करीत असतात. मुल्ये ही सर्व समाजात सारखी असतीलच असे मात्र असत नाही. भारतातील काही राज्यात, धर्मात गोमांस खाऊ नये हे मूल्ये असेल तर इतर काही राज्यात, जाती धर्मात बीफ खाणे हे मूल्य आहे. संस्कृतीत मूल्याप्रमाणे प्रमाणकाची व्यवस्था असते. प्रमाणके लिखित तर कधी अलिखित असतात. लोकनीती, कायदे हे प्रमाणके असतात. संस्कृतीमध्ये चौथा घटक हा चिन्हे आहे संकेत आणि प्रतीके यांचा समावेश संस्कृतीत होतो. घंटा वाजणे हा शाळा सुटण्याचा किंवा भरण्याचा संकेत आहे. सिग्नल चे दिवे हे संकेत आहेत. संकेताप्रमाणे संस्कृतीत प्रतीके असतात. भाषा ही प्रतिक आहे. प्रत्येक देशाचे राष्ट्रध्वज हे त्या त्या देशाचे प्रतिक असतात. अलंकार, हस्तांदोलन किंवा अन्य प्रतीके. संस्कृतीतील हे घटक परस्पर संबंधित असतात.

मानवाची जडणघडण ही संस्कृतीमुळे होत असते. संस्कृती आत्मसात झाली की व्यक्तीचे सामाजिकीकरण होते. संस्कृती शिक्षण देत असते. गरजांची पूर्ती कोणत्या मार्गाने करावी याचे मार्गदर्शन संस्कृती करत असते. संस्कृती एक प्रकारे सामाजिक नियंत्रणही ठेवत असते. जीवन कसे जगावे याबाबत प्रत्येक संस्कृती मार्गदर्शन करते. संस्कृतीत नवनव्या ज्ञानाचा वापर करण्याची मुभा असेल तर अशा संस्कृतीची व समाजाची प्रगती होते.

सर्वच संस्कृतीमध्ये काही समान घटक आपल्याला आढळतात. १) भाषा, भौतिक घटक-भोजन सवयी, निवास, वेशभूषा, भांडी, साधने, वस्त्रे, व्यवसाय, उद्योग, कला, पौराणिक विद्या व वैज्ञानिक ज्ञान, धार्मिक क्रिया. कुटुंब व्यवस्था, युद्ध इत्यादी. विभिन्न संस्कृतीत कुटुंब आणि विवाह संस्था, धर्म, भाषा, कला, भौतिक सुखसोयी, अनौपचारिक शिक्षण, सामाजिक नियंत्रण इत्यादी घटक आढळलेले दिसतात. व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी संस्कृती महत्त्वाचे योगदान देत असते. व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक बाह्य व अंतर्गत वागणुकीवर संस्कृतीचा प्रभाव पडत असतो.

म्हणूनच समाजभाषा विज्ञानात संस्कृतीविज्ञानाचा उपयोग अधिक होऊ शकतो. भाषा हा संस्कृतीचा घटक आहे. भाषा ही संस्कृतीतील सर्वच घटकांना सामावून घेणारी घटक आहे. कुटुंब आणि विवाह संस्थेत भाषा व्यवहार होत असतो. जन्मापासून ते मरेपर्यंतचे सर्व ठिकाणी भाषा व्यापलेली असते. श्रद्धा भाषेतून व्यक्त होतात. कितीतरी प्राचीन धर्मग्रंथ आणि संस्कृती भाषेने बद्ध झाली आहे. भाषा हा संस्कृतीचा श्वास आहे. सामाजिक सांस्कृतिक व्यवहार भाषेतून होतात. कलेला देखील भाषा असते. अन्न, वस्त्र, निवारा या गरजा भागविण्यासाठी भाषेचा आश्रय घेतला जातो. परंपरा आणि आचार विचार हे भाषेतून प्रगत होतात. समाजभाषा विज्ञानात सांस्कृतिक तत्वांचा अभ्यास आवश्यक ठरतो. संस्कृती अभ्यासास अलिकडे संस्कृती विज्ञान असे म्हटले जाते. संस्कृतीचा अभ्यास हा समाजशास्त्राचा विषय आहे, आणि मानववंश शास्त्राचा देखील विषय आहे. संस्कृती आणि भाषा यांचा अभ्यास हा परस्पर पूरक अभ्यास आहे. उदा. गोंड समाजाची भाषा समजून घेताना तिचा संस्कृती संदर्भ घेत अभ्यास केला तर तो अधिक योग्य होतो. बोली आणि संस्कृती हिचा अभ्यास महत्त्वाचा आहे. अलिकडच्या काळात समाजभाषाविज्ञान हे अभ्यास क्षेत्र आंतरविद्या शाखीय असेच आहे. संस्कृतीला आकार देण्यात विविध सामाजिक घटकांची काय भूमिका असते याचा अभ्यास संस्कृती विज्ञानात केला जातो. वंश, वर्ग अणि लिंग यांची सांस्कृतिक ज्ञान वाढीत काय भूमिका आहे, हे अभ्यासाचे मुख्य घटक आहेत. समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, साहित्य समीक्षा, तत्त्वज्ञान आणि कला समीक्षा या अभ्यासात संस्कृती या घटकाने मोठा प्रभाव टाकला आहे.

आधुनिक काळात संस्कृती विज्ञान अभ्यास शाखेची सुरूवात १९५० च्या दशकात झालेली दिसते. रिचर्ड होगार्ड, स्टुअर्ट हॉल हे अभ्यासक महत्त्वाचे आहेत. मात्र याआधीही मानववंशशास्त्र, समाजभाषा विज्ञान याच्या अभ्यासातून या शाखेची पायाभरणी झालेली आढळते. या प्रकारचा अभ्यास करताना एक महत्त्वाची भूमिका संस्कृती विज्ञान अभ्यासकांनी मांडली आहे. स्टुअर्ट हॉल याच्या Cultural Identity and diaspora या लेखात त्याने मांडणी केली आहे. तो म्हणतो की, ''आपण सांस्कृतिक ओळख आणि प्रतिनिधित्व या संदर्भाने चर्चा करीत आहोत. लेखन करणाऱ्या माझ्याकडे स्पष्टपणे एक व्यक्ती म्हणून पहायला हवे, आपण सर्वजण एका ठराविक काळ आणि स्थान यानुसार आपल्या भूमिका घेत असतो. आपला इतिहास आणि संस्कृती यातून आपल्या भूमिका आकार घेतात. आपण जे काही बोलतो त्याच्या मागे नेहमीच एक संदर्भाची चौकट असते. एका परिप्रेक्षातूनच आपण बोलत असतो.

हॉल प्रमाणेच याची अगदी व्यवस्थित मांडणी बोआज फ्रान्झ याने १८८७ मध्ये केलेली आढळते. तो म्हणतो ''सभ्यता ही गोष्ट स्वतंत्रपणे अस्तित्वात नसते. ती नेहमीच सापेक्ष असते.. आपल्या कल्पना आणि समज यांना आपल्या संस्कृतीच्या वा सभ्यतेच्या मर्यादा असतात.

या त्याच्या बोलण्याचा अर्थ असा की, आपल्या प्रथा, परंपरा, समज, रूढी, सभ्य-असभ्यतेच्या कल्पना यांचे महत्त्व इतर संस्कृतीमध्ये असेलच असे नाही.

सेपीर आणि वोर्फ यांनी भाषा आणि संस्कृती यांचा अभ्यास करताना अशाच प्रकारचे गृहीतक मांडले आहे.

आपली भाषा आपला जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन ठरवते, ज्यातून प्रत्येक भाषा एक वेगळे जग निर्माण करत असते. यावरून आपल्याला असे दिसून येते की, भाषेचा विकास आणि संस्कृती, समाज यांचे घनिष्ठ नाते आहे. त्यामुळे भाषेचा अभ्यास करताना संस्कृती व समाजाच्या विकसनाचा अभ्यास देखील करावा लागेल. हा समाजभाषाविज्ञानाचा महत्त्वाचा गाभा घटक आहे.

### ३.४ समारोप

भाषा म्हणजे काय? भाषेची वैशिष्ट्ये कोणती? भाषेची कार्ये कोणती ? भाषेचा अभ्यास कसा करावा? आधुनिक भाषा विज्ञान पद्धती वाटचाल या संबंधीची माहिती घेत आपण समाजभाषाविज्ञानपद्धतीची माहिती घेतली. भाषेला असलेल्या सामाजिक संदर्भाचा शोध घेत अभ्यास करणे हे मुख्य उद्दिष्ट समाजभाषा विज्ञानाचे आहे. भाषा ही व्यक्तीगत बाब नाही तर ती सामाजिक संस्था आहे. प्रत्येक समाजाची भाषा ही त्या समाजाशी संबंधित परंपरा, रूढी, समजूती, संस्कृती इत्यादीमुळे समृद्ध झालेली असते. सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरण भौगोलिक परिस्थिती आणि भाषा यांचा परस्पर घनिष्ठ संबंध आहे. कारण पर्यावरण बदलले की भाषिक प्रभाव क्षेत्रही बदलते. पर्यायाने भाषा बदलते. समाजशास्त्रातील विविध संस्थांशी भाषेचा संबंध आहे. प्रत्येक समाजाचे एक भाषिक भांडार असते. व्यक्ती या भाषा भांडाराच्या आश्रयाने संवाद साधत असते. समाजातील विविध लघुक्षेत्रातून भाषेला शब्द मिळत असतात. भिन्न भाषेशी संपर्क आल्यनांतर भाषेत कसकसे बदल होतात याचीही माहिती आपण या घटकात घेतली आहे. साहित्य भाषेला देखील समाजातील विविध लघु क्षेत्रातून मदत मिळत असते. भाषेत जी परिवर्तने होत असतात त्यांच्या मागे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परिस्थिती कारणीभूत असते. समाजभाषाविज्ञानास समाजशास्त्र, मानवशास्त्र आणि संस्कृती विज्ञान यांची मदत होऊ शकते. समाजजीवनात आलेल्या असंख्य भाषिक रूपांचा अभ्यास करावयाचा असेल तर भाषेला असलेला सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ तपासणे आवश्यक आहे हे या अभ्यास पद्धतीचे मुख्य सूत्र आहे. काळ आणि अवकाश यानुसार भाषा बदलते आणि समाजजीवनही त्यामुळे बदलत असते. कोणत्याही कवी आणि लेखकाला आपली सांस्कृतिक पार्श्वभूमी बळ देत असते, तिच्याशी आंतरक्रिया करीतच लेखक लिहित असतो. समाजभाषाविज्ञान पद्धती ही सर्वकाळात उपयुक्क्त ठरते. कारण प्राचीन ते आधुनिक काळापर्यंत समाज आणि संस्कृती भाषेची साहित्याची सोबत करीत असते. समाजभाषाविज्ञान पद्धतीने मराठी कादंबरीचा अभ्यास डॉ. नंदकुमार मोरे यांनी केलेला आहे. विद्यार्थ्यांना आंतरविद्याशाखीय संबंध असलेली ही अभ्यास पद्धती निश्चित उपयोगी ठरेल.

### ३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

- **योग्य पर्याय निवडा**

१) समाज भाषाविज्ञानात भाषिक भांडार ही संकल्पना कोणी मांडली ?

अ) जॉर्ज गम्पर्झ  ब) नॉम चोम्स्की  क) फर्दिनं द सासेर  ड) श्मिट

२) लघुक्षेत्राची संकल्पना कोणी मांडली?

अ) जर्मन अभ्यासक श्मिट व रोर    ब) वोर्फ

क) नॉम चॉम्स्की    ड) ब्लूमफिल्ड

३) भाषा द्वित्व ही संकल्पना कोणी सांगितली?

अ) चार्ल्स फर्गसन  ब) लोन्बोसो  क) ग्रिअरसन  ड) सपीर

४) भारतीय बोली भाषा अभ्यासाच्या इतिहासात सर्वात मोठा प्रकल्प कोणाचा आहे?

अ) सर जॉर्ज ग्रअर्सन  ब) चोम्स्की  क) डॉ.शं.गो.तुलपुळे  ड) मालीनोवास्की

५) समाजशास्त्र हा शब्द पथम कोणी उपयोगात आणला?

अ) अगस्त कॉम्प्ट  ब) सोसुर  क) आर.ए. हडसन  ड) बेन्जमिन ली वोर्फ

६) मानववंशशास्त्र आणि भाषा असे एकमेकाला जोडून अभ्यास करायचा प्रयत्न प्रथम कोणी केला?

अ) फ्रांझ बाओज  ब) ग्रीअर्सन  क) सपीर  ड) श्री. म. माटे

७) समाजभाषाविज्ञानास 'भाषेचे समाजशास्त्र' असे कोणी म्हटले?

अ) रविंद्र केळेकर  ब) श्री. म. माटे  क) शं. गो. तुळपुळे  ड) रमेश वरखेडे

८) दोन भिन्न भाषिक समाज एकत्रित आल्यानंतर कामचलाऊ भाषा जी वापरली जाते तिला काय नाव आहे?

अ) पिजिन  ब) क्रिओल  क) मूळ भाषा  ड) सामाजिक भाषा

९) कोणत्याही सामाजिक व्यवहाराचा अभ्यास करावयाचा असेल तर प्रथम या व्यवहारातील वैयक्तिक अंश काढून स्थिर आणि सार्वत्रिक व्यवस्थेवर लक्ष केंद्रित करावे असे मत कोणी मांडले?

अ) एमिल ड्यूरखाईम  ब) चोम्स्की  क) ब्लूमफिल्ड  ड) आर.ए. हडसन

१०) मानवशास्त्राच्या प्रमुख शाखा दोन असून एक सामाजिक व सांस्कृतिक मानवशास्त्र आहे तर दुसरी कोणती?

अ) शारीरिक मानवशास्त्र    ब) आर्थिक मानवशास्त्र

क) धार्मिक मानवशास्त्र    ड) दुसरी कोणतीच नाही.

उत्तरे : १) अ  २) अ  ३) अ  ४) अ  ५) अ

६) अ  ७) अ  ८) अ  ९) अ  १०) अ

## ३.६ सरावासाठी प्रश्न

- **दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. समाजशास्त्रात कोणत्या घटकांचा अभ्यास केला जातो ते लिहा.

२. भाषा संपर्काचे प्रकार कोणते आहेत?

३. संस्कृतीची वैशिष्ट्ये कोणती?

४. मानववंशशास्त्राची अभ्यास पद्धती माहिती लिहा.

५. पिजन भाषा व क्रिओल भाषा यांची माहिती लिहा.

६. भाषाविज्ञान पद्धतींची माहिती द्या.

७. समाजभाषाविज्ञान पद्धतीची माहिती लिहा.

८. संस्कृतीविज्ञानाचे स्वरूप स्पष्ट करा.

९) संस्कृती आणि समाजभाषाविज्ञान यांचा संबध स्पष्ट करा.

## ३.७ संदर्भ ग्रंथ


१. समाजशास्त्र, डॉ. प्रदीप आगलावे, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२. समाजभाषाविज्ञान, रमेश वरखेडे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.

३. भाषिक संघर्षाचे समाजशास्त्र, रविंद्र केळेकर, राजहंस वितरण, पणजी

४. समाजभाषा विज्ञान आणि मराठी कादंबरी, डॉ. नंदकुमार मोरे, पद्मगंध प्रकाशन, पुणे.

५. भाषा, समाज आणि संस्कृती, सोनाली देशपांडे, गुजर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.


●●●

**घटक–४**

# समाजभाषाविज्ञान आणि मराठीच्या प्रमुख बोली

**अनुक्रमणिका :**


४.१ उद्दिष्ट्ये

४.२ प्रस्तावना

४.३ विषय विवेचन

४.३.१ बोली आणि समाज

४.३.२ बोली भूगोल

४.३.३ सामाजिक बोलीविज्ञान

४.३.४ बोलीभाषांची निर्मिती

४.३.५ बोलीच्या क्षेत्रमर्यादा

४.३.६ मराठी प्रमुख बोली

४.४ समारोप

४.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न


## ४.१ उद्दिष्ट्ये :

भाषा हे माणसाच्या भावभावनांचे आणि विचारांच्या अभिव्यक्तीचे मुख्य माध्यम मानले जाते. मानवाच्या विकासात भाषा ही महत्त्वाची गोष्ट मानली जाते. अन्न, वस्त्र निवाऱ्याइतकीच भाषासुद्धा मानवाची मुलभूत गरज आहे. सर्व प्रकारच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरांचे संवर्धन व संक्रमण भाषेच्या माध्यमातून झालेले दिसते. मानवाच्या अनेक परंपराप्रमाणे भाषासुद्धा एक सामाजिक परंपरा आहे. भाषा आणि समाज यांच्या परस्पर संबंधाचे व परिणामांची अध्ययन करणारी ज्ञानशाखा म्हणजे समाजभाषाविज्ञान होय. बोलींचा सर्वांगीण अभ्यास हे या शाखेचे प्रमुख अंग आहे. या घटकाचे वाचन केल्यास आपणास.....

१. समाजभाषाविज्ञान म्हणजे ही संकल्पना समजून घेता येईल.

२. समाजभाषाविज्ञान आणि बोली यांचा सहसंबंध पाहता येईल.

३. बोलींची निर्मिती आणि तिच्या क्षेत्रमर्यादा समजून घेता येतील.

४. समाजिकबोलीविज्ञान ही संकल्पना समजून घेता येईल.

५. मराठीच्या प्रमुख बोलींचे स्वरूप समजावून घेता येईल.

### ४.२ प्रस्तावना

प्रस्तुत घटकामध्ये समाजभाषाविज्ञान आणि मराठीच्या बोली या अनुषंगाने विचार करावयाचा आहे. भाषा बोली आणि समाज यांचे तात्विक विवेचन अभ्यासावयाचे आहे. भाषा ही माणसाचे सर्व जीवन व्यापून टाकणारी संस्था आहे. त्यामुळे तिच्या अभ्यासाचे क्षेत्र फार व्यापक आहे. मानवी जीवन जेवढे गुंतागुंतीचे, गुढ आहे तेवढीच भाषा ही सुद्धा गुढ आहे, गुंतागुंतीची आहे. भाषेच्या अभ्यासाला खूप मोठी परंपरा असली तरी गेल्या तीन शतकांत या अभ्यासाने मोठी गती घेतली आहे. ती लक्षणीय अशी आहे. भाषाविज्ञानाचा आधुनिक काळात झालेला अभ्यास हा वैज्ञानिक पातळीवर झालेला आहे. सध्या भाषाविज्ञानाच्या क्षेत्रात विविध प्रकारचे संशोधन सुरू आहे. त्यामध्ये समाजभाषाविज्ञान हे असेच क्षेत्र आहे. मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या दृष्टीकोणातून भाषेच्या अनुषंगाने संशोधन सुरू आहे.

फर्दिना द सोस्यूर या भाषाभ्यासकाने भाषाभ्यासात नव्याने मांडणी केली. भाषिक व्यवहाराच्या सामाजिक अंगाचा अभ्यास करण्याची भाषाभ्यासाची नवी दिशा समाजभाषाविज्ञानाने दिली. भाषेच्या वर्तनप्रक्रियेचा म्हणजेच उपयोजित अभ्यास करणारे 'समाजभाषाविज्ञान' हे अध्ययनक्षेत्र आज भाषाविज्ञानाचा सर्वात प्रगत टप्पा म्हणून ओळखले जाते. समाजभाषाविज्ञान ही आज भाषाविज्ञानाची केवळ शाखाच राहिली नाही, तर स्वतंत्र अभ्यासशाखा म्हणून स्वत:च्या सिद्धांत संकल्पनावर उभी राहत आहे. या अंतर्गतच समाजभाषाविज्ञान आणि बोली असाही अभ्यास आणि संशोधन मोठ्या प्रमाणात होत आहे. या अनुषंगाने मराठीच्या प्रमुख बोलींचा विचार प्रस्तुत घटकात केला आहे. त्यामध्ये बोलींची निर्मिती, बोलीभूगोल, सामाजिक बोलीविज्ञान, बोलींच्या क्षेत्रमर्यादा तसेच मराठीच्या काही प्रमुख बोलीमधील कोकणी, खानदेशी, अहिराणी, चंदगडी बोली इत्यादी बोलीचा विचार केला जाणार आहे.

### ४.३ विषय विवेचन

#### ४.३.१ बोली आणि समाज

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. समूहाने तो आपले जीवन जगत असतो. त्याचे समूहजीवन यशस्वी होण्यासाठी त्याला काही नियम पाळणे आवश्यक असते. त्याच्या ठराविक बाबतीत शक्य तितक्या सारख्या रितीने वागण्यामुळे समाजाचे व्यवहार सुरळीत चालू शकतात. हे संस्कार तो आधीच्या पिढीकडून घेत असतो. त्याला आपण सामाजिक वारसा असे म्हणत असतो. तोच वारसा पुढच्या अनेक पिढ्यांकडे हस्तांतरीत होतो. जिला आपण सामाजिक संस्था म्हणून ओळखतो. कुटुंब, विवाह, शिक्षण, न्याय, राजकारभार इत्यादी सामाजिक संस्थांचा अभ्यास केला म्हणजे या सवयी अशा बनतात आणि बदलतात हे दिसून येते. या सर्वात महत्त्वाची संस्था म्हणजे भाषा होय. कारण इतर सर्व संस्था चालविण्यासाठी समाजातील सर्व व्यक्तींना एकत्र येणे,

एकमेकांचे विचार समजून घेणे जरूरीचे असते. आपले अनुभव अथवा विचार दुसऱ्यापर्यंत जावून पोहचतील अशा रितीने व्यक्त करण्याचे साधन असल्याशिवाय सामाजिक व्यवहार शक्य होणार नाही. एवढेच नाही तर समाजही अस्तित्वात येवू शकणार नाही. हा व्यवहार भाषेने शक्य होतो. म्हणून भाषा ही एक सर्वश्रेष्ठ सामाजिक संस्था आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे मागील पिढ्यांचे अनुभव व ज्ञान भाषेच्या माध्यमातून पुढच्या पिढ्यांपर्यंत येवून पोहचतात. म्हणून भाषा हे मानवाच्या विकासातील महत्त्वाचे साधन आहे. भाषेच्या स्वरूपाचा विचार केला तर असे दिसेल की, हे स्वरूप ध्वनीरूप आहे. मानव आपल्या मुखावाटे ध्वनी निर्माण करतो. ते ध्वनी एकत्र आणून अर्थवाहक संकेत निर्माण होतात. आणि तेच संकेत विशिष्ट रूपात विशिष्ट क्रमाने विचार व्यक्त करतात. याला आपण वर्ण, शब्द आणि विधान म्हणू शकतो.

भाषेतील ध्वनीत होणारा बदल हा सर्वत्र सारखा नसतो, एखाद्या प्रदेशात पसरलेली भाषा तिच्या वेगळ्या रितीने बदलते. काही जुने ध्वनी मुळीच बदलत नाहीत तर काही सारखे बदलत असतात, आणि काही भिन्न मार्गाने बदलत असतात. यामुळे एकाच भाषेपासून निघालेल्या भाषात काही साम्य व काही भेद दिसून येतात. जोपर्यंत हे भेद परस्परांच्या आड येण्याइतके तीव्र स्वरूपाचे नसतात. तोपर्यंत काळाच्या ओघात बदललेल्या एकाच भाषेच्या, एकाच काळी पण भिन्न भिन्न भागात अस्तित्वात असणाऱ्या विविध स्वरूपाना पोटभाषा किंवा बोली म्हणता येईल. व्यवहाराच्या आड येण्याइतके हे भेद तीव्र झाले म्हणजे एका बोलीभाषेच्या लोकांना दुसरी बोलीभाषा कळेनाशी झाली, त्यांना स्वतंत्र भाषा म्हणावे लागेल. काही शतकांपूर्वी राजस्थानी व गुजराती यांचे स्वरूप एकच होते. म्हणजे त्या प्रदेशात एकच भाषा बोलली जाते. आणखी विचार करता गुजराती मराठी किंवा मराठी व हिंदी इत्यादी भाषांबद्दल हेच विधान करता येईल. जितके आपण मागे जावून विचार करू तितक्या या भाषा वर्ण, शब्द आणि विधान या दृष्टींनी अधिकाअधिक जवळ येत जातील. आणि शेवटी अशी एक वेळ येईल की, या सर्व भाषांचे मूळ एकच आहे असे आपल्या लक्षात येईल. साधारणपणे ज्यांच्या व्यवहारात दळणवळणांचे, भौगोलिक व सांस्कृतिक अडथळे कमी असतात. ज्याचे सामाजिक संबंध अधिक निकटचे असतात अशा वर्गाची भाषा सारखी असते. म्हणून एकाच प्रदेशात राहणाऱ्या एकाच जातीची भाषिक पातळी सारखी असते असा अनुभव येतो. जातीच्या परंपरेमुळे जे वर्ग परस्परांहून वेगळे होतात ते शिक्षण, राजकारण इत्यादी क्षेत्रात येवू शकतात. समाजातील या एकत्र येण्यामुळे बोलीभाषांना एकत्र येण्याला अधिक वाव असतो असे म्हणता येईल. आणि त्यामुळेच अनुकरण आणि उसणवारी यांना संधी मिळून त्यांच्यातील भिन्नपणाची तीव्रता कमी होते. अशा रितीने भिन्न होणे आणि जवळ येणे या क्रिया चालू असतात. समाज जितका अधिक क्रियाशिल त्यातले सर्व वर्ग एखाद्या सामान्य ध्येयाच्या निमित्ताने जितके एकत्र येतील तितके बोलीभाषांचे संबंध अधिक येतील.

सामाजिक जीवनाचे स्वरूपच असे आहे की, त्यातल्या सर्व व्यक्ती नेहमी एकत्र येवू शकत नाहीत तर व्यवसाय, अभ्यास, आवड इत्यादी कारणांनी काही व्यक्तींना अधिक एकत्र यावे लागते. प्रत्येक व्यक्तीला या व इतर अनेक कारणांनी ज्या ज्या वर्तुळात शिरावे लागते त्या वर्तुळात वेगवेगळ्या पातळीची बोली वापर अधिक स्वाभाविक आणि अपरिहार्य असते. डॉक्टर लोकांची आपआपसातील भाषा वेगळी, तसेच शेतकरी

सुतार, गवंडी, कुंभार, कोळी, चांभार, विणकर इत्यादी लोकांची त्यांच्या धंद्याबद्दलची भाषा आपल्याला कळणार नाही. याचे कारण त्यांना शुद्ध भाषा बोलता येत नाही असे नाही तर त्याच्या जीवनाचे ते जगत असलेल्या समाजाचे स्वरूप, त्यांच्या गरजा व्यक्त करण्यासाठी उपयोगात आणली जाणारी शब्दसंपत्ती त्यांची सामाजिक आणि भाषिक परंपरा यातील भिन्नता हे आहे.

समाजाच्या वेगवेगळ्या घटकांची ओळख करून घेणे म्हणजे वेगवेगळ्या प्रदेशात विखुरलेल्या समाजातील वर्गाचा, त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या कुटुंब पद्धतीचा, संस्कृतीचा अभ्यास करणे होय. त्याचे स्वरूप अधिक समजून घ्यावयाचे माध्यम म्हणजे भाषा होय. बहुविध संस्कृतीला जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे भाषा होय. अर्थात ही भाषा बहुविध असते. आणि जरी या अनेक बहुविध स्वरूपांना आपण भाषा अशी सामान्य संज्ञा वापरली तर भाषा अशी स्वतंत्रपणे नसतेच खरे अस्तित्व असते ते बोलींनाच. निरनिराळ्या ठिकाणच्या निरनिराळ्या जातीच्या, व्यवसायांच्या कोणत्या तरी कारणाने वारंवार एकत्र येणाऱ्या मानवसमुहाच्या स्त्रियांच्या, पुरुषांच्या, वृद्धांच्या आणि मुलांच्या बोलींना स्थलभिनत्वामुळे ज्याप्रमाणे बोलींचे स्वरूप दलते. त्याप्रमाणे एकच व्यक्ती निरनिराळ्या समूहात वावरतानाही तिच्या भाषेत वेगवेगळ्या छटा दिसून येतात, कारण जीवनच असे लवचिक आहे. आणि जीवनप्रवाह अखंड राहून सुसह्य करणाऱ्या व्यवहाराचे जे अपरिहार्य साधन भाषा तीही याचमुळे टणक सर्वत्र सारखी असू शकणार नाही. एकूणच बोली या त्या त्या समाजानुसार, व्यक्तीनुसार भिन्न भिन्न स्वरूपाच्या असतात असे आपल्याला म्हणता येते. त्यामुळे बोली आणि समाज यांचे नाते घनिष्ठ असते.

### ४.३.२ बोली भूगोल

बोलीविज्ञानाची अध्ययनभाषा Geographical Dialectology ही एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अस्तित्वात आली. भौगोलिक सीमारेषांच्या आधारे भाषा-भेदांचा अभ्यास करणे हे या अध्ययनशाखेचे उद्दिष्ट होते. 'देशाच्या विशिष्ट भागात बोलली जाणारी भाषा' अशी बोलीची व्याख्या येथे गृहित धरण्यात आली आहे. विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील बोलींचा अभ्यास करणारी ही अध्ययनशाखा Areal Linguistics या नावाने ओळखली जाते. दर बारा कोसांवर भाषा बदलते असे म्हणतात. क्षेत्रीय सर्वेक्षणाच्या आधारे अशा भाषाबदलांचा नकाशा तयार करण्याचे काम बोलीविज्ञानात अभिप्रेत आहे. बोलींच्या अभ्यासाचे एक परिक्षेत्र म्हणून बोलीभूगोल ही संकल्पना विकसित झाली आहे. बोली कोणकोणत्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये कशाकशा बोलल्या जातात याचे सर्वेक्षण करून बोलींच्या प्रदेशनिष्ठ वर्तनासंबधाने काही निरीक्षण मांडणे बोलीभूगोलाचे अभ्यासध्येय असते. बोलीभूगोलाच्या अभ्यासाची एक अभ्यासपद्धत म्हणून बोलीमधील साधर्म्य अधोरेखित करणारे स्थलनिष्ठ नकाशे तयार केले जातात. त्यांना बोलीनकाशा म्हणतात. फ्रान्समधील गेल्या शतकाच्या अखेरीस झ्यूंल झिल्यरो यांनी अशा बोली नकाशांचा वापर करून तेथील बोलींचा अभ्यास केला बोलीतील कोणताही एखादा घटक म्हणजे उच्चारण तपासण्यासाठी एखादा ध्वनिघटक, व्याकरण तपासण्यासाठी एखादा व्याकरण घटक, आणि शब्दसंग्रह तपासण्यासाठी एखादा शब्दघटक स्वीकारला जातो. अशा घटकांना घटक भाषांश (Gloss) असे म्हणतात. समाजरूप असलेले भाषांश जेव्हा एकाच भौगोलिक प्रदेशात

आढळतात तेव्हा समान रूपदर्शक सीमा संभवतात. अशा सीमांना मर्यादित असणाऱ्या भागाला समभाषांश (Isogloss) म्हणतात. असे अनेक समभाषांश एकाच प्रदेशात आढळले की वर्तनक्षेत्रे निश्चित करता येतात. असे वर्तनक्षेत्र निश्चित करणाऱ्या रेषांद्वारे बोलीची क्षेत्रमर्यादा आखता येते. बोलींच्या अभ्यासाचे म्हणून जे समग्र शास्त्र विकसित झालेले आहे त्यास बोलीविज्ञान (Dialectology) असे म्हणतात. व्याकरण, शब्दसंग्रह व उच्चारधाटणी यावर शेजार भाषांचा परस्परांवर का परिणाम होतो याचाही अभ्यास बोलीविज्ञानात केला जातो. उदाहरणार्थ मराठी गुजराती या शेजारभाषांचा किंवा वऱ्हाडी व अहिराणी या शेजारबोलींचा अभ्यास.

भाषा आणि बोली हे दोन्ही शब्द समानार्थी असले तरी भाषाविज्ञानात आणि या दोन शब्दात भेद केला जातो. याला पोटभाषा किंवा बोली असेही म्हणतात. एका विस्तीर्ण प्रदेशावर बोलल्या जाणाऱ्या भाषेमध्ये या प्रदेशाच्या निरनिराळ्या विभागानुसार जे भेद निर्माण होतात. त्यांना त्या भाषेच्या प्रादेशिक बोली म्हणतात. या प्रादेशिक बोली एकाच मूळ भाषेतून निर्माण झालेल्या असल्यामुळे त्यांच्यात बरेच साम्य असते. आणि प्रदेशानुसार त्यांच्यात भेदही निर्माण होतात. या बोलीमधूनच एक बोली राजकीय, सांस्कृतिक कारणांनी प्रतिष्ठीत होते, तिला प्रमाण बोली म्हणतात. तिला या मूळ भाषेचेच नाव प्राप्त होते. इतर बोली या प्रमाणबोलीच्या उपबोली म्हणून तिच्याशी जोडल्या जातात. या उपबोलींना त्या ज्या प्रदेशात बोलल्या जात असतील त्या प्रदेशावरून प्रादेशिक नावे प्राप्त होतात. उदाहरणार्थ कोकणी, चंदगडी, खानदेशी इत्यादी. क्वचित अहिराणीसारखे प्रदेशवाचक नसलेले नावही प्रादेशिक बोलीला मिळते.

प्रमाणबोलीसुद्धा एक प्रादेशिक बोलीच असते. पण शिक्षण, शासकीय पत्रव्यवहार, प्रसारमाध्यमे, न्यायसंस्था इत्यादींनी तिचा स्वीकार केल्याने ती पुढील काळात त्या प्रदेशापुरती मर्यादीत न राहता मूळ भाषेच्या क्षेत्राला व्यापून टाकते. प्रमाणे बोलीचे क्षेत्र सोडून इतर बोलींच्या क्षेत्रांमध्ये त्या त्या प्रादेशिक बोलींच्या जोडीने प्रमाण बोलीपण वापरली जाते. फक्त त्यांच्या वापरांची क्षेत्रे भिन्न असतात. प्रमाणबोली तिच्या सर्व प्रादेशिक बोलींना सारख्याच प्रमाणात आकलनक्षम असेल.उलट प्रादेशिक बोलींची आपआपसातील आकलन क्षमता त्याच्या भौगोलिक अंतराच्या प्रमाणात कमी जास्त होईल. यातूनच बोलीभूगोल ही संकल्पना पुढे आली.

**४.३.३ सामाजिक बोलीविज्ञान**

१९६६ मध्ये लेबॉव या अभ्यासकाने न्युयॉर्क शहरातील भाषावैविध्याची समाजभाषावैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहणी केली. 'सामाजिक बोलीविज्ञान'चा (Social Dialectollogy) प्रारंभ लेबॉवच्या या पाहणी-अभ्यासानेच झाला. भौगोलिक भाषाविज्ञानातील स्थानिक बोलीभाषांची उच्चारसरणी, शब्दसंग्रह व व्याकरणदृष्ट्या पाहणी केली जाते. सामजिक बोलीविज्ञानात विशिष्ट बोलीकडे पाहण्याचा निजभाषकांचा दृष्टीकोन, तसेच त्या बोलीची सामाजिक प्रतिष्ठा लक्षात घेवून बोलींचा अभ्यास केला जातो. नमुने गोळा करताना बोलणाऱ्यांचे सामाजिक स्तर यामुळे त्या बोलीत जी भाषिक वैशिष्ट्ये निर्माण होतात त्याचा अभ्यास सामाजिक बोलीविज्ञानात केला जातो. त्यामुळे व्यापक क्षेत्रिय सर्वेक्षणाऐवजी मर्यादित उपयोजनावर लक्ष केंद्रित करून भाषिक पाहणी

करण्याकडे या अभ्यासकांचा कल असतो. उपयोजन क्षेत्रानुसार भाषिक विकल्पनाचे नमुने गोळा करून त्या सामाजिक बोलीचे वर्णन देणे हे या अभ्यासपद्धतीचे उद्दिष्ट आहे.

दोन भाषकांना परस्पराच्या भाषेचे अवलोकन होण्यात भाषिक अडथळे निर्माण होतात, तेव्हा त्या दोन वेगवेगळ्या भाषा ठरतात. भौगोलिक भाषाविज्ञानात अशा भाषा-भेदांच्या सीमा दाखविणारा नकाशा काढता येतो. परंतु सामाजिक बोलीविज्ञानात वर्ग, जात, वंश, धर्म यासारख्या कारणांनी परस्परांच्या भाषेच्या आकलनात पडणारे अंतर आणि अडथळे यांचा विचार केला जातो. उदाहरणार्थ, एखाद्या गावातील शेतकऱ्याची भाषा ही आजुबाजूच्या गावातील शेतकऱ्यांच्या भाषेशी मिळती जुळती असते. परंतु त्याच गावातील ब्राह्मणांच्या भाषेपासून ती वेगळी असते. एकाच बांधकाम व्यवसायातील बिल्डरची भाषा, मुकादमाची भाषा आणि गाडी, वडार, माती वडार अशा कामगारांची भाषा यातील अंतर हे सामाजिक स्तरभेदांनी निर्माण झालेले अंतर असते.

पाश्चात्य देशात वर्गीय बोलींचा अभ्यास या दृष्टीने केला जातो. वर्गनिहाय उच्चारसरणी कशी बदलते, व्याकरणिक भेदावरून सामाजिक भेदांविषयी अटकळ कशी बांधता येते यासंबधीचे विवेचन अशा अभ्यासातून आढळते. उदाहरणार्थ

| उच्चवर्गीय समाजगट | कनिष्ठ वर्गीय समाजगट |
|---|---|
| I did it yesterday | I done yesterday |

पाश्चात्य देशात औद्योगिक संस्कृतीतून सामाजिक श्रेणी उदयाला आल्या, त्यातून सामाजिक बोलीही जन्मल्या. भारतासारख्या देशात मात्र स्तरभेद हे प्रामुख्याने जातीनिहाय असल्याने महारी, धनगरी, भिल्ली, अशा जात-जमातनिष्ठ बोलींचे अध्ययन सामाजिक बोलीविज्ञानाच्या मर्मदृष्टीतून करता येवू शकेल.

व्यक्ती ज्या समाजगटात राहते त्या समाजगटाच्या प्रतिष्ठेनुसार त्या भाषेत, बोलीत भाषा वैविध्याची व शैली विशिष्टतेची उदाहरणे आढळतात. बोलीचा दर्जा हा त्या समाजाच्या सामाजिक दर्जावर अवलंबून असतो. त्यामुळे मागासवर्गीयांच्या बोलीचा दर्जाही मागासलेला राहतो. उदाहरणार्थ इंग्रजीच्या काही बोलीस "r" चा उच्चार तर काहीच होत नाही. उदाहरणार्थ -

Car : ca (अंत्य "r" चा लोक)

Cart : Cat (उपांत्य "r" चा लोप)

"r" चा उच्चारसरणीविषयी संकेतानुसार बोलणे शिष्टमान्य व मागासलेले ठरविण्यात येते. इंग्लंडमध्ये "r" चा उच्चारलोप असलेले बोलणे अधिक योग्य वा प्रतिष्ठीत मानले जाते. विनोदनिर्मितीसाठी ग्राम्य शब्दप्रयोग, ग्राम्य उच्चारसरणीचा उपयोग केला जातो. त्याप्रमाणे इंग्लंडमध्ये विनोदी श्रृतिका, प्रहसनांमध्ये "r" चा उच्चार केला जातो. ऑक्सफर्ड इंग्लिश वा बी.बी.सी. इंग्लिशमध्ये "r" चा उच्चार हे गांवढळपणाचे लक्षण मानले जाते. याउलट दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात न्यूयॉर्कमध्ये वरिष्ठ वर्गीयांच्या बोलण्यात अत्यंत "r" चा

व उपांत्य "r" चा उच्चार होतो. लेबॉवने १९६६ मध्ये केलेल्या पाहणीनुसार न्यूयॉर्कमध्ये निम्नस्तरीय कामगार वर्गात "r" चा उच्चार सहज संभाषणात केला जात नाही. मात्र वाचनप्रक्रियेत "r" चा उच्चार करण्याकडे त्यांचा कल असतो. पन्नास टक्के कामगार वाचताना "r" वाचतात परंतु नेहमीच्या भाषणात मात्र "r" चा उच्चार टाळतात.

बोलीविज्ञान ही एक महत्त्वाची शाखा म्हणून मान्यता पावलेली असल्याने भाषा, भाषाविज्ञान आणि बोली यांचा जवळचा संबंध आहे. ज्याप्रमाणे भाषाविज्ञानाच्या अभ्यास शास्त्रीय पद्धतींचा वापर करून सुव्यवस्थितीत संकलित केलेल्या माहितीच्या आधारावर बेतलेला असतो. बोलीविज्ञानाची सुरूवात १८७६ या वर्षापासून झाली असे मानले जाते. जॉर्ज बेन्र या एका तरूणाने एका स्थानिक बोलीच्या सर्वेक्षणाला सुरूवात केली. पुढे युरोप अमेरिकेत बोलीच्या संशोधनाला सुरूवात झाली. अलिकडच्या काळात १९६० नंतर जगभर बोलीच्या अभ्यासाला प्रारंभ झालेला दिसतो.

बोली अभ्यासाचा प्रदीर्घ इतिहास त्याच्या अभ्यासपद्धतीमध्ये, ध्येय उद्दिष्टांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत. या शाखेचा इतिहास म्हणजे भौगोलिक दृष्ट्या पसरलेल्या मुख्यत: ग्रामीण बोलीच्या गुणवैशिष्ट्यांचा नमुना संकलनापासून सामाजिक आणि इतर काही भाषिक बाबींशी संबंधित मुख्यत: शहरी बोलींच्या विश्लेषणापर्यंत झालेले स्थित्यंतर असेच म्हणावे लागेल. ही स्थित्यंतरे भाषाविज्ञानामध्ये झालेल्या स्थित्यंतराच्या समांतर जाताना आढळतात. बोलीभूगोल पारंपरिक बोलीविज्ञान, संरचनात्मक बोलीविज्ञान, जननशिलबोलीविज्ञान, सामाजिक बोलीविज्ञान आणि शहरी बोलीविज्ञान व आजच्या काळात प्रसिद्ध पावलेले वैविध्यात्मक बोलीविज्ञान असा बोली अभ्यासाचा प्रवास झालेला दिसून येतो.

बोली दोन प्रकारच्या असतात. एक भौगोलिक बोली आणि दुसरी सामाजिक बोली. आजच्या काळात व्यक्तीबोली ही संकल्पनाही रूढ झाली आहे. अलिकडच्या काळात भाषाभ्यासाला वास्तवलक्षी बनविण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न समाजभाषाविज्ञानात केला आहे. समाजभाषाविज्ञान ही शाखा भाषाव्यवहाराचा अभ्यास करते. भाषेच्या वरवरच्या केवळ बाह्य रूपरेषेवर ती संतुष्ट नाही. भाषा ही समाजात प्रत्यक्षात कशी बोलली जाते. याचाच ते प्रामुख्याने अभ्यास करतात. व्यक्ती तितक्या प्रवृती या न्यायाने प्रत्येक व्यक्तीची भाषा ही इतर व्यक्तीच्या भाषेपेक्षा वेगळी असते. हे खरे असले तरी भाषाव्यवहारात सर्वसमाजाचा मान्यतेचा निकष प्रमाण मानला जातो. मानवी समाज, लिंग, वय, व्यवसाय, परंपरा इत्यादी अनेक कारणांनी विभागला जात असतो. असे निरनिराळे सामाजिक गट तयार झालेले असतात. त्यामुळे भाषेमध्येही अनेक भेद निर्माण झालेले असतात. या भाषाभेदांची कारणे समजावून घेवून करण्यात येणारा अभ्यास म्हणजे समाजभाषावैज्ञानिक अभ्यास होय. बोलीविज्ञानातही प्रादेकि भाषाभेदांचा अभ्यास केला जातो.

### ४.३.४ बोलीभाषांची निर्मिती

बोली कशा निर्माण होतात त्या कशा ओळखायच्या, त्यांची क्षेत्रे कशी निश्चित करावयाची, कोणती बोली कोणत्या भाषेत अंतर्भूत करावयाची यासाठी कोणत्या कसोटीचा वापर करावयाचा याचा विचार प्रस्तुत ठिकाणी केला जाणार आहे.

भाषेत स्थानपरत्वे भेद होवून बोली निर्माण होतात. पण हे भेद कशा रितीने घडून येतात किंवा त्यांची व्याप्ती काय याचा विचार करणे गरजेचे ठरते. मराठी मूळ भाषा, तिचे रूप हे खानदेशात काही अंशी बदलून त्याची खानदेशी झाली, कोकणात ती कोकणी झाली, पण खानदेशील किंवा कोकणीला निश्चित क्षेत्र असेल तर ते नेमके केवढे आहे, सुरू कोठे होते, संपते कोठे याचा विचार बोलींच्या निर्मितीचा विचार करताना अपेक्षीत आहे. बोली हे दैनंदिन व्यवहरातील एक महत्त्वाचे साधन असल्याने ती जीवंत व स्वाभाविक स्वरूप धारण करून असते. यासंदर्भात ना. गो. कोलेलकर म्हणतात, ''बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुखपरंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य.''

ऐतिहासिक पद्धतीला अनुसरून बोली निर्माण होण्याचे दोन प्रकार सांगता येतील. पहिल्या प्रकाराप्रमाणे एका विस्तीर्ण प्रदेशात बोलली जाणारी, बऱ्याच प्रमाणात एकरूप असणारी बोली कालांतराने या प्रदेशाच्या वेगवेगळ्या भागात कमी अधीक प्रमाणात बदलते. या स्वाभाविक परिवर्तनाने होणाऱ्या तिच्या या वेगवेगळ्या रूपांना प्रादेशिक बोली म्हणता येईल. या बोली एकेमेकींपासून आणखी दूर गेल्या, त्यांच्यातले भेद विशेष तीव्र झाले, म्हणजेच विनिमयाला अडथळा येण्याइतके तीव्र झाले. या बोलीभाषेतून संबंधित परंतु परस्परभिन्न भाषा निर्माण होण्याची शक्यता असते. रोमन साम्राज्यात बोलली जाणारी लॅटीन भाषा त्या साम्राज्याचा ऱ्हास होताच विस्कळीत झाली आणि ती विस्तीर्ण प्रदेशात बोलली जात होती. त्यांच्यातले दळणवळण शिथिल असल्यामुळे वेगवेगळ्या भागात भिन्न दिशांनी परिवर्तित होत गेली.

दुसऱ्या प्रकारानुसार मुलात जवळजवळ सारख्या स्वरूपाची भाषा बोलणाऱ्या लोकांच्या टोळ्या विस्तीर्ण प्रदेशावर आक्रमण करतात आणि त्या वेगवेगळ्या भागात स्थायिक होतात. परस्परांशी नीट दळणवळण होवू न शकल्यामुळे त्यांच्या बोली भिन्न मार्गानी परिवर्तन पावतात आणि अशा रीतीने निर्माण झालेले स्थानिक भेद त्याचप्रमाणे त्या भागातील मूळ रहिवाशांचा संपर्क यामुळे वैशिष्ट्यपूर्ण बनतात. उत्तर भारतातील आर्यांचे आक्रमण किंवा आर्यभाषिक लोकांनी केलेली महाराष्ट्राची वसाहत अशा स्वरूपाची होती असे मानले जाते.

याशिवाय आणखी एक प्रकार आहे. पुष्कळदा काही कारणामुळे एकमेकांच्या सानिध्यात येवून सहजीवनाच्या तत्त्वाचा स्वीकार करावा लागणाऱ्या दोन भिन्नभाषिक समाजांपैकी एक समाज स्वत:ची भाषा टाकून आपल्या शेजारच्या समाजाची भाषा स्वीकारतो. स्वत:ची मूळ भाषा आणि नंतर स्वीकारलेली नवी भाषा अशा दोन भाषा या समाजाला सुरूवातीच्या संक्रमणकाळात बोलाव्या लागतात. काही काळानंतर तो या नव्या भाषेचाच पूर्णपणे वापर करू लागतो. पुढील पिढीत तर ही भाषाच मातृभाषा होते. पण स्वभाषेचा त्याग करण्यापूर्वी असलेल्या जुन्या पिढीच्या काही भाषिक सवयी या नव्याने आत्मसात केलेल्या भाषेत प्रवेश करतात. आणि तिचे रूप काही बाबतीत बदलून टाकतात. त्यामुळे ज्यांची ती परंपरागत भाषा आहे अशा समाजाच्या तोडी असणारे तिचे रूप आणि ज्याने ती नव्याने स्वीकृत केली त्या समाजात झालेले तिचे नवे

रूप या दोहोंत एक ठळक अंतर निर्माण होते. या दुसऱ्या रूपाला मूळ रूपाची बोलीभाषा असे म्हणता येईल. अशा रीतीने स्वभाषा टाकून परभाषा स्वीकारल्याची उदाहरणे इतिहासात पुष्कळ आहेत. या संदर्भात ना. गो. कालेलकर म्हणतात, ''आज आर्यभाषा बोलणारे भारतातील बहुसंख्य लोक मुळात अतिशय वेगळ्या भाषा बोलणाऱ्या परभाषिक समाजाचे वंशज असावेत असे म्हणता येते. भारतातील आणि भारताबाहेरील इंडोयुरोपियन भाषांत दिसून येणारा फरक काही बाबतीत या कारणामुळेच घडून आला असावा.'' समाजातील भिन्न भिन्न गट एकत्र राहतात. आणि अशा गटांची व्यवहाराची भाषाही एक होते. ही भाषा संपूर्ण समाज वापरत असलेल्या सर्वसाधारण भाषेशी म्हणजेच प्रमाणभाषेशी काही बाबतीत भिन्नता राखून असते. समाजातील या गटांची वेगळी बोली कशी निर्माण होते याविषयी डॉ. ना. गो. कालेलकर म्हणतात, ''समाजाच्या सर्वच व्यक्ती सदोदित एकत्र येवून व्यवहार करत नाहीत. काही व्यवहार एखाद्या विशिष्ट वर्गापुरते मर्यादित असतात. कारण समाजरचनेचा तो एक आवश्यक भाग आहे. अशा वर्गातल्या लोकांच्या भाषेचे स्वरूप व तिची पातळी सामान्य भाषेपेक्षा वेगळी होत. अशा रीतीने भिन्न असणारी भाषा एकाच व्यवसायातल्या अनेक व्यक्तींना एकत्र आणणारी पण सामान्य भाषेपासून दूर असणारी एक बोली होते.'' थोडक्यात असे म्हणता येईल की, समाजरचनेच्या किंवा सामाजिक व्यवहारांच्या गरजेतून एकभाषिक समाजाच्या आतच विविध गट तयार होणे हे बोलीच्या निर्मितीचे एक महत्त्वाचे कारण आहे.

भाषेच्या अंगी लवचिकता असते. आणि परिवर्तन होत राहण्याची क्षमता असते. या भाषेच्या वैशिष्ट्यामुळे बोली निर्माण होतात. तसेच काळाच्या ओघात भाषेत परिवर्तन होते. पण हे परिवर्तन सर्व भौगोलिक परिसरात एकसारखे होत नाही. एकाच भाषेची भिन्न भिन्न रूपे भिन्न भिन्न प्रदेशात विकसित होतात. ही रूपे एकमेकांना दुर्बोध वाटावी इतकी दूर गेलेली नसतात. ही रूपे वापरणारे लोक आपआपसात व्यवहार करू शकतात. त्यासाठी भाषेच्या कोणत्या तरी एका वर्तमानकालीन रूपाचाच वापर करतात. अशा रितीने भाषेच्या ऐतिहासिक विकासक्रमांमध्ये बोली जन्म पावतात. काही काही वेळा जीत-जेते संबंधातून बोली निर्माण होतात. सीमाभागातील लोकांचा शेजार भाषा बोलणाऱ्या लोकांशी संबंध येतो व भाषेचे एक वेगळे रूप तयार होते. यातून सीमाभागातील बोलींची निर्मिती होते. यासाठी बेळगांव किंवा कर्नाटक सीमाभागातील बोलींचा विचार करता येईल. विविध जातीसंस्थांच्या एकत्र येण्यातूनही बोली निर्माण होतात. याबरोबरच व्यवसायभिन्नता, लिंगभेद यामुळेही बोली निर्माण होतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, समाजातील आपोआप निरनिराळे गट निर्माण होत राहतात. आणि त्या त्या गटाच्या जगण्याच्या शैलीला पोषक असे रूप भाषा धारण करते आणि यातूनच बोली निर्माण होतात.

बोलीभाषेचे नामकरण आपण त्या त्या प्रादेशिक क्षेत्रांच्या नावावरून करतो. कोकणी असे नाव ऐकले म्हणजे कोकण या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशाशी संबंध असलेली कल्पना होते. ती कोकणातच सापडली पाहिजे आणि कोकणाबाहेर कुठेही सापडणारी असू नये आणि अनेक सामान्य वैशिष्ट्यांमुळे एका नावाने संबोधता येईल. अशी बऱ्याच अंशी एकरूप बोली असावी अशी समजूतही होते. ती कुठे सुरू होते आणि संपते, तिचे एकंदर क्षेत्र केवढे आणि कुठचे, तिच्या आजुबाजूला निश्चित कोणकोणत्या बोली बोलल्या जातात, असे अनेक प्रश्न आपल्याला सूचायला हवेत.

### ४.३.५ बोलींच्या क्षेत्रमर्यादा

समाजाचे दळणवळण सुरळीत चालू ठेवून त्याला संघटित करणारे आणि त्याचे व्यवहार अर्थपूर्ण करणारे भाषा एक ध्वनीरूप साधन आहे. आपल्या मनोगतांपैकी जी जी दुसऱ्याला कळविण्याची आपली इच्छा असते किंवा आवश्यकता भासते, ती ती आपण आपल्या समाजात रूढ असलेल्या ध्वनिरूप संकेतांनी व्यक्त करतो. भाषेचे अस्तित्व हे अशा रीतीने समाजाच्या स्थैर्याला आणि व्यवहार सुरळीत चालण्याला अपरिहार्य असल्यामुळे ती एक सामाजिक संस्था आहे असे आपल्याला म्हणावे लागते. ना. गो. कालेलकर यांनी बोलींच्या क्षेत्रमर्यादा संदर्भात केलेल्या विवेचनाच्या आधारे आपल्याला मांडणी करता येईल.

ध्वनीत होणारे अखंड परिवर्तन हे भाषेच्या इतिहासातील आद्यतत्व आहे. आशय व्यक्त करणे हा मूलभूत हेतू बनलेला नाही तरी तो ज्या इंद्रियगोचर साधनांनी व्यक्त केला जातो ती साधने म्हणजे संकेताचे बाह्य रूप. असे ध्वनी निरंतर बदलत असतात. उदा. 'पान' ही संकल्पना व्यक्त करण्यासाठी संस्कृत काळात तिचे 'पण्ण' असे परिवर्तन झाले. आणि आज आपण पण्ण याचेच आणखी परिवर्तित रूप जे पान असे व्यक्त करतो. पण तरीही जो आशय व्यक्त करण्यासाठी समाजाने ही वेगवेगळी रूपे वापरली तो आशय अबाधित राहिला आहे. भाषेच्या ध्वनीत अखंड होत असणारे परिवर्तन तिने व्यापलेल्या सर्व ठिकाणी एकाच दिशेने होत नसते. तर एकभाषा प्रदेशाच्या वेगवेगळ्या भागात एकच ध्वनी कित्येकदा वेगवेगळ्या दिशांनी परिवर्तित होत जातो. ग्राम, भ्रातु, घोटक हे शब्द वापरणाऱ्या एकाच प्रदेशाच्या भागात कालांतराने त्यांची गांवे - गाव, भाई-भाऊ, घोडो-घोडा ही रूपे बनली. त्यामध्ये दिसून येणारे परिवर्तन जोपर्यंत तीव्र स्वरूपाचे नसते म्हणजे जोपर्यंत एकत्र व्यवहाराला अडथळा करू शकत नाही, तोपर्यंत आपण या रूपांना स्थानिक भेद म्हणतो. हे भेद अधिक ठळक होवून अडथळ्याचे प्रमाण वाढले म्हणजे त्यांना आपण बोलीभाषा असे म्हणतो. अशा बोलींच्या क्षेत्रमर्यादा ठरलेल्या असतात त्याचा विचार प्रस्तुत विवेचनात करता येईल.

एखाद्या विस्तीर्ण प्रदेशात पसरलेल्या एकाच बोलीची कालांतराने वेगवेगळ्या भागात जी वेगवेगळी रूपे होतात ती एकमेकांपासून जितकी दूर अंतरावर असतील तितका त्यांच्यातला भेद अधिक तीव्र असतो. आणि जितकी ती एकमेकांपासून जवळ असतात तितके त्यांच्यातील साम्य अधिक स्पष्ट होते. त्यामुळे एखादी भाषा स्वत:च्या क्षेत्रातल्या वेगवेगळ्या प्रदेशात उत्क्रांत होत गेली तर जी अनेक रूपे कालांतराने तयार होतील त्यातल्या कोणत्याही दोन परस्परलगता प्रदेशातील रूपांची सरहद्द नक्की करणे आवश्यक असते, कारण एका निश्चित मर्यादेपर्यंत अमूक एक प्रकारची बोली वापरात असून ती मर्यादा ओलांडताच दुसऱ्या एका विशिष्ट बोलीचा अंमल सुरू होतो असे स्पष्ट करता येणार नाही. उदाहरणार्थ एकाच भाषेतून निघालेली, परस्परांना लागू असणाऱ्या प्रदेशातील एका विशिष्ट काळातली क, ख, ग ही रूपे घेतली तर क चे ख बरोबर आणि ख चे ग बरोबर जितके साम्य दिसून येईल त्यापेक्षा क आणि ग यांच्यातले साम्य बरेच कमी आहे असे दिसून येईल. अशा परिस्थितीत क आणि ग यांच्या दरम्यान असलेला ख हा प्रदेश भाषिक दृष्टिने या दोहोंपैकी कोणत्या प्रदेशात सामील करावा असा प्रश्न उद्‌भवला तर त्याचे उत्तर देणे सोपे नाही. कारण क रूपाच्या सीमेजवळ असलेल्या क व्याप्त भागात क ची भाषावैशिष्ट्ये मोठ्या प्रमाणात आढळतील तर ग च्या सीमेजवळ असणाऱ्या ख व्याप्त प्रदेशात ग ची भाषा वैशिष्ट्य अधिक दिसून येतील. भौगोलिक दृष्टिने पाहिले तर शेजारच्या बोलीतील

अशा प्रकारचे परिवर्तन एकदम होत नसून क्रमश: होत गेलेले असते. इतके की संथपणे प्रवास करणाऱ्या भाषिक पूर्वग्रहशून्य प्रवाशाला एक भाषाद्‌भव बोलींच्या प्रदेशात अस्तित्वात असणाऱ्या या भेदांची जाणीव क्वचित होईल.

बोलीभाषांना निश्चित अशा निसर्गदत्त क्षेत्रमर्यादा नसतात. या संदर्भात आधुनिक भाषाविज्ञानाचे प्रवर्तक फेर्दिना द सोस्यूर म्हणतात की, भाषा आणि बोलीभाषा यातील भेद स्पष्ट करणे ही कठीण गोष्ट आहे. पुष्कळदा साहित्यनिर्मिती केल्यामुळे एखाद्या बोलीभाषेला भाषा हे नाव देण्यात येते. पोर्तुगीज व डच ही याची उदाहरणे आहेत. परस्परांचे बोलणे समजणे हा ही इथे एक महत्त्वाचा मुद्दा आहे. ज्या लोकांना एकमेकांचे बोलणे समजत नाही त्यांच्या भाषा वेगवेगळ्या आहेत असे आपण म्हणू. कसेही असले तरी ज्या भाषाविषयक घटना बोलीभाषांच्या जीवनात आढळतात. त्याच सलग प्रदेशात स्थिर जीवन व्यतीत करणाऱ्या लोकसमूहांच्या विकास पावणाऱ्या भाषांतही अधिक मोठ्या प्रमाणात दिसून येतात. तिथेही आपणाला नवनिर्मितीच्या लाटा दिसतात. फक्त अनेक भाषांनी व्यापलेल्या सामान्य प्रदेशाएवढ्या असतात. आपण गृहित धरलेल्या आदर्श परिस्थितीत एकवशोद्‌भव भाषांभाषांमधील किंवा एकाच भाषेच्या बोलीभाषेतील सरहद्दी निश्चित करणे शक्य नाही. मग त्यांनी व्यापलेल्या प्रदेशाचा विस्तार केवढाही असो. ज्याप्रमाणे हायजर्मन कुठे संपते आणि लोजर्मन कुठे सुरू होते हे सांगता येणार नाही. त्याचप्रमाणे जर्मन व डच किंवा फ्रेंच व इटालियन यांच्या क्षेत्रमर्यादा दर्शवणाऱ्या रेषा नक्की करणे शक्य नाही. हा फ्रेंचाचा प्रदेश आहे इथे इटालियनांचे स्वामित्व आहे असे निश्चित विधान करता येण्यासारखे टोकाचे प्रदेश आहेत हे खरे असले तरी, ही निश्चितता या दोन भाषा ज्या ठिकाणी एकमेकींना येवून भिडतात त्या मध्यस्थ भागात टिकू शकत नाहीत. फ्रेंच आणि इटालियन यांच्यामधले संक्रमण दर्शवणारा प्रोव्हासाल हा ज्या प्रकारचा एक दाट मर्यादित पट्टा आहे अशा प्रकारचे पट्टे दोन भाषाभगिनीत असावेत. ही कल्पना देखील वस्तुस्थितीला सोडून आहे. एकमेकांपासून अधिकाअधिक पण हळूहळू भिन्न होत जाणाऱ्या एका विशिष्ट प्रदेशातल्या भाषा प्रकारात, कोणत्याही तत्त्वाला धरून का होईना मर्यादा दर्शक निश्चित रेषा कशा काढता येतील? भाषाभाषातले भेद हे अशा परिस्थितीत बोलीभाषांतील भेदाप्रमाणे संक्रमणातच विसरून जातात. ज्याप्रमाणे बोलीभाषा या एकाच भाषेच्या स्वामित्वाखाली असलेल्या संबंध प्रदेशाचे स्वैरपणे केलेले भाग असतात. त्याचप्रमाणे दोन भाषामधील सरहद्द म्हणून मान्य करण्यात आलेली रेषा ही केवळ परंपरागतच असते.

असे असूनही एका भाषेचा प्रदेश संपून एकदम दुसऱ्या भाषेचा प्रदेश सुरू झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. हे कसे घडते? याचे उत्तर असे की, प्रतिकूल परिस्थितीमुळे मधली लक्षात न येण्यासारखी रूपे टिकू शकली नाहीत. अनेक शतकांच्या स्थलांतरामुळे या भाषाविषयक संक्रमणात ढवळाढवळ होवून पुष्कळ ठिकाणी संक्रमणाच्या खाणाखूणा नाहीशा होतात. इंडोयुरोपियन भाषावंश हे याचे उत्तम उदाहरण आहे.

**४.३.६ मराठीच्या प्रमुख बोली**

- **वऱ्हाडी बोली**

मराठी बोलींचा सर्वप्रथम अभ्यास ग्रिअर्सनने आपल्या 'लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया' या ग्रंथात केला.

या ग्रंथातील सातव्या खंडात बोलींचा अभ्यास आहे. प्रस्तुत ग्रंथात मराठी बोलींचा अभ्यास करताना कोकणी ही मराठीची प्रमुख बोली मानली असून दख्खनची मराठी, वऱ्हाडी, मध्य प्रांताची मराठी अशा काही स्थानिक बोली मानल्या आहेत. या ग्रंथातील ग्रिअर्सनने केलेले मराठी बोलींसंदर्भातील सर्व विवेचन मान्य होईलच असे नाही. तरीही त्याने केलेला अभ्यास बोलींच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

वऱ्हाडी बोली ही स्थनिक बोली नसून एक महत्त्वपूर्ण प्रादेशिक बोली आहे. महाराष्ट्राच्या उत्तर सीमाभागात ही बोली बोलली जाते. मध्यवर्ती मराठी बोलीपासून अत्यंत दूर अंतरावर वापरली जाणारी ही बोली मराठीच्या मूळ केंद्रपासून जास्त अंतरावर असल्यामुळे तिच्या स्वरूपामध्ये अधिक भिन्नता आढळते. ही बोली परंपरेने जो भाग वऱ्हाडी म्हणून ओळखला जातो त्या प्रांतात बोलली जाते. प्रांतावरूनच 'वऱ्हाडी' ही विशेषण या बोलीला प्राप्त झाले आहे. वऱ्हाड म्हणजे बुलढाण्याचा पूर्वभाग, एलिचपूर, बैतूल, सिवनी व बालाघाट या प्रदेशाचा दक्षिण भाग आणि भंडारा, वणी, वाशीम, चांदा एवढ्या विस्तीर्ण भूप्रदेशात ही बोली बोलली जाते. या बोलीचे घाटावरची वऱ्हाडी आणि घाटाखालची वऱ्हाडी असे दोन उपभाग पडतात. तसेच स्थानिक वैशिष्ट्यानुसारही तिचे काही उपभेद करता येतात.

**वऱ्हाडीची स्वनिमव्यवस्था**

१) प्रमाण मराठीतील ए कारांन्त शब्द वऱ्हाडीत अ कारान्त होतात.

उदा. केले-केलं, मरेल मरेल - मरण, गेले-गेल

२) प्रमाण मराठीतील 'ळ' च्या जागी वऱ्हाडीत 'य' होतो.

उदा. डोळा - डोया, जवळ - जोय

३) प्रमाण मराठीत शब्दाच्या अंती वापरल्या जाणाऱ्या दीर्घ स्वरस्वनिमांऐवजी वऱ्हाडीमध्ये ऱ्हस्व स्वरस्वनिम वापरले जातात. उदा. मि, माझी - माहि

४) प्रमाण मराठीतील 'इ' आणि 'व' बद्दल वऱ्हाडी बोलीत 'ए' आणि 'य' होतो

उदा. दिले - देल्लं, वेळ-येळ

५) मराठीतील शब्दांच्या आद्य स्वरानंतर 'ड' येतो, तेथे त्याऐवजी वऱ्हाडीत 'र' वापरला जातो.

उदा. आडाणी - आराणी, इडापिडा - इरापिडा

६) मराठीतील 'व्ह' ऐवजी वऱ्हाडीत 'भ' चा वापर केला जातो.

उदा. नव्हते - नभते.

- **व्याकरणव्यवस्था**

प्रमाण मराठीचे व्याकरण आणि वऱ्हाडी बोलीचे व्याकरण यात फारसा फरक दिसून येत नाही. जो फरक आहे तो विभक्ती आणि आख्यात यांच्या काही प्रत्ययांबाबत आणि त्यांच्या उपयोजनाबाबत आहे. प्रमाण

मराठी आणि वऱ्हाडी बोलीचे विभक्तीचे प्रत्यय जवळजवळ सारखे आहेत, फक्त त्यांच्या उपयोजनाबाबत काही भेद आहेत.

१) प्रमाण मराठीतील चतुर्थी विभक्तीचा ल प्रत्यय वऱ्हाडीत 'ले' असा उच्चारला जातो. मले, तुले, पोराले

२) चतुर्थ विभक्ती 'स' या प्रत्ययाचे अनेकवचन मराठीतील अनेकवचनापेक्षा थोडेसे वेगळे असते. उधा. बापस - बापाईस, माणसाला - माणसाईले

३) सर्वनामांना जे विभक्ती प्रत्यय लागतात त्या प्रत्ययांचेही स्वरूप थोडेसे भिन्न आहे.

४) प्रथम पुरुषी भविष्यकाळी क्रियापदाचे जे रूप मराठीत वापरले जाते त्यापेक्षा थोडेसे वेगळे रूप वऱ्हाडी बोलीमध्ये वापरले जाते.

उदा. मी म्हणाले - मी म्हनलं, मी बसेन - मी बसंल.

५) भूतकाळी रूपांस 'नि' लावण्याची प्रथा वऱ्हाडीत आहे. धाडलेनि, करलेनि.

६) प्रमाण मराठीतील 'ला' या कृदन्त ऐवजी वऱ्हाडीत 'ले' कृदन्त वापरले जाते.

करायला - करायले, धरायला - धरायले.

७) वऱ्हाडीत स्त्री पुल्लिंगी रूपांचा वापर करते. मी जातो, बसतो, यतो इत्यादी.

८) 'उन' या आख्यता प्रत्ययाऐवजी वऱ्हाडीत 'ओन' हा प्रत्यय वापरतात. करून - करोन, जावून - जाओन, मारून - मारोन.

- **वऱ्हाडीचा शब्दसंग्रह**

प्रमाण मराठी भाषेपेक्षा वऱ्हाडी बोलीमध्ये खास असे वेगळे प्रादेशिक शब्द असलेले दिसून येतात.ते असे अवंदा - यंदा, इंधन - सर्पण, कीर - रेघ, डोलची - बादली, थायली - थाळी, डांग - झाडाची फांदी, दाल्ला - नवरा, धुरकरी - गाडीवान इत्यादी. वऱ्हाडी बोली ज्या प्रदेशात बोलली जाते. त्या प्रदेशात सर्वच ठिकाणी सारख्याच पद्धतीने बोलली जाते असे नाही तर त्यामध्येही फरक असलेला दिसून येतो. दर दहा मैलांवर भाषा बदलते या प्रमाणे वऱ्हाडी बोलीमध्येही काही स्तरभेद असलेले दिसून येतात. यापैकी मध्यप्रदेशातील बस्तर, रायपूर आणि महाराष्ट्रातील चंद्रपूर, भंडारा या परिसरात वास्तव्य करणारे हळब लोक थोडीशी वेगळी बोली बोलतात. या बोलीस 'हळबी' असे म्हणतात. तर 'पोवारी' बोली ही 'पोवार' या शेतकरी जमातीची आहे. ती जमात बालाघाट आणि भंडारा या ठिकाणी राहते.

- **कोकणी बोली**

कोकणी ही मराठीची महत्त्वाची बोली म्हणून ओळखली जाते. कोकणी ही एक स्वतंत्र भाषाच आहे असे मत आणि त्याला आवश्यक असा प्रचार कित्येक वर्षापासून सुरू केला आहे. त्यामुळे कोकणी ही

मराठीच्या संदर्भातील वादग्रस्त बोली आहे. म्हणजे कोकणी मराठीची बोली आहे की स्वतंत्र भाषा आहे वगैरे. याबाबत सतत उलटसुलट चर्चा होताना दिसते. याला स्थानिक राजकारण आणि स्थानिक अस्मिताही कारणीभूत असलेली दिसून येते. प्रमाण मराठीशी अनेक अंगानी साधर्म्य असूनही मराठी भाषकांना तिचे चटकन आकलन होत नाही. भाषाअभ्यासक ग्रिअर्सनने मात्र कोकणी ही मराठीचीच बोली आहे असे आवर्जुन सांगितले आहे.

पश्चिमघाट आणि अरबी समुद्र यांच्या दरम्यान आलेल्या अरुंद पट्टीला कोकण या नावाने सामान्यत: ओळखले जाते. या प्रदेशात प्रमुख्याने ठाणे, कुलाबा, रायगड हे जिल्हे तसेच मुंबई व तिची उपनगरे रत्नागिरी जिल्हा, गोवा या भागाचा समावेश होतो. कोकण या प्रदेशावरूनच येथील बोलीला कोकणी हे प्रादेशिक नाव पडलेले आहे. तिनशे मैलांहून अधिक लांबी असलेल्या उभट चिंचोळ्या प्रदेशात सर्वच प्रकारची कोकणी बोली बोलली जात नाही. कोकणीचे उत्तर कोकणी, मध्य कोकणी, दक्षिण कोकणी असे तीन प्रकार पडतात. कोकणी बोलीचे मुख्य तीन भेद पडत असले तरी यामध्ये पुन्हा अंतर्गत स्थानिक भेद असलेले दिसून येतात. याशिवाय समाजातील वेगवेगळ्या स्तरांनुसार, जातीनुसार भेद असलेले दिसून येतात. त्यामध्ये मुख्यत: चित्पावनी, गौड, सारस्वतांची, ठाकरी, कुणबी इत्यादी बोली आढळतात. गोव्यात ख्रिश्चनांचे वास्तव्य आहे. त्यांच्या किरिस्ताव बोलीचाही एक कोकणी भेद दिसतो.

● **कोकणीची स्वनिम प्रक्रिया**

१. कोकणी बोलीमध्ये अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, ओ, अे, ओ हे स्वर आढळतात. यापैकी 'ए' आणि 'ओ' म्हणजे दीर्घ 'ए' किंवा दीर्घ 'ओ' होत. 'अ' म्हणजे ऱ्हस्व विवृत 'ओ' आहे.

२. कोकणी बालीमध्ये 'च' व्यंजने दन्त्य 'च' वर्गीय व्यंजने आणि दन्त्य तालव्य 'च' वर्गीय व्यंजने आहेत.

३. 'स्' च्या पु इ, ए हे तालव्य स्वर जर आले तर त्यांचा उच्चार मराठीप्रमाणे कोकणीतही श् असा होतो.

४. स्वनपरिवर्तनाच्या प्रक्रियेत व्यंजनयुग्माच्या जागी व्यंजन येतात त्यामागील स्वर दीर्घ होण्याची प्रक्रिया प्रमाण मराठी प्रमाणे कोकणी बोलीतही आढळते.

कोकणी बोलीची स्वनिम व्यवस्था ही सर्वसाधारणपणे प्रमाण मराठीच्या स्वनिम व्यवस्थेपेक्षा वेगळी आहे.

● **कोकणी बोलीची व्याकरणव्यवस्था**

कोकणी बोलीची व्याकरणव्यवस्था ही प्रमाण मराठीपेक्षा अनेक बाबतीत वेगळी असलेली दिसून येते.

१. तृतीयेचा प्रमाण मराठीतील एकवचनी प्रत्यय 'ने' आहे, तो कोकणीत 'न' असा होतो.

२. कोकणीतील षष्टीचा 'चो' हा प्रत्यय प्रमाण मराठीतील 'चा' शी साम्य सांगणारा आहे.

३. पुल्लिंगी नामाच्या प्रथमेच्या एकवचनात मराठीत जेथे 'आ' आढळतो तेथे कोकणीत 'ओ' आढळतो. मात्र अशा नामांचे एकवचनी रूप प्रमाण मराठीप्रमाणे कोकणीतही एकारान्त होते.

४. कोकणीत 'मी' या अर्थी 'हाव' हे सर्वनाम असले तरी त्या सर्वनामाची द्वितीया, चतुर्थ, पंचमी, षष्टी आणि सप्तमीची विभक्ती रूपे मी प्रमाणेच दिसतात.

५. कोकणीच्या सर्वनाम विभक्तीचा विशेष म्हणजे स्त्रीलिंगी-ती, नपुसकलिंगी-ते यांची रूपे वेगळी नाहीत. ती पुल्लिंगी 'तो' च्या रूपाप्रमाणेच होतात.

६. कोकणीत प्रमाण मराठीप्रमाणे धातूस 'ल' हा प्रत्यय लावून भूतकाळी रूपे साधली जातात.

**● कोकणीचा शब्दसंग्रह**

कोकणी बोलीचा शब्दसंग्रह हा प्रमाण मराठीशी एकाचवेळी साधर्म्य आणि वैधर्म्य सांगणारा आहे तो असा-

सहायु (सहाय्य), विचारू (विचार), तम्मि (तुम्ही), अम्मि (आम्ही), बा (बाप) असे अनेक शब्द कोकणी मराठी जवळीक सांगणारे आहेत. पण अड्डि (हरकत), मरवार (समोर), घो (नवरा), चॅडवो (मुलगी), भुरगे (लहान मुल) असे शब्द प्रमाण मराठीला दूरचे असणारे आहेत. कोकणीचे रूप हे आगळेवेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. मराठीच्या इतर बोलींपेक्षा कोकणीच्या या लक्षणीय स्वरूपाची नोंद घेताना ग्रिअर्सन म्हणतो ''मराठी बोलीभाषांचे पुरक भाषिक दृष्टीने कमी महत्त्वाचे आहेत. पोटभाषा अशी खरोखर एकच ती म्हणजे कोकणी होय.'' यावरून आपल्याला कोकणीचे वेगळेपण लक्षात येते.

**● अहिराणी बोली**

मराठीच्या बोलीभाषांपैकी अहिराणी ही एक महत्त्वाची बोली आहे. पुणे नाशिकजवळील शिष्ट अभिजात मध्यवर्ती मराठीच्या जवळचाच या भाषेचा प्रांत असल्याने हीच्या अभ्यासास विशेष महत्त्व येते. उत्तरेकडील गुजराती भाषेचा निकटचा सबंध आल्यामुळे गुजरातीचा ठसा या बोलीभाषेवर उमटला आहे. या भाषेला प्रांतावरून खानदेशी असेही नाव पडले आहे. उत्तरेकडील आभीर लोक खानदेशात येवून स्थिरावले असावेत. अहिराणी हे नाव या बोलीस अभिरांच्यावरून पडलेले दिसते. साधारणपणे या भाषेचे क्षेत्र पूर्व व पश्चिम खानदेशी हे दोन जिल्हे, दक्षिणेकडील नाभिक जिल्ह्याच्या उत्तर हद्दीपर्यंत व उत्तरेकडील बऱ्हाणपूरापर्यंत आहे. अशा या विस्तृत क्षेत्रात तिचा वापर आलेला दिसता. हा विस्तृत प्रदेश लहानमोठ्या डोंगरपर्वतांनी बनलेला असल्याने स्थानपरत्वे या बोलीच्या स्वरूपात फरकही पडतो. तापी, नर्मदा व सातपूडा पर्वतांमधील भिल्ल, ठाकूर, गोंड, कातकरी, वारली इत्यादी लोकांच्या बोलण्यातही ही भाषा येते. त्यामुळे मराठीच्या या बोलीचे आणखी पोटभेद झालेले आढळतात. नाशिकच्या वर थोडासा प्रवास केला की, लगतच्या शिष्ट लोकांच्या भाषेत देखील पाच दहा शब्दागणिक 'भाऊ', 'बा रे' हे शब्द आल्याखेरीज राहत नाहीत. खानदेशातला 'काय भाऊ' हा शब्द प्रयोग परिचित आहे. त्याचप्रमाणे या बोलीची दुसरी ढोबळ खूण म्हटली म्हणजे 'ळ' काराबद्दय 'य' कार येतो ही होय. उदा. डोया - डोळा, कावीय - कावीळ, मी करून राहिलो आहे, येवून राहयलो,

वाचून राहयलो, इत्यादा चालू वर्तमानकाळाचे प्रयोग वापरतात. तसेच बोलण्यामध्ये डिक्री, अखोर, बश, खेसर, जोयजे वगैरे प्रांतिक शब्दविशेष पहावयास मिळतात. खानदेशी किंवा अहिराणी बोलीच्या या ढोबळ खूणा आहेत.

● **अहिराणीची स्वनिमप्रक्रिया :**

१. 'स' बद्दल 'छ' छदा. सोड - छोड, सावली - छावली

२. ल बद्दल ळ उदा. लकार - ळकार,

३. ण बद्दल  नयेतो. पानी, वानी, पन, जाने

३. त बद्दल ट येतो. माती - माटी

४. र च्या पुढे उ आल्यास र चा ल होतो. रडू-लडू, परडे-पल्डें.

● **अहिराणी विभक्तीप्रक्रिया :**

१. अहिराणी बोलीत प्रमाण मराठीप्रमाणे तिन लिंगे आणि दोन वचने आहेत. या बोलीत विभक्ती प्रत्यय लागता नामाचे सामान्य रूप होत नाही.

२. अहिराणी विभक्तीचे प्रत्यय दोन्ही वचनात एकच आहेत. फक्त अनेकवचनी नामास प्रत्यय लागण्यापूर्वी अनेकवचन दर्शक 'स' हा प्रत्यय लागतो असे दिसते. या बोलीत सर्वनामाची विभक्तीरूपे वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

३. या बोलीत तिन्ही पुरुषात क्रियापदाचे एकच रूप चालते. तसेच कर्त्याच्या लिंगाचा क्रियापदावर कोणताच परिणाम होत नाही. उदा. मी फेक, तू टाक, त्यांनी टाक.

४. या बोलीत धातूचे मूळ रूप वापरून भूतकाळ दर्शवला जातो. कित्येकदा भूतकाळ करण्यासाठी 'नु', 'नुत', 'नो', 'नात' हे प्रत्यय लावले जातात.

उदा. मी बोलनू, बोलनूत

● **अहिराणीचा शब्दसंग्रह :**

अहिराणी ही बोलीभाषा जरी आर्याद्भव असली तरी, तिच्यात तत्सम शब्दाचा वापर की होतो. कारण या बोलीचे रूप बोलभाषिक आहे. तिला लेखनाची परंपरा ही अलिकडच्या काळात प्राप्त झाली आहे. कवयित्री बहिणाबाई यांच्या काव्यरचना अहिराणीतच आहेत. अर्धतत्सम शब्द आणि तद्भव शब्द अहिराणीत अधिक आढळतात. गाई, घर, शेत, परसाद इत्यादी. अरबी, पोर्तुगीत, फारसी, इंग्रजीती शब्द अहिराणीत जसेच्या तसे आलेले दिसून येतात. उदा. जागा, तारीक, सवाल, पगार, खमिस, तिकीट, बालिस्टर इत्यादी. अहिराणीत गुजराती शब्दही आढळतात. असे असले तरी अहिराणीचा स्वतःचा शब्दसंग्रह आहे. प्रमाण मराठी बोलणाऱ्यांना हे शब्द सहज लक्षात येत नाहीत. उदा. अंडशेर (मुलगा), झोऱ्या (सतरंजी), काव (दार), साक (भाजी).

अहिराणी बोलीवर गुजरताचा प्रभाव लक्षात घेवून ग्रिअर्सनने अहिराणी ही गुजरातीची बोली आहे असे मत नोंदलवे आहे. पण या बोलीचे मराठीशी असलेले नाते अतुट आहे. यासंदर्भात अहिराणी गुजराती वादावर १९३५ मध्ये श्री. ना. गो. चाफेकर, कृ. पां. कुलकर्णी, चि. ग. कर्वे यांनी अभ्यासांती अहिराणी ही मराठीचीच बोली असल्याचे सांगितले. यामध्ये त्यांनी अहिराणीती मराठी गुजराती शब्दाचे प्रमाण १००:४१ असे आहे. षष्टी वगळता अहिराणतील सर्व विभक्ती मराठीप्रमाणे आहेत. आख्यात प्रक्रिया एक ल्यबन्त वगळता मराठीप्रमाणे आहे. तसेच अहिराणीच्या स्वनिमप्रक्रियेवर मराठीचाच प्रभाव दिसतो. त्यामुळे अहिराणी बोली ही मराठीची बोली आहे असे ठामपणे म्हणता येते.

- **चंदगडी बोली :**

पश्चिम महाराष्ट्रात बोलल्या जाणाऱ्या मराठीच्या बोलीभाषांपैकी चंदगडी ही महत्त्वाची बोली आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये सर्वात शेवटी गोवा कर्नाटकच्या सीमेलगत असणाऱ्या चदंगड परिसरात ही बोली दिसून येते. येथील समाज बोलत असलेली चंदगडी कोणा जाती-जमातीची बोली नसून ती विशिष्ट प्रदेशाची बोली आहे. या बोलीतही प्रदेशनुसार भेद दिसून येतात. स्वतंत्र शब्दसंग्रह, व्याकरण व्यवस्था उच्चारवैशिष्ट्य इत्यादी बाबतीत या बोलीभाषेने स्वत:चे वेगळेपण जपले आहे असे दिसून येते. कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुका, बेळगावच्या सीमाभागातीह काही गावे, दोडामार्ग, सावंतवाडी तालुक्यातील काही गावे, आजरा तालुक्यातील दक्षिणेकडील काही भाग अशा विस्तृत प्रदेशात ही बोली बोलली जाते. चंदगडी बोलीचे पश्चिम विभाग आणि पूर्व विभाग असे दोन विभाग करता येतात. भाषाभ्यासक डॉ. नंदकुमार मोरे यांनी या बोलीवर स्वतंत्र संशोधन केले असून त्यांच्या या संशोधनामुळे या बोलीला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे. तसेच विद्यापीठीय पातळीवर ही बोली अभ्यासक्रमात लावण्यात आली आहे.

कोणतीही बोली तिच्या वैशिष्ट्यपूर्ण उच्चारशैलीमूळे वेगळी ठरत असते. तिचा शब्दसंग्रह, व्याकरणातील विशेष, वाक्यरचना या गोष्टी त्या बोलीचे वेगळेपण सिद्ध करत असतात. तसेच बोलीतील उच्चार, हेल, बलाघात यांची तुलना प्रमाणभाषेशी करता बोलीचे वेगळेपण ध्वनीत होताना दिसते. चंदगडी बोलीची काही उदाहरणे पाहता येतील. चंदगडी बोलीतील स्त्रिया 'मिय्या जेवलो', 'मिय्या बाजारास गेल्लो' असे बोलतात. वार्कीयातील क्रियापदे पुल्लिंगी आहेत. या बोलीचे उच्चारण हे या बोलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ही बोली हेल काढून बोलली जाते. उदा. 'जाऊलेयास...' हा शब्दप्रयोग 'तू जात आहेस' या अर्थाने वापरला जातो. 'तिया यल्लीस' म्हणजे 'तू आली होतीस का?' अशा विशिष्ट सुरावटीमध्ये बोलले जाते. या ठिकाणी 'तू' हे सर्वनाम 'तिच्या' असे होते. ही उच्चारसरणी, सुरावट कोकणी बोलीशी साधर्म्य सांगणारी आहे.

ही बोली सीमाभागातील काही गावांमध्ये बोलली जात असल्याने शिवाय चंदगडला कर्नाटक जवळ असल्याने पूर्व विभागतील बोलीवर कन्नडचा प्रभाव पडलेला दिसतो. कण्णं (केव्हा), तण्णं (तेव्हा), कास (कशाला), खट्टे (कोटे), गसली (गेल्या वर्षी), तवरस्क (तोपर्यंत), चकोट (चांगले), मिय्या (मी) असे शब्द पूर्ण भागात दिसतात. या भागामध्ये तूज, माज, त्यास, तिण्णं, मिण्णठ, त्यण्णांणी, हयण्णांणी अशी सर्वनामे वापरली जातात. 'कासणी ते', 'खट्टे गेल्ल्यास', 'कण्णांच्यान सोदूलोय मसोटीत गेल्लास काय', अशी वाक्ये

त्याच्या उच्चारामुळे वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

चंदगडी बोलीतील विशेषणे पाहिली तर त्यामध्येही वेगळेपण आढळून येईल. दांडगा (मोठा), व्हलस (घाण), बुरसा (घाणेरडश), आंबरसूका (ओलसर), कळकोट (भांडणे काढणारा), कळखोचरा (भांडणे उकरून काढणारा), काटकोळा (बारीक), धबला (जाडा), हुसभुरक्या (लाज नसलेला), व्हळके (होय होय म्हणणारी) इत्यादी तसेच हिरवट, तांबा भडक, मातकट, पिवळाधम्मक ही रंगावाचक विशेषणे. नाकाडा (लहान), नकबर (चिमुटभर), दांडगा (मोठा), वावभर (एक मिटर), उलासका (थोडासा) अशी आकारमानवाचक विशेषणे तर हिजडी, देवचार, जोकता, खज्जाळी, हुसभुर्की ही शिवीसदृश्य विशेषणे वैशिष्ट्यपूर्ण असलेली दिसतात.

### ४.४ समारोप :

उपरोक्त घटकातील विवेचनाचा विचार करता असे म्हणता येते की, १९६० नंतरच्या कालखंडामध्ये समाजभाषाविज्ञान ही भाषाविमानाची शाखा अधिकाधिक महत्त्वाची ठरते आहे. समाजविज्ञान आणि भाषाविज्ञान यांच्यातील संकलपना व अभ्यासपद्धती यांच्या देवाणघेवाणीतून उदयाला आलेली ही आंतरविद्याशाखीय ज्ञानशाखा आज भाषेशी संबंधित अशा विविध क्षेत्रातील अभ्यास करताना दिसते आहे. समाजभाषाविज्ञानाने भाषेच्या अभ्यासाला वेगळी दिशा आणि दृष्टी दिली आहे. सर्वसामान्य माणसाच्या भाषेशी संबंध तिच्या वापरातून येत असतो. समाजभाषाविज्ञान हे समाजात वापरल्या जाणाऱ्या भाषाभेदांचा अभ्यास करते. कोणताही समाज एकसंघ अशी वापरत नाही. त्यामध्ये प्रदेश, व्यवसाय, वय, लिंग, वर्ग, जात यातील भेदानुसार भाषेमध्ये वेगवेगळे भेद निर्माण झालेले असतात. याशिवाय अन्य भाषांच्या संपर्कामुळे वेगवेगळे भेद तयार होतात. समाजभाषाविज्ञान आणि मराठीच्या बोलींचा अभ्यासातही वैविध्यता दिसून येते. भाषेच्या बोलीपैकी प्राय: सुशिक्षित, संस्कृतीत, बुद्धिजीवी, राजमान्य व नागर समाजाची बोली विशेष मान्यता पावते असे दिसून येते. अन्य बोलींच्या भाषकास ती अनुकरणीय वाटते. तिचा शब्दसंग्रह विविधतापूर्ण विस्तृत व समावेशक असतो. वृत्तपत्रे साहित्याच्या लिखानाचे माध्यम म्हणून तिचा वापर होतो. लवचिक स्थिरता हा तिचा प्रधान गुण दिसून येतो. अशा बोलीला मग प्रमाण भाषा म्हणून ओळखले जाते. अशा बोलींकडे पाहण्याचा भाषक समाजाचा दृष्टीकोन स्वाभिमानाचा, मानमान्यतेचा व जागृतीपूर्ण असतो.

●●●